UNIVERSAL
LIBRARY
OU_184420
UNIVERSAL
LIBRARY

# स्वभाव - चित्रें

लेखक

दिनकर वासुदेव दिवेकर

प्रथमावृत्ति १९३४.

किंमत १ रुपया.

प्रकाशक व मुद्रक
**गोपाळ बळवंत जोशी,**
आनंद मुद्रणमंदिर, १९६/४६ सदाशिव पेठ, पुणें.

# आत्मनिवेदन

विजयादशमीच्या सुमुहूर्तावर या ‘ स्वभाव–चित्रांचें ’ पुस्तक वाचकांच्या हातीं देण्यास फार आनंद वाटतो. हीं स्वभाव–चित्रें पूर्वींच निरानिराळ्या मासिकांत व वर्तमानपत्रांत त्या त्या प्रसंगानें प्रसिद्ध झालेलीं आहेत. तीं एकत्र करून पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावीं अशी पुष्कळ दिवसांपासून मित्रमंडळींनीं आग्रहाची सूचनाहि केली होती. त्याप्रमाणें मीं ‘ आनंद ’ छापखान्याचे व्यवस्थापक श्री. गोपाळ बळवंत जोशी यांस विनंति केली व त्यांनीं ती एकदम उत्साहानें मान्य केली. हें पुस्तक मुख्यतः त्यांच्या उत्साहाचेंच फळ होय.

सुप्रसिद्ध इंग्रजी लेखक ए. जी. गार्डिनर यांनीं लिहिलेलीं स्वभाव–चित्रांचीं पुस्तकें वाचल्यापासून मराठी भाषेंत अशीं महनीय व्यक्तींचीं स्वभाव–चित्रें लिहावीं असें वाटत होतें. येथील विजय-छापखान्याचे व ‘ रत्नाकर ’ मासिकाचे व्यवस्थापक श्री. अ. स. गोखले यांनीं ‘ रत्नाकर ’ काढल्यावर त्यासाठीं फार आग्रह केला व यांपैकीं बरींच स्वभाव-चित्रें त्याच मासिकांत प्रसिद्ध झालीं आहेत. ज्या ज्या प्रसंगीं हीं स्वभाव–चित्रें लिहिलीं आहेत त्या त्या प्रसंगीं त्या व्यक्तीचें कार्य विशेष ठळकपणें जनतेच्या डोळ्यांपुढें होतें हें वाचकांच्या ध्यानीं येईलच. महात्मा गांधींचा दांडीचा दौरा संपल्यानंतर त्यांचें स्वभाव-चित्र लिहिलें. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षस्थानीं पं. मोतीलाल नेहरू यांची निवड झाल्यावर त्यांचें स्वभाव–चित्र लिहिलेलें आहे. अशा रीतीनें त्या त्या व्यक्तींच्या आयुष्यांतील कांहीं महत्त्वाचा प्रसंग साधून

हीं सर्व स्वभाव–चित्रें लिहिलेलीं आहेत. लो. टिळकांचें स्वभाव–चित्र म्हणून जें छापलें आहे तें मूळ स्वभाव–चित्र या दृष्टीनें लिहिलेलें नाहीं. परंतु एवढ्या मोठ्या पुढाऱ्यांच्या स्वभाव–चित्रांच्या पुस्तकांत लोकमान्यांच्या नांवाचा उल्लेखहि नसला तर पुस्तक ओकें वाटेल, म्हणून त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्तानें लिहिलेल्या एका लेखांतील कांहीं भाग या पुस्तकांत ग्रथित केला आहे. स्वभाव–चित्रें लिहिणें हें अर्थात् प्रत्यक्ष अनुभवाचें काम आहे. आणि प्रत्येकाचे एखाद्या व्यक्तीच्या स्वभावाविषयींचे अनुभव भिन्न भिन्न असणें अगदीं स्वाभाविक आहे. या दृष्टीनें स्वभाव–चित्रांच्या रेखाटनांत मतभेदास फार जागा असते. अशा स्थितींत हीं स्वभाव–चित्रें रंगविण्यांत कोणास कांहीं चूक झाली असें वाटेल किंवा कोणा चरित्र–विषयाच्या बाबतींत अन्याय झाला असें वाटेल तर तें सर्वस्वीं असमर्थनीय होय असें मानणें अयोग्य होईल याची जाणीव मला आहे.

'आनंद' छापखान्याचे व्यवस्थापक व इतर मंडळी यांचा तर या पुस्तकाच्या बाबतींत मी ऋणी आहेंच. त्यांच्याशिवाय, ज्या मासिकांत व वर्तमानपत्रांत हीं स्वभाव–चित्रें प्रथमतः प्रसिद्ध झालीं त्यांच्या चालकांनीं तीं या पुस्तकांत प्रसिद्ध करण्यास परवानगी दिली याबद्दल मी त्यांचेहि आभार मानतों. पुस्तकांत चित्रें घातलीं आहेत त्यांचे ब्लॉक्स व फोटो केसरी–मराठा संस्था, साहित्य–सेवक छापखाना, व चित्रशाळा प्रेस, यांनीं दिले यासाठीं त्यांच्या व्यवस्थापकांचे आभार मानणें माझें कर्तव्य आहे. तसेंच माझे मित्र श्री. काशिनाथ गंगाधर काळे यांनीं पुस्तकाच्या पानांचीं शेवटचीं मुद्रितें काळजीपूर्वक तपासलीं या गोष्टीचाहि साभार उल्लेख करणें अवश्य आहे.

शेवटीं प्रो. वामन मल्हार जोशी यांनीं माझ्या आग्रहाच्या, किंबहुना हट्टाच्या, विनंतीस मान देऊन रसिक मनानें पण मार्मिक दृष्टीनें प्रस्तावना लिहिली याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें.

दसऱ्याच्या दिवशीं आपट्याच्या झाडाचीं पानें देखील सोन्याप्रमाणें लोक मानतात, त्याप्रमाणेंच ही वाङ्मयसेवा वाचकांनीं गोड करून घ्यावी, एवढी नम्र विनंति करून हें 'सोनें' मी त्यांना देतों.

विजयादशमी,<br>ता. १७ आक्टोबर १९३४.<br>३७३ नारायण पेठ, पुणें नं. २ } दिनकर वासुदेव दिवेकर.

# प्रस्तावना

'केसरी–मराठा' ऑफिसमधील माझे मित्र रा. दिवेकर यांनीं वेळोवेळीं लिहिलेलीं 'स्वभाव–चित्रें' पुस्तकरूपानें प्रकाशित होत आहेत, हें पाहून मला आनंद होत आहे. मराठीमध्यें मुंबईच्या 'विविध-वृत्ता'मध्यें व 'प्रतिभे'मध्यें, नागपूरकडील 'वागीश्वरी' मध्यें, साता-ऱ्याच्या 'ऐक्या'मध्यें व इतरत्र कांहीं सुंदर स्वभाव-चित्रें प्रसिद्ध झालीं आहेत, पण तीं पुस्तकरूपानें बाहेर पडलेलीं नाहींत. इंग्लिशमध्यें ए. जी. गार्डिनर यांनीं लिहिलेलीं Pillars of Society व Prophets, Priests and Kings अशीं दोन पुस्तकें; जी. डब्ल्यू. ई. रसेल यांनीं लिहिलेल Collections and Recollections; एक 'कॉन्झर्व्हेटिव्ह' यांनीं लिहिलेलें Mirrors of Downing Street; तसेंच Portraits of 'Sixties, Portraits of 'Seventies, Portraits of 'Eighties,– अशीं पुस्तकें आहेत. याच धर्तीवर पण लहान प्रमाणांत, रा. दिवेकर यांचें पुस्तक असून मराठींतलें तें कालक्रमानें पहिलें व गुणानें सुंदर असें आहे. यांत लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, न. चिं. केळकर, जवाहरलाल नेहरू, मुकुंदराव जयकर, शिवराम महादेव परांजपे वगैरे बारा व्यक्तींचीं गुणग्राहक दृष्टीनें अवलोकिलेलीं, चटकदार भाषेंत लिहिलेलीं, अलंकारांनीं व सुभाषितांनीं भूषविलेलीं, मनोवेधक दंतकथांनीं व अनुभव--वर्णनांनीं मधूनमधून प्रत्यक्षाभास उत्पन्न करणारीं, अप्रत्यक्ष पणें सद्बोध करणारीं, मधुर व मार्मिक स्वभावचित्रें असून तीं लेखकाच्या लेखन-कीर्तीमध्यें भर घालतील अशी मला खात्री आहे.

कोठलेंहि चरित्र किंवा स्वभावचित्र हातीं घेतलें म्हणजे मला अलीकडे प्रथमच अशी शंका येऊं लागते कीं, एखाद्याचा खरा स्वभाव,

कळणें शक्य आहे काय ? खरा स्वभाव कळण्याला पुरेशी माहिती व साधन-सामुग्री सामान्यतः नसते; जी काय असते ती भक्तांच्या अदोषदर्शी अतिस्नेहामुळें व शत्रूंच्या अकारण पापशंकेमुळें दूषित झालेली असते. शिवाय मनुष्याचें मन त्याच्या भाषणांवरून व कृतींवरून अजमाविणें धोक्याचें आहे. आणखी मुख्य गोष्ट अशी कीं, मनुष्याचा खरा स्वभाव त्याचा त्यालाच कळत नसतो; मग इतरांना तो कसा कळणार ? मनुष्याचें मन इतकें गूढ व गुंतागुंतींचें आहे कीं, तें योग्यांना देखील अगम्य आहे असें मला वाटतें व अलीकडील मनोगाहनशास्त्रानें ( Psycho-analysis नें ) तर मनाचें अगम्यत्व फारच बळावलेलें आहे. सामान्य मनुष्याच्या मनांत काय किंवा थोर मनुष्याच्या मनांत काय, पापुद्र्यांच्या आंत पापुद्रे, कोशांच्या आंत कोश असतात. त्यांतील विकसित विचार-विकार-पुष्पांशेजारीं कीड पडलेल्या व गळूं लागलेल्या विचार--विकार--कलिका असतात. थोरपणाच्या दिव्याखालीं क्षुद्रपणाचा अंधार असतो व क्षुद्रपणाच्या पड्याआड थोरपणा लपलेला असतो. उदारवृत्तीच्या माणसांमध्येंहि क्वाचित्-प्रसंगीं अहंभाव असतो. Vanity is the last infirmity of noble minds असें म्हटलेलेंच आहे. तसेंच ग्रीस देशांतील तत्त्वज्ञ-तपस्वी डाओजेनीस हा शिकंदर बादशहाला भेटण्यास गेला, तेव्हां नेहमींचें फाटकें जाकीट त्यानें कांहीं बदललेलें नव्हतें. तेव्हां शिकंदर-बादशहा मार्मिकपणें म्हणाला, ‘ डाओजेनीस, तुझ्या जाकिटाच्या भोकांतून अहंकार डोकावत आहे. ’ ( Pride is peeping through the holes of your jacket. ) आणि या म्हणण्यांत पुष्कळ तथ्यांश आहे. उलटपक्षीं टिळक–आगरकर किंवा टिळक–गोखले यांच्या आपाततः क्षुद्र दिसणाऱ्या भांडणांच्या पाठीमागें उदारतत्त्वें नव्हतीं असें कोण म्हणेल ? घरगुती उदाहरणें द्यावयाचीं म्हणजे बायकांच्या क्षुद्र कंजूषपणांत व अप्पलपोटेपणांत स्वार्थत्यागी अपत्यप्रेम

नसतें असें नाहीं. अलीकडील मनोगाहनी ( Phycho-analysts ) धर्म, नीति, कला, ज्ञानलालसा, इत्यादि संस्कृति-कमलांची उत्पात्ति कामवासनेच्या चिखलांत शोधूं पाहतात हें जरी चुकीचें असलें तरी मनोपुष्पांचीं मूळें, नद्यांच्या व ऋषींच्या मूळांप्रमाणेंच, गूढ व भाविकांच्या भक्तीला धक्का देणारीं असतात हें कांहीं खोटें नव्हे. उलटपक्षीं महंमदीयांच्या 'कुराण अगर तलवार' या धोरणांत कांहीं चांगलें नव्हतें, किंवा सुयोधनाच्या ( दुर्योधन हें नांव मागाहूनचें आहे ) धोरणांत कांहींच अर्थ नव्हता, असेंहि म्हणतां यावयाचें नाहीं. हॅम्लेटच्या वेडेपणांत जशी एकप्रकारची सुसंगति होती, त्याचप्रमाणें न्यायनिष्ठुर लोकांच्या कठोरपणांतहि कित्येक वेळां प्रेमळपणा गूढ असतो.

मनुष्याच्या मनांतील अशा प्रकारच्या उभयविध विरोधाभासाचा मुद्दा स्पष्ट करण्याकरितां या पुस्तकांतील नरवीरांचीं उदाहरणें घेतां येतील. महात्मा गांधींच्या प्रमाद--हिमालयांतून एखाद्या तत्त्वगंगेचा उगम होत असेल हें जितकें संभवनीय आहे, तितकेंच त्यांच्या सत्याग्रह--गंगेंत दुराग्रहाचा ओढा मिळणेंहि संभवनीय आहे. जवाहरलाल नेहरूंच्या पराक्रमांत आदरणीय स्वार्थत्याग असणें जितकें संभवनीय आहे, तितकेंच त्यामध्यें अविचारी साहस लपून असण्याचा संभव आहे.

थोर लोकांच्या बाबतींत ही स्वभावविषयक दुर्गमता विशेषेंकरूनच भासते. मोठेपणा म्हटला कीं गैरसमज त्याच्याबरोबर आलाच. To be great is to be misunderstood असें म्हणतात तें खोटें नाहीं. मोठेपणा समजण्यास स्वतःच्या अंगीं तेवढा मोठेपणा बीजरूपानें तरी असावा लागतो. वीर-पुरुषाच्या हुजऱ्याला त्याचा मोठेपणा दिसत नाहीं. हिमालयावरील मानससरोवराचें ज्ञान पायथ्यापाशीं घोंटाळणाऱ्या कावळ्याला काय होणार? कांहीं मोठ्या लोकांच्या स्वभावांत परस्परविरुद्ध इतक्या प्रवृत्ति, वासना, आशा, आकांक्षा, वगैरे असतात कीं अंशतः पाहणाऱ्यांना त्यांत कांहीं संगति असेल

असें वाटत नाहीं. त्यांत त्यांना विसंगति दिसते. भाषणांतील किंवा वर्तनांतील दर्शनी सुसंगति हें कांहीं खऱ्या थोरपणाचें लक्षण नाहीं. Consistency is the virtue of an ass हें तत्त्व पुष्कळांच्या ध्यानांत नसतें, आणि मग ते ' सुसंगती ' चें शंख-वाद्य वाजवीत थोरां-मोठ्यांवर तुटून पडतात आणि स्वतःस हास्यास्पद करून घेतात. विभूतींचें विभूतिमत्त्व कळण्यास सुलभ असतें तर आपल्या इकडील साधुसंतांचा, किंवा युरोपमधील साक्रेटिसाचा किंवा ख्रिस्ताचा छळ कशाला होता ? बौद्धिक क्षेत्रांत, कीं जेथें भावनांचा फारसा संबंध येत नाहीं, तेथें शंकराचार्यांसारख्यांचा अद्वैतसिद्धान्त किंवा आइनस्टाईन-सारख्यांचा ' सापेक्ष ' वाद कितीकांना समजण्यासारखा आहे ? थोर विभूतींचा स्वभाव तर समजण्यास याहूनहि कठिण आहे. कारण त्यांपैकीं कांहींचा स्वभाव दिसण्यांत जितका साधा तितका संमिश्र असतो, त्यांत सरलतेबरोबर वक्रताहि असते, उच्चत्वाप्रमाणें खोल-पणाहि असतो ! कित्येक थोर लोकांचें मन जितकें कोमल तितकें प्रसंगीं कठोर होतें, तें कुसुमापेक्षां कोमल व वज्रापेक्षां कठिण असें असतें. तें गंगाप्रवाहाप्रमाणें स्वच्छ असतें, पण एखाद्या मौल्यवान् रसायनाप्रमाणें मृत्तिकेचाहि रंग धारण करतें. त्यांचा स्वभाव जितका गोड तितकाच वेळेनुसार कडू. त्यांत आंत-बाहेर असें कांहीं नसतें व असतेंहि ! दुसरे कांहीं थोर लोक मनांत दुःखी-कष्टी असतांना सुद्धां बाहेर आनंदी चेहरा ठेवतात, उजव्या हातानें केलेला परोपकार डाव्या हाताला कळूं देत नाहींत, इतरांच्या गुणपरमाणूंना ते पर्वताचें रूप देतात व स्वतःचे गुण दोषस्वरूप आहेत असें दाखवितात ! कित्येक विभूति अशा असतात कीं, लोकांना भोग मिळावा म्हणून ते स्वतः त्यागी व लोकांना प्रवृत्तिपर करतांना त्यांच्या मनांत निवृत्ति ! अशा या अनेकविध अलौकिक विभूतींचें मन ओळखावयाचें कसें व कोणीं ? त्यांत पुनः मनोगाहनी ( Psycho-analysts ) म्हणतात त्याप्रमाणें

अबुद्धिपुरःसर प्रवृत्तींची व वासनांची भानगड. आणि मनें जाणण्याचीं आपलीं साधनें काय, तर बाह्य कृति, मित्रांची स्तुति, शत्रूंची निन्दा, आणि तटस्थांच्या कर्णकथा व दंत-कथा !

म्हणजे याचा अर्थ असा नव्हे कीं, आपण थोर लोकांचीं चरित्रें लिहिण्याचा प्रयत्न करूं नये किंवा तीं वाचूं नयेत. तीं लिहितांना किंवा वाचतांना सावधगिरी किती ठेवली पाहिजे हें दर्शविण्याकरितां वर जें लिहिलें तें लिहिलें आहे. पूर्णपणें यथार्थ ज्ञान होणें शक्य नाहीं हें जरी ठाऊक असलें तरी मनुष्यमात्रांत जोंपर्यंत जिज्ञासा आहे तोंपर्यंत तो इतरांच्या विषयीं चौकसबुद्धि धारण करणारच व थोर विभूतींविषयीं तर तो विशेषच चौकस असणार. त्यांच्याविषयीं पूर्ण जरी नाहीं तरी जेवढी मिळेल तेवढी माहिती मिळाली म्हणजे त्याचें तेवढें समाधान होतें व यांत वावगें असें कांहीं नाहीं.

पण सहानुभूति, सत्यप्रीति, कल्पनाशक्ति व मार्मिकपणा असल्याशिवाय स्वभाव-ज्ञान यथार्थ होणें अशक्यप्राय आहे आणि म्हणूनच चरित्रलेखकामध्यें हे गुण असून सत्यकथनाचें धैर्यहि त्यांच्या जोडीला असावें लागतें. प्रस्तुत स्वभावचित्रें लिहिणाऱ्या रा. दिवेकरांमध्यें हे गुण असल्यामुळें त्यांचीं हीं शब्दचित्रें वाचनीय व मननीय झालीं आहेत.

रा. दिवेकरांनीं चरित्रनायकांचें सबंध चरित्र विस्तरशः दिलेलें नाहीं व त्यांच्या गुणदोषांची साधकबाधक सांगोपांग चर्चा केलेली नाहीं, तर जणूं कांहीं त्या चरित्रनायकाचा एखादा चांगल्या ओळखीचा मनुष्य आपणांला भेटला आहे व त्याविषयीं सहानुभूतीनें आपणांशीं बोलत आहे आणि ही माहिती सांगण्यांत तो रंगला आहे अशा पद्धतीनें हीं शब्दचित्रें काढलेलीं आहेत. अर्थात् प्रत्यक्ष अनुभवाच्या कांहीं गोष्टी, वाचनानें मिळविलेली माहिती, कांहीं कर्णकथा, इत्यादिकांचा सुंदर मिलाफ झाला आहे. रा. दिवेकरांना वर्ण्य विषयाशीं तादात्म्य पावून पुनः स्वतःचें स्वत्व कायम ठेवण्याची कला चांगली साधली आहे आणि त्यांची वर्णनशक्ति व भाषाप्रभुत्व हीं घेतलेल्या भूमिकेला साजेशीं आहेत.

ललितवाङ्मयांत कादंबरी आणि लघुकथा यांचीं ध्येयें, व यांच्या रचना पद्धति, हीं जशीं निराळीं त्याप्रमाणेंच चरित्रें आणि स्वभावचित्रें यांमध्यें फरक मानावा लागणार आहे. चरित्रामध्यें सर्व माहिती संकलित करून विस्तारानें दिलेली असते; स्वभावचित्रामध्यें मनांत भरेल अशी महत्त्वाचीच माहिती थोडक्यांत दिलेली असते. चरित्रामध्यें तार्किक सत्यप्रीतीचा पगडा असतो व जेथें तेवढा पुरावा असेल तेथें तेवढेंच विधान करावयाचें अशी वृत्ति असावी लागते. स्वभावचित्रें लिहिणाऱ्याला सत्यप्रीति अवश्य पाहिजेच, पण त्याला जें सत्य दिसेल तें तो सांगतो व पुराव्यांच्या भानगडींत तो सहसा पडत नाहीं, व पडलाच तर तो स्वतःच्या अभिरुचीला व भावनांना पटलेला पुरावा इतरांना पटेल अशा रीतीनें मांडतो. चरित्रलेखकाचें लक्ष चित्राच्या जिवंतपणापेक्षां साधारतेकडे अधिक असतें; स्वभावचित्रकाराचें लक्ष साधारतेपेक्षां जिवंतपणाकडे अधिक असतें. चरित्र वाचीत असतां रानांत शिरल्यासारखें होऊन विशिष्ट तरूंकडेच अधिक लक्ष जात व सबंद रान कसें दिसत असेल याची कल्पना चांगलीशी होत नाहीं. स्वभावचित्र वाचलें म्हणजे टेकडीवर बसलेल्या एखाद्या रसिकाला तें रान कसें दिसलें याची कल्पना होते. चरित्रलेखक अधिक वस्तुनिष्ठ असतो; स्वभावचित्रकार चरित्रनायकाची स्वभावसृष्टि स्वतःच्या दृष्टीनें दिग्दर्शित करतो. चरित्रें चांगलीं लिहावयाचीं म्हणजे तीं माहितीचीं पोतडीं असून उपयोगी नाहींत, तर त्यांत प्रमाणबद्ध व कलायुक्त मांडणी पाहिजेच; पण त्यांत कलात्मकतेपेक्षां कांटेतोल खरेपणाला विशेष महत्त्व आहे. स्वभाव-चित्रांमध्यें बारेमाप विधानांना वाव नाहीं, पण वैयक्तिक कल्पनांना व भावनांना मज्जाव नसतो, कारण या चित्रांमध्यें चित्रविषयाच्या भाव-भावनांप्रमाणेंच चित्रलेखकाच्या भाव-भावनाहि जाणण्याची व त्यांची गोडी चाखण्याची वाचकांची इच्छा असते. चरित्र वाचीत असतां चरित्रलेखकाचेहि विचार-विकार वाचकांना प्रतीत होत असतातच व त्यांचाहि आस्वाद तो घेतच असतो, पण विशेष भर चरित्रविषयीभूत व्यक्तीच्या विचार-विकारांवरच सामान्यतः असतो.

आतां कांहीं चरित्रलेखकहि असे असतात कीं, ते वर्ण्य नायकाचें चरित्र चिकित्सापूर्वक विस्तारानें देतात, गुणावगुणांविषयीं साधक-बाधक चर्चाहि करतात व त्यांचें चित्र कलात्मक व जिवंतहि असतें ! उदाहरणार्थ, महाराणी व्हिक्टोरिआचें चरित्र लिहिणारा स्ट्रॅची; तसेंच डिझ्रेली व शेली यांचीं चरित्रें लिहिणारा आंद्रे मॉरवाँ ( Andre **Maurois** ) यांचीं चरित्रें इतकीं चांगलीं आहेत कीं, त्यांतील नायकांइतकेंच लेखकांचेंहि कौतुक वाटतें ! तसेंच कार्लाइलसारखे लेखक French Revolution सारख्या व्यापक विषयावर विस्तारानें लिहितांना जिवंत स्वभावचित्रें उभीं करूं शकतात व चरित्रविषयीभूत व्यक्तींचें ज्ञान होत आहे या आनंदाबरोबरच कार्लाइलच्या लेखनकलेच्या रसास्वादाचा वाचकाला आनंद होत असतो. हें जरी खरें असलें तरी सामान्यतः चरित्रें व स्वभाव-चित्रें यांमध्यें वर दर्शविल्याप्रमाणें फरक करतां येईल, व **प्राधान्येन व्यपदेशाः भवन्ति** या न्यायानें तो मान्य करण्यासहि हरकत येणार नाहीं.

रा. दिवेकरांच्या स्वभाव-चित्रांकडे या दृष्टीनें पाहतां तीं बरींच यशस्वी आहेत असें म्हटलें पाहिजे. पण त्यांत वैगुण्यें नाहींत असें नाहीं. स्वभावचित्रांमध्यें वैयक्तिक आवडी-निवडीला जागा आहे हें खरें, पण या आवडी-निवडीलाहि मर्यादा आहेतच. रा. दिवेकरांना बहुतेक चरित्रनायकांविषयीं इतका आदर वाटतो कीं, ते जणूं कांहीं त्यांच्या भक्तगणांपैकीं आहेत असें वाटतें. ते चरित्र-नायकाचा एखाद–दुसरा दोष दाखवितात, पण स्वभावचित्राला उठाव देण्याकरितांच तो दाखवितात कीं काय असा भास होतो. असें एकवेळ कबूल करतां येईल कीं लोकमान्य टिळक किंवा महात्मा गांधी यांमध्यें कांहींहि दोष नाहींत; निदान तसें एखाद्याचें मत असलें तर तें रसयुक्त भाषेंत रंगविण्यास कांहींच हरकत नाहीं. पण कांहीं समंजस लोकांना त्यांमध्यें दोष दिसतात याची दखलगिरी लेखकाला पाहिजेच, आणि साधकबाधक चर्चा जरी केली नाहीं तरी कोणत्या दृष्टीनें त्या आरोपित दोषांचें निरा-

करण करतां येईल याचें भावनेच्या भाषेंत कां होईना दिग्दर्शन पाहिजेच. असें दिग्दर्शन या पुस्तकांत कित्येक ठिकाणीं दिसत नाहीं.

दुसरें वैगुण्य असें कीं कांहीं कांहीं स्वभावचित्रांच्या दृष्टीनेंहि महत्त्वाचे म्हटले पाहिजेत अशा प्रसंगांचा किंवा प्रकरणांचा कित्येक चित्रांत उल्लेख नाहीं. अनेकांपैकीं एकच उदाहरण घ्यावयाचें म्हणजे लो. टिळक यांचे चरित्रांत टिळक–आगरकर–संबंध, किंवा टिळक–गोखले–संबंध यांचा फारसा उल्लेख केलेला आढळत नाहीं, हें नजरेस आणून दिलें म्हणजे झालें.

पण माझी कदाचित् अशी चूक होत आहे कीं, ५–६ पानांच्या स्वभावचित्रांत ज्या गोष्टी आणण्यानें चित्राचा आटोपशीरपणा व जिवंतपणा जाईल त्या गोष्टी मीं दिवेकरांनीं आणल्या पाहिजे होत्या असें म्हणत आहें. शिवाय कांहीं स्वभावचित्रें बोलून–चालून वर्ण्य नायकांच्या "पुण्यप्रद स्मृतिपादांवर समर्पण केलेलीं स्तवन-सुमनें" आहेत, तेव्हां इतकी विचिकित्सा करणें हेंहि योग्य नव्हे. अर्थात् वर दाखविलेलें वैगुण्य हें वैगुण्य नव्हे. पण उणीव भासली ती लिहिली एवढेंच. ही उणीव नजरेला आली तरी स्वभावचित्रांचा आकर्षकपणा कमी होईल असें मला वाटत नाहीं, म्हणूनच ती येथें दर्शविली.

आकर्षकपणा जो आहे तो आधीं वर्ण्य विषयांच्या थोरपणाचा. यांत दिवेकरांना अर्थात् कांहीं श्रेय नाहीं. पण थोरांचा थोरपणा जाणण्याची योग्यता असणें, त्यांबद्दल आदर, किंबहुना भक्ति असणें, तद्विषयक वर्णन करण्याची हौस व शक्तिहि असणें, व सगळ्यांत अधिक गोष्ट म्हणजे या वर्णनांत आपण रंगणें व वाचकांना रंगविणें ही कांहीं लहानसहान गोष्ट नव्हे. दिवेकरांच्या उत्साहयुक्त विभूतिपूजेला अलंकारयुक्त भाषेची जोड आहे म्हणून ही अलंकारिक भाषा रसयुक्त झालेली आहे, या रसयुक्त भाषेंत सुभाषितांची खडीसाखर टाकल्यामुळें ती अधिकच मधुर झाली आहे, व या माधुर्यांत सदुपदेशाच्या सुवासाची भर पडली आहे!

पुणें ४ }
११।१०।३४ }

**वा. म. जोशी**

---

" Whyl I have tyme and space,
Me thinketh it acordaunt to resoun,
To telle yow al the condicioun
Of ech of hem, so as it semed me,
And whiche they weren, and of what degree;
And eek in what array that they were inne.'

**Chaucer's**
'The Prologue to the Canterbury Tales.'

हीं स्वभाव-चित्रें प्रथम ज्या मासिकांत किंवा पत्रांत प्रसिद्ध झालीं त्यांचीं नांवें व प्रसिद्ध झाल्याच्या तारखा खालीं दिल्या आहेत.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | लो. टिळक | केसरी | २ ऑगस्ट | १९२७ |
| २ | महात्मा गांधी | यशवंत | जून | १९३० |
| ३ | मोतीलाल नेहरू | रत्नाकर | डिसेंबर | १९२८ |
| ४ | वल्लभभाई पटेल | रत्नाकर | जुलै | १९२९ |
| ५ | विठ्ठलभाई पटेल | रत्नाकर | एप्रिल | १९२९ |
| ६ | न. चिं. केळकर | रत्नाकर | जानेवारी | १९३१ |
| ७ | न. चिं. केळकर | श्री लोकमान्य (खास अंक) | २२ ऑगस्ट | १९३२ |
| ८ | एम्. आर्. जयकर | रत्नाकर | जानेवारी | १९३३ |
| ९ | शि. म. परांजपे | रत्नाकर | आक्टोबर | १९२९ |
| १० | कृ. प्र. खाडिलकर (कांहीं भाग) | सकाळ (जादा साहित्य अंक) | २५ डिसेंबर | १९३३ |
| ११ | मा. श्री. अणे | चित्रमयजगत् | सप्टेंबर | १९३३ |
| १२ | जवाहरलाल नेहरू | रत्नाकर | डिसेंबर | १९२९ |
| १३ | सुभाषचंद्र बोस | केसरी | २२ डिसेंबर | १९३१ |

# अनुक्रमणिका


| नांव | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ लोकमान्य टिळक | .... | .... | .... | १ |
| २ महात्मा गांधी | .... | .... | .... | ७ |
| ३ पंडित मोतीलाल नेहरू | | .... | .... | २१ |
| ४ सरदार वल्लभभाई पटेल | | .... | .... | ३२ |
| ५ नामदार विठ्ठलभाई पटेल | | .... | ... | ४७ |
| ६ श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर | | .... | .... | ६१ |
| ७ ,, | | .... | .... | ७३ |
| ८ श्रीयुत मुकुंदराव जयकर | | .... | .... | ८३ |
| ९ प्रो. शिवराम महादेव परांजपे | | .... | .... | ९२ |
| १० श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर | | .... | .... | १०६ |
| ११ श्री. माधव श्रीहरि अणे | | .... | .... | ११५ |
| १२ पंडित जवाहरलाल नेहरू | | .... | .... | १२८ |
| १३ बाबू सुभाषचंद्र बोस | .... | .... | .... | १४० |

# स्वभाव-चित्रें

## १

## लोकमान्य टिळक

“ वाटे चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें. ”

—मोरोपंत.

कालरोजीं लोकमान्य टिळकांस इहलोक सोडून गेल्यास इंग्रजी तिथीप्रमाणें बरोबर सात वर्षें पुरीं झालीं. या सात वर्षांच्या अवधींत लोकमान्यांची स्मृति नाहींशी झाली नाहीं इतकेंच नव्हे, तर ती प्रतिदिवशीं सकाळीं फुलणाऱ्या फुलाप्रमाणें किंवा समुद्राच्या सपाटीवर हरघडीं उठणाऱ्या नवनवीन लाटेप्रमाणें अगदीं ताजीतवानी आहे असें आजहि वाटतें व चालू चिन्हांवरून असें अनुमानदेखील करण्यास हरकत नाहीं कीं, ही स्मृति भावी कालांतहि कोमेजणार नाहीं. एका निराशावादी लेखकानें म्हटलें आहे कीं, कोणाहि माणसानें, आपलें नांव मरणानंतर सहा महिन्यांवर टिकलें तर स्वतःस दैववान् समजावें. पण अर्थात् हें विधान खरें असेलच तर सामान्य मनुष्यासंबंधीं आहे. कारण असे कित्येक महापुरुष आहेत कीं, त्यांचीं नांवें शतकेंच्या शतकें लोटलीं तरी अद्यापि अजरामर आहेत. महात्मे कालाच्या पोटांत नष्ट होऊं शकत नाहींत आणि ते कालवश होऊन स्मृतिशेष होतात याचा भावार्थ असाच कीं, त्यांची आठवणच यावच्चंद्रदिवाकरौ सतेज अवस्थेंत कायम टिकून राहते; शिवाय कांहीं तत्त्वज्ञानी म्हणतात त्याप्रमाणें अगत्याचे प्रसंगीं लोकोत्तर पुरुष परिस्थितीच्या उदरांतून, शमी वृक्षांतून ज्वालायुक्त अग्नि बाहेर

यावा अथवा कमलांतून सावयव-सालंकृत लक्ष्मी उद्भव पावावी तसे, एकदम सज्ज-सायुध स्थितींत निर्माण होवोत; किंवा दुसरे कित्येक विचारी लेखक प्रतिपादितात त्याप्रमाणें, एकाद्या कुशल कारागिरानें आपणास इष्ट अशी मूर्ति घडवावी अथवा चतुर चिताऱ्यानें आपल्या हौशीप्रमाणें काढलेल्या चित्रांत रंगाची खुलावट करावी, तसे भोंवतालच्या परिस्थितीवर आपलें खोगीर चढवून तीवर स्वार होऊन आपल्या ध्येयसिद्धीस पोषक अशी तिची स्थिति करून व तिला गति देऊन असामान्य व्यक्ति आपलें ईश्वरी असामान्यत्व जगाच्या निदर्शनास आणोत; एवढी गोष्ट खास कीं, त्यांच्या अलौकिक गुणांचा व दीप्तिमान् कार्याचा ठसा मात्र परिस्थितीच्या फलकावर अक्षय असा उमटलेला दिसतो.

लोकमान्य टिळक हे अशा विभूतिवंत, महानुभावी, चिरपरिणामी व अवतारतुल्य थोर पुरुषांपैकीं एक होते हें सांगणें म्हणजे इंद्रधनुष्यावर कुंचला फिरवण्यासारखें किंवा सोन्याला मुलामा देण्यासारखें होय. कोणीहि थोर पुरुष घेतला तरी तो सव्यसाची, किंबहुना चतुरस्र असतो; निदान हें त्याचें बहुविध व सर्वंकष थोरपण व्यक्त स्वरूपांत नसलें तरी विजेच्या अवगुंठित तारेंतील गूढ शक्तीप्रमाणें गरजेबरहुकुम उघडपणें सेवेस सादर होणारें असतें हें सर्वमान्य आहे. प्रसिद्ध इंग्रजी लेखक कार्लाईल याचें जें म्हणणें कीं, " एका गोष्टींत वीर, तो सर्व गोष्टींत वीर " याचेंहि रहस्य हेंच होय. कोणी शास्त्रवेत्ता म्हणून तर कोणी संशोधक म्हणून, कोणी राजकारणी मुत्सद्दी म्हणून तर कोणी सेनानायक म्हणून, कोणी गद्यलेखक म्हणून तर कोणी कवि म्हणून, कोणी धर्मसंस्थापक म्हणून तर कोणी क्रांतिकारक म्हणून, सर्व लोकोत्तर पुरुष प्रसिद्ध होऊन जातात. आणि या गत महापुरुषांच्या स्मृतीचें मर्म यथार्थत्वानें जाणावयाचें म्हणजे विवक्षित क्षेत्रांतील त्यांच्या अलौकिक गुणांचें

व कार्याचें सूक्ष्म निरीक्षण करावयास पाहिजे. म्हणूनच इंद्रधनुष्य अधिक मनोहर करूं पाहाणें किंवा सुवर्णास जास्त चकाकी देऊं पाहाणें हें अनुचितपणाचें असलें तरी, त्या धनुष्यांतील रंगांचें पृथ· क्करण करणें अभ्यासकास जरूर पडतेंच व सोनेंहि, त्याचे दागिने करून ते लोकोपयोगी करणारास, विस्तवांत आटवावें लागतेंच, हें निर्विवाद आहे. एकाच महापुरुषानें अनेक रीतींनीं दोन-चार क्षेत्रांत आपलें महानुभावित्व, बुद्धिमत्त्व व कार्यकौशल्य उत्कटत्वानें प्रगट केलेलें असलें म्हणजे मग तर अशा तऱ्हेची निवड करणें अत्यंत आवश्यक होतें हें सांगावयास नकोच.

लोकमान्य टिळक हे अनेक दृष्टींनीं लोकोत्तर होते हें प्रसिद्ध आहे. त्यांचे संस्कृत व गणित हे दोन विषय विद्यार्थिदशेपासूनच तज्ज्ञांस देखील तोंडांत बोट घालण्यास लावण्याइतके तयार होते. त्यांची बुद्धि जशी अत्यंत विशाल तशी कुशाग्रहि होती. या देणगीच्या जोरावर त्यांनीं जे शोध लावले व ग्रंथ लिहिले ते जवळ जवळ प्रमाणभूत गणले जातात. कोणत्याहि विषयांत त्यांनीं आपलें पाऊल टाकलें कीं वनगजाप्रमाणें तो 'विषय' आपल्या बुद्धिप्रतापानें ते हस्तगत करून घेत असत हें विश्रुत आहे. ज्याला ज्याला म्हणून हात घालावा तें तें कृत्य उच्च दर्जाचें, आदर्शभूत, क्रांतिकारक व अप्रतिम व्हावें असा त्यांचा गुण होता. त्यांनीं गीतेचें आजन्म परिशीलन केलें व असा ग्रंथ त्यांच्या मेंदूतुन निपजला कीं, दुसरे हजार ग्रंथ टाकावेत आणि हाच घ्यावा असें प्रत्येकास वाटावें इतका त्याचा महिमा. पंचांगशोधन घ्या किंवा इतिहास-संशोधन घ्या, यांत सुद्धां लोकमान्यांचें कार्य अनन्यसाधारण आहे.

तथापि यासंबंधांत लोकमान्यांचें कार्य कितीहि महत्त्वाचें व विचारांत महापरिवर्तन करणारें असलें तरी त्यांनीं राजकीय क्षेत्रांत जी कामगिरी केली ती इतिहासांत वरील कोणत्याहि किंवा सर्व

प्रकारच्या कामांपेक्षां जास्त तेजस्वी, संस्मरणीय, जनतेची प्रत्यक्ष सेवा करणारी, जनतेच्या आदरास व कृतज्ञताबुद्धीस पात्र होणारी अशी उल्लेखिली जाईल यांत संशय नाहीं. कारण इतिहासांत राष्ट्रांच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांच्या विभागास जें मूर्धाभिषिक्त स्थान आहे तें प्रायः दुसऱ्या विभागास मिळण्यासारखें नाहीं, व मिळतां उपयोगीहि नाहीं. राष्ट्राला स्वातंत्र्य असेल तर सर्व कांहीं आहे; त्याचें स्वातंत्र्य हिरावलेलें असेल तर सर्व कांहीं असून नसून सारखेंच. जॉर्ज वॉशिंग्टन, जोसेफ मॅझिनी, गॅरीबाल्डी, पार्नेल, रेडमंड, डी व्हॅलेरा, लेनिन, केमालपाशा, कोसूथ इत्यादि स्वातंत्र्य-संस्थापकांचा अथवा स्वातंत्र्याकरितां शिरकमळ हातांत घेऊन उभ्या असलेल्या धीरोदात्त, पराक्रमशाली वीरांचा, अंतःकरण उचंबळून येऊन, शरीर उत्साहानें थरारून त्या त्या राष्ट्रांतील लोक सन्मान करतात, त्यांची जयंती–पुण्यतिथि साजरी करतात, त्यांचा उत्साह, धडाडी व स्वार्थत्याग आपल्या अंगांत अंशतः तरी संचरावा म्हणून प्रार्थना करतात; पण त्या त्या देशांतून गॅलीलियो, न्यूटन, कोपरनिकस, ॲरिस्टॉटल, एडिसन, झेपेलिन, वगैरे शास्त्रीय संशोधक किंवा यंत्रकार किंवा तत्त्वकुशल विवेचक यांचा इतक्या मोठ्या प्रमाणांत सत्कार तर होत नाहींच, पण सामान्य जनाला त्यांची फारशी माहितीहि नसते हें आपण उघड पाहतों. तेव्हां अशा स्थितींत लोकमान्यांच्या राजकीय तत्त्वावर व कार्यावर विशेष भर दिला तर त्यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. उलट छायाचित्र काढणारा वस्तुस्थितिनिदर्शक प्रतिमा निघावी म्हणून समोर बसलेल्या मंडळीस बरोबर रोखून आपलें यंत्र उभारतो, तद्वत् लोकमान्यांच्या राष्ट्रव्यापी यशोगानाचें अंतर्गत रहस्य यथातथ्य समजून घ्यावयाचें असेल, त्यांच्या कार्याची मातब्बरी ओळखावयाची असेल आणि त्यांची स्मृति भरीवपणानें व गांभीर्यानें उज्ज्वल

राखावयाची असेल तर त्यांच्या राजकीय योगसिद्धीचें त्यांच्या अनुयायांपैकीं प्रत्येकानें आपल्या हृत्पटलावर प्रतिबिंब पाडून, तत्प्रीत्यर्थ त्यांनीं उपयोगांत आणलेल्या साधनांचा पुन: स्वीकार करणें याखेरीज दुसरा उपाय नाहीं.

टिळकांना त्यांच्या ईश्वरी प्रेरणेमुळें जें यश प्राप्त झालें तें कदाचित् आपणांस प्राप्त होणार नाहीं, किंवा आतां टिळक नाहींत म्हणून कदाचित् थोडी निराशा देखील वाटण्याचा संभव आहे. पण टिळक वारंवार जन्माला येत नसतात. इमर्सननें म्हटल्याप्रमाणें, एक अद्वितीय महापुरुष अवतरला म्हणजे ज्या मुशींत निसर्गदेवतेनें त्याला ओतलें ती फोडून टाकण्यांत येते असें दिसतें. कारण त्याच्याचसारखा दुसरा निर्माण होऊं शकत नाहीं. त्याचा पूर्वज तोच व त्याचे वंशज तोच. त्याच्याबरोबर त्याचा वर्ग संपतो. त्याच्या कार्याचें बीं या भूमीवर पडून तें रुजावें, त्यापासून धष्टपुष्ट रोप तयार व्हावें व अखेरीस योग्य हंगाम प्राप्त होतांच त्याच्या समृद्ध फलपुष्पसंभारानें पृथ्वी सुशोभित होण्यास अवकाश मिळावा या, हेतूनें हा दैवी नेमानेम असल्यास न कळे. त्याच्यामागून लोक उत्पन्न होतातच. ‘ रविरुचिच्या ’ मागें तिचें कार्य दीपकावर पडतें, नाहीं असें नाहीं. पण कवीनें विचारल्याप्रमाणें ‘ विसरविल काय तेज प्रगट करुनि अल्प काजवा तीस ’ हेंच खरें. तथापि टिळकांचे अनुयायी व अभिमानी म्हणविणारांनीं एकदिलानें उपरिनिर्दिष्ट पद्धतीनें त्यांचें कार्ययुक्त स्मरण करावयाचें तर संघटित प्रयत्न केल्यास कांहींच यश येणार नाहीं असें कदापि होणार नाहीं. मात्र अंत:करणांतून उसळून बाहेर पडणारी इच्छा पाहिजे. अशी अंत:स्फूर्त इच्छा असेल तर कांहींहि अशक्य नाहीं. टिळक जिवंतपणें आपणांमध्यें वावरत नसले तरी त्यांचा आत्मा या राजकीय चळवळींत अंतर्धान पावलेला आहे आणि त्या चळवळींचा पुन: एकदां पुरस्कार होऊं लागला म्हणजे

ते व्यष्टिरूपानें नव्हे तरी समष्टिरूपानें या राजकीय जागृतीस हातभार लावतील याविषयीं संदेह नाहीं. महान् विभूति जिवंतपणापेक्षां मरणोत्तर सूक्ष्मावस्थेंतच अधिक स्फूर्तिदायक व उत्साहवर्धक होतात असें म्हणतात. त्यांतील सत्याची प्रतीति आम्हांसहि हल्लींच्या प्रसंगीं यावी अशी जगत्सूत्रचालकाची मनःपूर्वक प्रार्थना करून पुण्यश्लोक लोकमान्य टिळकांच्या पुण्यप्रद स्मृतिपादांवर हें स्तवन-सुमन समर्पण करतों.

# २

# महात्मा गांधी

परार्थव्यासंगादुपजहदथ स्वार्थपरता—
मभेदैकत्वं यो वहति गुणभूतेषु सततम् ।
स्वभावाद्यस्यांतः स्फुरति ललितोदात्तमहिमा
समर्थो यो नित्यं स जयतितरां कोऽपि पुरुषः ॥

—जगन्नाथ पंडित

जंबूसर येथील गोष्ट. सायंकाळची वेळ होती. दोघा-दोघांच्या रांगा करून स्वयंसेवक-मंडळी कापसाच्या गिरणीच्या आवारांतील छावणीच्या बाहेर, पुढील मुक्कामास जाण्याकरितां, सज्ज होती. आजूबाजूस हजारों स्त्री-पुरुषांचा समुदाय तटस्थ राहून त्याच जागेंतील एका लहानशा इमारतीच्या खोलीच्या दाराकडे टक लावून बघत होता. बरोबर सहा वाजतां वीज चमकल्यासारखी एक व्यक्ति चटकन् बाहेर पडली व आपल्या वयोमानास न शोभणाऱ्या अशा उत्साहानें लांब ढेंगा टाकीत सर्व सेवकांच्या अग्रभागीं उभी राहिली. शरीर म्हणजे अक्षरशः यष्टीसारखें, गाल बसलेले, डोळे खोल गेलेले, जवळजवळ सगळ्या डोक्यास टक्कल पडलेलें, कंबरेपासून जेमतेम गुडघ्यापर्यंतचा भाग एका खादीच्या पंचानें झांकलेला, उन्हाळा फार म्हणून भिजलेलें एक फडकें डोईस गुंडाळलेलें, हातांत काठी घेतलेली व पायांत चपला असलेली अशी ती नग्नप्राय जरत्कारु वामनमूर्ति मार्ग आक्रमण करूं लागली. साठी उलटून गेलेली; प्रकृति म्हणजे लवंगेनें उष्णता व वेलदोड्यानें थंडी होणारी; खेडा, भडोच व सुरत जिल्ह्यांतील मार्च महिन्यांतील प्रखर सूर्यताप; परंतु

महात्माजी जे एकदां साबरमतीहून, नंदकुलाचा निःपात करणाऱ्या चाणक्याप्रमाणें किंवा अन्यायी पेशवे दरबारच्या आश्रयाचा संन्यास करणाऱ्या रामशास्त्र्याप्रमाणें, प्रतिज्ञा करून निघाले ते निघालेच. शंभर मैलांच्या उन्हातान्हांतील प्रवासानेंही न थकलेल्या या देशाभिमानी महात्म्याला म्हणावें तरी काय? हा मानवप्राणी आहे, कीं मातृसेवेची साकार प्रतिमा आहे, कीं राष्ट्रभक्तीची जागती ज्योत आहे, कीं निश्चयानें नरदेह धारण केला आहे, कीं सत्याचा अवतार आहे, कीं अहिंसेचा चालता-बोलता पुतळा आहे, कीं कष्टाची मूर्ति घडलेली आहे, कीं आत्मिक बल रूपास आलेलें आहे, कीं आहे तरी काय?

पण मन असें विकल्पांत पडतें हाच तर मोठ्यांचा मोठेपणा. तो संपतच नाहीं. जणुं काय आवर्त दशांशच. श्री. तात्यासाहेब केळकरांनीं लोकमान्य टिळकांच्या चारित्राचे तीन भाग लिहिले, श्री. अण्णासाहेब बापटांनीं त्यांच्या आठवणींचेही तितकेच खंड प्रसिद्ध केले; पण टिळकांच्या महनीयत्वाचा पुरा थांग कोठें लागला आहे? म. गांधींचें तर विचारूंच नये. स्वतःच त्यांनीं आत्मचारित्राचे दोन बडे ग्रंथ निर्माण केले व याशिवाय कृष्णदासांचें 'सात महिन्यांचा महात्माजींचा सहवास,' महादेवभाईंचीं 'महात्माजींसह लंकेंत,' 'महात्माजींसह खेड्यांत' हीं पुस्तकें वगैरे वगैरे गांधी-वाङ्मय जमेस धरलें तर एक स्वतंत्र वाचनालयच व्हावयाचें. तथापि महात्माजींच्या महानुभावित्वाचा अद्यापि कोणास पत्ता लागत नाहीं. आणि म्हणून कोणी त्यांचें "The little great man" असें वर्णन करतो, कोणी "The terrible meek" ही पदवी त्यांस अर्पण करतो, कोणी त्यांस 'व्यवहारी ध्येयवादी' म्हणतो, कोणी 'राजकारणी साधु' असें त्यांस संबोधितो, कोणी त्यांस 'किंचित् पंख तुटलेला देवदूत' असें समजतो, कोणी त्यांस ख्रिस्ताची उपमा

देतो, कोणी त्यांस ' हिंदुस्थानचे टॉल्स्टॉय ' असें मानतो, कोणी ' हा आमचा नव्हे ' असें म्हणून त्याचा धिक्कार करतात, कोणी ' दरिद्री-नारायणाचा परमेश्वर ' म्हणून त्यांच्यापुढें धूप जाळतात. म्हणून तर मॅथ्यू आर्नाल्ड कवीनें शेक्सपीयरविषयीं लिहिलें तें प्रायः सर्व महाशयचक्रवर्ती पुरुषांना लागू पडतें.

" Others abide our question. Thou art free.
We ask and ask--Thou smilest and art still.
Out--topping knowledge..........
And thou who didst the stars and sun-beams know,
Self-schooled, self-scanned, self-honoured, self-secure,
Didst tread on earth unguessed at.—
Better so ! "

खरोखर म्हटलें म्हणजे एवढी ही जगद्वंद्य विभूति अखिल विश्वाच्या गुरुस्थानीं असावयाची; व बिशप होम्ससारखे कांहीं धर्मश्रद्ध गृहस्थ तसे मानतातही. तथापि प्राधान्येंकरून म. गांधी भारताला स्वातंत्र्य-युद्धांत अग्रणी लाभले ही केवढी पूर्वपुण्याई म्हणावयाची ! गमतीनें रोमेन रोलंड विचारतात, " लालाजी म्हणतात कीं, ' हिंदुस्थान दुःखी ' पण ज्या भूमींतून म. गांधींसारखीं विशुद्ध व तेजस्वी वीर-रत्नें उद्भव पावतात ती तर सुतराम् सुखी व दैववान् कां नव्हे ! " जनतेचे अस्सल पुढारी म्हणजे म. गांधी. असें आहे म्हणूनच त्यांची सत्याग्रहाची चळवळ थेट खेडोपाडीं पोंचली आहे. म. गांधींचें नांव ठाऊक नाहीं असा खेडवळ माणूस विरळा, व त्यांच्या मोहिमेची लाट पसरली नाहीं असा गांव क्वचितच एकादा आढळणार. त्यांच्या अंगच्या उत्कट गुणांचा व त्यांच्या स्वप्रणीत तत्त्वांचा विचार केला तर गोल्डस्मिथनें बर्कच्या बाबतींत जें म्हटलें आहे

त्याचें अनुकरण करून, 'साऱ्या जगताकरितां त्यांचा अवतार, पण मन संकोचित करून जें मानवजातीकरितां होतें तें स्वदेशासाठीं वेंचून टाकलें' असें विधान करावें लागेल. यांत स्वार्थत्याग तर आहेच; पण आंतरराष्ट्रीय शान्तता किंवा मनुष्यमात्राची उन्नति झाली तरी एखाद्या राष्ट्रांतूनच प्रस्थापित होणार कीं नाहीं? देशाभिमानाच्या नद्या मिळून मिळूनच भूतदयेचा महोदधि अधिक सुसंपन्न दिसूं लागतो म्हटलें तर तें योग्यच होय.

महात्माजींच्या या देशभक्तीचें वर्णन किती करावें? दिवसाचा एक क्षण नाहीं कीं जो स्वदेशहितचिंतनाविणें जातो. स्वार्थत्याग करण्यासच कांहीं उरलें नाहीं. केवळ जगण्यास अत्यंत जरूर इतक्याच त्यांच्या गरजा. सरासरीनें हिंदी मनुष्यास प्रतिवर्षी अकरा वार कापड लागतें म्हणतात, तर यांचा निर्वाह बहुतेक एक-दोन वारांतच होतो. थंडीचा कडाकाच असला तर एखादी घोंगडी पांघरावयाची. खाण्याच्या संबंधांत देखील To live to eat नव्हे, तर To eat to live हा यांचा कायमचा दंडक. व तें देखील इतकें तोलून मापून खावयाचें कीं रेसभरही इकडे-तिकडे होऊं नये. शेळीचें दूध, मनुका, मुसंबीं इत्यादि व्यतिरिक्त खाणेंपिणें मानवत नाहीं म्हणूनच तें घ्यावयाचें, चैन म्हणून नाहीं. फार कशाला, त्यांच्या स्वातंत्र्याच्या दौऱ्यांत सुरतेस लोकांनीं प्रेमानें त्यांचें व स्वयंसेवकांचें मेवामिठाईनें आदरातिथ्य केलें, तेव्हां त्यांनीं लोकांचे कान उपटण्यास कमी केलें नाहीं. निजावयास म्हटलें म्हणजे एखादी मोकळ्यावर टाकलेली चारपायी पुरे, मग ते खुद्द साबरमतीच्या आश्रमांत असले तरी तेंच व कराडीच्या शिबिरांत असले तरी तेंच. लिहिण्याचीं उपकरणें देखील अशींच साधीं. आश्रमांतील 'निवासस्थानांत' देखील उतरतें मेज असलें तरी वाहवा नसलें तरी वाहवा. लकडी पेन्सिल व कागद असले कीं मांडी मोडून तीवर यांचें काम

सुरू व्हावयाचें. टिळक देखील वळकटीचें टेबल करून अगर रॉकेलच्या दोन डब्यांवर एक फळी टाकून लिहावयास बसतच कीं नाहीं! महात्माजींच्या या लोकोत्तर साधेपणाचें व स्वार्थत्यागाचें कौतुक अधिक वाटतें. याचें कारण त्यांचें नशीब असें शिकंदर आहे कीं म्हणतील तर लक्ष्मी त्यांचे चरणीं लोटांगण घालीत येईल. मिडास राजाप्रमाणें ते स्पर्श करतील त्याचें सोनें होईल, अशी त्यांची स्थिति. काय सांगावें? परवां स्वातंत्र्य-संपादनाच्या स्वारीवर मजल दरमजल निघाले. तेव्हां आठवड्या–आठवड्यास म्हणतील तेव्हां हजारों रुपये मिळण्याची अहमदाबादच्या व्यापाऱ्यांनीं व्यवस्था करून ठेविली होती म्हणतात. मुक्कामाच्या गांवीं सभा केली म्हणजे नोटांचीं पुडकीं पायांपाशीं येऊन पडावयाचीं. एखाद्या जिनसेचा लिलांव पुकारला तर चार आण्यांच्या कचकड्याच्या बांगड्यांचे सव्वाशें रुपये व्हावयाचे!

गुजराथ-विद्यापीठाला स्वतःची इमारत पाहिजे होती. महात्माजींना थोडी चिंता वाटली. रंगूनच्या एका स्नेह्याकडून लाख रुपयांचें कर्ज भीतभीत मागितलें. पण हें कळतांच कर्ज नव्हेच, देणगी म्हणून तेवढी रक्कम त्यांच्याकडे वाट चालत आली. व आजचें साबरमतीच्या तीरावरचें भव्य विद्यापीठ व त्याची जागा प्राप्त झाली. इमारत तर अशी विशाल व वैभवशाली उठली आहे कीं सर परशुरामभाऊ कॉलेजच्या इमारतीनेंही खालीं पहावें, मग फर्ग्युसन कॉलेजच्या अस्ताव्यस्त पसरलेल्या छोट्याछोट्या घरांची तर गोष्टच नको. रोल्स-रॉईस मोटारगाडी कुठें व फोर्ड खटारा कुठें! इंद्राचा ऐरावत व शामभटाची तट्टाणी या दोहोंमधील जें अंतर तेंच द्रव्यसंपादनाच्या बाबतींत गुजराथ-महाराष्ट्रांत अंतर हेंच खरें. कालिदासानें म्हटल्याप्रमाणें,

लभेत वा प्रार्थयिता न वा श्रियम्<br>
श्रिया दुरापः कथमीप्सितो भवेत्।

अशी महात्माजींची गत. साबरमतीच्या आश्रमाची झाली तरी हीच कथा. 'नांव सोनूबाई पण हातीं कथलाचा वाळा' ही म्हण खोटी पडली. विजेच्या प्रकाशानें 'दिव्याखालीं अंधेर' हें म्हणणें असत्य ठरून 'दिव्यावर अंधेर' हें आज खरें ठरू पहातच आहे. उन्हाळ्यांत ज्याप्रमाणें आश्रमाखालीं नदी असून नदी नाहीं अशी अवस्था दृष्टीस पडते, तद्वत् समग्र आश्रम पाहून आल्यावर 'नांव आश्रमाचें पण स्वरूप श्रीमंताच्या गृहस्थाश्रमी सुखोपभोगाचें' असें वाटूं लागतें. तेथें कशाची कमतरता आहे? विस्तीर्ण 'छात्रालय' आहे; उत्तम बांधलेलें भोजनगृह आहे; आश्रमवासी जनांसाठीं लागणारीं पाव-बिस्किटें करण्याची स्वतःची भट्टी आहे; विहिरींवर लोखंडी रहाट आहेत; तेल गाळण्यासाठीं घाणा आहे; गोशाळा आहे; लोखंडी नांगर आहेत; 'हृदय-कुंज' नांवाचा बंगला आहे; 'चक्रीवीथि' आहे; 'मेहेंदी-वीथि' आहे; काय नाहीं? हें सर्व महात्माजींचें इच्छासंपत्तीचें महत् सौभाग्य पाहिलें म्हणजे मारीचाश्रमांतील तपोवनभूमीचें अवलोकन केल्यानंतर दुष्यंतानें 'यत्कांक्षंति तपोभिरन्यमुनयस्तस्मिंस्तपस्यंत्यमी' असे विस्मयोद्गार काढले, त्यांची आठवण सहृदय व सदभिरुचिसंपन्न प्रेक्षकांस व्हावी ह्यांत काय आश्चर्य! किंवा भर्तृहरीनें 'वैराग्यशतकां'त मुनीचें 'अतनुभूतिर्नृप इव' असें जें रम्य वर्णन केलें आहे तें एकाद्यानें म. गांधींस लावलें तर त्यांत वावगें तें काय!!

आश्रमाचें बहिरंग जरी अशा तऱ्हेचें आश्रमाच्या कल्पनेशीं विसंगत भासलें तरी आंतील शिस्त मात्र फार कडक, लष्करी थाटाची असते. महात्माजी स्वतः तर ती तंतोतंत पाळतात हें सांगावयास नको. पहांटे प्रार्थनेची वेळ झाली म्हणजे ते स्वतः प्रार्थनेच्या पटांगणांत सगळ्यांच्या अगोदर हजर. इतकेंच काय पण कूच चालू असतांना देखील सायंकाळीं चालतां चालतां कडोसरीस अडक-

विलेल्या घड्याळांत सात वाजले रे वाजले, कीं एकदम महात्माजी रस्त्यावरून खालीं शेतांत उतरावयाचे व प्रार्थनेच्या पदास प्रारंभ व्हावयाचा. उष्टीं भांडीं स्वतः घांसावयाचीं हें ठरलेलें, मग त्याला मिस स्लेडही अपवाद नाहीं किंवा मि. रेनॉल्ड्सही नाहीं. स्वयंपाकाप्रमाणें हलालखोराचें कामही आळीपाळीनें सर्वांनीं करावयाचें. कोणताही मनोविकार उत्पन्न होऊं नये म्हणून तिखट–मीठ खावयाचें नाहीं हा निर्बंध अंमलांत. साऱ्या दिवसाचे उद्योग पार पाडलेच पाहिजेत. स्वतः महात्माजीच जर हे सर्व नियम व हीं सर्व व्रतें पाळतात तर इतरांचा काय पाड ? इतक्याउपरही आश्रमांत कित्येक न घडाव्या अशा गोष्टी घडतात, नाहीं असें नाहीं. तथापि मनुष्य या इहलोकच्या जमिनीवरचा प्राणी आहे याचें स्मरण करून देण्यापलीकडे त्या विशेष कांहीं दर्शवीत नाहींत. गौरवपूर्ण कौतुक वाटतें तें महात्माजींच्या निर्भीडपणाचें व सत्यप्रियतेचें. तिथें आंत-बाहेर कांहीं नाहीं. आश्रमाच्या नियमांचें उल्लंघन करून चोरून पैसे जवळ ठेवले म्हणून प्रत्यक्ष सौभाग्यवतीला देखील ते फांसावर चढविण्यास मागेंपुढें पहात नाहींत. जसा घरच्या व्यवहारांत निर्भीड स्पष्टवक्तेपणा, तसाच सार्वजनिक आचरणांत. एकदां स्वतःच्या अंतःकरणास एखादी गोष्ट पटली म्हणजे ब्रह्मदेव समोर उभा राहिला तरी तींत बदल म्हणून व्हावयाचा नाहीं. दिल्लीस लॉर्ड आयर्विनसाहेबांची मुलाखत झाली. त्यांच्या अटी पाळीत नाहीं, म्हणून व्हाईसरॉयसाहेबांनीं सांगितल्यावर ताड्कन् उठून आले. मागें लॉर्ड रेडिंगसाहेबांच्या भेटीनंतर अल्लीबंधूंकडून माफी मागणें त्यांना योग्य वाटलें तेव्हां तसेंही घडवून आणलें. व मुंबईचे माजी गव्हर्नर जॉर्ज लॉइड यांच्याशीं संभाषण झालें त्यांत सत्याग्रह तेव्हांच सुरू केल्यास अत्याचार होण्याचा संभव आहे असें त्यांस वाटलें, म्हणून सत्याग्रह तहकूब करण्याचें ठरवून परत आले व तो निश्चय सर्व्हंट्स् ऑफ

इंडिया सोसायटीच्या दिवाणखान्यांत गव्हर्नरसाहेबांच्या भेटीचा निकाल ऐकण्यास जमलेल्या मंडळीस परत येतांच बिनदिक्कत सांगून टाकला. मग तेथून भेटीस जाण्याचे पूर्वी आपला काय बेत होता याचा बिलकूल विचार नाहीं. टीका सोसूनही चौरीचौऱ्याच्या दंग्या-नंतर बार्डोलीयेथील चळवळ नाहीं का त्यांनीं बेलाशक थांबविली? उलट, मागील खटल्यांत अहमदाबादच्या कोर्टांत त्यांनीं कैफियत सादर केली तींत खुद्द जज्जसाहेबांनादेखील असें आव्हान कीं, 'ज्या राज्यपद्धतींत तुम्ही काम करतां ती सदोष वाटत असेल तर तुम्ही न्यायासन सोडून खालीं या, नाहीं तर मला जास्तींत जास्त शिक्षा ठोठावा.'

वर्षानुवर्ष विचार करून, अनुभव घेऊन, हातानें सूत काढण्याचें तत्त्व मनास पटलें. व जवळजवळ 'सबकू सोनामुखी' या न्यायानें हिंदुस्थानच्या सर्व रोगांवर चरखा हाच उपाय त्यांना वाटूं लागला. व त्याच्यासाठीं आतांपर्यंत एवढी प्रचंड व अविश्रांत चळवळ केली कीं, ती भारतवर्षाच्या इतिहासांत नमूद झाल्याखेरीज रहाणें शक्य नाहीं. कोणी 'काय करूं' हा प्रश्न विचारला कीं, मोठमोठ्या रेल्वे-स्टेशनांतील तिकिटांच्या खांबांत एक आणेली टाकली कीं प्लॅटफॉर्म-तिकिट यावें त्याप्रमाणें, ठराविक तऱ्हेचें एकच उत्तर यावयाचें. मग प्रश्न विचारणारी व्यक्ति नवऱ्यानें टाकलेली बायको असो, मुलगा मेलेली आई असो, बाप स्वर्गवासी झालेला पुत्र असो. सुट्टींत काय करावें, म्हणून विचारण्यास कांहीं विद्यार्थी त्यांचेकडे गेले. सोमवार होता. मौन मोडावयाचें नव्हतें. कागदावर संदेश लिहून दाखविला तो हा—

Card, spin, weave;
Spin, weave, card;
Weave, card, spin;

मनाला वाटतें तें स्पष्ट शब्दांत बोलावयाचें. कोणाचा मुलाहिजा ठेवावयाचा नाहीं. कोणी कांहीं म्हणो. आपण पक्के मांसाहारी कसे कस होत होतों हें सांगावयाचें, पत्नीला लहानपणीं किती छळलें तें सांगावयाचें, वडील मृत्युशय्येवर असूनही खोलींत आपण कसे जाऊन निजलों हेंही लपवून ठेवावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें 'लोक-संग्रह' येथें चालू असतांना त्याचे संपादक श्री. अण्णासाहेब भोपटकर यांची १९२१-२२ सालीं श्री. तात्यासाहेब केळकरांच्या घरीं प्रथमच ओळख झाल्यानंतर स्वाभाविक पण वैशिष्ट्यदर्शक हास्य करून Mr. Bhopatkar, I have heard libellous things about you,' असें तोंडावर सांगून त्यांच्याशीं निर्विकार मनानें चर्चा करण्यासही कचरावयाचें नाहीं.

बोलण्या-चालण्यांत व वादविवाद-लेखनांत थोडाबहुत तर्ककर्कशपणा व तत्त्वकाठिण्य असलें तरी महात्माजींचें मन बरीक मृणालतंतूसारखें आहे हें निःसंशय. कमळाचा गाभा कोठूनही धरला तरी मृदु; लोणी म्हणजे अंतर्बाह्य मऊमऊ; खडीसाखरेचा खडा सगळाच गोड, असें त्यांचें अंतःकरण. भूतदया ओतप्रोत भरलेली. हिंद-वासीयांचें दारिद्र्य पाहिलें म्हणून तर बॅरिस्टरी सुरू केलेली टाकून जनतेची अहर्निश वकिली अंगीकारिली. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांची दुःखद स्थिति कानीं आली, तिकडे गेले, कित्येक वर्षें वास्तव्य करून राहिले, नाहीं नाहीं ते अपमान गोऱ्या लोकांकडून सोसले, कडोविकडीचे कष्ट केले व अखेरीस 'जंटलमन्स ॲग्रीमेंट' यशस्वितेनें प्राप्त केलें तेव्हांच मायदेशीं परत आले. चंपारण्यांतील चहाच्या मळ्यांतील मजुरांची करुण कहाणी ऐकली. झालें. मनाचा धडा केला व त्यांचीं गाऱ्हाणी दूर करण्यासाठीं मळ्यांत राहून जिवाचें रान केलें. १९२८ सालीं सिलोनांत गेले, तेव्हांही तेथील कामकऱ्यांची परिस्थिति पाहून त्यांचें मन कसें द्रवलें तें त्यांच्या

दयार्द्र व्याख्यानांवरून व लेखांवरून उघड होतें. खाजगी आप्तसंबं-धांत व चाल-चालणुकींतही असेंच. 'विष्णुदास' मेणाहून मऊ व वज्राहून कठोर म्हणतात तें अशाच कारणाकरितां. एकदां अहमदाबाद येथें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीची सभा भरली होती. तपस्वी बाबासाहेब परांजपे बोलण्याच्या कामांत अंमळ निसुग. भर सभेंत ते महात्माजींना वर्मी लागण्यासारखें कांहीं बोलले. महात्माजींना भडभडून आलें व त्यांच्या डोळ्यांतून खेदाश्रु टपाटप गळले. लहान मुलांबाळांशीं वागतांना तर त्यांच्या मनाचा हा हळुवार कोंवळेपणा चांगलाच दृग्गोचर होतो. सौभाग्यवती कस्तुरबा, चिरंजीव रामदास व देवीदास यांच्यासाठीं नाहीं इतका त्यांचा जीव आश्रमांतील अस्पृश्य कृतकपुत्री लक्ष्मीसाठीं तिळतिळ तुटत असतो. परवां परवां तुरुंगांतून मिराबाईस पाहिलेंच पत्र धाडलें त्यांत बालकांना 'चिमण्या पांखरांनो' अशी वात्सल्यपूर्ण हांक मारून जो निरोप सांगितला आहे तो अपत्यप्रेमाच्या पान्ह्यानें किती बरें ओथंबलेला आहे!

उद्यमशीलता व निरालस्य यांची तर शिकस्तच. सकाळींच उठल्यापासून एक सेकंद देखील वांया जावयाचा नाहीं. जें घरीं आश्रमांत तेंच दारीं परप्रान्तांतील दौऱ्यांत. बाया-बापड्या 'बापूजींच्या' दर्शनासाठीं येत असोत, मधेंच कोणी राजकीय चर्चा करण्यासाठीं येवोत, यांचा धंदा सतत चालू. तोंडाची टकळी, हाताची 'टकळी' व हातांतील सुताची टकळी, या अव्याहत सुरू असावयाच्या. सोमवारींच काय ती अगदीं अळीमिळी असेल तेवढी. पण तो 'यंग इंडिया,' 'नवजीवन' वगैरे पत्रांत लिहिण्याचा दिवस. एकवीस दिवसांचा उपास असो, आगगाडींत असोत, स्वातंत्र्याच्या मोहिमे-वर असोत, आपल्या वर्तमानपत्रांत ते लिहिण्यास कदापि चुकत नाहींत. लोकांनीं तोंडांत बोटें घालावीं कीं, महात्माजी कांहींही उद्योगांत कितीही व्यापृत असले तरी दर आठवड्यास 'यंग इंडियां-'

त M. K. G. हीं अक्षरें असावयाचींच. सूर्य पश्चिमेस उगवेल पण हें नाहीं असें होणार नाहीं ! रोजचें टपाल म्हटलें तरी हेन्री फोर्डसारखें आगगाडीच्या डबाभर नव्हे पण पिशवीभर खास यावयाचें. महात्माजींचा नियम असा कीं, होतां होईल तों सर्वांस उत्तरें जावीं. व तीं साधल्यास स्वतःच्या किडाकिडीत हस्ताक्षरांत. बरें, इतक्या जंजाळांत रिकामपण सांपडलें तर एकंदर जगांत खर्च कमी कसा करतां येईल याचा विचार करावयाचा. एकदां पुष्कळ तारा आल्या. या तारेच्या फॉर्म्सचें काय करावें? किंचित् हातकाम करून एका कागदाचा एक लिफाफा तयार केला व जवळच बसलेल्या कृष्णदासांना सांगितलें, ' हीं घ्या माझीं पेटंट एन्व्हेलप्स्. ' पंजाबच्या अत्याचारांच्या चौकशीचें काम कॉंग्रेसच्या कमिटीनें केलें तेव्हां तर साक्षी-पुरावा घेत असतांनाच काय फराळ करावयाचा असेल तो करावयाचा. पण कार्यांत खंड पडूं दिला नाहीं. ' अविश्रमोऽयं लोकतंत्राधिकारः ' असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. १९२८ सालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभा झाली. मुसलमानांशीं नेहरू रिपोर्टाच्या मान्यतेविषयीं तडजोड घाटत होती. तेव्हां वाटाघाटींत एका रात्रीं तर महात्माजींनीं अलोचन जागरण केलें व दिवसाही एका पाठोपाठ एक अशीं इतकीं कामें केलीं कीं महाराष्ट्रांत राष्ट्रीय सभा बोलावण्याविषयीं कांहीं चर्चा करावयाची होती त्यासाठीं आमच्या वासुकाका जोशांशीं भेटण्याची वेळ ठरविली ती पहांटे चार वाजतां. लोकांनीं म्हणावें शरीर आहे का यंत्र आहे !

कोणत्याही महत्कार्यांत ते गुंतले असले तरी आपला मनःप्रसाद कधीं ढळूं देत नाहींत. आर्जवाला व सौजन्याला कधीं फांटा देत नाहींत. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटींत अगदीं कत्तलची रात्र असली तरी कोणी महाराष्ट्रीय पुढारी सभेंत प्रथमच प्रवेश करतांना दिसला म्हणजे ' Oh, here comes Maharashtra ' असें अधिक्षेपगर्भित

विनोदाचे उद्गार मुखावाटे बाहेर यावयाचे. घाईगर्दीची वेळ असतांहि एकदां एक मुलगी वंदन करण्यास भर सभेंत व्यासपीठावर चढली; तिनें नमस्कार केला. " मुली, तुझें नांव काय ? " " चंदा ! " " वा, वा, फार छान; मग तूं किती चंदा (वर्गणी) राष्ट्रकार्याला देणार ? " असें संभाषण करून सदस्यांचीं मनें रिझविण्याइतकी त्यांच्या मनाची शान्ति कायम. शत्रु युद्ध संकटांत सांपडला असतां रंगरूटांची भरती करून त्याच्या मदतीस धांवले, शुश्रूषा-पथकें काढून त्याचेंही कार्य हलकें केलें. मग आपले परमप्रिय मित्र पंडित मोतीलाल नेहरू यांच्यासाठीं नाभाच्या महाराजांकरवीं आपलें वजन खर्चून त्यांच्या खटल्याचें घबाड पंडितजींच्या मौल्यवान् काश्मिरी शालींत टाकलें; किंवा राष्ट्रीय सभेच्या वर्किंग कमिटीकडून आग्र्याचा खटला विद्यमान परिस्थितींतही कोर्टांत लढविण्यास खास परवानगी देवविली; किंवा बडाभाई-छोटाभाई म्हणून लडिवाळपणानें कौतुक करतां करतां स्वतः महात्माजींसच शिंगावर घेणाऱ्या या नतद्रष्ट व नाठाळ अलीबंधूंना जवळ करण्याची आशा त्यांनीं मनांत बाळगली, हें त्यांच्या सरळ स्वभावास व विशुद्धमनस्कतेस साजेसेंच आहे असें कोण म्हणणार नाहीं ? बाहेरून दिसावयास पाश्चात्य सुधारणेच्या प्रतिक्रियेची जणुं मूर्ति दिसली तरी, पाश्चात्यांच्या शिष्टाचाराचा इतका सुपरिणाम त्यांच्यावर झालेला आहे कीं, पकडून येरवड्यास आणल्यावर अगदीं पहिलें काम कोणचें केलें असेल तर सरकारी अधिकाऱ्यांनीं आपणांस फार दक्षतेनें व दाक्षिण्यानें वागविलें याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानण्याचें. राजकीय अथवा इतर वाद-विवाद निकराचा होवो, पण दुसऱ्यास खुपण्यासारखा एक शब्दही ते उच्चारीत नाहींत. विचार रेखीव व बांधेसूद. उच्चार ठांशीव व आत्मविश्वास-पूर्ण. लेखनाचीही हीच पद्धति. शब्दयोजना अत्यंत मार्मिक व समर्पक. फालतूक शब्द औषधालाहि नसावयाचा.

लिहिण्या-बोलण्यांत अलंकार वगैरे नसावयाचे. तथापि भाषण व लिखाण इतकें नैसर्गिक व मधुर असावयाचें कीं, त्यांच्यापुढें नाणावलेल्या पढीक व शोभेच्या लेखकांनीं व व्याख्यात्यांनीं खरोखरच तोंड लपवावें. त्यांच्या गुजराथी, हिंदी व इंग्रजी व्याख्यानांचे व लेखांचे जाडे जाडे ग्रंथ प्रकाशित झालेले आहेत. अभावितपणानें ते कोणत्याही पानावर उघडून पाहिले तरी त्यांची भाषाशैली पाहून,

शुद्धान्तदुर्लभमिदं वपुराश्रमवासिनो यदि जनस्य
दूरीकृताः खलु गुणैरुद्यानलता वनलताभिः ।

असें म्हणून जो तो आश्चर्य करूं लागतो.

आज परमार्थतः अभूतपूर्व अशा चळवळीचे प्रवर्तक असे महात्माजी कारागृहांत आहेत. ज्या पुण्यश्लोक पुरुषाचें आपण गुणस्मरण व चिंतन करतों तो सदैव आपल्यांत असल्यासारखाच असतो. टिळक गेले हें जितकें सत्यपूर्ण, तितकेंच टिळक आहेत हेंही. त्यांचें राजकीय कार्य निदान सांप्रत तरी त्यांच्यामागून म. गांधींनीं पुढें चालविलेंच आहे. टिळकांची जशी प्रान्तानिहाय सहकारी–मंडळी तयार झाली होती, त्याप्रमाणें महात्माजींची प्रभावळही दीप्तिमान् झालेली आहे. साबरमती आश्रमासारखे आश्रम हिंदुस्थानांत पांचदहा ठिकाणीं सुरळीत चाललेच आहेत. बंगाल्यांत सेनगुप्त, संयुक्तप्रान्तांत पंडित नेहरूपितापुत्र, बिहारांत बाबू राजेंद्रप्रसाद, आंध्रप्रांतांत कोंडा व्यंकटप्पय्या, मद्रासेंत राजगोपाळाचार्य, कर्नाटकांत गंगाधरराव देशपांडे, गुजराथेंत सरदार वल्लभभाई इत्यादिप्रभृति त्यांची शिष्यपरंपरा खंबीर रीतीनें प्रस्थापित झाली आहे. जसे रामदासांचे मठ व ख्रिस्ताचे ॲपॉसल्स, तसे यांचे हे आश्रम व तसा सहकाऱ्यांचा हा संघ. साहजिकच या मित्रांवर महात्माजींचा अमोघ विश्वास. केव्हांही राजकीय धोरण किंवा कार्यक्रम ठरवावयाचा म्हणजे यांचा सल्ला घ्यावयाचा. गेल्या १२ मार्च रोजीं आश्रमांतून बाहेर पडण्यापूर्वीं

सविनय कायदेभंगाच्या चळवळीचें पुण्याहवाचन करण्यासाठीं या सर्व स्नेहीमंडळीस मुद्दाम विचारविनिमयाच्या उद्देशानें पाचारण करण्यांत आलें होतें. असा धीर, वीर, हीर राजकारणी महंत गुरुस्थानीं व असे मातबर व कर्तबगार जिगर दोस्त मदतनीस ज्या देशांत नांदत आहेत व स्वातंत्र्य-संपादनाचें स्वीकृत कार्य, अडचणींस व आपत्तींस न जुमानतां, धडाडीनें करीत आहेत त्याच्या नशिबाची रेषा लवकरच उमटणार यांत काय शंका? आणि अशा सुदैवी स्थितींत 'इटालीला जसा मॅझिनी, आयर्लंडला जसा पार्नेल व अमेरिकेला जसा वॉशिंग्टन, तसे भातरवर्षाला महात्मा गांधी आहेत!' ही डॉ. रदरफर्ड यांची अंतःस्फूर्त वाणी तरी अविलंबानें सफल व यशवंत कां होणार नाहीं!

महात्माजी,

महिमानं यदुत्कीर्त्य तव संव्हियते वचः<br>
श्रमेण तदशक्त्या वा न गुणानामियत्तया।

असें अखेरीस म्हणून, आपल्या नाम-संकीर्तनानें पुनीत व प्रमुदित झालेल्या या लेखणीस आपली चरणसेवा करण्यास कांहीं काळ विश्रान्ति देतों.'

३

# पंडित मोतीलाल नेहरू

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमधील सर्वांत भव्य, प्रतापशाली व प्रभुत्व-संपन्न असा सभासद कोणता? वरिष्ठ कायदेमंडळांत एक दिवस तरी जाऊन आलेल्या कोणाही सामान्य प्रेक्षकास हा प्रश्न विचारला तर तो 'पंडित मोतीलाल नेहरू' असें एकदम उत्तर देईल. आणि या उत्तरास कोणी किंचिदपि विरोध करणेंदेखील अशक्यप्राय होय. कारण, दिवसा प्रकाश कोण देतो याचें उत्तर जसें अचूक मिळावयाचें तसेंच वरील प्रश्नाचेंही होय. पंडितजींची ती रुबाबदार मूर्ति कायदे-मंडळाच्या दिवाणखान्यांत प्रविष्ट झाली म्हणजे बिन-सरकारी सभासद व प्रेक्षक आकृष्ट केले जावे हें तर साहजिकच; पण सरकारी बाकांवरील बडेबडे कार्यकारी अधिकारीही इकडे-तिकडे डोळे फिरवून जरा सांवरून बसतात व समोरच्या टेबला-वरील कागदांकडे जास्त कसोशीनें लक्ष देतात. पंडितजी म्हणजे उपजत उमरावच. जणुं काय आजूबाजूच्या परिस्थितीवर व समाजा-वर आधिपत्य गाजविण्याकरितांच या भूमीवर अवतीर्ण झालेले, असा यांचा मातबरपणा. 'आधीं सोन्याचें त्यांत जडावाचें' या न्यायानें त्यांच्या या नैसर्गिक स्वभावास शारीरिक व बौद्धिक गुणांची असामान्य जोड. स्वदेशीच पण अत्यंत मौल्यवान् असा पांढरा शुभ्र उत्तर हिंदुस्थानी पद्धतीचा पोषाख, कांखेखालून लपेटलेली ती लख-लखीत काश्मिरी शाल, देशभक्तीच्या पाण्यानें चमकणारे ते डोळे, दृढनिश्चयाची द्योतक अशी ती हनुवटी, करारीपणाचे दर्शक असे घट्ट दाबून धरलेले ते ओंठ, सर्व अवयवांवर ताबा चालविणारें असें

रुंद कपाळ, आणि भालपट्टावरही अंमलदारी करीत असलेलें, विविध अनुभवाचें आगर, राजकारणी चातुर्याची खाण व ज्ञानाची पेठ या वर्णनास साजणारें असें त्यांचें उत्तमांग, या ईश्वरदत्त लवाजम्यानिशीं एखादा महापुरुष केवळ हिंदुस्थानांतील वरिष्ठ कायदे मंडळांतच काय, पण जगाच्या पाठीवरील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रसमितींत दाखल झाला तरी तिला आपल्या दीप्तिमान् अस्तित्वानें शोभा आणणारच. तथापि हंसाचें यथार्थ सौंदर्य ज्याप्रमाणें मानस-सरोवरांत, त्याप्रमाणें पंडित मोतीलालजींचा खराखुरा गुणोत्कर्ष जनतेच्या मानस-सरोवरामध्यें प्रकाशमान् व्हावा व तेथेंच त्यांचें विशुद्ध तेज प्रगट व्हावें यांत काय नवल? मग तें मानस-सरोवर पारतंत्र्याच्या कर्दमानें बरेंच गढूळ झालेलें असलें तरी चिंता नाहीं. सुभाषितांत म्हटलेंच आहे, 'गिरिशिखरगताऽपि काकपंक्तिः पुलिनगतैर्न समत्व-मेति हंसैः ।' एकाद्या साहेबानें अगर त्याच्याशीं लांगूलचालन कर-ण्यांत स्वर्गसुखाचा लाभ मानणाऱ्या दुसऱ्या एखाद्यानें पंडितजींकडे तुच्छतादर्शक तिरक्या नजरेनें पाहिलें तरी पंडितजींची योग्यता त्यामुळें काडीमात्र कमी होऊं शकत नाहीं, हें न लिहितांच जाणण्या-सारखें आहे.

अशा कर्तबगार पुरुषाला हिंदी राष्ट्रीय सभेसारख्या मोठ्या प्रातिनिधिक संस्थेनें दोनदां अध्यक्षपद द्यावें हें सर्वथैव यथायोग्य होय. १९१९ सालीं अमृतसर येथील कॉंग्रेसचे पंडितजी अध्यक्ष होते व आतां कलकत्त्याच्या अधिवेशनाच्या अधिपतित्वाची सुपारी त्यांनाच प्रांतिक कॉंग्रेस कमिट्या व स्वागत-कमिटी यांच्या वतीनें देण्यांत आली आहे. इतकेंच नाहीं तर तिच्यावर रंगाक्षता टाकून ती पुनर्मुद्रांकितही केली आहे. अमृतसरच्या कॉंग्रेसपूर्वी त्यांच्या हातून पंजाबमधील सरकारी अत्याचारांच्या चौकशीबाबतींत महनीय राष्ट्रीय कामगिरी झाली. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या आधीं स्वरा-

ज्याची जवळ जवळ एकमुखी अशी मागणी प्राधान्येंकरून त्यांच्याच पुरस्कर्तृत्वामुळें, दूरदृष्टीमुळें व कौशल्यानें तयार झाली. हिंदुस्थानच्या अभागी इतिहासांत या प्रकारची राज्यघटना मूर्त स्वरूपांत आणण्याचें कार्य इतकें दुर्घट होऊन बसलें होतें कीं, तें घडवून आणणाराचा जेवढा गौरव करावा तितका थोडाच होणार; आणि राष्ट्रीय सभेनें मोतीलालजींस द्विवार अध्यक्षत्वाची माळ घालावी हा कांहीं लहानसहान मान नव्हे. अमेरिकेंत जॉर्ज वॉशिंग्टन दोनदां लोकनियुक्त अध्यक्ष झाले आणि इंग्लंडसारख्या देशांत तर एका पक्षाचा पुढारी अनेकशः मुख्य मंत्री होऊं शकतो. तथापि राष्ट्रीय सभेनें एकाच थोर पुरुषाची नऊ वर्षांनीं फिरून आपला कर्णधार म्हणून योजना करावी हें अत्यंत कौतुकास्पद व स्पृहणीय नाहीं असें कोण म्हणेल ? यापूर्वी पंडितजींच्या राष्ट्रीय सेवेचा परामर्ष घेतला गेला नाहीं असें नाहीं. कॉंग्रेसच्या जिल्हा व प्रांतीय संस्थांचीं सूत्रें त्यांच्या हातांत होतींच. १९२२ सालीं स्वराज्य पक्ष स्थापन झाला तेव्हां त्याची चिटणिशी त्यांच्याकडेच होती. देशबंधु दास हे अध्यक्ष नांवाला होते तरी पंडितजींची बहादुरी अशी कीं, चिटणिशीच्या वस्त्रांवर अध्यक्षांचा पोषाख ते चढवीत व त्यांच्या कर्तेपणानें तो दुहेरी पेहराव त्यांना उठून देखील दिसे. खुद्द असेंब्लींत तर ते स्वराज्यपक्षाचे अध्वर्यु स्वतःच्या लोकोत्तरत्वामुळें झालेच व आजतागायत आहेतही. पुण्यांतील लो० टिळकांच्या पुतळ्याचा अनावरणसमारंभ त्यांच्या हस्तें करविण्यांत एका दृष्टीनें महाराष्ट्रानें पंडितजींच्या सार्वजनिक मानसन्मानाची शीग भरली म्हटलें तरी वावगें होणार नाहीं.

हे सर्व सन्मान जमेस भरले तरी राजकारणांतील पंडितजींची सांप्रत स्थिति अलौकिक आहे यांत शंका नाहीं. अखिल भारतवर्ष एक पिरॅमिड अशी कल्पना केली तर पंडितजी त्याचा परमोच्च बिंदु.

वावटळीच्या चौफेर उधळणाऱ्या घोड्यावर स्वार होऊन त्याला नियंत्रित करणाऱ्या शक्तिमान् मनुष्याचें वर्णन इंग्रजी काव्यांत प्रसिद्ध आहे तें त्यांना चांगलें लागू पडण्यासारखें आहे. ॲसेंब्लीचे अभिषिक्त अग्रणी मुडिमन असोत अगर क्रेरर असोत; अनभिषिक्त पुढारीपण मात्र आपोआप पंडितजींकडे यावयाचेंच आणि तेंसुद्धां एकाच विशिष्ट पक्षाचें नव्हे, तर प्रायः सर्व पक्षांचें; मग औपचारिक रीत्या निरनिराळ्या छोट्या गटांचे वेगळे नेते कितीही असोत. बदक पाण्यांत जाणारें व जमिनीवर चालणारें असलें काय, किंवा शहामृग म्हटलें तर पक्षी व म्हटलें तर पशु अशा उभयसंचारी अवस्थेंत असला काय, पक्षिराज ही पदवी जशी एकट्या गरुडाची, तद्वत् सर्वमान्य व प्रस्थापित असे धुरंधर म्हटले म्हणजे पंडित मोतीलाल नेहरू हेच. म्हणून तर सरकारला त्यांचा दरारा वाटतो; व सर मालकम् हेले यांच्यासारखा ताठर मुत्सद्दी देखील त्यांच्या शिलशिलाटाला कंटाळून असेंब्ली सोडून गेला. जिनांसारख्या दुर्दम्य, स्वयंभू व मिजासखोर सभासदाला त्यांच्यापुढें आपली मान वांकवावी लागते. इतरेजनांना तर खालीं मान घालून मुकाट्यानें पंडितजी नेतील तिकडे जावें लागावें यांत आश्चर्य काय? १९२४ सालीं सरकारचें अंदाजपत्रकच्या पत्रक कोलमडून टाकण्याच्या प्रसंगीं बिचाऱ्या 'टाईम्स'च्या दिल्लीच्या बातमीदारानें ओरडून ओरडून विचारावें, 'अरे बेट्यांनो, या अलाहाबादच्या पंडिताच्या हातपेटींत डोकें खुपसून चाललां कोणीकडे?' पण पंडितजींच्या वजनापुढें व वर्चस्वापुढें कोण टिकाव धरूं शकणार!

१९१८ सालापूर्वी तें अमळ नेमस्त मताकडे झुकलेले होते. तेव्हां ते साहजिकच फक्त मवाळांना प्रिय असत. पुढें म. गांधींच्या साहचर्यामुळें महात्माजींच्या तेजस्वितेच्या ज्वालेंत त्यांचा नेमस्तपणा दग्ध झाला व ते असहकारितेचे पक्के आधारस्तंभ झाले. अर्थातच

तेव्हां असहकारितावाल्यांकडून त्यांचा खूप बडेजाव झाला. पंडितजी काश्मिरी ब्राह्मण म्हणून हिंदुवृंदाला पूज्य; लहानपणापासून मुसलमानी स्नेहसंबंध अधिक व परिचयही त्यांचाच विशेष, म्हणून त्यांचा ओढा मुसलमानांकडे असल्यामुळें त्यांनाही ते हवेसे वाटावे. एकेका वेळीं ते वरील पक्षांपैकीं प्रत्येकाला अत्यंत प्रिय होते व आतां जरी त्यांची लोकप्रियता व्यक्तिशः प्रत्येक पक्षांत पूर्वीच्याच प्रमाणांत कायम राहिली नसली तरी सामुदायिक विचार करतां, पूर्ण स्वातंत्र्यवादी नवीन पक्ष ध्यानांत घेऊनही, त्यांच्या लोकप्रियतेचा लघुतम साधारण विभाज्य राष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीपेक्षां अधिक भरेल हें निःसंशय आहे. १९१८ पूर्वी ते नेमस्त होते; परंतु स्वतःच्या डोळ्यांनीं पंजाबमधील सरकारी अत्याचारांची स्थिति व त्याविषयीं सरकारचें बेगुमानपणाचें धोरण पाहिल्यावर ते जहाल झाले. या पक्षांतराबद्दल जन्मतः जहाल असलेल्यांस विषाद तर नाहींच वाटत. उलट त्यांच्याविषयीं अभिमान जागृत होतो. किंबहुना, डायरशाही व ओड्वायरशाही यांच्यानंतरदेखील ज्यांनीं नेमस्तपणा सोडला नाहीं, त्यांच्याबद्दलची तिरस्काराची भावना दाबून ठेवणें एखाद्या जहालास कठिण वाटलें तरी तें क्षम्य ठरेल. रौलॅट या गोऱ्या साहेबाच्या नांवाशीं संलग्न असलेल्या 'काळ्या' बिलानंतरच्या पंजाबमधील घनघोर परिस्थितीच्या समक्ष अवलोकनानें ज्याचीं मतें बदललीं तोच खऱ्या कळकळीच्या देशभक्तीचा अवतार व जो आपलें विचारपरिवर्तन उघड निःशंकपणानें व धैर्यानें बोलून दाखवितो तोच खरा अद्वितीय स्पष्टवक्ता. बाकी, सायमन कमिशनवरील बहिष्कार मान्य आहे, पण बहिष्कारदर्शक मिरवणुकी मान्य नाहींत व स्वदेशी पसंत आहे पण परदेशी नापसंत नाहीं, असें वडिलोपार्जित मत प्रतिपादन करणाऱ्या पक्षाभिनिविष्टांची संख्या अधिक भरणार हें उघड आहे. 'माझ्या बापाची विहीर आहे' अशा दुराग्रहास बळी पडून, कित्येक

महान् स्थित्यंतरें झालीं तरी, जो शेजारच्या गोड्या व आरोग्यकारक पाण्याचा फायदा करून घेत नाहीं आणि त्यांतच मोठें भूषण मानतो त्याला कोण काय करूं शकणार ?

इतकी क्रांति व एवढा परिवर्त मुख्यत: महात्मा गांधींच्या परिचयानें व तत्त्वज्ञानानें केला. विचारांतर झालें तें इतकें संपूर्ण कीं, १९१८ चे नेमस्त १९२८ सालीं निर्भेळ स्वातंत्र्याची भाषा बोलूं लागले. आचारां-तील चैनबाजी व अत्तरांच्या दिव्यांची रोषनाई कमी झाली व त्यांची जागा साधेपणानें—पण तो देखील श्रीमंती साधेपणा—घेतली. दर आठवड्यास पॅरिसहून येणारें धुतलेल्या कपड्यांचें पार्सल थांबलें; शिकारीस जातांना इंग्रजी व हिंदी असे दोन मुदपाकखाने बरोबर जय्यत असावयाचे ते गेले; दिल्लीस विकत घेतलेल्या पितळी कुकरनें बनविलेल्या सामान्य भोजनावर भागूं लागलें. पण मूळ स्वभावांत म. गांधी झाले म्हणून काय फरक पाडणार ? असा बदल होत असता तर ' स्वभावो दुरतिक्रम: ' असें वाक्य जगाच्या व्यवहारांतील शाश्वत सत्य कसें होऊन राहिलें असतें ? पंडितजींची एकंदर राहणी पाहिली कीं, कोणी रोमन सेनेटर, विलायतेंतील लॉर्ड किंवा हिंदु-स्थानांतील राजा किंवा नबाब यांची आठवण व्हावी; त्यांचें 'आनंदभुवन' डोळयांनीं देखलें तर खरोखरच त्यानें 'लक्ष्मीविलास' राजवाड्याशीं अथवा एखाद्या ' गव्हर्मेंट हाऊस ' शीं देखील स्पर्धा करावी ! अशा गजान्त लक्ष्मीबरोबर तिचे पाठचे भाऊ म्हणजे लहरीपणा व अरेरावीपणा हे आले, तर अचंबा करण्याचें बिलकुल कारण नाहीं. सर्वांनीं यांची थुंकी झेलावी व यांच्या ताटाखालींच ठाण देऊन रहावें अशी यांची अपेक्षा स्वभावत: असणार हें क्रमप्राप्त ठरतें. जशी पैशाची दरकार नाहीं तशी माणसांचीही नाहीं. १९२३ सालीं एके दिवशीं पंडितजींच्या बंगल्यांत चोरी झाली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं चार लोकांनीं मोठ्या सहानुभूतीनें व खेदजड

अंतःकरणानें 'कितपत नुकसान झालें?' असें विचारलें. पंडितजींनीं अगदीं त्या गांवचे आपण नव्हे असें दाखवून उत्तर केलें, 'असेल तीन-चार हजारांचें किडूकमिडूक.' आणि इतकें उत्तर देऊन त्यांनीं आपलें मजलेदार खानदानी हास्य केलें व त्या हास्य-समुद्राच्या लाटांत घरांतील चोरी विरून गेली. हा अलिजाही बेफिकीरपणा द्रव्याच्या बाबतींत कौतुक करण्यासारखा भासला तरी, जेव्हां तो निर्जीव द्रव्यापासून सजीव मनुष्यांपर्यंत पोंचतो तेव्हां तो निःसंशय दूषणीय वाटणें स्वाभाविक होय. ज्या मापानें आपल्या शागीर्दाला किंवा पान देणाऱ्या नोकराला मोजावयाचें त्याच मापानें राजकारणांतील स्नेही किंवा इतर सद्गृहस्थ यांना देखील मापूं म्हटलें तर तें चालणें शक्य नाहीं, ही गोष्ट उमरावी उद्दामपणांत विसरून जाते. एकाच शहरचे पंडित मालवीय व पंडित मोतीलाल यांच्यामधून फारसा विस्तव जात नाहीं हें महशूर आहे. पण पंडितजींच्या तीक्ष्ण जिव्हास्त्रानें लालाजींचें हृदयही विद्ध झालेलें होतें, हें स्वतः त्यांनींच निधनापूर्वीं लिहून ठेविलें आहे. महाराष्ट्र व पंडितजी यांचें जसें काय विळया-भोंपळयाइतकें सूत. याचें कारण काय असेल तें पंडितजी जाणे किंवा परमेश्वर जाणे. वस्तुस्थिति तशी होती व व अजूनही नाहीं असें म्हणणें बरेंच धाडसाचें होईल.

एकदां महाराष्ट्र हें भारतवर्षरूपी विराटपुरुषाचें एक 'रोगट व नासलेलें इंद्रिय' म्हणून तें तोडून टाकण्याचा पंडितजींनीं जाहीर रीतीनें चंग बांधला होता. वाफेच्या जंगी रुळाखालीं त्याचें पीठ करून टाकूं, अशी त्यांनीं घोषणा केली होती. असें सांगतात कीं, प. वा. फेरोजशहा मेथांनीं देखील, महाराष्ट्रामधून चौचाकी चार घोड्यांची गाडी भरधांव चालवून त्याचा धुव्वा उडवून देऊं, अशी तंबी महाराष्ट्रीय पुढाऱ्यांस दिली होती. तथापि मेथांची गाडी जशी बोरघाटांतून वर येऊं शकली नाहीं म्हणून म्हणा, किंवा मुंबईच्या

सिंहाला अश्वरथ हांकण्याचा धीर होईना म्हणून म्हणा, महाराष्ट्र अखंड राहिला, तसा तो याही वेळीं राहिला. पंडितजींचें अस्त्र बोथट झालें व वाफेचा रूळ मसूरी-नैनितालच्या सर्द हवेंत थंड पडला! तें कसेंही असलें तरी, पंडितजींना प्रतिस्पर्धी सहन होत नाहीं हें खरें. १९२३ सालीं दासबाबूंनीं असेंब्लींत जाण्याचें टाळलें आणि ते बंगालच्या प्रांतिक मंडळांतच राहिले, या दर्शनी चमत्कारिक गोष्टीचें कारण झालें तरी हेंच कीं, पंडितजींच्या सार्वभौमत्वांत त्यांस अंशभागी खपत नाहीं. परंतु पिढीजात संस्कारामुळें व प्रचलित संवयीमुळें हा दोष उत्पन्न झाला असला तरी पंडिजींना त्याची जाणीव नाहीं असें मात्र नव्हे, हें ध्यानांत धरलें पाहिजे. असे अवगुण ज्ञात होतांच चुटकीसरसे लुप्त होते तर प्रकृतीचें प्रमाथित्व तें काय राहिलें असतें? दिल्ली येथें कांहीं महिन्यांपूर्वी सर्वपक्षीय परिषद् भरली तेव्हां लाला लजपतराय दिल्लींत उपस्थित असूनही सभेस आले नाहींत असें पंडितजींच्या दृष्टोत्पत्तीस येतांच, मागील भांडणें कोर्टांतील पक्षपातित्वाप्रमाणें विसरून जाऊन, ते लालाजींच्या बंगल्यावर गेले व आपला हात पुढें करून म्हणाले कीं, "लालाजी, हा मी मित्रत्वाचा हात पुढें करीत आहें, तुमचाही पुढें करा व आपण हस्तांदोलन करूं या." या स्वभावज्ञानांत, उदयोन्मुख परमतसहिष्णुतेंत व कार्यैकदृष्टित्वांतच पंडितजींच्या भावि यशाचें प्रभावी बीज आहे. कीर्तिध्वजाच्या अशा वाढत्या उज्ज्वलतेवरून टेनिसनें

> '...Men may rise on stepping-stones
>
> Of their dead selves to higher things.'

असा सिद्धान्त केला नसेल तर दुसऱ्या कोणत्या उदाहरणांवरून!

आज मोतीलालजींना सदुसष्टावें वर्ष आहे; परंतु त्यांचा उत्साह अणुमात्र कमी झालेला नाहीं. उलट, वयोमानाबरोबर तो वाढतो

कीं काय असेंच मनांत येतें. चळवळीकरितां हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत हिंडण्यांत तर त्यांच्या पायाला जसें चाक बांधलेलें; वकिली काम घेऊन विलायतेंतही कांहीं महिने राहण्यास मागेंपुढें अगदीं अलीकडेसुद्धां पाहिलें नाहीं. त्यांत पैशाचें घबाड लाभलें हें खरें असलें तरी उत्साह, निरलसता व कार्योत्सुकता यांची किंमत कमी नाहीं हें कबूल केलें पाहिजे. वृद्धावस्थेंत देखील ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभेंत बसल्या बसल्या त्यांचे ठरावांचे, उपसूचनांचे वगैरे मसुदे करण्याचें काम चाललेलें असावयाचें. १९२१ च्या डिसेंबर महिन्यांत सरकारनें त्यांस तुरुंग दाखविला; पण बंदिखान्यानें त्यांची देशभक्ति थिजली तर नाहींच, उलट पक्षीं तिला उकळ्या फुटल्या व त्यांच्या उष्णतेनें त्यांच्या सर्व कुटुंबांत राष्ट्रप्रेमाची ऊब निर्माण झाली. त्यांचें इंग्रजी शिक्षण बी. ए च्यापर्यंत झालें होतें तरी, वाङ्मयज्ञानाची उणीव त्यांच्या कायद्याच्या व्यापक व गाढ ज्ञानानें भरून काढली असल्यामुळें स्वराज्य पक्षाचा १९२३ सालचा त्यांनीं कौन्सिल-निवडणुकीचा जाहीरनामा, कॉंग्रेसच्या कायदेभंग-चौकशी-कमिटीचा रिपोर्ट व आतांचा नेहरू रिपोर्ट इत्यादि गंभीर व मार्मिक लिखाणांवरून लेखनांत त्यांचा कसा हातखंडा आहे हें प्रत्ययास येतें. कुशल कारागिरानें दगडावर दगड कोरींव रीतीनें व ठाकठिकीनें बसवावा त्याप्रमाणें त्यांची वाक्यरचना व शब्दयोजना रेखीव, ठसकेबाज व जोरदार असते. लेखनशैलीप्रमाणें भाषापद्धतिही सरळ व निघोट असते. दोहोंत विद्वत्तेचे फवारे प्रायः नसावयाचे, पण एक प्रकारचा स्पष्टवक्तेपणा व जोश असावयाचाच. पंडित मदन मोहन मालवीय जाहीर व्याख्यान देतांना ऐकणारांच्या डोक्यावर त्यांच्या मुखांतून गंगेचा पवित्र प्रवाह सारखा पडत असल्याचा भास होतो; लाला लजपतराय बोलण्याच्या आवेशांत आले म्हणजे श्रोत्यांना भावनोद्रेकाचें अखंड धारास्नान घडल्यासारखें

घाटावें; देशबंधु दासांचें वक्तृत्व-श्रवण म्हणजे तुफान समुद्राच्या उंच उडणाऱ्या लाटांवर तरंगण्याप्रमाणें; बॅरिस्टर जयकरांचें व्याख्यान म्हणजे नाजूक व सुवासिक जाईजुईच्या फुलांचा व गुलाबांचा वर्षाव; मोतीलालजींच्या भाषणपद्धतींत वरीलपैकीं एकही गुण उत्कटत्वानें नाहीं; तथापि त्यांचें भाषण तीरासारखें सरळ व थेट लक्ष्यवेधक अशा स्वरूपाचें असावयाचें, मग तें असेंब्लींत स्वराज्याची संयुक्त मागणी पुढें मांडण्याच्या वेळचें असो, नाहीं तर राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठा-वरून केलेलें असो. १८८३ पासून ज्या पेशाची गिरणी सतत पंडितजींनीं चालविली त्याचा परिणाम इतका कायमचा व सर्व-व्यापी झालेला दिसतो कीं, कोठेंही गेलें तरी त्यांचें बोलणें-चालणें वकिली बाण्याचें व्हावयाचें. मात्र फरक एवढाच कीं, अदालतींत ते पक्षकाराचे वकील व असेंब्लींत व बाहेर देशांत ते जनतेचे वकील.

कार्लाईलनें म्हटलें आहे कीं, महापुरुष म्हणजे परमेश्वरानें आकाशांतून भूमीवर फेंकलेली जळती ज्योत. पंडित मोतीलालजींच्या देशभक्तीची स्फूर्ति नैसर्गिक नसून म. गांधींपासून प्राप्त झालेली असें विधान केलें तर त्यांत पंडितजींना गौणपणा आणला असें होत नाहीं. लोकमान्य टिळक, देशबंधु दास, लाला लजपतराय यांची प्रणालिका अजीबात वेगळीच. महात्माजींच्या गुरुत्वाकर्षणानें पंडितजी राजकारणांत प्रामुख्यानें पडले, त्यांच्याच प्रोत्साहनानें पंडितजींनीं केला तो अभिनंदनीय स्वार्थत्याग केला व उभयतांचा गुरुशिष्यसंबंध पुढें पुढें नष्ट होऊन भावाभावांच्या प्रेमांत रूपांतर पावला. म. गांधींनींही कित्येकवेळां आपले कडक नियम मोडून तो संबंध सदैव ताजा व स्वच्छ असा राखला आहे. स्वराज्यपक्षांत पुढारपण पंडितजींचें म्हणून तर असहकारितावाद्यांचा व त्या पक्षाचा झाला तो समेट घडून आला व तो देखील साबरमतीस-फार कशाला, अजून देखील महत्त्वाचा असा धोरणाचा अगर

कार्यक्रमाचा कांहीं प्रश्न उद्भवला म्हणजे कौल घ्यावयास पंडितजी अलाहाबादेहून साबरमतीस जातात व हवा तसा फांसाही त्यांना पडतो. इतर कोणीं विनंति केली कीं, 'महात्माजी, आपण नेहरू रिपोर्टाविषयींच्या सर्वपक्षीय परिषदेचे अध्यक्ष व्हा' म्हणजे 'माझ्या-मुळेंच परिषद् यशस्वी होणारी असली तरी मी येणार नाहीं' असें महात्माजींचें सडेतोड उत्तर यावयाचें. पण पंडितजींच्या प्रेमाखातर व मोहबतीखातर 'जो या रिपोर्टास विरोध करील तो देशद्रोही' असें निर्भीडपणें लिहिण्यांत त्यांनीं कमी केलें नाहीं ! कोणाच्याही स्फूर्तीनें पंडितजी राजकारणांत पडले असोत, त्यांची कर्तबगारी हिंदी राष्ट्राला ललामभूत झाली यांत तिलप्राय शंका नाहीं. त्यांनीं कलकत्त्याच्या कॉंग्रेसचें अध्यक्षपद ग्रहण करण्याचे समयीं प्रत्येक हिंदपुत्रानें त्यांस दीर्घायुष्य चिंतावें हें 'काले वृष्टिरिव' नव्हे का ? पं. मोतीलाल नेहरूंचें सर्व कुटुंब हा एक हिंदमातेच्या गळयांतील दैदीप्यमान व मनोहर असा मुक्ताहारच होय; आणि त्यांत पंडित मोतीलाल हें एक तिच्या विशाल व तेजस्वी हृत्प्रदेशावर रुळणारें, जवा-हिराच्या कोंदणांत बसविलेलें, मौक्तिकरत्न अशी कल्पना केली तर ती प्रत्येकास सत्य व म्हणूनच रम्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. धन्य त्या मायभूमीची कूस, कीं जिच्यांतून अशीं माणिकमोतीं बाहेर पडतात व तिला आपल्या दैवी प्रभेनें भूपावितात !

---

## ४

# सरदार वल्लभभाई पटेल

केनोत्तुंगशिखाकलापकपिलो बद्धः पटांते शिखी।
पाशैः केन सदागतेरगतिता सद्यः समासादिता ॥
केनानेकपदानवासितसटः सिंहोऽर्पितः पंजरे।
भीमः केन च नैकनक्रमकरो दोर्भ्यां प्रतीर्णोऽर्णवः ॥

—मुद्राराक्षसम्.

दिल्ली येथें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची गेल्या हिंवाळ्यांतील बैठक चालू होती. एक दिवस सकाळच्या वेळीं असेंब्लीचे अध्यक्ष ना. विठ्ठलभाई पटेल यांच्या बंगल्यावर घरगुती मंडळी चहा पीत बसली होती. यजमान म्हणून विठ्ठलभाई होते. बार्डोलीचा अद्वितीय विजय संपादन करून विश्रांतीसाठीं थोरल्या भावाकडे आलेले वल्लभभाई होते. जिवलग स्नेही म्हणून मधून मधून बड्या मित्राच्या घरचा पाहुणचार घेणारे जमनादास मेथा असेंब्लीच्या कामाकरितां त्यांच्या-कडे राहातच असत. वडिलांची अत्यंत मनोभावानें शुश्रूषा करण्यांत दक्ष असणारी वल्लभभाईची लाडकी कन्या मणीबेन पण तेथें होती. चहा-चिवडा, शेव-गांठ्या वगैरे चाललें आहे, गप्पा अगदीं रंगांत आल्या आहेत, अशा वेळींच पंजाबचे लाला हंसराज आपली प्रभात-समयींची सहल संपवून बंगल्यांत शिरले. या दोन बंधूंची जोडी एकत्र पाहून त्यांनीं एकदम आश्चर्याचे उद्गार काढले: "हे दोनच भाऊ आहेत तरी सरकारला काय 'दे माय धरणी ठाय' झालें आहे! मग पांच असते तर सरकारची खरोखरच पांचावर धारण बसली असती!" विठ्ठलभाईची करणी लोकांना माहीत होतीच. वल्लभ-

भाईनीं बार्डोलीस यशःसिद्धि मिळविली ती तर अक्षरशः अभूतपूर्व. कोणी नाहीं म्हणावें ? कदाचित् सागराला उपमा जशी सागराचीच किंवा राम-रावणांच्या युद्धाला जशी दुसरी तुलना नाहीं, त्याप्रमाणें बार्डोलीचा पराक्रमही इतिहासांत अनन्योपमालंकाराचें उदाहरण होऊन राहील. असें हें दीप्तिमान् कार्य व तें घडवून आणणाऱ्या कर्मवीर वल्लभभाईचें नांव साऱ्या भारतवर्षासमोर अगदीं ताजें असतां, लाला हंसराजांच्या तोंडांतून जीं भावनामय वाक्यें बाहेर पडलीं तीं सर्व हिंदी जनतेच्या अंतःकरणांत अश्रुतावस्थेंत वास करीत होतीं असें अनुमान केलें तर तें शंभर टक्के यथार्थ होय, हें प्रत्येकजण कबूल करील. कीट्स कवीनें मोठ्या बहारीनें म्हटलें आहे कीं—

Heard melodies are sweet, but those unheard
Are sweeter;

या न्यायानें लोकांनीं केलेलें वल्लभभाईचें मानसिक व निःशब्द यशोगान मधुरतर असेल आणि लोकांच्या हृत्कासारांत अदृष्ट भाव-तरंग जास्त जोरानें व सौंदर्यानें खळाळलेही असतील. तें कसेंही असलें तरी लालाजींच्या हृदयांतून जे विचार उचंबळून प्रगट झाले, तीच अखिल भरतखंडाची आकाशवाणी म्हटली तरी चालेल.

बार्डोलीच्या पराक्रमाचें वर्णन कोठवर करावें ? या वीरकृत्याचें मुख्य श्रेय कोणाकडे हें एका शब्दांत सांगावयाचें म्हटलें तर ‘ सरदार वल्लभभाईकडे ’ असें म्हणणें सर्वथैव योग्य होय. नभ-प्रांगणांत नक्षत्रें पुष्कळ नसतात असें नाहीं; त्यांचा प्रकाश अगदीं कांहींच नसतो असेंही नव्हे. तथापि चंद्रिका ही चंद्राचीच; इतर तारकांचा धवलिमा असला तरी बेताचाच व तो चांदण्यास पोषक होण्यापेक्षां उलट त्यानेंच अधिक शोभा पावलेला. बार्डोलीस सदैव पांढरी स्वच्छ खादी वापरणारे स्वामी आनंद, महादेवभाई देसाई इत्यादि गृहस्थ होते; पण सर्वांहून श्रेष्ठ असे सूत्रधार सरदार वल्लभ-

भाई तेथें होते, म्हणून अंगीकृत कार्याला लाभलें तें अप्रतिम यश प्राप्त झालें व त्यांनाही मोठेपणा मिळाला. काय ती बार्डोलीची संघटना ! काय ती स्वयंसेवकांची व तेथील शेतकऱ्यांची लष्करी शिस्त ! काय ती कार्याची व्यवस्था ! असें होतें म्हणून तर एवढें सर्वशक्तिमान् सरकार हादरलें, त्याच्या यंत्राला खीळ पडली व 'टाइम्स' कार तावातावानें जाहीर रीतीनें विचारूं लागले कीं, 'बार्डोलींत स्वराज्य कोणाचें, बादशहांचें का वल्लभभाईचें' आणि आपल्या कौन्सिलमधील भाषणांत देखील माजी गव्हर्नरसाहेब सर लेस्ली विल्सन यांनीं सवाल टाकला, 'बार्डोलींत हुकमत बादशहांच्या राज्यकर्त्यांची किंवा एका विवक्षित व्यक्तीची?' पण असल्या वर्तमानपत्राच्या रकान्यांतून अगर कौन्सिलच्या दिवाणखान्यांतून मारलेल्या तीरांनीं प्रत्यक्ष परिस्थिति थोडीच बदलणार होती! तोंडाची किंवा लेखणीची वाफ दवडली तरी सरकारी यंत्र थंड पडलें त्यांत ऊब निर्माण कोठून होणार? आणि म्हणून तर मुंबई इलाख्याच्या गव्हर्नरसाहेबांना एकदम सिमल्यास धूम ठोकावी लागली. बिचाऱ्या स्थानिक कलेक्टर-कमिशनरांची दैना तर पुसूंच नये. हिंदुस्थानाचे डोळे बार्डोलीकडे वळले; ज्याच्या त्याच्या तोंडीं एकच एक विषय. या जबरदस्त नोकरशाहीच्या नाड्या कशा आंखडल्या; हा सर्वभक्षक अग्नि कोणी दाबून ठेवला; वाऱ्यासारखी हिची गति अगदीं अप्रतिहत, पण ती सुद्धां कुंठित झाली कीं हो; इतका सिंह बळकट, परंतु पिंजऱ्यांत कुत्र्या-माकडासारखा कोंडला गेला; सुसरी-मगरी वगैरे माणसाचे पाय ओढणारे व त्याला गिळंकृत करणारे क्रूर प्राणी समुद्रांत असंख्य खरे, तथापि केवळ बाहूंच्या सामर्थ्यानें तो उल्लंघिला गेला ! ! अमात्य राक्षसाला पकडल्यानंतर आर्य चाणक्यांनीं जे विस्मित होऊन शिरोभागीं उद्धृत केलेले उद्गार काढले तेच येथें लागू पडतात. इतकेंच काय, 'विनैव युद्धादार्येण जितं

दुर्जेयं परबलमिति लज्जित एवास्मि ' असें जें राक्षसाचें स्वगत भाषण त्याचाच प्रतिध्वनि गव्हर्नरसाहेबांच्या किंवा खुद्द व्हाइरॉयसाहेबांच्याही अंतःकरणांत उमटला असेल म्हटलें तरी वस्तुस्थितीस सोडून होणार नाहीं.

सरदार वल्लभभाईंची कार्य अंगावर घेण्याची व तें पार पाडण्याची पद्धतिच मुळीं अशी विलक्षण व लोकोत्तर आहे कीं, तींत यश येणें हें सुईमागून दोरा जावा तशासारखें अपरिहार्य होऊन बसतें. उत्कृष्ट प्रसंगाची टपून वाट पहात बसावयाचें व आपल्या कल्पनेप्रमाणें व योजनेप्रमाणें जुळणी झाली अशी स्वतःची खात्री पटली कीं, एकदम झडप टाकून कार्याचें पुण्याहवाचन व्हावयाचें व संकल्पाप्रमाणें तें तडीस जावयाचेंच. परवां ते मुंबईस सहज बोलतांना म्हणाले देखील, कीं या बार्डोलीकरितां मी किती तरी दिवस गणपति पाण्यांत बुडवून ठेविला होता. आणि तें खरेंच; कारण पहा, बार्डोलीच्या पूर्वी, इ० सन १९२० सालाच्या अगोदरपासून सरदार वल्लभभाई महात्मा गांधींच्या शिष्यवर्गांत आहेत, तरी त्यांचें नांव असें कोठें झळकत होतें ? अर्थात् त्या वेळच्या त्यांच्या कार्याच्या जमाखर्चाच्या चोपड्या कोऱ्या करकरीत आहेत किंवा त्यांच्या कीर्तीची तिजोरी मॅडम हंबर्टच्या तिजोरीसारखी अगदीं रिकामी आहे असें मात्र नव्हे. गोध्र्याच्या परिषदेनंतर वल्लभभाई तिचे चिटणीस झाले व परिषदेपुढील वेठबिगार बंद करण्याचें काम त्यांनीं शिरावर घेऊन अशा जोरानें चालविलें कीं, सत्याग्रहापर्यंत मजल येणार असें पाहतांच कमिशनर प्रॅटसाहेबांनीं त्यांचें म्हणणें ताबडतोब मान्य केलें. याच्यानंतर आला बोरसदचा लढा. बोरसदच्या रयतेवर सरकारनें निष्कारण जादा पोलिसांच्या खर्चासाठीं दोन-अडीच लाख रुपये दंड लादला. जनतेची सेवा करण्याची सुसंधि आली असें वल्लभभाईनीं हेरलें; व अशी सुयंत्रित चळवळ केली कीं, स्वतः गृह-

मंत्र्यांना ठिकाणावर जाऊन दंड माफ केल्याचें जाहीर करावें लागलें, तेव्हांच सरकारचा जीवही भांड्यांत पडल्यासारखा झाला. अशा आंदोलनाचा परिणाम दूरवर पोहोंचत असतो. बोरसदची चळवळ जिंकल्यानंतर आनंद तालुक्यांतील कित्येक गांवांवर असाच जुल्म चालला होता तो, त्या लोकांनीं नांवाला अर्ज गुजरण्याचा अवकाश, तत्क्षणीं थांबला.

या सर्व विजयांवर बार्डोलीनें सोनेरी कळस चढविला. ते त्यांचे रामदासस्वामींच्या मठांसारखे अकरा आश्रम, प्रत्येक आश्रमाचा नायक, ती त्यांची स्वयंसेवकांची सेना, तें अत्यंत शीघ्र-कार्यकारी असें प्रसिद्धिखातें वगैरे बार्डोलीचा सर्व सरंजाम पाहिला म्हणजे मन आश्चर्यानें थक्क होतें! बार्डोलीच्या नंतर 'मिस्टर' किंवा 'श्रीयुत' वल्लभभाई होते ते 'सरदार' वल्लभभाई झाले. असें असतां त्यांना तरी आत्मविश्वास कां न वाटावा? वांद्र्याच्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेची विषय-नियामक कमिटी बसली होती. नामदार विठ्ठलभाई पटेल यांनीं पब्लिक सेफ्टी बिलावरचें आपलें रूलिंग नुकतेंच दिलेलें होतें व शिवाय ते पडले महाराष्ट्र प्रांतिक कमिटीचे एकवेळचे उपाध्यक्ष. तेव्हां त्यांच्या अभिनंदनाचा ठराव कमिटीपुढें आला. सुचविणारानें आपल्या हातांतील कागदावरून 'This Conference congratulates the Honourable Mr. Vithalbhai Patel' वगैरे शब्द वाचले. छोटे भाई परिषदेचे अध्यक्ष व बड्या भाईचें अभिनंदन. 'ऑनरेबल' हा शब्द येतांच मंडळींत हा योग पाहून हास्यलहरी उठल्या. वल्लभभाई गंभीरपणानें चटकन् उद्गारले, 'Allright, let us go on, my *honour* was never in doubt.' वडील बंधु झाला म्हणून काय झालें? त्याचें कार्यक्षेत्र किती म्हटलें तरी अगदीं मर्यादित. मग धाकट्या भावाला आपल्या सुयशस्वी कर्तबगारीबद्दल आत्मविश्वास वाटावा व तो त्यानें अशा

अंमळ चमत्कारिकशा भासणाऱ्या रीतीनें व्यक्त करावा हें साहजिक नाहीं का ? फार काय, इतरांच्या बाबतींत वल्लभभाईंच्या संबंधीं, जगन्नाथ पंडितानें एका अन्योक्तींत म्हटल्याप्रमाणें—

**येन भिन्नकरिकुंभविस्खल-**
**न्मौक्तिकावलिभिरंचिता मही ।**
**अद्य तेन हरिणांतिके कथं**
**कथ्यतां नु हरिणा पराक्रमः ॥**

असें विधान केलें तर तें किंचित् अत्युक्तिपूर्ण वाटलें तरी, आजच्या राजकारणाच्या परिस्थितींत अगदींच असमर्थनीय ठरेल असें मात्र नव्हे. बार्डोलीस फिका पाडणारा आणखी एखादा सवाई विजय वल्लभभाईनें संपादन केला, तर तो कोणास नको आहे ?

वल्लभभाईंना म्हटलें म्हणजे सत्याग्रहाचें जसें कांहीं बाळकडूंच पाजलेलें. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात म्हणतात. वर्ड्स्वर्थ कवीलाही जो विचार एका काव्यमय प्रसंगीं अत्यंत रम्य व शाश्वतसत्यासारखा स्फुरला तो, ' Child is the father of the man. ' प्रभातकालावरून सबंध दिवसाचें हवामान वर्तवावें व बालपणांत भावि कर्तबगारीची कल्पना करावी, असें मिल्टन लोकांना सांगतो. सरदार वल्लभभाईंनीं हीं सुभाषितें सर्वस्वीं खरीं ठरविलीं आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. अक्षरशः पाळण्यांत जरी नसले तरी यांचे पाय लहानपणीं वर्गांत मात्र चांगलेच दिसले. नडीयादच्या प्राथमिक शाळेंत एक शिक्षक पुस्तकें, कागद, पेन्सिली वगैरे शालोपयोगी सामान जोडधंदा म्हणून विकीत असे. या मास्तरापासून कांहीं घ्यावयाचें नाहीं, असा वल्लभभाईंनीं आग्रह धरला व चळवळ सुरू केली. अखेरीस इतक्या थराला गोष्टी गेल्या कीं, सात दिवस शाळा बंद पडली. मास्तरला नमतें घ्यावें लागलें व तंटा मिटला. बडोद्याच्या हायस्कुलांतही मॅट्रिकच्या वर्गांत असलाच प्रकार झाला.

ऐच्छिक भाषा म्हणून त्यांनीं संस्कृत न घेतां गुजराथी घेतली. गुजराथीचे शिक्षक जरा शिष्ट होते. त्यांनीं या 'महापुरुषां' ना टोमणा दिला कीं, संस्कृत सोडून गुजराथी घेतली खरी; पण संस्कृता-शिवाय तुम्ही गुजराथी काय रडणार? बोलण्याच्या कामांत पटेल-बंधु अगदीं निर्भीड व सडेतोड! उत्तरास सव्याज प्रत्युत्तर. वल्लभ-भाईनीं उलट विचारलें, 'मी जर गुजराथी भाषा घेतली नसती तर, सर, तुम्ही तरी कोणापुढें आपलें पांडित्य करणार होतां?' शिक्षक खजिल झाला, त्याची प्रकृति गरम झाली. एकी एकी एकपासून दहापर्यंत पाढे दहा वेळां लिहून आणण्याबद्दल त्यांनीं सजा सुनावली. शिष्य ऐकत नाहींसें पाहून दररोज शिक्षेचें प्रमाण भूमितिश्रेढीनें वाढत गेलें. शेवटीं तेच पाढे दोनशें वेळां लिहून आणण्यापर्यंत मजल गेली. जिकीरीला येऊन शिष्यानें पाटीवर 'बसें पाडा' (दोनशें रेडे) असें एकदांचें लिहून आणलें व पाटी मास्तरसमोर धरली. आपली कांहीं डाळ शिजत नाहीं, असें पाहून छोटालाल मास्तरनें या नाठाळ छोकऱ्याला हेडमास्तरसाहेबांकडे पाठविलें. वल्लभभाईनीं सांगितलें कीं, 'शिक्षा केली ती माझ्या फायद्याची असती तर मी मान्य केली असती. हे पाढे काढीत बसलों तर मला लोक मूर्खांत काढतील.' हें प्रकरण कांहीं वेगळें आहे असें जाणून प्रमुखमहाशयांनीं वल्लभ-भाईंना सोडून दिलें.

वयोमानाबरोबर हीच उपजत मनोरचना बळावत गेली व बार्डो-लींत तिची सायसंगीन व वैभवशाली अशी अभिव्यक्ति झाली. इतर दृष्टीनें वल्लभभाईंचें चरित्र महानुभावि व तेजस्वि आहे असें नाहीं. १८५७ सालाच्या बंडांत झांशीच्या राणीच्या प्रदेशांत ज्यानें दोनतीन वर्षें घालविलीं, अशा बापाच्या पोटीं जन्म इतकेंच काय ते. बाकी घरची गरिबी फार, स्वतःची बुद्धिमत्ता सुमार, आजु-बाजूची परिस्थिति फारशी अनुकूल नाहीं, असे त्यांचे दिवस गेले.

निरलसता व कार्यैकदृष्टित्व हे गुण मात्र सत्याग्रहाच्या भावनेप्रमाणें शैशवापासून अंगीं मुरलेले. शेतें, खाचरें व गांवढळ लोक यांच्या अखंड सहवासांत प्रेमळ आईबापांची पाखर असतां कांहीं थोडा काळ लोटला. पेटलादला शिकावयास गेले तरी रविवारीं आपल्या राहत्या गांवीं म्हणजे करमसदला जावयाचें; आठवड्याचा शिधा बांधून घेऊन यावयाचा व पांच-सात सहाध्यायांनीं मिळून परमार्थतः स्वयंपाक करून अभ्यास साधावयाचा. कशीबशी मॅट्रिकची परीक्षा पदरांत पडली. विलायतेस जाऊन बॅरिस्टर व्हावें ही मनीषा उत्पन्न झाली. पण जावयाचें कसें ? अगोदर डिस्ट्रिक्ट प्लीडर होऊन पैसा जमवून जावयाचें असा निर्धार केला. परीक्षा उतरली. बोरसदला विठ्ठलभाई वकील होते, यांनीं गोध्र्यास वकिली थाटली. वल्लभभाई वकिलींत फार निष्णात ठरले. द्रव्यसंचय पुरेसा झाला. पासपोर्ट मिळविला. पण तो होता व्ही. जे. पटेल या नांवाचा. विठ्ठलभाईंच्या कानीं ही बातमी जातांच ते म्हणाले, 'मीही व्ही. जे. पटेल आहें व त्यांतल्यात्यांत मी वडील भाऊ, तेव्हां माझा हक्क विलायतला जाण्याचा अगोदर.' झालें; विठ्ठलभाई गेले, वल्लभभाई मागें राहिले व थोरले भाऊ परत आल्यावर त्यांच्या खांद्यावर कुटुंबभार टाकून वल्लभभाईंनींही प्रयाण केलें. हिंदुस्थानांत जसा अभ्यास कष्टमय दशेंत त्यांस करावा लागला, तसेंच तिकडे कायद्याचें परिशीलन देखील. वसतीच्या ठिकाणापासून मिड्ल् टेंपल अकरा मैल लांब होतें. परंतु इतकें अंतर रोज पायांनीं तोडावयाचें, सायंकाळीं सहा वाजेपर्यंत वाचनालयांत बसून वाचावयाचें. असा दर दिवशीं सतरा सतरा तास अभ्यास करून, कौतुकाची गोष्ट कीं परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिला नंबर मिळविला, पन्नास पौंडांची शिष्यवृत्ति खिशांत टाकली व चार टर्म्सची माफीही पण फायद्यांत पाडली. बॅरिस्टरीच्या परीक्षेंत यांनीं लिहिलेल्या उत्तराच्या वह्या एका परी-

क्षकाच्या इतक्या पसंतीस आल्या कीं, त्यानें न्यायमूर्ती स्कॉट यांस मुद्दाम पत्र लिहिलें व या नूतन बॅरिस्टरास न्यायखात्यांत श्रेष्ठ पदवीवर चढविण्याविषयीं सांगितलें. पण नशिबाची रेषा अशी कीं, हायकोर्टांतल्या उच्चासनावर बसण्याऐवजीं सरदार वल्लभभाई जनतेच्या मनोमंदिरांत ध्रुवासारखें अढळपद प्राप्त करून बसले! 'जित्याची खोड' सत्याग्रहाची, स्वभावजनित प्रकृति तशीच. मग न्यायदानाचें नाजूक काम यांच्याच्यानें कसचें होणार होतें? लोकमान्य टिळकांनीं प्रोफेसरचें काम जन्मभर केलें असतें तर राष्ट्राचें जें नुकसान झालें असतें तेंच वल्लभभाई हे न्यायाधीश होते तर झालें असतें.

छात्रावस्थेंत जे सद्गुण त्यांच्या वर्तनांत दृष्टोत्पत्तीस येतात तेच आजतागायत त्यांच्या सार्वजनिक चारित्र्यांत आढळतात. बॅरिस्टर होऊन अहमदाबादेस वकिली सुरू केल्यावर 'गुजराथ क्लबांत' ब्रिज खेळण्यांत हे नेहमीं चूर असावयाचे. एकदां म. गांधी त्या क्लबांत गेले व कांहीं उपदेशपर शब्द बोलले. त्याबद्दल तर वल्लभभाईनीं त्यांची कुचेष्टाही केलेली. परंतु 'बापू' च्या प्रभावानें व संनिकर्षानें वल्लभभाई जे एकदां लोकसेवेंत पडले ते कायमचेच पडले. जवळ जवळ अहर्निश लोकसेवेकरितां त्यांनीं संन्यासग्रहण केलें. आपल्या अंगच्या गुणांचा व कर्तृत्वाचा पुरेपुर फायदा त्यांनीं तेव्हांपासूनच्या सर्व सार्वजनिक कार्यांत जनतेस करून दिला. गुजराथेंत जलप्रलय झाला. दुःखग्रस्त व हताश झालेल्या हजारों लोकांस वल्लभभाईनीं आशेचे किरण दाखविले. निराश्रितांस मदत द्यावयाची ती सरकारनें यांच्यामार्फत दिली. एका रात्रींत दोन हजार स्वयंसेवक गोळा केले व त्यांच्या मदतीनें पीडितांच्या मुलाबाळांच्या तोंडांत यांनीं घांस घातला. बरें, स्वतः किती काम करावयाचें म्हणून सांगावें? एक दिवस पहांटेच चहा व खारीं सुरती बिस्किटें खाऊन गळाभर

पाण्यांतून हिंडतां हिंडतां व स्वयंसेवकांकरवीं काम करवून घेतां घेतां मध्य रात्र झाली तरी स्वारीचा पत्ता कोठें आहे! स्नेहीमंडळींच्या पोटांत गोळा उठला व चार दिशांनीं चौकशी करणारी मंडळी गेली तों अहमदाबादेपासून दूर एका गिरणीच्या आवारांत कंबरभर पाण्यांत उभें राहून, दिवसभर अन्न नाहीं, कांहीं तरी खाल्लें तरच दुसऱ्या दिवशीं काम होणार, म्हणून कोठें तरी मिळालेलीं शिळींपाकीं भजीं खात असलेली त्यांची मूर्ति सांपडली! बार्डोलीस झालें तरी कामाची तऱ्हा हीच. झुंजुमुंजू होतें न होतें तों आश्रमांतून निरनिराळया आश्रमांच्या मुख्यांना कामांची वांटणी करून देऊन निघावयाचें तें पंधरा-वीस खेडीं घेऊन प्रत्येक ठिकाणीं छोटीं छोटीं भाषणें करून व इतर कार्यावर देखरेख करून केव्हां तरी रात्रीं अपरात्रीं मुक्कामावर यावयाचें.

बरें, इतकें करून श्रमानें संतप्त होऊन ते चिडखोरपणानें वागले आहेत असें चुकून देखील नाहीं. सकाळीं उठल्यावर रोजचा परिपाठ चालू. स्वयंसेवकांशीं व दुसऱ्या जवळच्या माणसांशीं इतक्या गोडीगुलाबीनें व मनमिळाऊपणानें बोला-चालावयाचें कीं, जो तो त्यांना आपसुखच शिरसावंद्य मानी व त्यांचा शब्द पाळी. स्वयंसेवकांचा आज्ञाधारकपणा तर खरोखरच स्तुत्य. ठीकच आहे. 'If you want to command, first learn to obey' या उपदेशाचा कित्ता त्यांनीं फार चांगला गिरविला आहे. म. गांधी हे अग्रणी. महात्माजींनीं सांगितलें कीं, अमुक करावयाचें म्हणजे वल्लभभाईंनीं तें तंतोतंत केलेंच म्हणून समजावें. अगदीं ताजी हकीकत सांगावयाची तर, गेल्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचें अध्यक्षस्थान त्यांनीं स्वीकारलें तें केवळ 'बापू' ची आज्ञार्थक तार आली म्हणून. स्वतः त्यांना या अध्यक्षपदाची तोंपर्यंत कांहीं दखलगिरी होती नव्हती याची वानवाच. अगदीं परवांपरवांची गोष्ट घ्या ना. मुंबई

इलाखा शेतकरी संघ स्थापून पुण्याहून ते मुंबईस गेले. रात्रींच्या गाडीनें ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या सभेसाठीं अलाहाबादेस जावयाचें. हे तिकडे जाण्यासाठीं कलकत्ता मेलमध्यें व करमसदला नरसीभाईचा खून झाल्याची तार त्यांच्या हातांत. अलाहाबादेस जावयाचें कीं गांवीं जावयाचें? प्रत्यक्ष भावाचाच खून झालेला म्हणून घरीं जाणें अगदीं जरूर व व्यवहाराचें. पण 'बापू' नीं अलाहाबादेस बोलावलेलें. तेव्हां मुलगी मणिबेनला करमसदला रवाना केलें व आपण अलाहाबादला निघून गेले. खुद्द सेनापतीची शिस्त अशी कडक, मग अनुयायांची व शिपायांची असल्यास काय नवल? परंतु ही सर्व शिस्त प्रेमाची असल्याकारणानें सर्वांनाच ती स्पृहणीय वाटते. ऊरपूर म्हणून वल्लभभाईचा विनोद सदा सज्ज असतो. वल्लभभाईंना जास्त कमी बोलावयास हवें. त्यांची मौनवृत्ति पाहिली म्हणजे कार्लाईलनें आपल्या Silent Hero चें जें ग्रंथांत घोटून घोटून भडक चित्र रेखाटलें आहे तें डोळ्यांसमोर उभें राहतें. त्यांचा मूकभाव म्हणजे आढ्यतेचें किंवा कुर्रेबाजपणाचें लक्षण होय, अशांतला भाग बिलकूल नाहीं; तर स्वभावच मूलत: अबोलका. पण एकदां बोलूं लागले म्हणजे मात्र नारिकेलफलन्यायाचा मासला मिळतो हें खरें. त्यांच्या स्वाभाविक वक्रोक्तीमुळें त्या माधुर्यांत खारटपणाचा अंश येतो; तथापि स्वत:च्या परिमलानें लोकांस मोहून सोडणाऱ्या केशराची कटुता देखील नितांत रम्य वाटते, हें कवीनें लिहून ठेवलेंच आहे. तीच यांच्या बोलण्याची गत.

स्वत:चें व कार्यकारी लोकांचें श्रमविनोदन यांच्या विनोदी स्वभावानें तेव्हांच होऊन जातें. बार्डोलीससुद्धां आदल्यादिवशीं किती मेहनत घेतली असली तरी कामावर जाण्यापूर्वी दुसऱ्या सकाळीं सर्व प्रचारक-गण व खेडूत एकत्र जमले व वल्लभभाईंचें 'स्वामी आनंद चहा कां पीत नाहींत याची तुम्हांस खबर आहे! लिप्टनकडे

ते नोकरीला होते. त्यांचें तेथें भांडण झालें. त्यांनीं नोकरी सोडली व चहावर बहिष्कार घातला,' असलें रोजचें नवनवीन बोलणें त्यांनीं ऐकलें म्हणजे ते सर्वजण हंसत हंसत दुप्पट जोरानें कामाला जावयाचे. वल्लभभाईंच्या संभाषणांत काय अगर व्याख्यानांत काय, एका प्रकारच्या आनंददायक वक्रोक्तीची लकेर असते. अगोदर व्याख्यानबाजीचा अत्यंत तिटकारा; प्रसंगोपात्त ते जाहीर सभांत बोलतात; पण नाइलाज म्हणून. त्यांच्या व्याख्यानांत गाढ विद्वत्ता नसावयाची; वक्तृत्वाचा दिमाख शून्य असावयाचा; हातवारे नाहींत; किंबहुना 'वक्ता दशसहस्रेषु' या मानाला लायक होण्यास जे जे गुण लागतात त्या त्या सर्वांचें अभावानें अस्तित्व. तथापि स्फूर्ति हा त्यांच्या व्याख्यानांचा विशेष. नेपोलियन ज्याप्रमाणें आपल्या सैनिकांना पांच-दहा मिनिटांचीं परंतु त्वेष चढविणारीं व बार भरलेलीं भाषणें ऐकवीत असे, त्याप्रमाणें बार्डोलींत वल्लभभाई करीत. आणि त्या वेळीं ते इतके तन्मय होत कीं, त्यांचे तेजस्वी शब्द म्हणजे जणुं काय दैवी संचारानें भारलेले मंत्रच होत असें जमणाऱ्या दहा-दहा, वीस—वीस हजार स्त्रीपुरुष श्रोत्यांना वाटे. कित्येकदां जाहीर व्याख्यानाचें स्फूर्तीच्या आवेगानें आत्मगत भाषणांत रूपांतर होई. अलीकडे अलीकडे तर समर्थांची जशी 'जय जय रघुवीर समर्थ' ही घोषणा, तशी 'हूं तो खेडूत छूं' ही वल्लभभाईंची विजय-पताका होऊन बसली आहे. शेतकरी-बांधवांच्या हिताच्या कळकळीनें इतकें त्यांचें सारें अंतःकरण व्याप्त झालें आहे. पूर्वाश्रमींची बंगलोर कॅप, चायना-सिल्कचा कोट व कॉलर इत्यादि पोषाख गेला असून त्याची जागा एक साधा खादीचा सदरा, एक खादीचें धोतर व खांद्यावर अथवा हातांत खादीचा एक रुमाल एवढ्याच 'गामडी' पेहेरावानें घेतली. याच वस्त्रांत ते उभे राहिले, आणि किंचित् मान कलती करून व खेडूतांच्या हिताविषयींच्या दक्षतेची द्योतक अशी

कपाळावर एक आठी चढवून मंदमंद असें ते बोलूं लागले म्हणजे केवढा प्रचंड समाज त्यांच्या सभोंवार असला तरी कसा जादूगारानें अभिमंत्रित केलेल्या सापासारखा अगदीं स्तब्ध राहतो.

वल्लभभाईंच्या कथाप्रसंगांची व व्याख्यानांची खरी मौज त्यांच्या वक्रोक्तिपूर्ण विनोदांत असते. मेघांमधून चंचल चपलेची चमक विलसून जावी किंवा कोलारच्या खाणींत काळ्या फत्तरामधून सुवर्ण-रेषा दृग्गोचर होते, तद्वत् वल्लभभाईंच्या बोलण्यांतील उपरोधिक विनोदाची स्थिति आहे. पुष्करणींत रंगीबेरंगी मासे सोडलेले असले म्हणजे ते जसे आलटून पालटून वर येतात, तोंड बाहेर काढून श्वास घेऊन फवारे सोडतात, आणि जलपृष्ठावर रमणीय व लकलक-णारी शोभा उत्पन्न करून प्रेक्षकांचे डोळे आकृष्ट करतात, त्या-प्रमाणें वल्लभभाईंच्या कोट्यांनीं व चातुर्योक्तींनीं ऐकणारांचें मन रिझविलें जातें. रेशमी कपड्यावर स्त्रिया अत्यंत कौशल्यानें जीग भरून मनोहर आकृति काढतात व त्या कपड्यांचें सौंदर्य वृद्धिंगत करतात, त्याचप्रमाणें वल्लभभाईंचीं तीं लहानलहान वाक्यें अंतर्विलीन पण उदयोन्मुख अशा वक्रोक्तींनीं उल्लसित होतात. बार्डोलीचा लढा ऐन निकरावर आला असतां शेट वालचंद हिराचंद तेथें समक्ष परि-स्थिति अवलोकन करण्यास गेले. जप्ती वगैरेच्या भीतीनें म्हशी गोठ्यांत दिवसच्या दिवस डांबून ठेवलेल्या असत. त्यामुळें त्यांचीं कातडीं बुरसलीं. बोलतां बोलतां वल्लभभाई म्हणाले 'पहा, कशी मडमांसारखी त्यांची कातडी पांढरी झाली आहे!' अशी क्रांति-कारक चळवळ केली; पण त्यांना कांहीं तुरुंगवास नाहीं. ते म्हण-तात, 'माझ्या नशिबींच तो नाहीं, कारण मला गिरफदार करून सरकार काय मिळविणार! म्हैस पकडून नेली तर लिलावांत तिला किंमत तरी येईल.' वांद्र्याच्या परिषदेंत उपसंहाराचें भाषण कर-तांना नाहीं का ते लागून बोलले, 'गिरणीवाल्यांचा एवढा पुरस्कार

करून महाराष्ट्रीयांना काय नफा! बहुतेक सारे गिरणी-मालक तर गुजराथीच आहेत.' परवां परवां मुंबईच्या सरदार-गृहाच्या टिळक-हॉलमधील सभेंत त्यांनीं आजच्या पुढाऱ्यांना दिलाच कीं नाहीं एक शालजोडींतला–खादींतला म्हणा हवा तर! 'सांप्रत लीडर्स अनुयायांच्या पुढें न चालतां त्यांच्या मागें येत असतात.'

बार्डोलीचें कार्य तर आतां सिद्धीप्रत गेलें. 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते,' या न्यायानें वल्लभभाईनीं द्विगुणित उत्साहानें जास्त व्यापक कामगिरी अंगीकारली आहे. म्हणूनच ते 'बार्डोली हा माझ्या कार्याचा अंत नसून प्रारंभ आहे, असें सांगूं लागले आहेत.' जमीनधाऱ्याचा प्रश्न धसास लावून रयतेच्या म्हणण्याप्रमाणें तो सोडवून घ्यावयाचा असा त्यांचा कृतनिश्चय झाला आहे. याच्याकरतां 'लँड लीग' नांवाची इलाख्याची संस्था स्थापून तिचीं सूत्रें त्यांनीं आपल्या हातांत घेतलीं आहेत. 'हूं तो खेडूत छूं' हें त्यांचें ब्रीदवाक्य. यांतच त्यांच्या भावि कार्याची रूपरेषा अंतर्भूत आहे. जॉन ब्राइटनें म्हटल्याप्रमाणें, राष्ट्र भव्य बंगल्यांत रहात नसून गरिबांच्या झोंपड्यांत वास करीत असतें, अशी यांची दुर्दम्य भावना व तिला अनुसरून त्यांच्या इतउत्तरच्या चळवळी व्हावयाच्या. जमीन-धाऱ्याबाबत सरकारचें धोरण बदलत आहे यांत शंका नाहीं. बार्डोलीच्या कार्यास फळें येऊं लागणार अशीं मंगल चिन्हें आज स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. अशा स्थितींत बार्डोलीच्या या दृढव्रती, निरहंकार, मितभाषी, कार्यप्रेमी, सात्त्विक व सत्याग्रही कर्मवीराचा जयजयकार भारतवर्षांत झाला व उत्तरोत्तर अधिक होत जाईल यांत संशय नाहीं. सरदार वल्लभभाई, "आपल्या स्वीकृत कार्यांत 'शुभास्ते पंथानः सन्तु' अशी इच्छा हिंदुस्थानांतील प्रत्येक शेतकरी करीत आहे; आपल्या हाताला यश आहे अशी त्यांची पक्की खात्री झाली आहे. कार्य आणि कर्ता यांची अशी जोड मिळा-

ल्यावर यशाविषयीं चिंता बाळगण्याचें कोणास काय प्रयोजन!" अधिकाराच्या लोकनियुक्त किंवा लोकनियंत्रित जागा स्वीकारून राष्ट्रसेवा कशी करतां येते याचे आदर्श नामदार विठ्ठलभाई होते. कौन्सिलाबाहेर राहून 'उस्सेबी जादा' राष्ट्रसेवा कशी करतां येते, याचें प्रत्यंतर सरदार वल्लभभाईंनीं आणून दिलें. 'नांदा व नांदू द्या' या तत्त्वावर किंवा बंधुप्रेमानें कौन्सिलांतर्गत व कौन्सिलबाह्य अशीं उभयविध परस्परपोषक व भ्रातृतुल्य कामें निर्वेध रीतीनें व राष्ट्रीय दृष्टीनें कशीं पार पाडावीं तें या विठ्ठल-वल्लभांनीं सोदाहरण दाखवून दिलें आहे. सूर्यानें अग्नीला तेज द्यावें व अग्नीनें सूर्यास तोच परत अहेर करावा, अशा सलोख्यानें हें विविध राष्ट्रकार्य संपादन केलें जावें ही हिंदुस्थानास एक प्रकारची शिकवणच या पटेलबंधूपासून मिळाली. आणि आज तरी विक्रमोर्वशीय नाटकांत कालिदासानें, एका बाजूला महनीय व उन्नत पुरुषांच्या अग्रभागीं असलेला पुरूरवा व अनाकंप्यधैर्य युवराज यांच्यामध्यें विभक्त झालेल्या राज्यलक्ष्मीचें जें हृदयंगम वर्णन केलें आहे तेंच पितृसमान ज्येष्ठ बंधु विठ्ठलभाई व कनिष्ठ बंधु सरदार वल्लभभाई यांच्या दरम्यान विभागलेल्या राष्ट्र-सेवेला लावण्यासारखें आहे. सिमला व साबरमती यांच्यामध्यें विस्फूर्जित झालेली राष्ट्रसेवारूपी लक्ष्मी 'हिमवति जलधौ च व्यस्ततोया' गंगेप्रमाणें अधिकच शोभायमान होत नाहीं असें म्हणण्याचें कोण धाडस करील?

५

# नामदार विठ्ठलभाई पटेल

गांगमंबु सितमंबु यामुनम् कज्जलाभमुभयत्र मज्जतः ।
राजहंस तव सैव शुभ्रता चीयते न च न चापचीयते ॥

सुभाषित

साल १९२५. ऑगस्ट महिन्याच्या २४ तारखेचा दिवस. ऐन मध्यान्हींच्या मुहूर्तावर सिमला येथील लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीच्या दिवाणखान्यांतील व्यासपीठाच्या पाठीमागील दरवाज्यांतून, लष्करी पोषाखांतील एका पोक्त कनकवेत्रधाऱ्यानें पुढें येऊन 'धि ऑन. रेबल मिस्टर प्रेसिडेंट' अशी ललकारी दिल्यानंतर, पायांत पांढऱ्या चपल्या, डोक्यावर राखाड्या रंगाची केंसाळ कानटोपी, अंगावर जाडेंभरडें खादीचें अंगवस्त्र व त्याला शोभणारें नेसूं असलेलें धोतर आणि या सर्वांच्या वरून पायघोळ असा काळसर पातळासारख्या कापडाचा मागेपुढें शेंपट्या लोंबत असलेला झगा, अशा पेहेरावांत एक विचित्र व्यक्ति मंदगतीनें प्रवेश करती झाली. पिंगट रंगाची लांब दाढी, डोळे पिचक्यांतलेच, शरीरकांतिहि पं. मोतीलाल नेहेरू-च्या अगदीं उलट आणि एकंदर स्वरूप पाहिलें तर पत्त्यांच्या डावांतील जोकरसारखें किंवा सर्कशींतील विदूषकासारखें; तथापि हीं टेंगणी व बावळीशी मूर्ति दिवाणखान्यांत दाखल होतांच सर्व सभासदांनीं एकदम, विजेचें बटन दाबल्याप्रमाणें, उभें राहून तिला सन्मानपूर्वक खडी ताजीम दिली. त्या व्यक्तीनेंही आदरपूर्वक उभ्यानें किंचित् मान खालीं लववून आपलें सौजन्य व्यक्त केलें व राजकीय दृष्टीनें पवित्र मानलेल्या शेजारच्या उच्चासनास अनुलक्षून तसाच

कुर्निसात केल्यासारखें करून ती त्यावर अधिष्ठित झाली. एकदांचा आपला मनुष्य ॲसेंब्लीच्या अध्यक्षाच्या जागीं जाऊन बसला, हें पाहून लोकनियुक्त सभासदांचीं अंतःकरणें प्रफुल्ल झालीं. दिवाण बहादुर रंगाचार्य स्वयंवरांत हरले, आतां 'पदरीं पडलें आणि पवित्र झालें' असा विचार करून सरकारपक्षीय मंडळींचीं तोंडें साहजिकच थोडीं उतरलीं म्हणावयास हरकत नाहीं. आपल्या आगमनानें अशी क्रांति करणारी ही व्यक्ति तरी कोण असावी बरें? ही व्यक्ति म्हणजेच हिंदुस्थानचे पहिले लोकनियुक्त 'मिस्टर स्पीकर' नामदार विठ्ठलभाई जव्हेरभाई पटेल! ध्यान अंमळ वेंधळें तर खरेंच; पण कर्तबगारी पहावी ती मात्र भारतवर्षाच्या सगळ्या राजकारणाच्या समुद्रांत विलक्षण खळबळ उडवून देणारी. कांहीं कांहीं प्रसंगीं त्या प्रक्षोभाच्या लाटा विलायतेच्या व युरोपखंडाच्या किनाऱ्यावर देखील आदळून फुटल्या व त्यांचे तुषार तिकडे पसरले.

विठ्ठलभाईंच्या करणीची आठवण झाली, कीं कुंट्यांच्या 'राजा शिवाजी' काव्यांतील बहिर्जी नाइकाचें वर्णन मनांत उभें राहतें:—

दिसे ठेंगणी मूर्ति ही बावळीशी;

* * *

जरी मानिती लोक हें रूप भोळें,<br>
तरी न्याळती शत्रु ते तीव्र डोळे.<br>
हुशारींत ऐसा नसे अन्य कोणी,

* * *

कळे सर्व ज्याला कुठें काय चाले,<br>
कुठें बैसला, कोण तो काय बोले.<br>
घडे शत्रुलोकांत ज्याचा प्रवेश,<br>
करी रोज जो पाहिजे तोहि वेष.

एखाद्या परीक्षकानें वरील उतारा प्रश्नपत्रिकेंत लिहून त्या वर्ण-

नास साजेल अशा एखाद्या विद्यमान पुरुषाचें नांव शिरोभागीं लिहा असें सांगितलें तर 'पटेलसाहेब' असें उत्तर कोणीं दिलें असतां तें बहुतांशीं अनुरूप होय, यांत संशय नाहीं. 'वेष असावा बावळा। परी अंतरीं नाना कळा' हे चरण देखील जसे कांहीं विठ्ठलभाईंना उद्देशूनच स्फुरण पावलेले. संस्कृत सुभाषितकारानें लोकांस शिकविलें कीं, 'वासः प्रधानं खलु योग्यतायाः'। आणि शेक्सपीयरनें आपल्या एका प्रख्यात पात्राच्या मुखांतून व्यवहारज्ञान व अनुभव वदविला तो 'Apparel oft proclaims the man.' तथापि विठ्ठलभाईंनीं हीं सुभाषितें सर्वथैव खोटीं पाडलीं, मग राजकारणांतील इतरांचीं व स्वतःचींही कांहीं सुभाषितें त्यांनीं आपल्या कामगिरीनें व प्रत्यक्ष वर्तनानें धुडकावून दिलीं असल्यास काय नवल! कस्तूरीचें बाह्य रंगरूपही काळेंबेंद्रेंच नसतें का? लांबून पाहिली तर चिखलासारखी भासते; परंतु तिच्या परिमलगुणांपुढें सर्व सुगंधी द्रव्यें मात्र रद्द होत. नारदाचीं वस्त्रेंप्रावर्णें अगदीं शक्य तितकीं कमी; साहित्यसामुग्री म्हटली तर एकुलता एक वीणा व फारच म्हटलें तर त्याची जगत्प्रसिद्ध थोटकी शेंडी; पण त्याच्या कार्याचा प्रभाव तिन्ही लोकांत प्रसृत झालेला, त्याची वसति खास इंद्राच्या सभेंत व ज्या लोकांत जाईल तेथें तो सर्वांना सारखा पूज्य. विठ्ठलभाईंची गोणपाटी खादी म्हणजे नारदमुनींचीं वस्त्रें, त्यांची दाढी म्हणजे यांची शेंडी, 'नारायण, नारायण' हे गूढार्थवाचक अहर्निश ऐकूं येणारे आलाप म्हणजेच यांच्या वीण्याचा झंकार; आणि लोकपक्ष, निमसरकारपक्ष व सरकारपक्ष हे त्यांचे स्वर्ग, मृत्यु, पाताळ. नारद जसे मुनि तसे दाढीदीक्षित विठ्ठलभाईसुद्धां व्यवहारांत व राजकारणांत संन्यासवृत्तीनेंच कालक्रमण करणारे. इतकें साम्य असल्यावर, आमच्या विठ्ठलभाईंची दोनदां ॲसेंब्लीचे ते अध्यक्ष झाले तसे पुनःपुन्हा होण्यासाठीं व भारतवर्षाच्या बाणेदार सेवेसाठीं, राजकीय भुता-

खेतांची व आल्यागेल्याची इडापीडा टळावी म्हणून भारतमाता मीठमोहऱ्यांनीं दृष्ट कां काढणार नाहीं व आपल्या या 'गुंड्या' पुत्राला 'शतौक्ष' लाभावें असें दिवसरात्र कां चिंतणार नाहीं ?

खेडवळ पाटीदार जातींत जन्म; अत्यंत काबाडकष्ट करून बॅरिस्टर पदवी प्राप्त केली; पण वकिलीच्या नात्यानें पाहिलें तर जवळजवळ आंवळ्याएवढें, किंवा कोहोळ्याएवढें म्हटलें तरी अतिशयोक्ति नाहीं. पण शिक्षणक्रम संपल्यापासून त्यांच्या काळच्या राजकारणाच्या आखाड्यांत फेरोजशहा मेथा, गोखले वगैरे वस्तादांच्या देखरेखीखालीं मुंबई प्रेसिडेन्सी ॲसोसिएशनच्या इमारतींत पटेलसाहेब वाढलेले. उपजत आवडसुद्धां सार्वजनिक कामगिरीची विशेष आणि ती देखील सनदशीर सुसंघटित संस्थांमार्फत. ले. ॲसेंब्लीचे अध्यक्ष निवडून आल्यावर पूर्वाध्यक्ष सर फ्रेडरिक व्हाईट यांच्या अभिनंदनपर भाषणाला त्यांनीं आपल्या मोडक्यातोडक्या भाषेंत व खडबडीत आवाजांत उत्तर दिलें. त्यांत ते म्हणाले कीं, 'आपलीं उदारपणाचीं अधिकारवचनें (रूलिंग्ज्) वाचून असहकारितेचें कुंपण तोडून ॲसेंब्लींत येऊन बसावें असें कित्येकदां माझ्या मनांत येई.' विठ्ठलभाई वस्तुतः या प्रकारच्या कामालाच जन्मतः अतिशय लायक. ते अध्यक्षाच्या महान् खुर्चीवर अध्यारूढ झाले त्यावेळीं बहुतेकांच्या ओंठांवरून 'योग्य मनुष्य योग्य स्थळीं बसला, पाचूचा खडा सोन्याच्या अंगठींत शोभायमान झाला' असे तारीफवजा उद्गार आले ते फारच रास्त होत, हें काय लिहावयास पाहिजे! पूर्वाश्रमींच्या मुंबई कौन्सिलचे सभासद व ले. ॲसेंब्लीचे सभासद म्हणून त्यांनीं जनतेची इतकी अलौकिक सेवा केली कीं, तिची बेरीज कोणाही एका आमदार-खासदाराच्या जमेपेक्षां अधिक भरेल. मुंबई कॉर्पोरेशनचे अध्यक्ष या दृष्टीनें तर त्यांची काकदृष्टि युरोपियनांकडून व ॲंग्लो-इंडियन लोकांकडून आणि वर्तमानपत्रांकडून

देखील वाहवा झाली. एके काळीं ते राष्ट्रीय सभेचे सर चिटणीस होते व सन १९१९ सालीं विलायतेंत गेल्यावर कॉंग्रेसच्या शिष्ट-मंडळीचेही मंत्री होते; पण कोणत्याही नात्यानें काम केलें तरी तें असें चोख व निर्दोष असावयाचें कीं, डोळ्यांत तेल घालून पाहणारास सुद्धां फजीत व्हावें लागावें. स्वभाव निरलस व अंगेजणीनें सतत उद्दिष्ट कार्य करण्याचा. मग सिद्धि त्यांस हमखास मिळावी हें योग्यच आहे. घरचा व्याप कांहीं नाहीं, मग संताप तरी कोठचा येणार ? मुंबईचे लॉर्ड मेयॉर होते तेव्हां देखील यांचा सरंजाम म्हणजे वांद्र्यास एका बंगल्यांत बेताबाताची जागा व एक बब्रर्जी. लॉर्ड मेयॉरचें मग रूपांतर झालें 'मिस्टर स्पीकर' यांत. त्यांच्या मागोमाग भालदार-चोपदार, टंकयंत्रवाला, लघुलेखक, खाजगी चिट-णीस वगैरेंचा लवाजमा लागला. जेथें जावें तेथें हा आहेच. पटेल-साहेबांना हें सारें शुष्ककाष्ठासारखें वाटलें व ते प्रथम विनोदानें उद्गारलेसुद्धां कीं, 'हें काय लचांड आहे बोवा !' आतांच ॲसेंब्लीचें अध्यक्षपद प्राप्त झाल्यापासून स्वतंत्र सरकारी बंगला मिळाला म्हणून त्यांच्याकडे, कोठेंही गेल्या तरी अगदीं घरच्यासारख्या वागणाऱ्या सौ. सरोजिनी नायडू अगर म. गांधी किंवा बार्डोलीच्या चळवळीनंतर-प्रमाणें विश्रांतीसाठीं त्यांचे भाऊ वल्लभभाई, व महादेवभाई देसाई यांच्यासारखे काय पाव्हणेरावळे येतील ते. एरवीं त्यांचा बहुतेक परमार्थतः संन्याशाचा संसार.

विठ्ठलभाईंचें बाहेरचें रूप जितकें साधें व धोपटपणाचें दिसतें तितकें त्यांचें अंतरंग नाहीं असें म्हणणें वावगें नाहीं. त्यांचें मन हें एक अलीकडच्या राजकारणांतील कोडें आहे असें त्यांच्या चारित्र्याचें सूक्ष्म अवलोकन करणारास वाटतें. मांजरपाठी कापड उभेंआडवें पांढऱ्या सुताचें एकजिनसी एकरंगी असतें तसें ज्ञान-सुलभ त्यांचें मन नाहीं. कापडाचीच उपमा द्यावयाची तर, ताप-

त्याची किंवा बुट्टीदार गर्भरेशमी कापडाची देणें युक्त होईल. एखाद्या कापडावर वरून नकशीचे छाप ठोकले तर ते उघड दिसतात व पाहणारास ओळखतांही येतात. पण एक सुती, एक रेशमी अशा धाग्यांचें सणंग असलें म्हणजे तें विविध रंगाचें, मनोहर व स्पृहणीय दिसतें खरें; तथापि त्याचा रंग निश्चित सांगतां येत नाहीं, त्याची विणकर दुर्बोध वाटते. घड्याळावरच्या तबकडीवरील काट्यांनीं काळवेळ सांगतां येते, पोटांतील चक्रांची भानगड कांहीं उकलतां येत नाहीं. विठ्ठलभाईंचे खरे व पक्के विचार काय आहेत, याचा थांग त्यांच्या वरकरणी बोलण्यावरून केव्हांच लागणें शक्य नसतें. विचारांचें कृतींत पर्यवसान झालें म्हणजे मग त्यांच्या मागील विचारांचा ग्रंथ लावावयाचा. 'फलानुमेयाः प्रारंभाः' अशी त्यांच्या कार्याची पद्धति. पुष्कळ वेळां तर कृति व उक्ति यांत दोन ध्रुवांइतका विरोध असल्याचा भास होतो. 'चित्ते वाचि क्रियायां च' एकरूपता हें मोठेंपणाचें लक्षण मानलें जातें. विठ्ठलभाईंचें कौतुकास्पद महनीयत्व त्यांची भाषा व कृति यांच्या विसंवादित्वांत सांठविलेलें आहे. फारच कठिण प्रसंग आला म्हणजे 'नारायण, नारायण' या परमेश्वराच्या नांवाचा जप करून तो वारून न्यावयाचा.

असहकारितेविषयीं त्यांचीं मतें काय होतीं व प्रस्तुत काय आहेत यांचा अद्यापि कोणास पत्ता लागला असेल तर शपथ. नागपूर सत्याग्रहाची परिस्थिति समक्ष अवलोकन करण्यास व शक्य तर त्याला पाठिंबा देण्यास ते आपले बंधु वल्लभभाई यांच्यासमवेत नागपुरास गेले. ते असहकारितेच्या वाढीचे दिवस. सर्व राष्ट्राचे डोळे त्यांच्याकडे लागलेले. अत्यंत अचंबा वाटणारी गोष्ट कीं, त्या राजश्रींनीं खुशाल गव्हर्नरसाहेबांच्या गांठीभेटी घेऊन सत्याग्रह थांबविला! राष्ट्रीय सभेच्या कायदेभंग-चौकशी-कमिटींत ते शिरले. तोंडांत असहकारिता व अंगावर खादी यांच्या साहाय्यानें इतर सभासदांचीं

मनें पोखरून पोखरून कौन्सिल-प्रवेशास अनुकूल करून घेतलीं. स्वतः स्वारी कौन्सिलांत बसून 'सतत, सुसंगत व एकजात' सरकारची अडवणूक करण्याच्या धोरणाचा पुरस्कार करणारी, किंबहुना या शब्दयोजनेची जन्मदात्री; परंतु ले. अॅसेंब्लीच्या अध्यक्षपदाकरितां निवडणूक होण्याची चिरापेक्षित संधि प्राप्त होतांच विठ्ठलभाई स्वतः उभे राहिले, सरकारी उमेदवार दि. ब. रंगाचार्य यांचा रंग त्यांनीं फिका पाडला व अखेरीस दोन मतें अधिक मिळवून ते विजयी झाले; इतकेंच नव्हे तर दिवाणगिऱ्या वगैरे सरकारी नोकऱ्या स्वराज्य-पक्षानें टाकून देण्याचा कॉंग्रेसमध्यें बूट निघाला तेव्हांदेखील 'तुम्ही वाटेल तो ठराव पास करा, मी अध्यक्षपदाचा राजीनामा देणार नाहीं.' असें त्यांनीं साफ राष्ट्रीय सभेच्या विषय-नियामक कमिटींत बजाविलें. ज्या जिभेनें त्यांनीं 'Uniform, continuous and consistent obstruction' असें स्वराज्यपक्षाचें कौन्सिलांतील धोरण बोलून दाखविलें त्याच जिभेनें त्यांनीं अध्यक्षाच्या खुर्चीवरून 'if my duty requirs me to do so, I will see the Viceroy ten times a day,' अशी ग्वाही बिनधोकपणानें दिली. विठ्ठलभाईचें सारें जीवितच मुळीं, श्रीधरकवीनें हरिविजयांत कृष्णचरित्राचें वर्णन करतांना वारंवार जे मार्मिक शब्द योजले आहेत ते वापरावायचे म्हणजे, 'अघटित विंदानानें' ओतप्रोत भरलेलें. तेथें निवडानिवड कसली करावयाची?

त्यांच्या अंगीं असा एक दुर्दम्य गुण आहे कीं, त्या योगानें विठ्ठलभाई कांहींही बोलले, कसेही वागले, तरी त्यांचें सर्वांस कौतुकच वाटावें. त्यांची ओंगळ मुद्रा पाहिली तर हंसू येतें; पण तें दुष्ट नसतें. त्यांचा धांद्रटपणा इतका कीं, अध्यक्षस्थानीं निवड झाल्यावर अॅसेंब्लीचे आभार मानण्यासाठीं उभे राहिले व बोलण्याच्या ओघांत आपल्या उमेदवारीच्या पत्रकांतील भावी धोरणाविषयींचीं कांहीं

वाक्यें वाचून दाखवितों म्हणून खिसे चापसूं लागले तों तो कागद बंगल्यांतील टेबलावरच निघतांना विसरलेला! पण त्यांच्या या अव्यवस्थितपणाचें देखील कौतुकच वाटतें. जरूर लागेल तर दहांदा व्हाइसरॉयसाहेबांकडे जाईन, असें त्यांनीं स्पष्ट जाहीर केलें तरी स्वराज्य-पक्षीयांनाच काय, कौन्सिल-बहिष्कारवादी लोकांनाही त्याचा राग येत नाहीं. त्यांच्या चारित्र्याला सर्वच गोष्टी शोभून दिसतात. कारण त्यांच्या शत्रूची देखील मनोमन अशी खात्री असते कीं, पटेलसाहेब जगाच्या पाठीवर कोठेंही गेले तरी आपल्या राष्ट्रीयत्वाच्या व्रतास किंचिदपि बाध आणीत नाहींत. राजहंस गंगेच्या शुभ्र प्रवाहांत पडला काय, किंवा यमुनेच्या काळ्या पाण्यांत पोहला काय, त्याच्या मूळ स्वरूपांत फरक घडून येत नाहीं; त्याप्रमाणें विठ्ठलभाई पांढऱ्या लोकगंगेंतच रममाण झाले काय अथवा सरकार-पक्षाच्या काळ्या पाण्यांत चिरकाल आंघोळ करीत बसले काय, हिंदुस्थानचे देशभक्त विठ्ठलभाई पटेल ते देशभक्त पटेलच! एका अर्थानें ॲसेंब्लीचें अध्यक्षपद म्हणजे पक्षाभिनिवेशाच्या जलधींतील निर्लेप बेट; 'मी आतां कोणत्याच पक्षाचा नाहीं, मी आतां सर्व पक्षांचा आहें' असें विधान त्यांनीं स्वत: केलें. कबूल, पण ॲसेंब्लींतून 'वॉक आऊट' करून स्वराज्य पक्ष बाहेर निघून गेल्यावर 'बैठक तहकूब करीन' असें त्यांनीं ठांसून सांगितलें; व्हाइसरॉय-साहेबांस गुजराथच्या जलप्रलयानंतर तेथील परिस्थिति पाहण्या-करितां आणलें; मासिक उत्पन्नापैकीं खर्चवेंच वजा जातां बाकी त्यांनीं म. गांधींकडे पाठविली; गृहमंत्री मि. क्रेरर यांस नाक घांसा-वयास लावलें; उद्दाम 'टाइम्सच्या' फाजील शहाण्या प्रतिनिधीला सपशेल पदर पसरावयास लावलें; परवां 'पब्लिक अकाउंट्स् कमिटी'चा रिपोर्ट ॲसेंब्लीपुढें चर्चेस येण्याचे बाबतींत त्यांनीं लोक-पक्षाचा पुरस्कार करणारा निर्णय दिला; अगदीं ताजी गोष्ट

म्हणजे त्यांनीं व्हाइसरॉयसाहेब, म. गांधी व पं. नेहरू यांना चहा पानाच्या निमित्तानें एकत्र आणलें, आणि पब्लिक सेफ्टी बिलाचे बाबतींत सर्व जगास थक्क करून सोडणारें व क्षणभर सरकारचे डोळे पांढरें करणारें रूलिंग दिलें. हीं सारीं कृत्यें देशभक्तीनें व राष्ट्रीयत्वाच्या अभिमानानें रसरसलेलीं नाहींत असें कोण सुज्ञ मनुष्य म्हणावयाचें धाडस करील? कोणी म्हणतात कीं, गनिमी काव्यानें सरकारशीं लढणारा हा युक्तिबाज वीर गेल्यामुळें लोक-पक्षाचें नुकसान झालें. स्वराज्य-पक्षाचे अध्वर्यु पं. मोतीलाल नेहरू व इतर मंडळी यांना विठ्ठलभाई ही एकाप्रकारें ब्यादच वाटे; सर-कारलाही यांच्या राजकारणी डाव-पेंचांची अंमळ भीतिच. दोन्ही पक्षांना ती एक खट. १९२९ सालच्या पहिल्या निवडणुकीचे वेळीं सरकारनें त्यांना विरोध केला, व पंडितजींनीं देखील श्री. तात्यासाहेब केळकरांना उभें राहण्याबद्दल आग्रह गेला होता. अखेरीस दिवाण-बहादुर हरले, केळकर पाहिल्यापासून उभेच राहिले नाहींत, विठ्ठल-भाई यशस्वी झाले व त्यांनीं काम इतकें सुंदर रीतीनें केलें कीं, सन १९२७ च्या जानेवारींत पुन्हा ते बिनविरोध अध्यक्ष झाले. स्वराज्य-पक्षांत राहून पं. मोतीलाल नेहरू व श्रीनिवास आयंगार यांच्या-मधील लाजिरवाण्या यादवीप्रमाणें परस्परांविरुद्ध कारवाई करीत बसण्याऐवजीं अध्यक्षपदावर विराजमान होत्साते विठ्ठलभाई राष्ट्र-कार्याला जास्त उपकारक झाले खास. बायबलांत म्हटल्याप्रमाणें "The stone which the builders refused is become the head-stone of the corner" असा विचार उभयपक्षांच्या मनांत विठ्ठलभाईंच्याविषयीं एखा देवेळीं देखील उत्स्फूर्त होत नसेल असें समजणें मानवी स्वभावाच्या अज्ञानाचें दर्शक होय.

ही त्याग केलेल्या दगडाची उपमा विठ्ठलभाईंना त्यांच्या बाहेरील अवतारामुळें समर्पकहि आहे. त्यांच्या स्वभावांत दगडासारखें काठिण्य

व सडेतोडपणा आहे. कोणत्याही हत्याराची दगडाला पर्वा नाहीं, तद्वत् पटेलांपुढें कोणाचीही मातबरी नाहीं. बॅरिस्टर जयकर असोत, पं. मोतीलालजी असोत, व्हाइसरॉयसाहेब असोत, फार काय, खुद्द बादशहा असोत, त्यांचा निर्भीडपणा आपला कायम! पटेल विलायतेंत गेले तेव्हां मि. स्पीकर म्हणून ते शिरस्त्याप्रमाणें खाविंदांना मुजरा करावयास गेले. संभाषणप्रसंगांत बादशहा म्हणाले, 'तुमचें राजकारणबिजकारण माझें प्रधानमंडळ पाहून घेईल. मी तुम्हांला माझ्यापुरतें विचारतों. राजपुत्र हिंदुस्थानांत गेले तेव्हां तुम्हीं त्यांजवर बहिष्कार घालण्यांत सिंहासनाचा उपमर्द नाहीं का केला?' विठ्ठलभाईंनीं तत्क्षणीं उत्तर दिलें, 'बादशहा म्हणतात तें खरें; पण युवराजांना हिंदी जनतेनें कोठें निमंत्रण दिलें होतें?' बादशहा कुंठित झाले. बाकी विठ्ठलभाईंना देखील असलें शेरास सव्वाशेर उत्तर मिळण्याचा अनुभव पं. मोतीलालजींनीं आणून दिला आहे. स्वराज्य-पक्षाच्या प्रारंभास थट्टेनें पटेल नेहरूंना 'तुम्ही कौन्सिलांत जाऊन बसावयास भारी उल्लू (उतावीळ) झालां आहां' असें थोडें खिजविण्याकरितां बोलले होते. पंडितजी कांहीं कमी नाहींत. पटेल अध्यक्षाच्या खुर्चीवर बसल्यावर त्यांनीं सर्व सभासदांस आपल्याशीं हस्तांदोलन करण्यास पाचारण केलें; तेव्हां पंडितजींच्या पाळीच्या वेळीं त्यांनीं एकीकडे हातभेट करतां करतां पटेलांच्या कर्णरंध्रांत 'आतां कसें आपण बडे उल्लू झालां बरें का' हे सूडाचे जळजळीत उद्गार ओतले. विनोदानें विनोदाचा संक्षेप उडाला.

पं. मोतीलाल जसे थट्टेबाज तसे विठ्ठलभाई म्हणजे त्या गोष्टींत शंभर टक्के कोरडे पाषाण आहेत असें मात्र बिलकुल नाहीं. त्यांचा विनोद वागण्यांत व बोलण्यांत दृग्गोचर होतो. कोणाकडे जेवणास ते गेले कीं, पानांत पडेल तें उचलून लहान मुलासारखें तोंडांत टाकावयाचें; बाईमाणूस वाढण्यास आलें—मग ती बाई दाक्षिणी कां

असेना—व पंक्तींत वाढूं लागलें कीं विठ्ठलभाईनीं 'एमने ना आपो' मने आपजो' असें फुस्कारून वाढणारीस भांबावून सोडलेंच व हंशा पिकविलाच म्हणून समजावें. दुसऱ्यास नांवानें हांक मारतांना तत्सदृश दुसऱ्या एखाद्या चमत्कारिक नांवानें त्याला संबोधावयाचें अशी यांना जबरदस्त खोड. या संवयींत नेहमींच शुद्ध विनोद भरला असतो, खोंचदारपणा तिळमात्र नसतो असें नव्हे. 'अंतुकाका' म्हणण्याऐवजीं विठ्ठलभाई उभ्या हयातींत चुकूनही 'अंत्यजकाका' म्हटल्याखेरीज राहिले नाहींत. 'बाबूराव गोखले' या अभिधानाला त्यांच्या विकृत नामकोशांत 'बबन गोखले' हा पर्याय शब्द सांपडावयाचा. मद्रास इलाख्यांतील 'राजगोपाळाचार्य' वाजवीपेक्षां जास्त कृष्णवर्णी; म्हणून विठ्ठलभाई राष्ट्रीय सभेंत देखील बेधडक 'कालीदास' या पदवीनें त्यांचा उल्लेख करीत. असलें 'ऑनर्स लिस्ट' एकट्या पटेलांचेंच आहे असें नाहीं. लोकमान्य टिळक तर विठ्ठलभाईंना 'पाटील' म्हणावयाचे. कांहीं धोरण ठरविलें म्हणजे टिळकांनीं विचारावें 'आमचा पाटील काय म्हणतो?' शंकाखोर व्यक्तीसंबंधीं इंग्लिश भाषेंत म्हण आहेच कीं, 'What will Mrs. Grundy say?' टिळक नेहमीं याच अर्थानें साभिप्राय असा प्रश्न करीत नसत; पण तो हेतु अजीबात नसेल असेंही नाहीं. वर्मवाक्य म्हणून आमच्या बापूजी अण्यांच्याही 'कर्नल सर हेन्री स्टॅनियन,' यांच्या भव्याकृतीवरून 'कर्नल सर हेन्री स्टॅलियन,' 'मौलवी महमद याकूब' यांच्या अपरिपक्व विचारपद्धतीवरून 'मौलवी महंमद बेवकूब' वगैरे जीभ चावून केलेल्या कोट्या असेंब्लीच्या वातावरणांत क्वचित् फडफडतात. सुभाषित-विनोदांच्या क्षेत्रांत 'परिहासविजल्पितं सखे परमार्थेन न गृह्यतां वचः' अशी क्षमायुक्त विनंति करण्याची थोडीच गरज असते! भ्रमराप्रमाणें, कांटेरी गुलाब असला तरी, रसास्वाद तेवढा घ्यावयाचा इतकेंच.

विठ्ठलभाईंच्या मनांत देखील क्षणभर हास्योत्पादन करावें, याच्यापलीकडे कांहीं अनिर्मल उद्देश असेल असें अनुमान करणें प्रायः अन्यायाचें होय.

अमृतांजनासारखा शीतल परिणाम करणारे विनोदाचे तुषार यांच्यापासून विरळ लाभणारे. कारण स्वभावाचें वास्तविक स्वरूप बहुतेक बाजूंनीं बोचणारें एवढें निःसंशय. सिमल्याच्या डोंगरावर ‘बींचूकाटी’ या नांवाची एक वनस्पति पुष्कळ उगवलेली असते. सहज चालतांना ती पायाला लागली म्हणजे विंचू डसल्यासारख्या सर्वांगाला वेदना व्हावयाच्या. विठ्ठलभाईंचें ज्याच्याशीं संघर्षण झालें त्याला असें सळो का पळो व्हावयाचें. खालमाने पण विलक्षण पाताळयंत्री, मूकस्तंभ पण पक्के आंतल्या गांठीचे, असे विठ्ठलभाई असल्याकारणानें कोणाशीं त्यांचें बनत नाहींसें झालें म्हणजे त्यांनीं आपली घटका भरली असें निखालस मानावें. बाहेरून कांहीं दिसावयाचें नाहीं, भडभड कधीं बोलणार नाहींत; परंतु आंतील पीळ मात्र कधीं न सुटणारा व डंख न विस्मरण पावणारा. निवडणुकी लढविण्यांत किंवा अन्य कोणतें कार्य घडवून आणण्यांत त्यांचें मन व मेंदू गिरमिटाप्रमाणें चालतात. या गुणावगुणांमुळें पक्षसंघटनेंत, नेतृत्वांत, किंवा दुसऱ्या कसल्या मोठ्या सांघिक कार्यांत ते फारसे उपयोगी पडत नाहींत. भिन्नभिन्न कर्तबगारीचीं व गुणांचीं माणसें एकत्र जमवून त्यांना आपल्या अंगच्या शक्तीनें, आपल्या तेजस्वितेनें, आपल्या मनौदार्यानें व आपल्या अजिंक्य युक्तिबाजपणानें राष्ट्रकार्यास जुंपण्याचें सामर्थ्य त्यांना नाहीं. उलट बिब्बा अंगावर उतेल म्हणून जो तो त्याच्यापासून दूरच सरतो; औषधाकरितां म्हणून जेव्हां जरूर पडेल तेव्हांच त्याच्याजवळ जावयाचें. विठ्ठलभाईंचें वैशिष्ट्य हें कीं, त्यांच्या गुणदोषसमुच्चयाचा मारा आपल्या लोकांवर होतो त्याच्यापेक्षां दसपट अधिक जोरानें सरकार-पक्षावर होतो.

आणि तो समुच्चय त्यांच्या स्वप्नांत देखील राष्ट्रहितास विघातक होईल अशा रीतीनें आपला प्रभाव गाजवीत नाहींत. एवंगुणविशिष्ट गृहस्थाला देशकार्य करण्यास ॲसेंब्लीच्या अध्यक्षपदाखेरीज दुसरी नाक्याची जागा मिळणें शक्य नव्हतें. चित्रकाराला जसा फलक, लेखकाला जशी लेखणी, व्यापाऱ्याला जसा तराजू, त्याप्रमाणें विठ्ठलभाईंना 'मिस्टर स्पीकर'त्व आवडतें. आणि मग 'नक्रः स्वस्थानमासाद्य गजेंद्रमपि कर्षति' असा यांचा पराक्रम बादशहांना निर्भयपणें निरुत्तर करूं शकतो व गृहमंत्र्यांना आपल्या खुर्चीसमोर 'क्षमस्व' म्हणून साष्टांग प्रणिपात घालावयास लावतो. हें स्थान म्हणजे यांचें जणुं काय ईश्वरदत्त कार्यक्षेत्र.

आजकाल पंडित मोतीलाल व पंडित जवाहरलाल या पिता-पुत्रांची अद्वितीय जोडी भारतवर्षाच्या राजकारणाच्या नभोरूपी चांदव्याला रविचंद्राप्रमाणें लटकत आहे, त्याप्रमाणें नामदार विठ्ठल-भाई व सरदार वल्लभभाई हें बंधुद्वय त्याच सुरेख छताला गुरु-शुक्रांच्या ताऱ्यांप्रमाणें आपल्या तेजोवलयांनीं शोभिवंत करीत आहे. इंग्लंडमधील कॉमन्स सभेंत एकेक गृहस्थ दहा-दहा वर्षें अध्यक्ष-स्थानीं नियुक्त झालेले आहेत. १८५७ सालापासून आतांपर्यंत फक्त चार पुरुष 'मिस्टर स्पीकर' झाले आहेत. व्हायकाउंट अल्सवॉटर यांनीं तर सोळा वर्षें गादी सांभाळिली. विठ्ठलभाईंना देखील असें सुदैव लाभावें व त्यांच्या नैसर्गिक कार्यक्षमतेचा आणि बाणेदार लोकसेवेचा हिंदुस्थानाला पुरेपुर फायदा मिळावा अशी परमेशाची प्रार्थना करणें, नवीन निवडणुकी जवळ येऊं लागल्याकारणानें, समुचित नाहीं असें कोण म्हणेल ? भ्रातृयुगुल असावें तर पटेलबंधूं-सारखें, रामायणांतील रामलक्ष्मणासारखें, पेशवाईंतील बाजीराव-चिमणाजीआप्पांसारखें. लोकनियुक्त कायदे-मंडळाचा अध्यक्ष कसा असावा ? नामदार व्ही. जे. पटेल यांच्यासारखा. बाकी सगळे अध्य

क्षच. मासा बारा महिने तेरा काळ पाण्यांत राहतो, साप वारा खातो, मेंढा पाल्यावर जगतो, चातक नुसत्या पाण्यावर उदरानिर्वाह करतो, उंदीर सदैव गुहेंत राहतो, गर्दभाच्या अंगाला नेहमीं राख फांसलेली असते, बगळा ध्यानस्थ बसतो, म्हणून या सर्वांना कांहीं तपश्चर्येचें फळ प्राप्त होत नाहीं; तसें केवळ स्वतांच्या नशिबानें व हिंदुस्थानाच्या कमनशीबानें अगर सरकारच्या कारवाईमुळें व लोक-प्रतिनिधींच्या अपस्वार्थी लाळघोटेपणामुळें ज्यांना इतर छोट्या-मोठ्या कायदे-मंडळांचें अध्यक्षपद मिळालें आहे ते जवळजवळ खुर्चीचे मालक. विठ्ठलभाईंची सर इतरांना येणें म्हणजे फारच मुष्कील. विठ्ठलभाई, आपणांस उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य असो. ' नारायण, नारायण ' ! !

६

# श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर

कस्याऽस्ति कोऽप्यतिशयोऽस्ति स तेन लोके।
ख्यातिं प्रयाति न हिं सर्वविदस्तु सर्वे॥
किं केतकी फलति किं पनसः सपुष्पः।
किं नागवल्ल्यऽपिच पुष्पफलैरुपेता॥

सुभाषित

"फार कशाला, मी तुम्हांला खरें सांगूं का, शहाण्णव सालीं मी जो 'केसरी–मराठ्या' ला येऊन मिळालों तो देखील खूप लिहावयाची हौस म्हणून!" एकदां सहज चार स्नेही–मंडळी गप्पा-गोष्टी सांगत असतांना तात्यासाहेब केळकरांनीं हें आपलें हृद्गत बोलून दाखविलें; आणि खरोखरीच तें वस्तुस्थितीस सर्वस्वीं धरूनही आहे. त्यांची लिहावयाची हौस किती म्हणून वर्णन करावी? त्यांच्यासारखे जबरदस्त लेखक तेच. मध्यरात्रीं झोपेंतून उठवून अग्रलेख लिहून पाहिजे म्हणून मागणी केली तरी सुद्धां देतील! किंबहुना, दादाभाई नौरोजी वारले तेव्हां असाच प्रसंग आला देखील होता म्हणतात. त्यांना स्वप्नें पडत असतील तीं बहुधा लेखनाचींच असतील! त्यांचा एकंदर लेखन-प्रपंच पाहिला म्हणजे अनभिज्ञांस काय, पण खुद्द त्यांच्या समव्यवसायी बंधूंसही वाटावें कीं, त्यांच्या शरीरांत मानवी रक्त अभिसरण पावत आहे किंवा निळी काळी शाई सळसळत आहे! हाताचीं बोटें नसून टांक आहेत कीं काय? डोकें नसून विचारवैभव व शब्दसंपत्ति उत्पादन करण्याचा अखंड चालू असणारा कारखाना आहे कीं

काय ? कोणाला लेखनकार्यास एकांतवास लागतो, कोणी अगदीं ठराविक वेळीं स्फूर्ति येईल तेव्हांच लिहूं शकतो, कोणाला ओळ ओढण्यापूर्वी तासचे तास मुद्दे काढण्यांत, कच्चा खर्डा तयार करण्यांत, त्याची 'फेअर कॉपी' करण्यांत घालवावे लागतात; परंतु कांहींही लिहावयाचें म्हटलें म्हणजे, आगीच्या बंबाप्रमाणें, हे आपले सदैव सज्ज ! मग तो 'केसरी' चा अगर 'मराठ्या' चा अग्रलेख असो, एखादी स्फुट सूचना असो, दिल्ली-सिमल्याचें बातमीपत्र असो, कविता असो, गोष्ट असो, नाटकांतील प्रवेश असो, प्रस्तावना असो, किंवा एखादें साधें पत्र असो. जवळ कोणी लिहिण्यास मनुष्य असो वा नसो. असला तर त्याला सांगावयाचें, नाहीं तर स्वतःच हातानें लिहावयाचें. तीन डझन वर्षांच्या सतत व्यासंगानें इतकें सगळें बसून गेलें आहे कीं, त्यांनीं तोंडानें कांहीं सांगितलें तरी तें उत्कृष्टच उतरावयाचें. 'यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवंति शास्त्राणि' या न्यायानें त्यांनीं जें बोलावें तोच अग्रलेख, अशी स्थिति सांप्रत प्राप्त झालेली आहे. सोमवारींच सकाळीं एकदम 'टाईम्स' मध्यें अभावितपणानें अग्रलेख लिहिण्यास योग्य असा विषय उपस्थित व्हावा; घारीच्या नजरेनें चटकन् आपणास काय मुद्दा पाहिजे तो त्यांतून हेरून, अग्रलेख सांगण्यास सुरवात व्हावयाची, खोलींत इकडून तिकडे फेऱ्या घालतां घालतां दोन तासांत काम संपून जावयाचें. जशी फोनोग्राफची प्लेट लावून द्यावी तशी रीत. मध्यंतरीं कोणी कांहीं विचारावयास आलें तरी संगति तुटत नाहीं, प्रतिभा गारठत नाहीं, विचार-परंपरा नष्ट होत नाहीं, विनोदाचा रंग फिका पडत नाहीं, उपमा, दाखले, अवतरणें वगैरेंना खळ पडत नाहीं.

बरें, आश्चर्य हें कीं, लेखन कसेंही लिहिलें तरी सर्व बाजूंनीं नामांकित असावयाचें. सामान्य पत्राचें उत्तर धाडलें तरी त्यांत देखील वाङ्मय-विलास असावयाचा; मग अधिक महत्त्वाच्या लिखा-

णांत तो असल्यास काय नवल ? त्यांच्याइतकें सुंदर, मधुर व सर्वांगीण वाङ्मय मराठींत कोणीच निर्माण केलें नाहीं असें म्हटलें तरी त्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं. एखादा तज्ज्ञ आपल्या आवडीच्या विषयांत खेळत असतो तसे ते लेखनांत रमतात व रंगतात. उत्तर-हिंदुस्थानी गवयानें स्वर जसे कांहीं श्रोतृवृंदांत गळ्यांतून बाहेर काढून सोडून द्यावे, बड्या जवाहिऱ्यानें श्रीमंत व गुलजार गिऱ्हाइकापुढें आपल्या कपाटांतील सोन्या-मोत्यांचे, जडावाचे दागदागिने मांडावे, सुरतेच्या, काशीच्या अथवा मदुरा-कोइमतूरच्या जरीच्या व्यापाऱ्यानें आपलीं जरतारी बुट्टीदार शालजोड्या, पैठण्या वगैरे सणंगें भराभर घड्या मोडून विकत घेणारासमोर पसरून ठेवावीं, तद्वत् त्यांच्या लेखनांत वाचकांसाठीं शृंगार-साज इत्यादि बहुमोल जिन्नसांची भरपूर पखरण केलेली असावयाची. भाषा परिपक्व, शब्द समर्पक, विवेचन सुश्लिष्ट, विनोद गंभीर, टीका प्रयोजक, आदि-अंत परिणामकारक, मथळा मार्मिक. त्यांचा लेख वाचूं लागलें म्हणजे ऐश्वर्यशाली राजवाड्याच्या फलपुष्पसंभारानें सुशोभित केलेल्या नंदनवनांतील सुगंधित वायुलहरींनीं आंदोलित होणाऱ्या उद्यानांत बसल्याचा भास व्हावा. वाक्यपद्धति अशी प्रगल्भ, प्रौढ व गंभीर कीं जणुं खानदानी कुळांतील टोपपदरी इरकली लुगडें परिधान केलेली, पायांत पुणेरी जोडा असणारी, समग्रभूषणा अशी पुरंध्रीच. सरदारी थाट आहे, पण आधुनिक सुशिक्षित तरुणींचा पोकळ व नटवा छचोरपणा नाहीं; सौंदर्य आहे, पण त्यांचें उत्तान प्रदर्शन नाहीं; विद्वत्ता आहे, पण अवडंबर नाहीं. त्यांच्या बरोबरीचे लेखक व संपादक महाराष्ट्रांत थोडे कां होईना, होऊन गेले व कांहीं आहेतही. त्या लेखकांच्या लेखनांतील जोश व नाट्यावेग तात्यासाहेबांच्या लेखनांत सांपडणार नाहीं, वक्रोक्ति सांपडणार नाहीं हें खरें; तथापि जगन्नाथ पंडिताचें 'मृद्वीकामध्यनिर्यन्मसृणरझरीमाधुरी'

हें विशेषण लावावयाचें त्यांच्याच वाणीला व लेखणीला. आणि—

Who left scarcely any style of writing untouched,

And touched nothing that he did not adorn,'

हें जॉनसननें केलेलें गोल्डास्मिथचें गोड व कौतुकाचें वर्णन अक्षरशः कोणास लागू पडत असेल तर त्यांनाच.

लिहिण्याप्रमाणें बोलणेंही चित्ताकर्षक, सुलभ, व्यवहारज्ञ, ऐकणारास पटण्यासारखें. नाटकी आविर्भाव, भावनांचा प्रकर्ष, हृत्प्रक्षोभकारक वक्तृत्व, असला कांहीं प्रकार त्यांच्या भाषणांत नसावयाचा. परंतु तें अत्यंत विचारपरिप्लुत असावयाचें. त्यांत प्रतिपाद्य विषयाचे पापुद्रे काढून काढून तो पूर्णपणें उघड व स्पष्ट केलेला असावयाचा. त्यांत उदाहरणें, अलंकार, इत्यादिकांचा मसाला घातलेला असावयाचा; जरूर तेथें टीकेची फोडणी दिलेली असावयाची; क्वचित्प्रसंगीं झणझणीत मोहरीही लावलेली असावयाची! कांहीं असलें तरी लोकांना तें आवडतें व पसंत पडतें. आतां पुष्कळ वेळीं असें दिसतें कीं, विचार पिंजतां पिंजतां खालीं विशेष कांहींच उरत नाहीं; विषयाचें पृथक्करण इतकें परिपूर्ण व्हावयाचें कीं, ग्राह्य अवशिष्ट भाग फारच थोडा राहावयाचा. परंतु लोकांपुढें विषयाचें उद्घाटन उत्तम व्हावयाचें व मोठमोठाल्या दुकानांत 'शो रूम' मध्यें माल जसा जनतेच्या आवडीनिवडीकरितां मांडलेला असतो, त्याप्रमाणें अनुभवी विवेकीपणानें विचार-वैजयंतीमधील मणि सुटेसुटे करून दाखवावयाचे. ज्यानें त्यानें आपापली अभिरुचि चालवावी व त्याग-स्वीकार काय करावयाचा असेल तो स्वखुषीनें करावा. ही त्यांची प्रथा. मात्र जें सांगावयाचें तें समयोचितपणानें व निर्भीडपणानें सांगावयाचें. अर्थात् वयोमानाप्रमाणें स्वभावांत नैसर्गिक क्रान्ति व्हावयाची ती झाली असल्याकारणानें किंचित् चिडखोरपणा उत्पन्न झाला आहे हें निःसंशय! व तो जसा लेखनांत तसा भाषणांत

अगदीं अलीकडे प्रसंगोपात्त दृग्गोचर होतो. पण मूळ स्वभावांत तो नसल्याकारणानें कोणी त्याचा फारसा विषाद मानीत नाहीं. क्षुल्लक कारणावरून किंवा एकादे वेळेस कारण नसतांना देखील एकदम रागानें वरच्या मजल्याचें बोलावयाचें; फारशी जरूर नसली तरी सहज पंडित मोतीलाल नेहरू किंवा दुसरे कोणी केव्हांचे तरी विरोधी असतील त्यांस टोमणा द्यावयाचा, असें त्यांचे हातून घडतें. परंतु हें सर्व आगंतुक आहे हें जाणून क्षणिक वाईट वाटल्यावर तें मनांतून नाहींसें होतें.

जात्या ते कल्याण प्रकृति आहेत यांत काडीमात्र शंका नाहीं. सहसा कोणाचें नुकसान करावें ही बुद्धिच अजिबात नाहीं. कोणीही केव्हांही भेटावयास आलें तरी भेटावें, त्याच्याशीं मनमोकळेपणानें बोलावें व काय सल्ला द्यावयाचा असेल तो अत्यंत सद्बुद्धीनें द्यावा. दुपारच्या अडीच वाजेपर्यंतच्या आवडीच्या वामकुक्षीच्या वेळीं कोणी जागें केलें तरी हरकत नसावयाची. असें आहे म्हणून हजार व्यवसाय त्यांच्या मागें नको नको म्हणतां चिकटतात. विमा कंपनी आहे, पैसाफंड आहे, सहकारी बँक आहे, शारदोपासक संमेलन आहे, शिक्षण-प्रसारक मंडळी आहे, आतां आणखी डेक्कन एज्युकेशन सोसायटी आहे, आयुर्वेदीय रुग्णालय आहे, संगीत परिषद् आहे, रायगड स्मारक आहे; काय नाहीं म्हणून लिहावें? त्यांची कार्य पार पाडण्याची कुशलता अशी कीं, या सर्व संस्थांचा संसार चालू करून द्यावयाचा व तत्परतेनें आपणांस जेवढी मदत करतां येईल तेवढी सदैव करीत रहावयाचें. कोणी खाजगी सल्ला घेण्यास आला तरी स्वतःस योग्य वाटेल तो सल्ला स्पष्टपणें द्यावयाचा. कोणी पत्रानें कांहीं मागणी केली तरी ती शक्य असेल तर द्यावयाची, नसेल तर नाहीं. परंतु त्याला ताबडतोब उत्तर हें जावयाचेंच. मनाचा थोरपणा इतका कीं, एखादी चळवळ आपणास सर्वस्वीं

मान्य नसली तरी तिलाही, ती केवळ राष्ट्रीयत्वास पोषक म्हणून, हातभार लावावयाचा. एक ना दोन. त्यांचे उद्योग बहुशाखी व अनंत. हल्लीं 'केसरी' चें संपादकत्व सोडलें व राजकारणांतून वानप्रस्थाश्रम घेतल्यासारखें केलें असलें तरी त्यांच्या व्यापाचें चक्र चालूंच आहे. एवढ्या खटाटोपांत देखील गृहकृत्यांतील दक्षता आहेच. घरबांधणी पहाण्याची जिज्ञासा अति तीव्र व आपल्या घरांत दुरुस्ती करण्याची इच्छाही अनिवार. लॉइड जॉर्ज आपल्या क्रिसीथ गांवीं बटाटे लावतात म्हणतात. चर्चिल तर गवंड्याचें काम करतात. व्हायकाउंट ग्रे आपल्या वाड्याभोंवतीं बागबगीच्या लावीत. तात्यासाहेबांना घरदुरुस्तीचा, बसावयाची जागा इकडून तिकडे वारंवार बदलण्याचा हव्यास दांडगा. मधून मधून सर्वसंमत व सर्व-संमानित अशा रूढीच्या विरुद्ध मुद्दाम वागावयाचें. व हें अगदीं साध्या बाबीपासून तों थेट धार्मिक व राजकीय बाबींपर्यंत. लोक वेळेस एक कप चहा पितात तर त्यांना दीड कप लागतोच व ही त्यांची संवय त्यांच्या मित्रांना आपापसांतील चेष्टेचा विषय होऊन बसली आहे. लोक वाडिलांचें श्राद्ध करतात, तर ते वडिलांच्या तिथीस कथा करवितात. 'केसरी' गंभीर राजकीय मतप्रसारासाठीं आहे! मग त्यांत ते जाणूनबुजून 'रजःकण' अथवा गोष्टी प्रसिद्ध करणारच. या प्रकारचा थोडा आग्रहीपणा आहे. आणि मन तर इतकें चंचल कीं, मनांत गोष्ट आली म्हणजे ती अविलंबानें झालीच पाहिजे.

त्यांचें मन शारीरिक गतीप्रमाणें फार वेगानें काम करीत असलें पाहिजे असें दिसतें. कारण जसें एका कल्पनेवरून दुसरीवर त्यांचें मन उडी मारतें तसें पुस्तकांचेंही. ते इतक्या लवकर लवकर पुस्तकें वाचतात कीं, प्राकृत जनास अचंबा वाटतो. वाळलेल्या गवतांत जसा अग्नि, त्याचप्रमाणें ग्रंथालयांत त्यांचें मन. तेच सांगतात कीं, पूर्वीच्या काळीं राजकारण थोडें स्थिर असतांना, दुपारीं अकरा

वाजतां हपीसांत यावें व पांच वाजेपर्यंत वाङ्मयक्षेत्रांत चरत बसावें. टिळकांच्या व जिनसीवाल्यांच्या लायब्ररींतील एखादें पुस्तक काढून पहावें तों त्यांच्या खाणाखुणा पानांवर हटकून सांपडावयाच्याच. अजूनही केव्हां मुंबईस गेले कीं, अनेक कामांपैकीं 'रॉयल एशियाटिक' मध्यें जावयाचें व 'तारापूरवाल्या' कडे जावयाचें हीं दोन खास असावयाचींच. फार काय, कोठेंही चांगलें पुस्तक वा मासिक दिसलें म्हणजे त्यांनीं आपल्या हँडबॅगमध्यें घालून, घरीं नेऊन, वाचलेंच म्हणून खुशाल समजावें. कामाशिवाय दुसऱ्याच्या घराची पायरी चढावयाचे नाहींत; दुसरा आपणाकडे चालून आल्यास त्याचें काम झाल्यावर एक निमिष स्वस्थ न बसतां किंवा निवळ गप्पा न मारतां, बाहेर जावयाचें असेल तर कोट, पगडी घालून तयारी करतील; अगर घरींच दुसरें काम असेल तर तें करूं लागतील; पण वेळ वायां जाऊं देणार नाहींत. दिल्ली-सिमल्यास ॲसेंब्लीसाठीं गेले असले तरी हीच तऱ्हा. आवश्यक झाल्याशिवाय आपली खोली सोडून दुसऱ्याच्या खोलींत कदापि पाऊल टाकावयाचे नाहींत. स्वतः वाचीत तरी असावयाचे, नाहीं तर कोणी आगाशे वगैरे चिटणीस नेला असेल त्याला कशावर तरी लेख सांगत असावयाचें; अथवा एखादें भाषण डिक्टेट करीत असावयाचें. हा सततचा देखावा पाहूनच दत्तोपंत बेळवींनीं कंटाळावें व चेष्टेनें विचारावें, "काय तात्यासाहेब, रात्रंदिवस गणपतिबोवासारखे समोर उंदीर घेऊन बसतां बोवा!"

त्यांचे सहाध्यायी कॉलेजांतल्या त्यांच्या वागणुकीचें असेंच वर्णन मजेनें करतात. आज तरी काय, सटीसामाशीं तात्यासाहेब मेहेंदळ्यांकडे किंवा वाटेवर जातां येतां अण्णासाहेब भोपटकरांकडे वळतील तेवढेच. बाकी, आपलें घर व हपीस बरें आणि आपण बरे. त्यांच्या या स्वभावाचें निरीक्षण केलें म्हणजे बायरननें—

Exhausting thought,
And hiving wisdom with each studious year,

असें गिबनचें चित्र काढलें आहे त्याची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

मनाच्या चंचलत्वाबरोबर मृदुलत्वही अतिशय आहे. बाह्य परिस्थितीचा परिणाम तत्क्षणीं प्रतिबिंबित होतो. वाईट बातमी कानीं आली म्हणजे खेदाची छटा चेहेऱ्यावर दिसावी. वात्रट पत्रांतून गैरवाजवी टीका आल्याचें त्यांना कोणी सांगितलें म्हणजे अंतःकरणाला वेदना झाल्यासारखें स्पष्ट दिसावें. मनासारखी गोष्ट झाली नाहीं म्हणजे निराशेची भावना त्यांच्या तोंडावरून पाहाणारानें अनुमानित करावी.

सज्जनस्य हृदयं नवनीतं यद्वदंति कवयस्तदलीकम्।
अन्यदेहविलसत्परितापात्सज्जनो द्रवति नो नवनीतम्॥

असा कवीनें व्यतिरेकालंकार केला आहे; परंतु तात्यासाहेबांचें मन असें नाजूक आहे कीं, स्वतःच्या तापानें विरघळतें व दुसऱ्याच्या तापानें पण विरघळतें. कांहीं महिन्यांपूर्वी सदाशिवपेठेंतील लिमयांच्या टाईप-रायटिंग रूममध्यें लहानशी सभा त्यांच्याच सन्मानार्थ भरली होती. टिळकांचा व आपला दीर्घकालीन संबंध व नानातऱ्हेच्या अडचणी वगैरे इतिहासाचें त्यांना कथाप्रसंगांत स्मरण झालें आणि कंठ एकदम इतका दाटून आला कीं, त्यांच्या डोळ्यांत दुःखाश्रु उभे राहिले; दर्शन चिंताजड झालें व वाचा फुटेनाशी झाली! परवां देशमुखांच्या वाड्यांत बालचरांचे खेळ झाले. समारंभ आटोपून मंडळी परत जातां जातां, उदईक सकाळीं सोलापूरच्या चार लोकांना फांशी देणार, ही निश्चित बातमी येरवड्यास त्यांना भेटून आलेल्या एका गृहस्थानें सांगितली. बातमी कानीं पडतांच त्यांनीं कपाळाला हात लावून 'नशीब' असे निराशेचे उद्गार

काढले व बाहेर पडले ते तडक घरींच गेले! व्यक्तीचें काय किंवा जनसमुदायाचें काय, नेहमीं हित व्हावें ही त्यांच्या दयार्द्र अंतःकरणाची मनीषा. म्हणून तर त्यांनीं मुळशीच्या शेतकऱ्यांना बदला जमिनी मिळाव्या यासाठीं हळहळून प्रयत्न केले. तुरुंगांत गेलेल्या अमक्या गृहस्थाला गाडीला जुंपलें होतें, तमक्याला तोंडावर पोतें घालून मारलें, अशा हकीगती त्यांना सांगूं लागलें म्हणजे त्यांना इतका गहिंवर यावा कीं त्यांनीं, 'हें कांहीं मला सहन करवत नाहीं' असें म्हणून तो विषयच टाळावा. 'सर्वेऽपि सुखिनः संतु सर्वे संतु निरामयाः,' सगळीकडे शांतता अविच्छिन्नपणें वास करावी, सर्वांनीं स्वतंत्रपणें परंतु कर्तव्यनिष्ठेनें आपली कामगिरी करीत रहावें, स्वयंस्फूर्तीनें होईल तेवढा स्वार्थत्याग ज्यानें त्यानें करावा, राष्ट्रकार्यरूपी नामदेवाच्या पालखीस स्वसामर्थ्यानुसार प्रत्येकानें हात लावावा, कोणी कोणास भरीस घालूं नये, ज्याला जें रुचेल, पचेल व सुचेल तें तो करीतच असतो, या स्वरूपाची त्यांची व्यवहारज्ञतेची व अनुभवसिद्ध अशी मनोभूमिका. एका टोंकास राष्ट्रस्वातंत्र्य व दुसऱ्या टोंकास गृहव्यवस्था, एका टोंकास परमार्थ व दुसऱ्या टोंकास स्वार्थ हीं दोन्ही सांभाळावयाची हें त्यांचें ब्रीद. वर्ड्स्वर्थनें चंडोल पक्ष्याच्या काव्यांत त्याचा स्वभाव-विशेष या हृदयंगम शब्दांत वर्णिला आहे—

"A privacy of glorious light is thine,
Whence thou dost pour upon the world a flood
Of harmony, with instinct more divine;
Type of the wise, who soar, but never roam—
True to the kindred points of Heaven and Home."

जरूर त्या फरकानें तात्यासाहेबांचें धोरणही या धूर्त शब्दांत दिग्दर्शित केल्याप्रमाणें असतें असें म्हटलें तर तें रास्तच होय.

हें धोरण त्यांच्या वर्तनांत व कृतींत प्रतिबिंबित होतें. मनच आरशाप्रमाणें शुद्ध व स्वच्छ, मग त्यांतून आंतील क्रिया–प्रक्रिया उघड दिसावी हें साहजिकच होय. लहान मुलगा असला तरी तेंच किंवा अखिलभारतीय लोकाग्रणी असला तरी तेंच. आरशाचा धर्मच तो. स्वभावाचा व घरगुती राहणीचा साधेपणा कोणी बडा पाहुणा आला तरी बदलावयाचा नाहीं. विशेष समारंभ असला तरी पोपाख रोजचा साधा असेल तोच कायम. कडक उन्हाळा असला कीं, सदऱ्याशिवाय नुसताच बंद गळयाचा कोट घालावयाचा; खिशांत घड्याळ असावयाचें तें किल्ली वेळेवर न दिल्याकारणानें बहुधा बंद असावयाचें; फाउंटन पेन असलें तरी तें रिकामें असावयाचें व त्यांत शाई भरतां येत नसावयाची. हा जो एक जुन्या जमान्यांतील स्वाभाविक साधेपणा तोच सार्वजनिक बाबतींतही दृष्टोत्पत्तीस येतो. बोलण्या-चालण्यांत लपंडाव, कुटिलपणा अगर ‘एक हात काकडी नऊ हात बी’ असा प्रकार केव्हांही नसावयाचा. कोणत्याही प्रश्नाचा निकाल करावयाचा तो अगदीं निःपक्षपातीपणानें, धारवाडी कांट्यानें तोलून करावयाचा; व या न्यायीपणाबद्दल इतकी सार्वत्रिक ख्याति कीं, खाजगी तंटे पंचायतीनें तोडण्याचें त्यांच्याकडे येऊन पडावयाचें. येथील कॉसमॉस सोसायटीमध्यें मतभेद उत्पन्न झाले आहेत? तात्यासाहेबांना ॲड्व्हायसरी कौन्सिलवर घ्या व तडजोड प्रस्थापित करून घ्या. व्यापारांतील भागीदारींत भांडण झालें आहे? तात्यासाहेबांना, वादी-प्रतिवादींनीं राजीनामा देऊन, लवाद नेमा. भावाभावांत वांटणी करावयाची आहे? चला तात्यासाहेबांकडे कागदपत्र घेऊन. फार कशाला? असें सांगतात कीं, त्यांच्या समतोलपणाबद्दल व निर्विकारीपणाबद्दल सरकार–दरबारीं देखील इतका विश्वास वाटतो कीं, एकच उदाहरण द्यावयाचें म्हणजे १९२९ सालच्या लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीच्या पहिल्या

लोकनियुक्त अध्यक्षाच्या निवडणुकीच्या वेळचें. विठ्ठलभाई पटेल व टी. रंगाचार्य हे उमेदवार होते. सरकारची व सभासदांची इच्छा अशी कीं, कॉमन्स सभेप्रमाणें निवडणूक बिनविरोध व्हावी. पण 'नृपति–जनपदांना' प्रिय व मान्य होण्यासारखा असा अस्सल लोकप्रतिनिधि कोण ? सर्वांच्या तोंडीं तात्यासाहेबांचें नांव. अर्थात् पुढें हें घडलें नाहीं हें वेगळें.

त्यांचा या थोर गुणांचा टिळकांनीं चांगलाच उपयोग करून घेतला व त्यांनींही तो फार प्रामाणिकपणानें, मनोभावानें व निष्ठेनें करून दिला. टिळकांच्या तुरुंगवासांत या त्यांच्या संबंधांत विघ्नें उपस्थित झालीं, नाहीं असें नाहीं; पण तात्यासाहेबांची उदारमनस्कता व टिळकांच्याविषयीं त्यांचा अत्यंत आपलेपणा यांच्यामुळें त्या अडचणी नाहींशा झाल्या. टिळकांच्या राजकीय कामगिरींत तात्यासाहेबांचा भाग किती व कोणत्या प्रकारचा हें काळ ठरवीलच. दैवयोग मात्र असा विचित्र कीं, १९२० सालानंतर हें सारें पालटलें. 'वैयक्तिक गुण ते सार्वजनिक चारित्र्यांत दुर्गुण' ठरतात हें खरें असेल म्हणा, ड्रायडननें म्हटल्याप्रमाणें—

'Art thou a statesman
And canst not be a hypocrite ?'

हें विधान बरोबर असेल म्हणा, किंवा इमर्सनच्या सिद्धान्ताप्रमाणें To be great is to be misunderstood, हें यथार्थ असेल म्हणा, त्यांच्या गुणांचें चीज होईनासें झालें. त्यांच्या मतांविषयीं गैरसमज पसरूं लागला. परिस्थितीस कलाटणी देण्याच्या कार्यांत दुटप्पीपणा पदरीं आला. त्यांचा अचूक दूरदर्शीपणा विश्वासघात ठरला. निर्भीडपणास व स्पष्टवक्तेपणास भित्रेपणाची पदवी मिळाली. कर्तव्यतत्परतेस स्वार्थीपणाचें रूप प्राप्त झालें. गंगालहरींतील श्लोकाप्रमाणें 'गुणानामेवायं तव: जननि दोष: परिणत:' अशी स्थिति

उत्पन्न झाली. विरोधाच्या व प्रच्छन्नशत्रुत्वाच्या वावटळीवर वावटळी उठल्या; पण त्यांनीं आपली स्थितप्रज्ञता यत्किंचित् ढळूं दिली नाहीं. विषारी टीकेनें देखील त्यांस आपल्या मार्गापासून च्युत केलें नाहीं. टिळकांच्या पाठीमागें दहा वर्षें 'केसरी–मराठा' संस्था, अनपेक्षित व नाजुक अडचणींस तोंड देऊन टिकविली, एवढेंच नव्हे तर महाराष्ट्रांत अनन्यसाधारण उत्कर्षाप्रत नेली. परंतु दुरतिक्रम स्वभाव व दुर्निवार परिस्थिति यांचा झगडा सुरू होण्याची आपत्ति आली म्हणजे परिणाम या तऱ्हेचा व्हावा हें नैसर्गिक होय. तथापि ज्याचा जो ईश्वरदत्त गुणधर्म तो अप्रतिहत रीतीनें प्रतीत व्हावयाचा हें निश्चित. केवड्याला फळें येणार नाहींत; पण त्याचा मोहक सुगंध कोण हिरावून घेणार? फणसाच्या वृक्षावर सुवासिक फुलें बहरणार नाहींत, पण त्याचें फळांचें पीक कोण कमी करणार? नागवेलीला तर फळही नाहीं व फूलही नाहीं; पण ती निरुपयोगी थोडीच आहे? साऱ्या हिंदुस्थानभर काय परंतु विलायतेंतही 'एक धिम्मा व प्रशान्त मुत्सद्दी' म्हणून त्यांची ख्याति आहे. टेनिसननें आपल्या सुप्रसिद्ध खंडकाव्यांत—

> 'Who knew the seasons when to take
> Occasion by the hand and make
> The bounds of freedom wider yet,'

अशा राजकारणी पुरुषांचें वर्णन केलें आहे तें जसें कांहीं तात्यासाहेबांच्या मनोवृत्तीच्या मुत्सद्द्यांचें. त्यांच्या अंगीं टिळकांची लोकोत्तर धडाडी नाहीं, महात्मा गांधींचा पराकाष्ठेचा निग्रह नाहीं, पंडित मोतीलाल नेहरूंची युक्तिबाज मुत्सद्देगिरी नाहीं, पंडित मदनमोहन मालवीयांची दैवी संपद् नाहीं, श्री. विठ्ठलभाई पटेल यांचा अज्ञेय कावेबाजपणा नाहीं, श्री. वल्लभभाई पटेल यांचा एकमार्गीपणा नाहीं, श्री. गंगाधरराव देशपांडे यांची भावनावशता नाहीं, पंडित जवाहर-

लाल नेहरूंची युद्धप्रियता नाहीं, बाबू सुभाषचंद्र बोस यांचा ध्येयवाद नाहीं. परंतु मौज अशी कीं, असें असूनही यांपैकीं प्रत्येकास तात्यासाहेबांविषयीं आदर वाटतो, व तात्यासाहेबांस या प्रत्येकाविषयीं आदर वाटतो. याचें कारण तात्यासाहेबांपाशीं जो असाधारण गुणसमुच्चय वास करतो तो कोणाच्याही जवळ नाहीं, हें जसें वस्तुस्थितीस धरून, तसेंच यांच्यापैकीं प्रत्येकाचा जो शिरोधार्य व परा कोटीस गेलेला गुणविशेष तो आपल्या अंगीं नाहीं, याची जाणीव हेंही सत्यपूर्ण. अशी परस्पर मनोमन ओळख असल्यावर कोणापुढें झालें तरी—

नितरां नीचोऽस्मीति त्वं खेदं कूप मा कदापि कृथाः ।
अत्यंतसरसहृदयो यतः परेषां गुणग्रहीतासि ॥

या अन्योक्तीची उजळणी कशास हवी? तात्यासाहेबांपुढें तर सुतरां नको. कारण त्यांच्यासारखा रसिक, विद्वान्, निगर्वी, दूरदर्शी, समयज्ञ, अष्टपैलू, व्यवहारी, सरस्वतीकंठाभरण साहित्यशिरोमणि व राष्ट्रसेवक महाराष्ट्रांत तर कोणीच नाहीं आणि बाहेरील हिंदुस्थानांतही विरळाच सांपडेल. परमेश्वर करो आणि सांप्रत उदयगूढ अशी अधिक अनुकूल व प्रसन्न परिस्थिति हिंदी राजकारणांत अवतीर्ण होऊन, तात्यासाहेबांच्या अंगचे अभिजात गुण मायभूमीला वाढत्या प्रमाणांत उपयोगी होवोत म्हणजे झालें !

७

# श्री. नरसिंह चिंतामण केळकर

" The social, friendly, honest man, whatever he be,
'Tis he fulfils great Nature's plan,
And none but he, "

Burns.

'संपादकानां केळकरोऽस्मि.' भगवान् श्रीकृष्णानें गीतेच्या दहाव्या अध्यायांत स्वतःचें वर्णन करतांना मी आदित्यांपैकीं विष्णु, नक्षत्रांमध्यें चंद्र, देवांत इंद्र, वृक्षांत अश्वत्थ, गंधर्वांत चित्ररथ, पक्ष्यांत गरुड, पांडवांत अर्जुन, मुनींत व्यास, असें सांगितलें. भगवंताचा आजच्या काळांत अवतार झाला व असेंच वर्णन करण्याचा प्रसंग आला तर त्यानें खरोखरच 'संपादकानां केळकरोऽस्मि' असा एक चरण गीतेंतील वर्णनांत घातला असता. तात्यासाहेबांची त्या धंद्यांतील श्रेष्ठता आहेहि तशीच. ते जसे कांहीं जन्मजात संपादकच. शाळा–कॉलेजांत असतांना काय लेखन केलें तें सोडून देऊं. परंतु १८९६ सालीं ते केसरी–मराठ्याला येऊन मिळाले तेव्हांपासून चालू घटकेपर्यंत त्यांचें लेखनकार्य चालूंच आहे. सतत ३६ वर्षें संपादक म्हणून लेखनव्यवसाय करीत असलेला पुरुष विरळाच सांपडावयाचा. लेखनाचा त्यांना कंटाळा असा कधींच येत नाहीं. तोंडी सांगितलेलें टिपून घेण्यास कोणी मनुष्य असला म्हणजे बरेंचसें इकडून तिकडे फेऱ्या घालीत व कांहीं खुर्चीवर पडून, असें त्यांचें अखंड काम चाललेलें असावयाचें. लिहिणाराचीं बोटें दुखूं लागावीं, टाकाचें टोंक झिजावें, दौतींतील शाई संपत यावी, बरोबर आणलेले लिहाव-

याचे कागद खलास व्हावे, पण त्यांच्या जिभेला उसंत नाहीं व डोक्यांत घोळत असणाऱ्या विचारांना अंत नाहीं. केसरी-मराठ्याचे चार-पांच कॉलम लेख लिहावयाचा म्हणजे त्यांच्या हातचा मळ. हें कांहींच नाहीं. लो. टिळक निवर्तल्यावर त्यांनीं पुण्यास येऊन टिळकांच्या आजारीपणाची हकीकत सांगून लिहविली व त्यांच्यावरच एक अग्रलेख लिहिला तो तर लेखन-क्षेत्रांतील अग्रगण्य पराक्रमच होय. आदल्या रात्रीं अकरा वाजेपर्यंत घरीं व दुसऱ्या दिवशीं ऑफिसांत सकाळीं आठ वाजल्यापासून सायंकाळीं पांच वाजेपर्यंत त्यांच्या मुखांतून वाक्यांची संततधार सारखी वहात होती. बरें, संपादक एकट्या केसरी-मराठ्यांतच होते असें नव्हे. टिळकांनीं विलायतेंत ‘इंडिया’ पत्र आपल्याकडे घेऊन चालविण्याचें ठरविलें. पण संपादक कोण ? टिळकांनीं म्हटलें, ‘तात्यासाहेब, तुम्ही व्हा.’ अर्थात् तात्यासाहेबांची तयारी होतीच. मिसेस बेझंटबाईंना एकाएकीं अटक झाल्याकारणानें त्यांचा ‘न्यू इंडिया’ अडचणींत आला. तें पत्र चालविण्यास तात्यासाहेब मद्रासलाहि गेले. याला म्हणावें खरा हौशी व उपजत संपादक !

तुलना करणें अंमळ गैर खरें; तथापि साधारणपणें त्यांच्या बरोबरीचे मद्रासचे ए. रंगस्वामी अय्यंगार अगर अलाहाबादचे सी. वाय. चिंतामणी किंवा मुंबईचे कृष्णाजीपंत खाडीलकर घेतले काय, हे एकमार्गी लेखक दिसतात. केळकरांच्या लेखनाच्या टांग्याला इंग्रजी व मराठी असे दोन घोडे जुंपलेले. आणि त्यांचा टांगा वर्तमानपत्राच्या धोपट मार्गानेंच केवळ जातो असें नाहीं, तर चरित्रग्रंथ, नाटकें, काव्य, प्रस्तावना, इतिहास, गोष्टी, राजकारण, अर्थशास्त्र वगैरे अनेक लहानमोठ्या रस्त्यांनीं सहज जाऊं शकतो. रंगस्वामींनीं, एका केळीला एकच घड यावा, त्याप्रमाणें भारतीय राज्यघटनेवर एकच ग्रंथ निर्माण केलेला आहे. कृष्णाजीपंतांच्या नाट्यप्रतिभेच्या

वेलीला आलेला घोंस तर रससंपन्न आहेच आहे. पण तात्यासाहेबांच्या लेखनाच्या उद्योगानें विस्तीर्ण असा बागच तयार होऊन राहिला आहे आणि त्यांत नानाप्रकारचीं फळांचीं व फुलांचीं झाडें आपल्या सौंदर्याचें व माधुर्याचें वातावरण सुगंधित करीत आहेत. त्यांनीं मराठी भाषेला विलक्षण सौष्ठव प्राप्त करून दिलें आहे. अगोदरच त्यांचे विचार स्पष्ट व स्वतंत्र, त्यांत ते प्रदर्शित करण्यास भाषाहि सोन्यामोत्याचे दागिने ल्यालेली. मग काय ? मुली उखाणे घेतात त्याप्रमाणें 'किनखापाची गादी, त्यावर भरगची लोड' अगर 'चांदीच्या वाटींत केशराचा गोळा' अशी त्यांच्या साऱ्या लेखांची स्थिति. जे लेखनाचे गुण तेच भाषणाचे. घशाच्या विकारामुळें व्याख्यान अस्खलित होऊंच शकत नाहीं.

पण तें खाजगी संभाषणासारखें व विचारपरिप्लुत असावयाचें. तें इतकें कीं, सभा संपून शिवाजी मंदिरांतून घरोघर जातांना लोक बोलतात देखील कीं, केळकर बोलले म्हणजे सभा कशाविषयीं झाली व प्रस्तुत विचार काय आहे हें बरोबर कळतें. आतां हें खरें कीं, हिरव्यागार गवतांत चालत असतां मध्येंच एकादा कांटा बोंचावा त्याप्रमाणें त्यांच्या राजकीय लेखनांत किंवा भाषणांत कोणा प्रतिपक्षीयांना क्वचित् चिमटा घेतलेला असावयाचा. पण तो केवळ प्रतियोगी म्हणून व तोहि मोठ्या खुबीदार व मार्मिक शब्दांत. त्यांनीं नाटकावरील टीकेच्या रूपानें असहकारितावाद्यांना दिलेला घरचा अहेर कोण विसरेल ? तसेंच, त्यांनीं शिवाजी-मंदिरांत राष्ट्रीय शिक्षणासंबंधींच्या एका व्याख्यानांत दिलेली 'ताडीच्या रिकाम्या पिंपावर लावलेल्या ताडाच्या झाडांच्या फांदी'ची उपमा आठवली म्हणजे तो सभेचा प्रसंग प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर उभा राहणारच. तद्वत् स्वभाव जरी मूळचा अत्यंत गोडवा असला, तरी खाजगी वादविवादांत काय अथवा जाहीर सभेंत काय, कोटीला

प्रतिकोटि करण्यांत किंवा हजरजबाबीपणांत ते कांहीं कमी नाहींत. देशबंधु दास एकदां सहज चेष्टेनें परंतु गर्भित अधिक्षेपानें म्हणाले कीं, मराठ्यांनींच तर राज्य गमावलें. तेथल्या तेथेंच केळकरांनीं त्यांना बजावलें, 'अहो दासबाबू, तुम्ही म्हणतां तें सर्वस्वीं खरें; पण तुम्ही हें विसरलां कीं, गमावण्यास तरी मराठ्यांचें राज्य होतें म्हणूनच गमावलें कीं नाहीं?' दुसऱ्या वेळीं असेंच एकदां मौ. शौकतअल्लींनीं 'पानपत लक्षांत आहे ना' असा सवाल केला होता. तेव्हां केळकरांनीं तडकाफडकी उलट ठासून विचारलें, 'रोहिल्यांना विसरलांत कीं काय?'

राजकारणाच्या व सामान्यतः सार्वजनिक कार्याच्या धकाधकींत हे प्रकार चालावयाचेच. एरवीं त्यांचा स्वभाव म्हणजे काय सांगावा? शांतिप्रियता, सौजन्य, उद्यमशीलता व सदिच्छा यांचें जसें माहेरच. चळवळीचा धबडगा मनापासून नको. १९०८ सालीं ते बोलतांना एका वऱ्हाडच्या पुढाऱ्याजवळ म्हणाले, 'I am at my best in peace times' तें तंतोतंत व खरेंखुरें आत्मवर्णन. बैठकीवर बसून एखाद्या विषयाची सांगोपांग चर्चा करण्यांत ते फारच निपुण. त्यांची बुद्धि पृथक्करणप्रधान दिसते. तिची ग्राहकताहि विशेष आहे. कारण त्यांचें वाचनांतील व लेखनांतील द्रुतगतित्व पाहिलें म्हणजे सामान्य माणूस स्तंभित होतो. 'न खलु धीमतामविषयो नाम' असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. कारण त्यांची बुद्धि सर्व विषयांत अकुंठित रीतीनें चालते; टिळकांचें विशाल चरित्र सांगते, मराठे व इंग्रज यांच्याशीं संभाषण व वादविवाद करूं शकते, तोतयाचें बंड घडवून आणते, कृष्णार्जुनांचें युद्ध लढविते, इतिहासांत विहार करते, संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन करते, नवरदेवांची जोडगोळी सोडते, मौजेचे चार प्रहर घालविते, राज्यशास्त्रांत अवगाहन करते. मग ती वाचनालयांत नेहमीं चरत असेल यांत काय नवल? यथातथ्य

संपादक म्हटला म्हणजे त्याला लायब्ररीची व संदर्भाच्या व्यवस्थेची अमूप आवडही सहज असावयाची. सांप्रत सर्वोत्कृष्ट वाचनालय व ग्रंथसंग्रहालय केसरी–मराठा संस्थेंत करण्याची त्यांची हौस पाहिली म्हणजे या बाबतींत त्यांची मनीषा किती तीव्र आहे हें पटतें. स्वतःच्या देखरेखीखालीं दिवाणखाना बांधून घेऊन, कपाटें मागवून, पुस्तकें–अहवाल यांची व्यवस्था लावून लायब्ररी बनविण्याचें काम आज चालू आहे. त्याच्यासाठीं निरनिराळ्या सरकारी व इतर पुस्तकांचे कॅटलॉग मागवावयाचे, लायब्रेरिअन कसा असावा, त्याचें कर्तव्य काय या विषयांचीं इंग्रजी पुस्तकें आणावयाचीं, एक स्वतंत्र मनुष्य नेमावयाचा व महत्त्वाकांक्षा सफल करून घ्यावयाची. अशी तत्परता केवळ लायब्ररीपुरतीच असें नाहीं. कोणतेंहि काम करावयाचें म्हणजे, तें लहान असो वा मोठें असो, त्यांना धीर नाहीं. क्षुल्लक पत्र कां असेना, त्याला तत्काळ उत्तर गेलेंच पाहिजे. मोठीं मोठीं कामें योग्य तऱ्हेनें व निरलसतेनें त्यांनीं पार पाडावीं हें क्रमप्राप्तच होय.

आणि या कामांची उंच वाढणारी श्रेणी केवढी म्हणून सांगावें? केसरी-मराठा संस्थेचे संचालक, लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लीचे सभासद, म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष, शिक्षणप्रसारक मंडळी व डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या कार्यकारी मंडळाचे सभासद, सहकारी पतपेढीचे अध्यक्ष, रायगड स्मारकाचे चिटणीस, टिळक-स्मारक मंदिराचे ट्रस्टी वगैरे वगैरे अनेक नात्यांनीं ते काम करतात. टिळक हयात असतांना तर पुसूंच नये. ताईमहाराजांचे खटले, औरंगाबादच्या साक्षी, त्यांतच दोन्ही वर्तमानपत्रें. तात्यासाहेबांच्या सारखा कामाचा उरक असणारा मनुष्य होता म्हणून सर्व कांहीं निर्विघ्नपणें सिद्धीस गेलें व संस्थेला हे दिवस लाभले. मौज अशी कीं, अशा अठरा कारखान्यांचें काम करीत असतांना त्रासिकपणा नसावयाचा. व्यग्र

असतांना सुद्धां कोणीही यावें, मोजक्या शब्दांत आपलें काम सांगावें. त्यांनीं होय, नाहीं, काय असेल तें म्हणावें व पुनः गाडा चालूच. मात्र वायफळ बडबडीची चीड फार. स्वतःला गप्पाष्टकें मारावयास नकोत व दुसऱ्यांनीं मारून वेळ घ्यावा हेंहि नको, कोणी भेटावयास यायचें म्हणजे, इतर बड्या पुढाऱ्यांप्रमाणें 'व्हिजिटिंग कार्ड' नको, 'अपॉइंटमेंट' करावयास नको. हा जसा खाजगी व सार्वजनिक कामांत वागण्याचा साधेपणा प्रशंसनीय तशी त्यांच्या मनाची ऋजुताही कौतुकास्पद आहे. पहिल्या प्रथमच त्यांच्या मनांत वांकडें कधीं येत नाहीं. विरोधकांची बाजू अगोदर समजून घ्यावयाची; मग स्वतःच्या बाजूविषयीं गैरसमज पसरेना, त्याची फारशी क्षिति बाळगावयाची नाहीं. मनाच्या उजूपणासारखा पोषाखांत व खाण्यापिण्यांतहि अगदीं कमालीचा साधेपणा. कळीचा सदरा, धोतर आंखूड असलें तरी हरकत नाहीं, कोट, उपरणें व पगडी. खिशांत रुमाल बहुधा नसावयाचा. कपड्यांत ऐट नको व जेवणांतहि बडेजाव नको. मोठ्यांत मोठें व्यसन म्हटलें म्हणजे वामकुक्षी, भुईमुगाचे दाणे व चहा. गमतीखातर पंक्तीस भोजनास बसले म्हणजे साधारणपणें अशा मेजवानीचे प्रसंगीं घरांत नसणारा जिन्नस काय मागतील तेवढाच.

अशा प्रकारच्या त्यांच्या गोड स्वभावामुळें ते सर्वांना प्रिय व आदरणीय वाटतात. त्यांचीं मतें ज्यांना पटतात, त्यांना तर ते हवेसे वाटावे हें योग्यच. पण त्यांच्याशीं न जुळणाऱ्या लोकांत सुद्धां त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि दिसून येते. हल्लींच्या राष्ट्रीय सभेच्या दृष्टीनें त्यांचीं राजकीय मतें सौम्य भासतात हें नाकबूल करतां येत नाहीं. पण वाटतें तें प्रांजळपणानें, निर्भीडपणानें ते पुढें मांडतात हें विशेष. म्हणून तर परवांच्या पुण्याच्या सभेंत अमुक मार्गानें चालू लढा मिटावा असें त्यांनीं प्रतिपादन केलें. आणि ह्या त्यांच्या राष्ट्रीयत्वास

पोषक पण स्वतंत्र विचारांबद्दल व सरळपणाबद्दल सगळ्या हिंदुस्थानभर त्यांची कीर्ति झाली आहे. देशबंधु दास यांना त्यांच्याविषयीं धन्यता वाटे. दिल्लीस काँग्रेसचें जादा अधिवेशन मौ. अबुल कलम अझाद यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. केळकर वगैरे महाराष्ट्रीय मंडळी दासबाबू उतरले होते तेथें प्रातःकाळीं गेली. दासबाबू निजले होते ते खडबडून उठले व त्यांनीं बंगाली प्रतिनिधींना बसण्यास खुर्च्या आणण्यास सांगितलें. त्या वेळीं त्यांनीं मजेनें विलायतेंतील एक गोष्ट सांगितली कीं, एकदां एका मोठ्या मनुष्याचा सन्मान करण्यासाठीं त्याला दोन खुर्च्या देण्यांत आल्या व केळकरांना तसेंच करण्याविषयीं त्यांनीं विनोदानें सुचविलें. पण विनोदांतील अंतर्निष्ठ भावना उघड होती. पं. मोतीलाल नेहरू हेहि त्यांचें मन कलुषित होईपर्यंत तात्यासाहेबांना उच्च लेखीत. दिल्ली-सिमल्यास ते कांहीं दिवस परकेपणानें 'केळकर' म्हणण्याचें सोडून देऊन प्रेमानें 'तात्यासाहेब' असेंहि संबोधूं लागले होते. महात्मा गांधींना तर त्यांच्याविषयीं काय वाटतें तें त्यांनीं अहमदाबादच्या राष्ट्रीय सभेंत जाहीर रीतीनें बोलूनच दाखविलें. नामदार शास्त्री त्यांच्याशीं मनमोकळेपणानें चर्चा करतात; जयकरांना ते आपल्या येथें यावेत असें वाटतें; फार काय न्यायमूर्ति मडगांवकर पण त्यांना भेटूं चाहतात! सर्वांचें चांगलें व्हावें, निसर्गसृष्टीप्रमाणें जिकडे तिकडे शांततेचें साम्राज्य असावें, प्रत्येकानें आपलें कर्तव्य आपली मर्यादा जाणून करावें, सर्वांनीं व्यवहार सांभाळावा व सर्वांनीं सदिच्छेनें, परोपकारबुद्धीनें मगदुराप्रमाणें लोकसेवा करीत राहावें अशी त्यांची प्रायः सदैव वृत्ति असते. शिरोभागीं असलेल्या बर्न्सच्या कवितेंतील निसर्गाची योजना म्हणजे याच स्वरूपाची.

असे गुण तात्यासाहेबांच्या ठायीं आहेत म्हणून तर आज छत्तीस वर्षें एके ठिकाणीं ते ठाण मांडून आहेत. नाहीं तर काय, टिळ-

कांच्या संस्थेंत कित्येक लोक आले आणि गेले तसेंच त्यांचेंहि होतें. पण त्यांच्या स्वतःच्या अंगचे अनेक गुण व खुद्द टिळकांना त्यांची जाणीव असा योग जुळल्यावर, सर्व कठिण प्रसंगांतून सुखरूप निभावून ते स्थिरासन झाले व आपल्या आयुष्याच्या उंबरठ्यावर असतांच त्यांनीं जें लोकसेवेचें व्रत स्वीकारलें तें आज वयास साठ वर्षे पुरीं झालीं तरी यौवन-सुलभ उत्साहानें व अनाळशी पद्धतीनें ते करीत राहिले आहेत. ते राजकारणी असून सरस्वतीचे लाडके उपासक आहेत; लोकाग्रणी असून सर्वांना दर्शनसुलभ आहेत; कर्तबगार असून निरहंकारी आहेत; विद्वान् असून विनयशील आहेत; देशभक्त असून मितभाषी आहेत; रसिक असून सदभिरुचिसंपन्न आहेत. यांपैकीं एखादा गुण मनुष्याच्या अंगीं वास करीत असेल तरीहि तो प्रिय व मान्य होतो. मग हे सारे गुण ज्यांच्या ठिकाणीं एकवटले त्यांची भारतवर्षांत तारीफ व्हावी व सर्वांनीं त्यांच्या एकसष्टाव्या वाढदिवढानिमित्त त्यांचा सत्कार करावा आणि अभीष्ट चिंतावें हें मनुष्यस्वभावास अनुरूपच आहे. त्यांच्या राजकीय मतांच्या सौम्यपणामुळें त्यांच्या अंगच्या इतर गुणांचीहि व्हावी तेवढी चहा नाहीं. पण त्यायोगें त्यांच्या लोकोत्तरत्वाला मुळींच कमीपणा येत होत नाहीं. गोल्डस्मिथनें लिहिल्याप्रमाणें—

"As some tall cliff that lifts its awful form
Swells from the vale and midway leaves the storm,
Though round its breast the rolling clouds are spread,
Eternal sunshine settles on its head."

अशीच वस्तुतः त्यांचीहि स्थिति आहे. मतभेदाचे वारे मधल्यामधेंच घोंघावत राहतात. ढग कांहीं कालानें नष्ट होऊन जातात. शेवटीं सूर्यप्रकाश मात्र पर्वताच्या शिखरावर दैदीप्यमान होऊन राहतो. राष्ट्रीय सभेच्या राजकारणांत ते अध्यक्षपदाजवळ जाऊन

मागें पडले हें कबूल केलें, तरी त्यांच्या अंगच्या गुणसमुच्चयाचें माहात्म्य कोण हिरावूं शकणार? त्यांचें तेज चमकल्याशिवाय राहणें शक्य नाहीं. असें आहे म्हणूनच सुभाषितकारानें विचारलें, विधाता रागावला तर हंसाचा कमलवनविलास तो नाहींसा करील; पण त्याच्या दुग्धजलभेदाविषयीं असलेल्या वैदग्यकीर्तीचा अपहार करण्यास कोण समर्थ होणार! या सर्व त्यांच्या अलौकिक गुणांचा प्रभाव हिंदी राजकारणांत पडो व त्यांचा उपयोग विद्यमान प्रक्षुब्ध वातावरण शांत करण्याकडे होवो, एवढेंच त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या शुभप्रसंगानें चिंतितों.

८

# श्री. मुकुंदराव जयकर

" He was a scholar, and a ripe and good one;
Exceeding wise, fair-spoken, and persuading;
Lofty and sour to them that loved him not,
But to those men that sought him sweet as summer. "

—*Shakespeare.*

आज नऊ वर्षें होऊन गेलीं. त्या वेळीं ना. हेवर्ड मुंबई सरकारचे गृहमंत्री होते. मुंबईच्या टाऊन-हॉलमध्यें कायदे-मंडळाची बैठक चालू होती. बाबासाहेब जयकर स्वराज्यपक्षाचे अध्वर्यू होते. ते व हेवर्डसाहेब समोरासमोर बसत. हेवर्डसाहेब बोलत असतां चुकून जयकरांना Leader of the Opposition असें म्हणण्याऐवजीं Leader of the House असें बोलून गेले. सर्व सभासद हंसले. चूक तेव्हांच लक्षांत आली. परंतु I am only anticipating असें म्हणून हेवर्डसाहेबांनीं वेळ मारून नेली. मागें तात्यासाहेब केळकरांचें नव्हतें कां असेंच झालें ? Consistency is the virtue of an ass असें विधान करण्याऐवजीं त्यांच्या तोंडून Consistency is the ass of a virtue असे शब्द निघून गेले. त्यांचेंही त्यांनीं समर्थन केलें. व तें बरोबर होतेंही. बाबासाहेबांची तेव्हांपासूनची आजतागायत कामगिरी पाहिली तर हेवर्डसाहेबांची ती भविष्यवाणी तर नव्हती ना, असा विचार मनास चटकन् बंदुकीच्या गोळी-सारखा चाटून जातो. नवीन राज्यघटनेंत जयकर, सप्रू वगैरे कोण होणार याचीं स्वप्नेंही कित्येकांना पडूं लागलीं असलीं तरी त्यांत वावगें असें नाहीं. योग्य माणूस योग्य स्थळीं बसावा, याहून अधिक

समाधानाची दुसरी कोणती गोष्ट असणार? सोन्याच्या अंगठींत हिरकणी असावी, चांदीच्या वाटींत केशराचें गंध असावें, फुलदाणींत गुलाबांचा गुच्छ असावा, आणि बाबासाहेबांसारखा सद्‌गृहस्थ राज्यघटनेंत उच्चासनावर कायदे-पंडित म्हणून, प्रधानमंत्री म्हणून, अध्यक्ष म्हणून किंवा परराष्ट्रांतील प्रतिनिधि म्हणून विराजमान व्हावा म्हणजे अगदीं औचित्य शिगेस आलें म्हटलें तरी चालेल.

त्यांच्यासारख्या सुखी, संपन्न, मानी, शांतिप्रिय, लाडांत वाढलेल्या, हळव्या व अत्यंत सुसंस्कृत विद्वानानें राजकारणाच्या मामल्यांत पडावें हेंच खरोखर कौतुक. बालपणीं व तरुण वयांत आईबापांनीं व आजोबांनीं चोज केलें तसें मोठेपणीं जनतेनें कोडकौतुक करावें इतकेंच. कोणाही मातबर व नेकीच्या माणसाकडून होईल तितकी कामगिरी जमेस धरणें हेंच श्रेयस्कर व कृतज्ञपणाचें द्योतक. जें त्याच्याकडून झालें नाहीं किंवा जें त्याच्याकरवीं व्हावें असा ईश्वरी संकेतच नव्हता त्याच्याबद्दल खेद करीत बसणें, मनाला हुरहूर लावून घेणें आणि त्या व्यक्तीला दूषण देणें समंजसपणाचें व व्यवहारीपणाचें लक्षण नव्हे. बाबासाहेब शूर आहेत, कृतविद्य आहेत; पण त्यांचें शौर्य व त्यांची विद्या शांततेच्या काळांतील युद्धांतच केवळ उपयोगी पडणारी. एवढें मात्र त्यांच्या शत्रूला देखील कबूल केलें पाहिजे कीं, या कामांत कुचराई म्हणून काडीमात्र व्हावयाची नाहीं. १९२४-२५ सालीं मुंबई कौन्सिलांत स्वराज्य पक्षाचे पुढारी म्हणून कर्तबगारी गाजविली ती निःसंशय स्तुतिपात्र होती. त्यांचे अंगीं अनेक आकर्षक गुण असल्याकारणानें स्वराज्य पक्षाच्या बाहेरील सभासद सुद्धां आपण होऊन त्यांना येऊन मिळावयाचे. पुढें अकोल्यास प्रतियोगी सहकारिता पक्ष स्थापन झाला तेव्हां तर त्याची मुंबईत, बंगाल्यांत, मद्रासकडे व महाराष्ट्रांत संघटना करण्याची त्यांनीं अविश्रांत मेहेनत घेतली. व ती कोठपासून, तर पक्षाचा

जाहीरनामा तयार करण्यापासून. लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून गेले. तेथें सर्वसामान्य राष्ट्रीय पक्षाचें नेतृत्व त्यांचेकडेच आलें. तिन्ही गोलमेज परिषदांतून त्यांनीं सर तेजबहादुर सप्रू यांच्या सहकार्यानें चांगलेंच भरीव कार्य केलें हें नाकबूल करतां येणार नाहीं. युनिव्हर्सिटीच्या मतदार-संघामार्फत निवडणुकीस उमेदवार उभे राहिले कीं दक्षिण कानडा जिल्ह्यापासून थरपारकरपर्यंत प्रवास करण्याचा कंटाळा करणार नाहींत. पत्राचीं उत्तरें नियमितपणें पाठविण्यास विसरणार नाहींत. तज्ज्ञ लघुलेखक बरोबर घेऊन, स्वतः-बरोबर पहिल्या वर्गाच्या डब्यांत त्याला बसवून, मुंबईपासून पुण्यापर्यंत त्यास आगगाडींत पत्रें सांगून स्टेशनवरूनच त्याला परत पाठवून, दुसऱ्या दिवशीं पहांटे पुण्याहून मुंबईस पोंचण्याच्या आंत काम तयार ठेवण्याची आज्ञा करण्यास मागेंपुढें पाहाणार नाहींत. पंढरपुरच्या देवळाच्या प्रमाणें रोजीं हजाराचे वर प्राप्ति असणारें एखादें अपील आलें तरी कदाचित् घेणार नाहींत. सप्रूंच्या बरोबर राष्ट्रीय सभा व सरकार यांच्यांत समेट घडवून आणण्याचें शांतिदूताचें काम अंगावर घेतलें म्हणजे स्वतःचा प्रत्यक्ष जांवई निवर्तला तरी, ठरल्याप्रमाणें रात्रींच्या गाडीनें मुंबई सोडून येरवड्याच्या तुरुंगांत महात्मा गांधींस भेटण्याचें दिरंगाईवर टाकणार नाहींत.

तसें पाहिलें तर या गर्भश्रीमंत, विलासी, अभिजात अभिरुचीच्या व बॅरिस्टरी देखील लहर लागेल तेवढीच करूं पाहणाऱ्या उमरावांना ही यातायात कशाला हवी होती ? पण लोणावळा परिषदेला अध्यक्ष म्हणून लोकमान्य टिळकांनीं त्यांना राजकारणांत ओढलें, तेव्हांपासून ते सतत त्या क्षेत्रांत आपल्या आवडीप्रमाणें काम करीत राहिलेच. नाहीं तर पूर्वी ठाकुरद्वार रस्त्यावरील किंवा आतां वुईंटर रोडवरील भव्य व सुंदर बंगल्यांत दिवाणखान्यांतून, भिंतीवर आपटणाऱ्या समुद्राच्या लाटांकडे बघत, कोचावरून खुर्चीवर व खुर्चीवरून

कोचावर बसत, चैनींत आयुष्य वेंचून टाकलें असतें तर त्यांना कांहीं कमी कां होतें? परंतु हौस, त्याला ते काय करणार! आपल्या मगदुराप्रमाणें कां होईना, पण राष्ट्रसेवा करावी ही इच्छा खरी. एरवीं, घरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजावयास ते जाते कशाला? समेटासाठीं दिल्ली, सिमला व पुणें या तीन शहरीं त्यांना किती किती वेळां जावें लागलें असेल? लोकांनीं लुडबुडे म्हणावें तरी यांनीं प्रयत्न थांबवूं नये असें चाललें होतें. बाबासाहेबांचा स्वार्थ-त्याग थोडाथोडका नाहीं. १९२०-२१ सालीं त्यांनीं एक वर्ष वकिली तहकूब केली, इतकेंच नव्हे तर खुद्द म. गांधींच्या शब्दाबर-हुकूम पंचवीस हजार रुपयांचा एकरकमी चेक एकाक्षणांत फाडून त्यांना दिला. अजून देखील वर्षअखेर कित्येक हजार रुपये निर-निराळ्या संस्थांना मदत म्हणून खर्ची पडलेले त्यांच्या जमाखर्चांत आढळतात.

बाबासाहेब नांवाचेच मुकुंद नाहींत. शिष्टाई व शांतिप्रधान कार्य या दोहोंची त्यांना मनापासून आवड व अशा प्रकारच्या कार्याला जे गुण असावे लागतात ते त्यांच्याजवळ भरपूर. एकनाथानें शिष्ट कसा असावा याचा खुलासा केला आहे. "शिष्ट नसावा महा भ्याड। शिष्टें न धरावी भीड। शिष्ट बोलका सुघड। निवडा प्रौढ निजबुद्धि॥ शिष्ट पाहिजे चपळ चतुर। देऊं जाणे प्रत्युत्तर। राहो-नियां धुरेसमोर। स्वामिकार्यसाधक॥" यांत वर्णिलेले सर्व गुण जयकरांच्या अंगीं थोड्याबहुत प्रमाणांत खात्रीनें वास करीत आहेत. त्यांच्याइतके परिपक्व बुद्धीचे मधुर वक्ते आज किती आहेत? इंग्लिश काय व मराठी काय, भाषा जशी कांहीं रसनाग्रनर्तकी. शब्दलालित्य इतकें ओतप्रोत भरलेलें कीं, त्यांच्या व्याख्यानाला वृद्धांनीं घर सोडून व तरुणांनीं खेळ टाकून जावें. विलायतेंत लॉर्ड सँकी यांनीं त्यांना 'बडा शांतिदूत' ही पदवी अर्पण केली व परवां

येथील भारतसेवक समाजांत पोलाक देखील म्हणाले कीं, गोलमेज परिषदेंत जयकरांच्या Melting persuasiveness नें जितकें काम झालें तितकें दुसऱ्या कशानेंही होणार नाहीं. प्रज्ञाप्रकर्ष असामान्य व वाङ्माधुर्य अमूप अशी जोडी जमली मग कशाची उणीव? व्याख्यानांत भावनावशता नाहीं, पण प्रवाहाचा प्रशांतपणा कांहीं अलौकिक असतो. पंडित मालवीयांच्या बेहद्द भाषणांत माधुर्याबरोबर भावनोद्दीपकता फार असते. जयकरांच्या मर्यादित भाषणांत शब्दसौष्ठव, व्यवस्थितपणा व विचारप्रगल्भता थोडी जास्त दिसते. प्रतिपक्षाला ते कधीं टाकून बोलत नाहींत; शिष्टाचार सोडीत नाहींत; मनांतून रागावतील, धुसफुसतील, आपल्या मित्रांजवळ क्रोध व्यक्त करतील; पण जाहीर रीतीनें त्याचा स्फोट कधीं करणार नाहींत.

त्यांचें मन फार सुसंस्कृत आहे व त्यांच्या एकंदर स्वभावांत एक प्रकारचा पद्यमय सुरेलपणा आहे. मतभेद झाला तरी गृहस्थाश्रमांतील आदरातिथ्यांत व उपचारांत किंचिदपि कमतरता त्यांचे हातून व्हावयाची नाहीं. स्वराज्य पक्षाचा व प्रतियोगी सहकारिता पक्षाचा कडाक्याचा वाद व्याख्यानांतून झाला. तथापि पंडित मोतीलाल नेहरू मुंबईस आले कीं उतरावयाचे बाबासाहेबांच्याच बंगल्यांत व त्यांच्या सन्मानार्थ बाबासाहेबांनीं देखील मुंबईतील कांहीं बड्या लोकांना निमंत्रण देऊन थाटाची मेजवानी द्यावयाची. तसेंच, आपल्या कट्टया विरोधकांच्या घरीं कां होईना, मंगल कार्य निघालें व निमंत्रणपत्रिका आली म्हणजे जयकर योग्य तो मानाचा अहेर पाठविण्यास कसूर करणार नाहींत. आणि त्यांच्याशीं जे गोडीनें व आपुलकीच्या नात्यानें वागतील त्यांना तर त्यांचा सुहृद्भाव हिंवाळ्यांतील उन्हाप्रमाणें सुखकर व आल्हाददायक वाटतो. त्यांचें सगळेंच वागणें ऐटबाज व डौलदार असतें. खाजगी संभाषण असो किंवा

जाहीर भाषण असो, त्यांत आत्मप्रौढीचा मसाला पुष्कळ पेरलेला असावयाचा. त्यांत विनय नसतो असें नाहीं; पण तो विनय म्हणजे अभिमानाची शालजोडी पांघरणारा असावयाचा. 'आतांच मजकडे सुमारें एक डझन राष्ट्रीय सभेचे वजनदार गृहस्थ येऊन गेले व समेट घडवून आणा असें सांगून गेले;' 'माझ्या खिशांत अशा प्रतिष्ठित लोकांचीं पत्रें आहेत कीं, त्यांवरून मी म्हणतों हें सिद्ध होण्यासारखें आहे.' अशा स्वरूपाचे उद्गार वरचेवर निघावयाचेच. हा अभिमान सर्वस्वीं असमर्थनीय असतो असें म्हणणें निखालस चुकीचें होईल. तथापि ती एक कायमची ढब होऊन बसली आहे. भांडारकर रोडवरील राजाबहादुर गोविंदलाल शिवलाल यांच्या बंगल्यावर, अस्पृश्यांच्या पुणें करारावर शेवटच्या सह्या होण्याच्या अगदीं ऐन वेळीं जयकर जर म्हणाले कीं, "You see, Dr. Ambedkar gave us a lot of trouble. We have changed all that," तर तो एक विजयाचा उद्रेक मानावयास हरकत काय ?

बाबासाहेबांना गायनाचा उपजत नाद आहे. नामांकित संगीतशास्त्रज्ञ शिकविण्यास ठेवून ते शास्त्र शिकले आहेत व त्यांना सतार, दिलरुबा वगैरे वाद्यें वाजवितांहि येतात. दररोज दिवसभर कामधाम करून आल्यावर रात्रीं गायन झाल्याखेरीज निजावयाचें नाहीं असा त्यांचा आजही क्रम आहे. मुंबई कौन्सिलची बैठक चालू असतांना अण्णासाहेब भोपटकर, रामभाऊ सोमण, तात्यासाहेब जोशी, नानासाहेब सप्तर्षि इत्यादि सभासदांना आग्रहानें घरीं बोलवावयाचें, 'I generally devote three quarters of an hour to music every day,' असें त्यांना सांगावयाचें, एक-दीड वाजेपर्यंत त्यांना गाणें ऐकवावयाचें, सुंदर कपांत मधुरशी कॉफी त्यांना द्यावयाची, नंतर नाजुक लहान लहान बशांतून खारे बदाम-

पिस्ते पुढें करावयाचे, व मग त्यांना निरोप द्यावयाचा. या त्यांच्या गानप्रियतेमुळें त्यांच्या पोषाखांत, बोलण्याचालण्यांत, राहणींत विशेष मोहक रागदारी उत्पन्न झाल्यासारखी वाटते. कपड्यालत्त्यांत खाराखिरी फार. हरएक गोष्टींत आवडनिवड व चिकित्सा कांहीं विलक्षण. जिन्नस दिसण्यांत साधा, परंतु तलम, फिक्या रंगाचा, लज्जतदार असा असावा अशी जबर इच्छा. सर्व कांहीं नीटनेटकें, रेखीव असावें. त्यांत तसूभर इकडेतिकडे होतां कामा नये. शब्द वेंचक पाहिजेत. कोट, टोपी, धोतर परस्परांस शोभेशीं पाहिजेत. साहेबी पोषाख असला तर त्यांत जुळणी व सुसंगतपणा पाहिजे. शिवाजी मंदिरांत एकदां व्याख्यान होतें. वेळेपूर्वीं तात्यासाहेब केळकरांच्या घरींच ते बसले होते. निघतांना गळ्याभोंवतीं घ्यावयास कांहीं तरी पाहिजे होतें. तेव्हां तात्यासाहेबांनीं आपली शाल देऊं केली. "छे, छे, That looks a little too gaudy." म्हणून ते 'नको' म्हणाले व शुभ्रकांठी उपरणें गुंडाळून बाहेर पडले. घराच्या बाबतींत देखील अशीच रसिकता नजरेस येते. वुइंटर रोडवरील बंगला घेतला, त्यांत हजारों रुपये खर्चून पाहिजे तशी दुरुस्ती करून घेतली व बाबू सुभाषचंद्र बोसांसारखा पाहुणा आला म्हणजे त्याला समुद्राच्या बाजूच्या खिडक्या किती अंशांचा कोण करून उघडावयाच्या हें देखील सांगावयाचें, ऑक्सिडाइज्ड सिल्व्हरचीं विजेचीं बटनें दाखवावयाचीं, डायनिंग हॉलमधील ग्रीक चित्रांचा गूढ अर्थ फोडून स्पष्ट करावयाचा व भोजनाचीं नाना प्रकारचीं व आकारांचीं सुबक कलाकुसरीचीं चांदीचीं उपकरणें कोठून कशीं आणविलीं त्याचा इतिहास कथन करावयाचा.

तें कांहीं असलें तरी त्यांच्या सहवासाचा, बोलण्या-चालण्याचा व त्यांच्या खानदानी बडिवाराचा कंटाळा येत नाहीं. लहान मुलानें कांहीं केलें तरी त्याचें कौतुक वाटावें अगर कोंकरूं इकडून तिकडे

नाचलें-बागडलें तरी त्याच्या हालचाली आनंदमय वाटाव्या तसें बाबासाहेबांचें आहे. कोठेंही गेले तरी त्यांच्याभोंवतीं ते प्रेमळपणाचें वातावरण निर्माण करतात. कृष्णाची मुरली व त्यांची जिव्हा. बंगल्यांत बसलेले पाहिले कीं खूप रोषनाई व आरास केलेल्या गणेशोत्सवांतील गणपतीच्या एकाद्या बालमूर्तीचें स्मरण व्हावें; आणि चेहऱ्यावर तर अद्यापि कॉलेजांतील विद्यार्थिदशेची छटाही कायमच टिकून आहे म्हणावयाची. लॉर्ड रोजबरी यांच्यासंबंधानें एका इतिहासकारानें म्हटलें आहे कीं, तो पोक्तापुरवता केव्हां झालाच नाहीं. जयकरांची त्यांतलीच गत दिसते. अजूनही पोलो कॉलरचा शर्ट काय घालतील, शॉर्ट कोट काय घालतील, पायांत अल्लड तरुणांसारख्या चपला काय घालतील, जेवीत असतां वाढण्यासाठीं आईच्या अंगावर काय खेंकसतील, किंचित् बिघडलें म्हणजे मनांतल्या मनांत रुसून काय बसतील व लागलीच मुलाच्या वृत्तीप्रमाणें विसरून काय जातील !

बॅरिस्टर म्हणून अगदीं पाहिले नव्हे, पण पहिल्या रांगेंत ते बसूं शकतात. त्यांची वकिलीची पद्धत मात्र बॅरिस्टर जिनांच्या तंतोतंत उलट. जिना आपल्या ताठरपणानें व बेमुर्वतखोरपणानें जिंकतात, तर जयकर सौम्यपणानें यश संपादितात. त्यांची राजकारणांतील व समाजकारणांतील तरफदारीही मृदु स्वरूपाची असते. तथापि त्यांचें चातुर्य कमी पडतें असें मात्र नव्हे. सर्वपक्षीय परिषदेचे वेळीं कलकत्त्यास हिंदूंची बाजू उत्तम रीतीनें मांडून जिनांवर त्यांनीं मात केली ती हिंदु लोक कसे विसरतील ? तसेंच गांधी-आयर्विन समेट व पुणें करार हे दोन तर त्यांच्या कौशल्याचे विजयस्तंभच होत. सरकार दरबारीं वजन बऱ्यापैकीं व सुज्ञ जनतेंतही प्रगट किंवा अप्रगट आदराची भावना, अशी बाबासाहेबांची स्थिति फारशी स्पृहणीय नसली तरी त्यांस शोभादायक आहे हें मान्य केलें पाहिजे. अलीकडे दोन-तीन वर्षांत त्यांची कीर्ति भारतवर्षाच्या बाहेर गेली आहे.

कंठांत सरस्वती, हातांत लक्ष्मी व अंत:करणांत आपल्या समजुती-प्रमाणें स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्रसेवा करण्याची जागती इच्छा, असा योग जमून आल्यावर बाबासाहेबांना भाग्यवंत कां म्हणूं नये? ठीकच आहे, सुभाषितकारानें म्हटलें आहे—

वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचो वाचः ।
करणं परोपकरणं येषां केषां न ते वंद्याः ॥

असें असल्याकारणानें जयकरांचीं मतें कोणास न आवडलीं तरी, स्वत: ते आवडत नाहींतसे केव्हांच होणें शक्य नाहीं.

ग्रीक पुराणांत ज्याप्रमाणें कॅस्टर व पोलक्स यांची जोडी किंवा आपल्या इकडे ज्याप्रमाणें दोन अश्विनीकुमार त्याप्रमाणें अलीकडे सप्रू–जयकरांचें झालें आहे. कोणी लिहिलें आहे कीं, सप्रूंच्या सान्निध्यामुळें जयकरांच्या नांवाचा डंका वाजला! पण हें यथार्थ नाहीं. उभयतांच्या अंगच्या गुणांनीं व अंगीकृत कार्याच्या योगानें त्यांची सांधेजोड नमुनेदार जमली व टिकली इतकेंच. कोणीं कोणाला हिणकसपणा आणला असें नाहीं. उलट पक्षीं, आधीं सोन्याचें होतें तें जडावाचें झालें; मोत्याचे गोळीबंद दाणे तांबड्या फडक्यावर खुलून दिसावे त्याप्रमाणें झालें. आतां, या जोडीचें नवीन राज्यघटनेंत स्थान काय याविषयीं पुष्कळ कयास सुरू व्हावे हें स्वाभाविक आहे. बाबासाहेब प्रांतिक कायदे–मंडळांत राहणार कां मध्यवर्ति कायदेमंडळांत जाणार? कायदे-मंडळाचे अध्यक्ष होणार कां प्रधानमंत्री होणार? कां हायकोर्टाच्या न्यायाधीशाच्या जागेवर पाणी सोडलें त्याप्रमाणें कोणतीच अधिकाराची जागा न स्वीकारतां, दुरून खेळ बघत राहणार? पण राजकारणाचें व मानवी मनाचें कोणी झालें तरी काय सांगावें? एवढें फक्त अगदीं निश्चित कीं, ते कोठेंही असले तरी चॉसर कवीनें आपल्या सरदाराचें He was a very perfect gentle Knight" हें जें वर्णन केलें आहे तें त्यांना सदैव लागू होऊन राहील.

१

# प्रो. शिवराम महादेव परांजपे

"Now is the stately column broke,
The beacon-light is quenched in smoke,
The trumpet's silent sound is still,
The warder silent on the hill!"

—*Sir Walter Scott*

वाणी आणि लेखणी यांचा प्रभाव खरोखरच फार अजब आहे. जगाच्या इतिहासांत या दोन लहानशा साधनांनीं जबरदस्त व क्रांतिकारक गोष्टी घडविल्या गेल्या आहेत. लेखणी म्हणजे एवढीशी नार, पण तिचें सामर्थ्य पाहावें तर असें आश्चर्यकारक कीं 'तरवारीहूनही ती बलवत्तर' अशी इंग्लिश भाषेंत म्हणच होऊन बसलेली! वाणीची शक्ति देखील अपरमित म्हणून तर 'वाग्भूषण हेंच खरें भूषण' असें म्हटलें जातें; व शारदेचें वर्णन जसें 'वीणा-पुस्तक-धारिणी' या विशेषणानें आपल्या संस्कृत वाङ्मयांत केलें आहे, तसेंच 'पाशांकुशधरा' या पराक्रमदर्शक पदवीनेंही केलेलें आहे. सिसिरोच्या वक्तृत्वाचा नाद रोमच्या आसपासच्या गिरिकुहरांत चिरकाल घुमत राहणार हें निःसंशय. डिमॉस्थेनीसनें आपल्या वाणीच्या जोरानें स्वदेशाच्या इतिहासांत मोठीच उलटापालट करून टाकली. मॅझिनीच्या लेखणींतून निघणाऱ्या ज्वालांनींच इटलीच्या पारतंत्र्याची राखरांगोळी झाली. रूसो–व्हॉल्टेअरप्रभृति पराक्रमी लेखकांनीं आपल्या पत्रकांच्या व ग्रंथांच्या साहाय्यानें जी प्रचंड विचारक्रांति केली तिच्या कक्षेंत सर्व जग सांपडलें गेलें. या लेखणी-बहाद्दरांच्या व वाग्वीरांच्या जवांमर्दीचें निरीक्षण केलें म्हणजे त्यांची

उपकरणें व क्रियासिद्धि यांमधील विलक्षण विसंगतीनें व अप्रमाण-बद्धतेनें मन क्षणभर गुंग होऊन जातें. लेखणी ती केवढी व जिव्हा ती केवढी ? पण संस्कृत सुभाषितांत मदनाच्या व सूर्याच्या सामग्रीचें आणि त्यांच्या लोकप्रसिद्ध कृतींचें असें विरोधात्मक वर्णन केलें आहे. त्याच प्रकारचें वरील दोन प्रकारच्या शस्त्रधाऱ्यांचेंही केलें पाहिजे. मदन स्वतः अनंग, त्याचें धनुष्य नाजुक फुलांचें, दोरी भुंग्यांची; तथापि साऱ्या जगाला तो व्याकुळ करणारा. सूर्याचेंही असेंच. रथाला चाक एक, घोड्यांचे लगाम म्हणजे सुळसुळीत साप, रस्ता आकाशांत आणि सारथि लंगडा; परंतु त्याचा दररोजचा जगज्जीवन-दायी प्रवास मात्र अखंड चालू. तें कसेंही असलें तरी, ज्यांना परमेश्वरानें हीं द्विविध हत्यारें देऊन निर्माण केलें व ज्यांनीं त्यांचा लोककल्याणाकरितां उपयोग केला ते दैववान् हें खरेंच. परंतु कै. शिवरामपंतांप्रमाणें ज्या सव्यसाची पुरुषांनीं आपली वीर्यशाली लेखणी आणि तेजोमयी व चैतन्यघन वाणी सतत दोन-अडीच तपें मायभूमीच्या स्वातंत्र्य–संपादनाकरितां झिजविली ते तर सुतरां धन्य व कृतार्थ होत.

अर्थात् परकी राज्याखालीं ही गोष्ट करणें हें कांहीं सोपें व बिन-कष्टाचें काम होतें असें नव्हे. उलट तें सुळावरच्या पोळीसारखें होतें. आणि अण्णासाहेबांना १९०८ मध्यें पकडल्यानंतर लो. टिळकांना गिरफदार करण्यापूर्वीं उभयतांची गांठ पडली तेव्हां टिळकांनीं त्यांना कानमंत्र सांगितला तो देखील हा कीं, 'हें पहा शिवरामपंत, तुम्ही तर सरकारी तोहमतींत आहांच, आम्हीही तुमच्या पाठोपाठ येतोंच. हें सतीचें वाण आहे एवढेंच लक्षांत ठेवा.' राष्ट्रस्वातंत्र्यासाठीं आंदोलन करतांना ज्या सरकारी आपत्ति व हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्या शिवरामपंतांनीं मोठ्या आनंदानें सोसल्या. किंबहुना, बालपणींपासून त्यांच्या बाह्य वागणुकीवरून

कल्पना न येण्यासारखा सोशिकपणा त्यांच्या अंगीं वसत होता म्हटलें तरी चालेल. महाडास अगस्त्याच्या झाडावरून फुलें काढतांना खालीं पडून, शरीराची एक बाजूच्या बाजू सबंध चांगलीच दुखावली असतां ज्या 'बाळक्या' नें नेसलेल्या धोतराचा सोगा पांघरून घेऊन जखम घरच्या माणसांपासून चोरून ठेवली, त्यानेंच पुढें दोनदां तुरुंगवासांतील भोगास सादर व्हावें हें स्वाभाविक वाटतें. अशी सहनशीलता बाणलेली होती म्हणून गतवर्षी नेहेरू रिपोर्टाच्या सर्वपक्षीय दौऱ्यांत जळगांवीं पायास ठेंच लागली तिचें मधुमेहानें वाढलेलें दुखणें त्यांनीं सहा महिने शांत चित्तानें काढलें; कपाळावर पोफळाहून मोठें एवढें गळूं त्यानंतर झालें तें वहात असतां-असतां बेळगांवच्या साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षाचें भाषण तयार केलें; फार कशाला, कानामागें प्राणांतक पुटकुळी उठली, ती वाढूं लागली, अत्यंत ठणका लागला तरी शिवरामपंतांचें रूसोच्या 'सोशल कॉंट्रॅक्ट' चें मराठी भाषांतरही चाललेलें व नाटकाच्या प्रवेश-लेखनाचें कार्यही तहकूब नाहीं अशी स्थिति !

पण एवढी सहिष्णुता अण्णासाहेबांच्या एकंदर राहणीशीं विजोड अशी दिसते. लहान वयापासून ते रसिक, रंगेल व गुलहौशी अशा वृत्तींत वाढलेले. यांचे पूर्वज पेशव्यांचे पदरीं होते. ती पेशवाई जणुं काय यांच्या अंगीं पक्की मुरलेली ! मॅट्रिकच्या परीक्षेंत पहिल्या वर्षी नापास झाले तेव्हां त्राग्यानें रेशमी धोतरें कांहीं दिवस टाकलीं व अंगावरचीं सोनें-मोतीं बाजूस ठेवलीं तितकींच. बाकी १९२१ सालापर्यंत अण्णासाहेब म्हणजे नेहमीं दरबारी थाटाच्या पोषाखांत असावयाचे. व्याख्यानाला जावयाचें म्हणजे उन्हाळा असेल तर, चॉसरनें यतीचें वर्णन केल्याप्रमाणें 'कांचेसारख्या तुळतुळीत डोक्यावर' मोतिया रंगाचें पागोटें, भालपट्टावर रुंद नामानें लावलेलें उभें केशरी गंध, एका कानांत झळकणारी टपोऱ्या मोत्यांची भिकबाळी, दुसऱ्या

कानांत अत्तराचा फाया, अंगांत पांढरा स्वच्छ पेशवाई अंगरखा, उजव्या बाजूच्या कांखेजवळ चकाकणारा जरीच्या जाकिटाचा भाग, अंगावर गोखले पद्धतीप्रमाणें गळ्याभोंवताल्न नव्हे व टिळक पद्धतीप्रमाणें बाहुवट्यावरूनही नव्हे, असें स्वतंत्र पद्धतीप्रमाणें कांखेखालून घेऊन त्याच बाजूनें खांद्यावरून पाठीवर सोडलेलें दर्शनी वीतभर करवती कांठ असलेलें उपरणें, नेसलेलें शुभ्रकांठी धोतर, पायांत लाल पुणेरी जोडा व हातांत छत्री किंवा काठीच्या ऐवजीं एखादें सुवासिक फूल किंवा गजरा, अशा ऐटबाज तऱ्हेनें यांची स्वारी निघावयाची व रस्त्याच्या बाजूनें ताठ पण मंदमंद पावलें टाकीत गंभीर मुद्रेनें जावयाची. सभा संपून घरीं येतांच वडीलधाऱ्या बायका-मंडळीकडून यांची दृष्टही काढली जावयाची. महात्मा गांधींनीं त्यांचा पेहेरावाचा दिमाख हिरावून घेतला; पण त्यांचें उपजत रसवैदग्ध्य कोण नष्ट करूं शकणार ?

जो पोषाखांत रासिकपणा, रुबाबदारपणा व ऐषआराम तोच त्यांच्या इतर सर्व बारीकसारीक बाबतींतील वागण्यांतही दिसून येतो. नुसता चहा प्यायचा तरी तो देखील, प्रसन्न चेहरा करून तो कढत कढत डोळ्याला लावावयाचा व मग त्याची थोडी महती गायल्यासारखें करून धीरोदात्तपणानें चाखत चाखत घोटघोट ओष्ट–प्रदेशाच्या खालीं विनिर्मुक्त व्हावयाचा. अशा प्रकारचा त्यांचा कांटेकोरपणा व सरसत्व हे गुण केवळ स्वतःपुरतेच नसून, त्यांजकडे कोणत्या तरी प्रसंगानें चार लोक जमले तरी त्यांच्या व्यवस्थेंतही नजरेस पडत. राष्ट्रीय क्लब करण्याची अण्णासाहेबांची पाळी आली म्हणजे कांहीं विचारूं नये. त्यांच्या घरचा क्लब म्हटला म्हणजे टापटीप, श्रीमंती थाटमाट, षड्रसपूर्ण पदार्थ हें पाहून आपण एखाद्या सरदाराच्या तर मेजवानीला नाहीं ना आलों, असें कित्येकांना वाटावें! १९२८ च्या महाराष्ट्रप्रांतिक परिषदेचे अण्णासाहेब

स्वागताध्यक्ष होते. त्यांनीं अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांच्या सन्मानार्थ केलेली ' ॲट होम ' किती नमुनेदार होती तें ती समक्ष पाहाणारा-सच माहीत. कोणी एखादा सामान्य मनुष्य देखील त्यांचेकडे प्रसंगोपात्त कामाकरितां गेला तरी त्याचीही योग्यतेप्रमाणें बरदास्त राहावयाची. स्वतः किती घाईगर्दीत असले तरी त्याचें म्हणणें अगदीं स्तब्ध अंतःकरणानें ऐकून घ्यावयाचें व जरी ते त्याच्याशीं मोकळ्या मनानें बोलले नाहींत तरी, येणारा गृहस्थ त्यांच्या नितांत-मधुर वाणीनें संतुष्ट होऊन आपली फत्ते झाली असें समजून माघारीं जावयाचा व तेही दारापर्यंत त्याला ' बरें, ठीक आहे; या, या बरें ' असें म्हणण्यासाठीं पोंचविण्यास जावयाचे. ' वाङ्माधुर्यान्नान्यदस्ति प्रियत्वं ' म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. त्यांना शर्कराखंडखाद्य जें जिवाइतकें प्यार होतें त्याचा सर्व रस त्यांच्या जिभेंतच संचित होऊन राहत असे कीं काय न कळे! टिळकसुद्धां एखादे प्रसंगीं एक घाव दोन तुकडे करणारा प्रश्न समोरच्या मनुष्याला विचारीत. तात्यासाहेब केळकरांची मिठ्ठास भाषणाबद्दल प्रसिद्धि, पण तेही क्वचित् भेटीस येणाराला तुटक बोलून परत लावतील. दुसऱ्याशीं वागण्याची खाडीलकरांची पद्धत तर बरीच तापटपणाची व माणुस-घाणेपणाची; पण शिवरामपंतांची रसना ही जशी कांहीं माधुर्यनिर्झ-रिणी व तीही सतत वाहणारी.

असलें धाराप्रवाही प्रियंवादित्व असल्यावर ते जेथें जातील तेथें हवेसे वाटावे यांत नवल काय? अप्पाबळवंताच्या चौकांत शास्त्री-बोवांच्या दवाखान्यांत रोज सायंकाळीं टिळकांच्या राष्ट्रीय पक्षाची मंडळी गप्पा मारण्याकारितां जमत. तेथें अण्णासाहेब आपल्या संव-गड्यांच्या मध्यें श्रीकृष्ण बसावा त्याप्रमाणें बसत; आणि तेथें नेहमींची कृष्णाजीपंत खाडिलकर, वामनराव पोतदार, महाराज चिंचाळकर वगैरे मित्रमंडळी जमली म्हणजे यांचें संभाषण सुरू व्हावयाचें.

मधुर वाणीला विद्वत्तापूर्ण विनोदाची जोड व बरोबरीचीं गप्पा मारणारीं माणसें. मग काय विचारावें ? तेथें एकेकाची कोटीवर कोटी चढावयाची, अकलेचे तारे तुटावयाचे, विनोदाचीं कारंजीं उडावयाचीं. हा प्रकार पाहणारास व ऐकणारास भोजप्रबंधांतील संध्यासमयींच्या कल्पनाशक्तीच्या व प्रतिभायुक्त विनोदाच्या शर्यतीची आठवण व्हावी. एके वेळीं भोज राजा सूर्यास्ताची शोभा पहात बसला असतां म्हणाला, "सूर्य समुद्रांत बुडत आहे." बाण उद्गारला, "छे: ! कमलाच्या अंतर्भागांत मधुलोलुप भ्रमर अडकून पडत आहे." महेश्वरांची कल्पना निराळ्याच दिशेनें धांवली व ते म्हणाले, "तसें नव्हे, बागेंतील वृक्षाच्या पोकळींत पक्षी आसरा घेत आहे." आणि शेवटीं कविकुलगुरु कालिदास पुढें सरसावले; "तुम्ही सारेजण चूक आहां; तरुण स्त्रियांच्या शरिरांत रतिकांत हळुहळु प्रवेश करीत आहे." डॉक्टर जॉनसन यांचा जसा एक क्लब इंग्लंडच्या वाङ्मयेतिहासांत महशूर आहे, किंवा १८–१९ व्या शतकांत संपन्न विद्याविलासी गृहिणी फ्रान्समध्यें ज्याप्रमाणें आपापल्या घरीं लोकधुरीणांचीं व इतर प्रसिद्ध व्यक्तींचीं संमेलनें भरवीत, त्या तऱ्हेची शोभा व महत्त्व शिवरामपंत येऊन बसत तेव्हां या राष्ट्रीय क्लबाला होती म्हटलें तरी अतिशयोक्ति नाहीं. अर्थात् एकदां गप्पांना सुरवात झाली म्हणजे त्यांना कांहीं निर्बंध नाहीं. गांवकुटाळकीपासून तों राजकारणांतील अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांचा परामर्ष त्या स्थळीं फार मौजेनें व मुक्तकंठानें घेतला जावयाचा. जी या राष्ट्रीय क्लबाची स्थिति तीच शिवरामपंत बुधवार चौकांत शेठ रामदास गोवर्धनदास यांच्या कापड दुकानीं दररोज नियमितपणें जात तेथील. विशेषत: गुजराथी व्यापारी मंडळी त्या ठिकाणीं आकृष्ट केली जात आणि तेथेंही मनमुराद चकाट्यांचा अड्डा पडे व परस्पर स्नेहसंवर्धनाचा आनंद लुटला जाई. धार्मिक दृष्ट्या मनानें

सर्वस्वीं व आचरणानें थोडेबहुत जुन्या जमान्यांतील असले तरी, मुसलमानांच्याविषयींही राजकारणासाठीं कां होईना त्यांची एक प्रकारची आपुलकीची भावना असे. ती इतकी कीं, मित्राच्या मोहबतीखातर ते मुद्दाम निझाम हैद्राबादेकडे अहमदभाई तांबोळींच्या मुलाच्या शादीकरितां कांहीं दिवसांपूर्वीं गेले होते. मात्र हा प्रेमळपणा त्यांच्या अंगीं बऱ्याच लहान वयापासून असला पाहिजे. पूर्वीं महाडच्या मुसलमान-मोहल्ल्याला उन्हाळ्यांत दोन प्रहरीं आग लागली होती तेव्हां त्यांनीं आपल्या घरचीं गडीमाणसें पाठविलीं, आपण स्वतः गेले व आग विझविण्यास अतोनात मेहनत घेतली. इतक्यावरच ते थांबले नाहींत. घरीं अन्न शिजवून एक वेळ दुःखग्रस्त मुसलमान मुलांबाळांना व बायाबापड्यांना खाऊं घातलें, सरकारकडे मदतीचा अर्ज त्यांना इंग्रजींत स्वतः लिहून दिला व त्याच वेळीं अकस्मात् गव्हर्नरसाहेबांची स्वारी महाड रस्त्यानें जावयाची होती तेव्हां त्यांची मोटार थांबवून त्यांस समक्ष तो अर्ज देण्याविषयींचा समयसूचकपणा व मुत्सद्देगिरीचा सल्ला त्यांनींच दिला.

मूळ स्वभाव अत्यंत प्रेमळ. बिनसंबंधी लोकांशीं वागणूक इतकी आपलेपणाची तर खुद्द नातेवाईकांशीं किती तरी पटीनें अधिक प्रेमाची असणें क्रमप्राप्त ठरतें. आपलीं मुलें, नातवंडें, सुना, भाचे यांची त्यांना अतिशय काळजी वाटावयाची. ठीकच आहे. 'अतिस्नेहः पापशंकी' असें म्हटलेंच आहे. महाडच्या आपल्या घराविषयीं व वास्तूविषयींही त्यांना निरतिशय प्रेम व अभिमान वाटे. साधारण समजूं-उमजूं लागल्यापासून 'ब' शीं (आजीशीं) व 'बाती' शीं (पार्वती, आईशीं) गप्पा मारण्यांत व त्यांना रात्रीं पोथ्या वगैरे वाचून दाखविण्यांत गडी कसा दंग असे. तिकडील सर्व मिळकतीवरील हक्क त्यांनीं सोडला, तथापि स्वतःच्या जन्मस्थानाची मूळ घरची जुनी ओंवरी आपल्याकडे ठेविली. अलीकडे सतत आजारीपणामुळें अंमळ

जिकिरीला आल्यासारखें झाले होते तेव्हां कित्येकवेळां धाकटी बहीण जवळ असतां "मी कनी, वेणे, बरा झालों म्हणजे आपण महाडला जाऊन राहूं" असे करुणास्पद व गाहिंवराचे उद्गार त्यांच्या खिन्न मुखांतून बाहेर येत. आणि खरोखरच त्या प्रसंगींच्या त्यांच्या चेहऱ्यावरील विकारांवरून त्यांच्या अंतःकरणांत गोल्डस्मिथ कवीच्या

As an hare whom hounds and horns pursue,
Pants to the place from whence at first he flew,
I still had hopes, my long vexations past,
Here to return--and die at home at last.

या ओळी उचंबळत आहेत कीं काय असा संशय आल्यास तो त्यांच्या अभिजात उपस्थितीचा व वात्सल्याचा गौरवच होय. खऱ्या गृहस्थाश्रमी मनुष्यानें कुटुंबाची चिंता वहावी व योगक्षेम चालवावा तसा ते अप्रतिम वळणदारपणानें व कसोशीनें चालवीत. मन तर लोण्यासारखें मऊ. थोरले चिरंजीव नुकतेच विलायतेस गेले असतां त्यांस थोडा ज्वर येत असल्याचें कळतांच, बॅरिस्टरीच्या परीक्षेची वाट न पाहतां ताबडतोब परत बोलावलें. सार्वजनिक कार्यांतही पक्षाभिनिवेशामुळें इरेस पडून किंवा इरेस घातलें असतां त्यांच्या हातून कठोर कृत्यें घडलीं नाहींत असें नाहीं. तथापि आंतल्या मनाचा गाभा फार मृदु यांत शंका नाहीं. टिळकांच्या धाकट्या मुलाची प्रेतयात्रा चालली असतां टिळकांच्या केसरी-मराठा संस्थेच्या ट्रस्टीविषयीं कांहीं असभ्यपणाचें व गालिप्रचुर ओरडणें त्यांच्या कानीं पडतांच त्यांच्या डोळ्यांतून खळकन् आंसवें गळलीं !

स्वजनांविषयीं, स्वगृहाविषयीं व स्वग्रामाविषयीं अण्णासाहेबांना जी उच्च प्रकारची तीव्र निस्सीम भक्ति वाटे तीच शतगुणित रीतीनें स्वदेशाविषयीं वाटत असे. त्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं त्यांनीं आपल्या सर्व शक्ति वेंचल्या, आपला देह कष्टविला. हें त्यांनीं सर्व कौतुका-

स्पद निरलसतेनें केलें. अभ्यासाचा जसा हव्यास तसाच देश-कार्यार्थ लेख लिहिण्याचा व व्याख्यानें देण्याचा. विष्णुशास्त्री चिपळुणकरांनीं आपल्या प्रोद्दीपक लिखाणानें स्वदेशाभिमान जागृत केला. शिवरामपंत परांजपे यांनीं आपल्या परंतप लेखणीनें व वाणीनें तो देशाभिमान राष्ट्रीय स्वातंत्र्याकडे वळविला. राष्ट्रीय सभेनें मद्रास येथें दोनच वर्षांपूर्वी आपलें ध्येय स्वातंत्र्य हें जाहीर केलें. अण्णा-साहेबांनीं आपल्या आश्चर्योत्पादक लेखन-भाषणांनीं, प्रवचन-पुराणांनीं स्वातंत्र्याच्या ध्येयाची घोषणा १८९५ सालापासून अव्याहत चालविली होती. आणि तीसुद्धां अशा लोकोत्तर पद्धतीनें कीं, सर्वांनीं त्या पद्धतीच्या प्रभावशालित्वानें स्तंभित होऊन तोंडांत बोटें घालावीं. ' निबंधमाला ' कार चिपळुणकरांनीं स्फूर्तिदायक व देशा-भिमानानें दरवळणाऱ्या लेखरूपी फुलांच्या माला पक्क्या मजबूत दोऱ्यांत गुंफल्या खऱ्या. ' केसरी ' कर्त्या टिळकांची गर्जना अजून महाराष्ट्रांत व इतरत्र दुमदुमून राहिली आहे. व ती ऐकून परपक्षाच्या छातींत धडकी भरत असे हें सर्वथैव खरें. जसे कांहीं ' ज्युलियस सीझर ' नाटकांतील " I am a plain blunt man, I speak rightly on " हे शब्द त्यांनींच भाषणापूर्वी उच्चारावे. परंतु ' काळ ' कर्त्या परांजप्यांची लिहिण्या–बोलण्याची प्रथाच आजिबात वेगळी. त्यांचा प्रज्ञोन्मेष, त्यांचा अलंकारशास्त्राचा सर्वांगीण व दीर्घ-कालीन व्यासंग, त्यांचा जातिवंत उपरोधिकपणा व प्रखर विनोद, त्यांचें वक्रोक्तिशौंडत्व, त्यांची व्यंग्योक्तिनिपुणता इत्यादि सर्व गुण त्यांच्या लेखनांत व भाषणांत त्यांच्या जळजळीत देशाभिमानाच्या भट्टींतून रसरूपानें उतरावयाचे.

मौज अशी कीं, प्रायः सर्व महत्त्वाच्या लेखांचा व व्याख्यानांचा उपसंहार राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या कल्पनेंत व्हावयाचा. ' सागरं वर्ज-यित्वा कुत्र वा महानद्यवतरति ' या न्यायानें परतंत्र राष्ट्रांतील सर्व

गोष्टींचा शेवट स्वातंत्र्यलालसेंत व्हावा हें नैसर्गिक व यथायोग्य नव्हे तर काय? 'पिकांची पाहणी' केली तरी तेंच. 'दगडी कोळसा' उगाळला तरी तेंच. 'भाऊसाहेबांच्या घणां' तून निनाद निघावयाचा तोच. 'आम्रवृक्षा' ला फळ यावयाचें तेंच. 'कान-पूरच्या विहिरींत' बुडी मारली तरी हातीं लागायचें तेंच. 'पशूंच्या साम्राज्यां' त प्रवेश केला तरी तेंच. 'ऐतिहासिक पदार्थसंग्रहा-लयांत' शिरलें तरी तेंच. 'सोमयज्ञ' केला तरी तेंच. 'झोपेंतील देखावा' पाहिला तरी तेंच. 'तेहि नो दिवसा गता:' यावर व्याख्यान दिलें तरी तेंच. 'असंतोष: श्रियो मूलम्' यावर प्रवचन केलें तरी तेंच. 'जगीं थोरला देव तो चोरिलासे' यावर पुराण-कथन केलें तरी तेंच. काउपरच्या कवितेंत करवताच्या व इतर हत्यारांच्या आवाजाशिवाय स्वप्नाप्रमाणें गुपचुप उभ्या राहिलेल्या इमारतीचें वर्णन आहे व कोलरिजनें कुबलाखानाचाही एक जादूचा रमणीय व नाजूक तरता बंगला चित्रित केलेला आहे. त्याप्रमाणें शिवराम-पंतांच्या लेखांतून व भाषणांतून स्वातंत्र्याची दुर्दम्य आकांक्षा वाचकां-च्या व श्रोत्यांच्या मन:प्रांगणांत क्षीरसागरांत न्हालेली, इंद्रधनुष्या-च्या रंगांत नटलेली व नंदनवनांतील पुष्पांनीं सुगंधित झालेली अशी सुप्रतिष्ठित होऊन बसावी. शिवरामपंतांच्या लेखणीनें राम म्हटलें व त्यांच्या वाणीनें कायमची रजा घेतली. पण त्यांच्या लेखां-तील व भाषणांतील स्वातंत्र्याच्या भावनेचें अनुरणन चाललेंच आहे; शेलेनें म्हटलें नाहीं का!—

"Music when soft voices die,
Vibrates in the memory;
Odours, when sweet violets sicken,
Live within the sense they quicken."

हीच त्यांची लेखनशैली व भाषाशैली शत्रुपक्षाला व त्याच्याशीं

प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संगनमत करणाऱ्या स्वजनांतीलच त्यांच्या विरोधकांना अत्यंत विलक्षण रीतीनें बोंचणारी वाटे. लेखांत व भाषणांत परपक्षाचें म्हणणें वगैरे साधकबाधक प्रमाणें देऊन केव्हांही खोडलेलें नसावयाचें. पण तीव्र उपहासाच्या तीक्ष्ण व विषारी बाणांचा असा वर्षाव करावयाचा कीं सामनेवाले बिचारे विवश व विकल होऊन जावेत. या उपहासाचें अमोघ अस्त्र जेथें 'सूर्या' वर देखील सुटावयाचें तेथें टिळकांचा झाला तरी काय पाड ? चिरोल केस जारी असतांना एक खासगी सभा कांहीं कारणानें भरली. दिवस शुक्रवारचा होता. टिळकांना येण्यास किंचित् वेळ लागला. गमतीखातर खरें; पण शिवरामपंत म्हटल्याशिवाय राहिले नाहींत, 'काय हो, विलायतचें टपाल पोष्टांत शुक्रवारींच घेतात, अगोदर घेत नाहींत, नाहीं !' याचा अर्थ त्यांना टिळकांविषयीं आदर कमी होता असा नव्हे. टिळकांना ते गुरुस्थानींच मानीत व नाशीकच्या स्वतःच्या मानपत्र-समर्पणाचे प्रसंगीं त्यांनीं आपल्याला घालण्यास आणलेला हार गुरु म्हणून अगोदर टिळकांच्या तसबिरीला घातला. तरी पण टिळकांच्या राजकारणाशीं ते समरस असे केव्हांच झाले नाहींत. टिळकांनीं कांहीं धोरण मुक्रर ठरविण्याकरितां गायकवाड वाड्यांत बोलावलें म्हणजे आपली स्नेही मंडळी घेऊन जावयाचें; पण इकडे चर्चा जोरांत चालली असली तरी चकार शब्द तोंडावाटे बाहेर पडूं न देण्याची खबरदारी घेऊन ते एका कोपऱ्यांत जसे कांहीं ध्यानस्थ बसावयाचे. आलेल्या व वादविवादांत भाग घेणाऱ्या गृहस्थांना त्यांच्या मुकेपणाचा चमत्कार वाटावयाचा. फिलीप स्नोडनसाहेब अबकारी खात्यांत पूर्वी नोकर असतां एका बाईनें त्यांच्यावर गैरशिस्त वागणुकीचा आळ घेतला. ते म्हणाले, 'मी तुमच्यासमोर ब्रही उच्चारला नाहीं.' बाई म्हणाल्या, 'That was the worst of it. You looked it !' खाजगी

राजकीय वादप्रसंगीं शिवरामपंतांविषयीं त्यांच्या बरोबरीच्या लोकांना असेंच वाटावें.

एखाद्या राजकीय अगर सामाजिक प्रश्नाचा उपन्यास करावा, उलट-सुलट मुद्दे पुढें मांडावे, त्यांचा निष्कर्ष काढावा, या कार्याला लागणारी जी एक विशिष्ट प्रकारची बुद्धि लागते ती जन्मादारभ्य त्यांना नव्हतीच. व्याख्यानाचेंही असेंच. एखाद्या ठरावावर पांच-दहा मिनिटें बोलावयाचें यांना सहसा जमावयाचें नाहीं. रणदुंदुभि ऐकून समरभूमीवर विजय पावणारा लष्करी घोडा कोणीकडे आणि मिरवणुकीचा प्रसंग साजरा करण्यासाठीं नटणारा-नाचणारा घुंगुर-वाळेवाला कोतवाल घोडा कोणीकडे ! नगाधिराजाच्या उत्तुंग शिखरावर मानससरोवरांत ज्यानें आयुष्य घालविलें, त्या मरालकुल-नायकानें पल्वलजलामध्यें कीं हो दिवस काढण्यास कसें समर्थ व्हावें ? असें होतें तर जगन्नाथाच्या अन्योक्तींत कांहींच स्वारस्य राहतें ना. व्याख्यानाला त्यांना एकट्याला भरपूर वेळ असला म्हणजे मग त्यांच्या पांडित्याचा प्रकर्ष आणि वक्तृत्वाचा ओघ पाहून घ्यावा व श्रोत्यांनीं माना डोलवाव्या. बोलण्याला विषय कांहीं असो वा नसो. कारणावांचून कार्य होत नाहीं हा अर्थ दाखविणारी 'Making bricks without straw' अशी म्हण आहे. पण अण्णासाहेबांचें वैशिष्ट्य असें कीं, द्रव्यसामग्रीशिवाय विटाच काय, मोहक अशा ताजमहालास शोभण्यासारख्या जमिनीवर बसविण्याच्या बारकि चौकोनी रंगदार चिरेबंदी फरशा ते बनवीत. प्रख्यात विनोदी लेखक मोलिअर म्हणतो, खरा चतुर स्वयंपाकी तोच कीं, जो मालमसाल्या-शिवाय पंचपक्वान्नाचें सुग्रास भोजन तयार करूं शकतो. उत्कृष्ट साहित्य सज्ज असल्यावर कोणीही सामान्य बल्लव नाहीं कां पंगत खुष करणार व पानें शोभाविणार ? अण्णासाहेबांचें असें अलौकिक कौशल्य, म्हणून तर १९०७-८ सालच्या शिवाजी-उत्सवांतील

त्यांच्या व्याख्यानांना लोक सहस्रशः एकत्रित व्हावयाचे. मुलांची खेळण्याची अगदीं लहान अशी कागदाची जपानी टिकली मिळते. ती पाण्यांत सोडली म्हणजे तिचा एकेक पदर आपोआप उलगडतां उलगडतां, एकांतून एक अशा नवीन आकृति जलपृष्ठावर तरंगूं लागतात आणि आपल्या फुललेल्या सजावटीनें प्रेक्षकांचें मन आकर्षून घेतात. अण्णासाहेबांच्या व्याख्यानाचा विस्तार म्हणजे असा व्हावयाचा. शोभेच्या दारूचें झाड लावलें म्हणजे परस्परसंभूत ठिणग्या लागून त्यांतून स्फुलिंगमय फिरत्या, उडत्या, बोलत्या विविध व मनोज्ञ अशा अलंकारित घटना निर्माण व्हाव्या, त्याप्रमाणें शिवरामपंतांच्या व्याख्यानसमयीं बहुशः व्हावयाचें. गुदस्तां सायमन कमिशन नेमलें गेलें त्याच सुमारास वर्तमानपत्रांत त्यांनीं 'रॉयल कमिशन फॉर ब्रीडिंग हॉर्सेस अँड म्यूल्स' नेमलें गेल्याचेंही वाचलें. मग काय ? यांच्या व्याख्यानाला भरपूर अन्नदान लाभलें व या दोन्ही कमिशनांमधील काल्पनिक साम्य त्यांनीं आपल्या वक्रोक्तीच्या पाणीदार हत्यारांनी उकलून दाखविलें. तसेंच त्याचवेळीं गौरींचे दिवस होते. बायका दगडांच्या गौरी गोळा करतात या गोष्टीचें रूपक त्यांनीं सायमन कमिशनच्या व इतर सहकारी व मध्यवर्ती प्रांतिक कमिट्यांच्या नेमणुकीवर बसविलें. अशा स्थितींत त्यांच्या वक्तृत्वाला दुसरा बहर आल्यासारखें लोकांस भासलें.

आतां हें सर्व संपलें. त्यांच्या दीर्घकालीन आयुष्यांत त्यांनीं एखादी विधायक संस्था स्थापली व ती कायमची चालू राहण्याची व्यवस्था केली असें नाहीं. स्वतः होऊन एखादी नवीन संघटित चळवळ काढून ती टोंकास नेली असेंही फारसें म्हणण्यासारखें त्यांच्या हातून झालें नाहीं. त्यांच्या बुद्धीची व मनाची ठेवणच याला अनुकूल अशी नव्हती. कठिण समय असतां महाराष्ट्र स्वातंत्र्योन्मुख करण्यासाठीं त्यांनीं आपली विद्वत्ता, आपलें वक्तृत्व व आपले

स्वाभाविक गुण खर्च केले हीच त्यांची प्रधान कामगिरी व तिज-बद्दल महाराष्ट्र त्यांचा सदैव ऋणी राहील. पावसाचें कार्य म्हटलें म्हणजे पडण्याचें. शेतीच्या पिकांकरितां त्याचा जास्तींत जास्त उप-योग करून घेण्याचें काम दुसऱ्याचें. अफाट धरण बांधून, त्यांतील पाणी डोंगरावरून जोरानें सोडून त्यापासून वीज उत्पन्न करावयाची व विद्युत्संचय करून ठेवावयाचा. पण त्याच्यापासून योग्य फल-निष्पत्ति करून घेणें हें काम जो करील त्याचें. हें न घडलें तर पर्जन्याचा अथवा विजेचा दोष काय? टिळकांचें व परांजप्यांचें म्हणण्यासारखें मनोमय ऐकमत्य नव्हतें तरी टिळक याच दृष्टीनें त्यांच्या कामाकडे पाहात. येत्या जानेवारी महिन्यापासून राष्ट्रीय सभेनंतर संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला कदाचित् पुन्हा एकदां तेज चढणारसें दिसतें. १८९६ ते १९०८ सालांप्रमाणें शिवरामपंत असते तर, त्यांची स्वतंत्रतादेवीची वाङ्मयोपासना महा-राष्ट्राला व पर्यायानें अखिल भारतवर्षाला साहाय्यभूत झाली असती. पण परमेश्वराची इच्छा वेगळीच होती. म्हणून तर स्वातंत्र्याच्या आधारस्तंभाची राख होऊन बसली, स्वातंत्र्याचा दिवा मालविला गेला, स्वातंत्र्याच्या तुतारीचे पडसाद आकाशांत विरून गेले व स्वातंत्र्याचा शाहीर देवाघरीं गेला!! त्याचा आत्मा केव्हां बरें शांत होईल?

## १०

# श्री. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

" We must be free or die,
who speak the tongue
That Shakespeare spake."
--Wordsworth.

'गुणी मनुष्यच गुण जाणतो' म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. म्हणून तर १८९६ सालीं लोकमान्य टिळकांनीं खाडिलकरांना एकदम केसरी संस्थेंत येण्याविषयीं सांगितलें. नाहीं तर 'विविधज्ञान-विस्तारां' त कृष्णाजीपंतांचें विद्यार्थिदशेंतील "ब्राह्मण आणि त्यांची विद्या" या गोळे यांच्या पुस्तकाचें परीक्षण प्रसिद्ध होतें काय व तेवढेंच वाचून टिळक त्या लेखकाला संपादक म्हणून निवडतात काय ? पण 'उमटे तोचि तरुफळीं, असतो जो काय गुप्त गुण बीजीं' हें मोरोपंतांनीं म्हटलें तें टिळकांनीं बरोबर हेरलें, यांत संशय नाहीं. प्रथम तात्यासाहेब केळकर व मग काकासाहेब खाडिलकर या उभयतांची टिळकांनीं जी निवड केली ती किती योग्य व उत्कृष्ट ठरली हें काय महाराष्ट्रीयांस सांगावयास पाहिजे ? आतां हें खरें कीं गुणभेदामुळें केळकरांचें कार्य बहुशाखी व अनंत झालें, खाडिलकरांचें अगदीं आटोपशीर व मर्यादित झालें. कांहीं वृक्षांना नुसतीं सुगंधी फुलें येतात, कांहींना केवळ मधुर फळेंच लाभतात, तर कांहीं थोड्यांना दोहोंचाही संभार प्राप्त होतो. पण त्यामुळें त्यांचें महत्व कांहीं कमीजास्त ठरविलें जात नाहीं. तें कांहीं असलें तरी ब्रह्मा म्हटलें कीं ज्याप्रमाणें विष्णु आणि महेश यांची भाविकांस

आठवण व्हावयाचीच, त्याप्रमाणें टिळक हें नांव उच्चारलें कीं केळकर आणि खाडिलकर यांच्या मूर्ति डोळ्यांसमोर यावयाच्याच.

आणि खरोखरच टिळकांचा व खाडिलकरांचा गुरु-शिष्य या नात्याचा संबंध अत्यंत जिव्हाळयाचा होताहि. खाजगी व्यवहारांतील गुरु त्यांचे थोरले बंधु हरिपंत व सार्वजनिक प्रपंचांतील गुरु लोकमान्य टिळक. वडील भावाविषयीं जी निस्सीम पूज्यबुद्धि तीच लोकमान्यांविषयीं. टिळक कधींच चुकावयाचे नाहींत ही त्यांची पहिल्यापासून भावना होती. एखादे वेळीं टिळक असतांना असें व्हावें कीं, बाहेर मंडळींत बोलतांना खाडिलकरांनीं एक मत प्रतिदावें पण ते आंत जाऊन टिळकांचें म्हणणें ऐकून आले म्हणजे त्यांच्या मताचा तितक्याच आवेशानें पुरस्कार करावा! याचें कारण एकच. तें म्हणजे कृष्णाजीपंतांची लोकमान्यांविषयींची खरी व निरुपम निष्ठा. या अव्यभिचारी निष्ठेचा परिणाम खाडिलकरांच्या भाषेवर व लेखनपद्धतीवर देखील झाला. तो इतका कीं टिळक तुरुंगांत गेल्यावर खाडिलकरांनीं 'बेमालूम सांधा जोडला' असें सर्वांनाच वाटलें. टिळकांप्रमाणें खाडिलकरांचें लिखाणहि देशाभिमानानें व स्फूर्तिदायित्वानें रसरसलेलें असावयाचें. जें वर्तमानपत्री लेखांत तेंच त्यांच्या नाटकांतून. कांहीं कांहीं प्रसंगींचीं वाक्यें वाचलीं किंवा ऐकलीं म्हणजे वाचणाराचें व ऐकणाराचें रक्त उसळूं लागलेंच पाहिजे. श्री. कृष्णाजीपंतांची भाषण करण्याची पद्धत सुद्धां अशाच स्वरूपाची आहे. सावकाश सुरवात होऊन व्याख्यान ऐन रंगांत आलें म्हणजे आवाज चढावयाचा व शब्दहि कांचकारखान्याच्या भट्टींतील रसाप्रमाणें ज्वालामय अवस्थेंत जणुं बाहेर पडावयाचे. ज्यांनीं ज्यांनीं त्यांचीं टिळकांच्या बरोबर असतांची किंवा स्वतंत्रपणें एकट्यानें दिलेलीं कर्नाटक, महाराष्ट्र, वऱ्हाड या प्रांतांतील स्वराज्यावरचीं भाषणें ऐकलीं त्यांना त्यांच्या वक्तृत्वाची

साक्ष पटते. शिवरामपंतांच्या भाषणांत उपरोधाचा वाङ्मयविलास अधिक. तात्यासाहेबांच्या व्याख्यानांत तर्कशुद्धता व विनोद हीं प्रधान. कृष्णाजीपंतांच्या व्याख्यानांत आवेश मुख्य. अलीकडे त्यांनीं 'विश्रामं लभतामिदं च शिथिलज्याबंधमस्मद्धनुः' असें म्हणून राजकारणाविषयीं लेखन व भाषण सोडून दिलें आहे. तथापि त्यांच्या लेखणीला व वाणीला महाराष्ट्र सहसा विसरूं शकणार नाहीं हें निश्चित.

इतक्या उशीरानें तरी त्यांना साहित्य-संमेलनाच्या अध्यक्ष-पदाचा मान मिळतोच, यावरून ही गोष्ट सिद्ध नाहीं का होत? बारा-तेरा नाटकें व संपादकीय लेख यांच्या पलीकडे त्यांचा वाङ्मय-व्यवसाय कधीं गेला नाहीं. पण तेवढ्यावरून साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष होण्यास ते पात्र आहेत यांत मात्र बिलकुल संशय नाहीं. संपादकीय लेखनांत ते जवळजवळ टिळक व नाट्यनिर्मितींत ते जवळजवळ शेक्सपीयर असें त्यांचें वर्णन कोणी केलें तरी तें 'एक हात काकडी व नऊ हात बी' असें म्हणण्यासारखें नव्हे. शेक्स-पीयरनें ज्याप्रमाणें मनुष्यस्वभावाच्या मुळाला हात घातला त्याप्रमाणें कांहीं नाटकांत खाडिलकरांनींहि त्याचा अगदीं ठाव घेतला. यामुळें त्यांचीं नाटकें चिरकाल टिकणारीं अशीं उतरलीं. पौराणिक वस्तु घेऊन तींतून आधुनिक विचारसरणीस व परिस्थितीस समांतर असें मतप्रतिपादन करावयाचें ही त्यांची विशेष शैली. नाटक लिहिण्या-पूर्वी प्रतिपाद्य विषयाचें व गोष्टींचें चिंतन ते फार काळ करीत असतात. अमुक विषयावर नाटक लिहावयाचें मुक्रर केलें म्हणजे त्याचा सदैव निदिध्यास चालू असतो. साबरमतीच्या तुरुंगांत असतांना तर त्यांनीं दोन-तीन नाटकें तयार करून ठेविलीं. नाटकांचीं पदें करतांनाहि असाच सतत डोक्यांत विचार घोळत असावयाचा. घरीं एकटे असतां, फेऱ्या घालतां घालतां मनांतल्या मनांत पदरचना

चाललेली असावयाची. अशा दीर्घकालीन चिंतनामुळें त्यांचीं नाटकें वाङ्मयांत व रंगभूमीवर अढळ पद प्राप्त करून बसलीं आहेत म्हटलें तरी वावगें नाहीं. कोणी म्हणतात कीं, बालगंधर्व लाभले म्हणून खाडिलकरांच्या नाटकांचा एवढा बोलबोला झाला. पण कांहीं गुण सोनाराचा व कांहीं सोन्याचा, हें कबूल केलेंच पाहिजे. कारण 'मधुकर वनवन फिरत करी गुंजारवाला' 'पांडवां सम्राट्पदाला' 'या नवनवल नयनोत्सवा,' व 'किति मजेदार हार,' इत्यादि पदचरण गंधर्वांच्या गाननैपुण्यामुळें लोकांच्या तोंडीं बसले हें जसें खरें, तसें भाऊबंदकी, कीचकवध, मानापमान, स्वयंवर, द्रौपदी, मेनका, सावित्री या नाटकांचीं कथानकें अशा रीतीनें जुळविलीं कीं त्यांनींही जनतेच्या मनावर आपला पक्का पगडा बसविला आहे हेंहि यथार्थ होय, असें म्हणावें लागतें. दोघांची साथ अति उत्तम जुळली, एवढें बरीक खास. 'काळी चंद्रकळा आणि मोत्यांचा पदर' असें मुली म्हणतात तसें झालें. परस्पर शोभा वाढली ती दोघांच्या गुणांच्या संयोगामुळें, असें विधान केलें तर तें कोणालाहि कमी लेखल्यासारखें नाहीं.

द्रव्यलाभाच्या बाबतींत नाटकांनीं खाडिलकरांना चांगलीच मदत केली. किंबहुना घरगुती अडचण हीच त्यांच्या नाटकांची जन्मदात्री होती म्हटलें तरी चालेल. घरचीं मंगलकार्यें पार पाडण्यासाठीं, त्याप्रमाणेंच 'नवाकाळ वाडी' उभी करण्यास व आपला स्वतंत्र छापखाना व वर्तमानपत्र प्रस्थापित करण्यास त्यांना नाटकांचाच फार उपयोग झाला. पन्नाशी उलटून गेल्यावर स्वतःच्या जबाबदारीवर दैनिक काढून तें यशस्वी करून दाखविणें व मुंबईसारख्या शहरीं नवीनच जाऊन मालकीच्या इमारतींत स्थायिक होऊन राहावयाचें, दोन पत्रें चालवावयाचीं, दंडाचीं संकटें आलीं तरी ती धिटाईनें सोसावयाचीं व टिकाऊ संस्था निर्माण करावयाची ही गोष्ट उतार

वयांत करून दाखविणें म्हणजे कांहीं लहानसहान पराक्रम नव्हे! कृष्णाजीपंतांनीं ती कामगिरी जगास निःसंशय करून दाखविली.

असें कर्तृत्व सिद्ध करण्यास अवश्य लागणारा करारीपणा व आत्मविश्वास त्यांच्या अंगीं भरपूर आहेत. या गुणांच्या जोरावरच ते १९०८ सालीं टिळक तुरुंगांत गेल्यावर दुर्वासऋषीसारखे क्रोधायमान होऊन केसरी–कचेरींतून निघून गेले ते टिळक परत येईपर्यंत तिकडे फिरकले देखील नाहींत! या गुणांच्या जोरावरच 'लोकमान्य' कचेरींतून 'मी एखाद्या कंपनीचा मुनीम म्हणून काम करण्यास तयार नाहीं' असें निक्षून बजावून ते ताडकन् निघून गेले ते स्वतःच्या मालकीचें पत्र काढल्याशिवाय स्वस्थ राहिले नाहींत! ते खाजगी व सार्वजनिक वागणुकींत जसे निग्रही आहेत तसे बरेचसे एकमार्गी व एककल्लीहि आहेत. ते स्वतः गरीबींत वाढले असल्याकारणानें व त्यांच्या ज्येष्ठ बंधूंनीं त्यांच्या शिक्षणाविषयीं स्वार्थत्याग केला असल्याकारणानें त्यांच्या अंगीं आपल्या निराश्रित कुटुंबीयांस सांपत्तिक व इतर मदत करण्याची बुद्धि जागृत आहे. घरांत लक्ष द्यावयाचें नाहीं. ठराविक पैसा घरांत देऊन टाकला म्हणजे यांचें काम झालें. मग दिवसभर आपली खोली अन् आपण. स्वभाव तापट पडल्यामुळें लोकांची ये-जा प्रायः नाहींच. वाघ आपल्या गुहेंत पडलेला किंवा फिरत असावयाचा, तशी यांची वृत्ति. केसरींत असतांना सुद्धां आतां अगदीं समय येऊन ठेपला म्हणजे मग सोमवारीं सकाळीं अग्रलेख सांगावयाचा. एरवीं काय 'टाइम्स' वाचतील तेवढा. 'लोकमान्य' व 'नवा काळ' नवीनच पत्रें असल्यामुळें केसरीपेक्षां थोडें अधिक त्यांजकडे लक्ष दिलें असेल इतकेंच. रोजचीं वर्तमानपत्रें गड्यानें आणून ठेवलीं तर तीं फक्त उलटीं करून ठेवावयाचीं म्हणजे वाचून झालीं असें समजावयाचें. लोकांचीं पत्रें येणें, त्यांना रीतसर वेळेवर उत्तरें धाडणें,

लेख वाचणें-संपादणें वगैरे कामें त्यांच्या राज्यांत नाहींतच. सायंकाळीं ते स्वतः काय डॉ. देशमुख किंवा छत्रे यांजकडे गप्पाष्टकें करावयास जातील तेवढाच लोकसंग्रह किंवा त्यांच्याकडेच श्री. वासुकाका जोशी व श्री. गंगाधरराव देशपांडे उतरण्यास आले तर. पुण्यास वास्तव्य असतांना घरून सकाळीं निघून लांब कोट, तेव्हां पगडी व आतां गांधी टोपी, गळ्याभोंवतीं उपरण्याची घडी अशा अगदीं साध्या पोशाखानिशीं गटाराच्या बाजूनें एक पाय खरडत खरडत कचेरींत यावयाचें व संध्याकाळीं मोरोबादादांच्या वाड्यांत कवडेशास्त्री यांच्या दवाखान्यांत शिवरामपंत परांजपे वगैरे मंडळी रोज जमावयाची तेथें जावयाचें. १९२० सालानंतर तें सर्व बदललें. क्वचित् ते येथें आले तर एकदां कोणी साधारणतः नसेल अशा वेळीं केसरी कचेरींत जुन्या स्नेही-ऋणानुबंधी लोकांना भेटावयास जावयाचें व केशवराव देशमुखांकडे संध्याकाळचा अड्डा पडावयाचा. तेथें तंबाखू खातखात गंभीर वाद, विनोदी चर्चा, चेष्टा वगैरे सर्व प्रकार चालावयाचा. त्यांचा स्वभाव इतका उग्र व कोपिष्ठ आहे कीं त्यांच्या विरुद्ध कोणी कांहीं बोलल्यास त्याला ते एकदम काय टाकून बोलतील याचा नेम नाहीं. सर्वांसच त्यांच्याविषयीं भीति वाटते. कोणा कारकुनानें त्यांना कांहीं सुचविण्याचें धाडस केलें तर त्याला 'मला माझ्या कारकुंड्याकडून शिकण्याची आवश्यकता नाहीं' असें बक्षिस मिळालेंच म्हणून खुशाल समजावें!

मानीपणा व आत्मविश्वास तर इतका अंगांत भरलेला कीं स्वतःस काय करावयाचें तें केल्यानंतर दुसरा काय म्हणतो याची रतिमात्र पर्वा करावयाची नाहीं. त्यांच्यावर व त्यांच्या नाटकांवर कित्येक टीका व परीक्षणें झालीं असतील. टीकाकारांना उत्तर देण्यासाठीं त्यांनीं कधीं हातांत लेखणी धरली असेल तर शपथ. हत्ती आपल्या गतीनें जात असतो, तो आजूबाजूला काय चाललें आहे इकडे दृष्टि

कधींच वळवीत नाहीं. कृष्णाजीपंतांची हीच स्थिति. एखादा विषय निघाला तर त्यावरचीं कांहीं पुस्तकें पाहून साधकबाधक विचार करून आपल्या मनाशीं सिद्धान्त बांधावयाचे, यासाठीं जी एक प्रकारची तत्परता, साक्षेप व आकलनशक्ति लागते ती त्यांनीं फारच क्वचित् प्रसंगीं दाखविली व पटविली. निष्ठा हेंच त्यांच्या बुद्धिमत्तेचें मुख्य लक्षण. टिळकांनीं साहाणेवर जें गंध उगाळून ठेवावें त्याचा टिळा लावून मिरविणारे आम्हीं, असें जें गंगाधरराव नेहमीं गंमतीनें म्हणतात तेंच कृष्णाजीपंतांनाहि लागू. टिळकांच्या मागें ती निष्ठा गांधींकडे वळली व तेथेंही ती तितक्याच अनन्यभावानें खिळून राहिली. नाहीं तर गांधींच्या कार्यक्रमाची कृष्णाजीपंतांनीं आरंभीं आरंभीं कमी का चेष्टा केली आहे! परंतु निष्ठा म्हटली कीं निष्ठा. स्वतः सर्वस्वीं तसें वागणें अशक्य असलें तरी पुरस्कार अव्याहतपणें गांधीजींच्या तत्त्वांचा व कार्यक्रमाचा. लहानपणीं त्यांना सांगण्यांत आलें होतें कीं, बुडत असतांना रामराम म्हणावें. ते स्वतः एकदां नदींत बुडत असतां एका गृहस्थानें त्यांना वर काढलें. लगेच घरीं जाऊन 'मी रामराम म्हटलें म्हणून वांचलों' असें सांगितलें. ही विश्वासाची व निष्ठेची भावना त्यांच्या मनांत मुरलेली आहे. आणि त्या भावनेनेंच ते गांधीजींच्या चरख्याच्या कार्यक्रमाचा आपल्या लेखांतून अखंड जप करीत असत. त्याच निष्ठेनें अजूनहि त्यांचें जीवित चाललें आहे.

अलीकडे 'नवाकाळ' पत्राचा व इतर छापखान्याच्या धंद्याचा भार आपल्या चिरंजीवावर व संपादकमंडळावर सोंपवून त्यांनीं आपलें लक्ष देवाधर्माकडे लावलेलें दिसतें. सांगलीस दत्तमंदिर स्थापून ते प्रवचनेंही करूं लागले आहेत. गीता, ज्ञानेश्वरी इत्यादि ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास त्यांनीं कांहीं महिन्यांपासून आरंभिला आहे. त्यांच्या एकलकोंड्या स्वभावास हें वागणें अगदीं जुळण्यासारखें

आहे. हें मात्र ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, ते अंमळ वाजवीपेक्षां जास्त माणुसघाणे वाटले तरी बरोबरीच्या चार मंडळींत ते बसले म्हणजे गप्पाविनोदाला कांहीं वाण नाहीं असें असतें. तेथें बोलणें अघळ-पघळ व हंशाही खो खो खो. केव्हां जुन्या गोष्टी सांगतील; कधीं आपणांस पकडण्यास खटाव बिल्डिंगमध्यें शिरतांना लांबून एका लठ्ठ गृहस्थास पाहिलें तेव्हां सिनेमाची मोठी जाहिरात देणारें कूळ आलें असें आशेनें कसें वाटलें तेंहि खुलवून सांगतील. पण हा लाभ अगदीं निवडक परिचितांनाच मिळावयाचा.

चतुरस्र संपादक म्हणून त्यांची कीर्ति नाहीं तरी केसरींत त्यांनीं जे लेख लिहिले ते मराठी वाङ्मयांत टिकतील. परराष्ट्रीय राजकारणाचें ते मार्मिक पृथक्करण करूं शकतात हें त्यांच्या ' चित्रमयजगत् ' मधील महायुद्धावरील लेखांवरून सिद्ध होतें. पण त्यांचीं नाटकें हेंच त्यांचें ' शेखरीभूत वाङ्मय. ' क्वचित् स्थळीं अश्लीलसा वाटणारा विनोद असेल. क्वचित् स्थळीं पदें कांहींतरीच वाटतील. सर्वच पात्रें सारखीं उठावदार रीतीनें चित्रित केलेलीं नसतील. पण या दोषांपासून शेक्सपीयर तरी कोठें सुटला आहे ? त्यांच्या नाटकांतील कथानक आकर्षक असावयाचें, महत्त्वाच्या तत्त्वावर नाटकाची उभारणी झालेली असावयाची, पौराणिक कथेचें आधुनिक परिस्थितीच्या चष्म्यानें निरीक्षण केलेलें असावयाचें, भाषा तेजस्वी असावयाची, विविध रस चातुर्यानें आळविलेले असावयाचे. अशा स्थितींत त्यांना ' नाट्याचार्य ' पदवी जनतेनें आपण होऊन बहाल करावी हें यथा-योग्यच होय. जसे चिंतामणराव वैद्य यथार्थत्वानें भारताचार्य व तात्यासाहेब केळकर साहित्याचार्य तसे काकासाहेब ' नाट्याचार्य. ' असा हा महाराष्ट्रीय शेक्सपीयर साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षस्थानीं विराजमान व्हावा हें जसें कांहीं रामाच्या देवळांत सोन्याची घांट बांधण्यासारखें परस्परशोभादायक झालें. याच्यापूर्वींच कृष्णाजी-

पंतांना हा मान मिळावयास पाहिजे होता. परंतु त्यांना प्रसिद्धीचें फार वावडें. ज्या गृहस्थानें गतवर्षी आपला ६१ वा वाढदिवस जाहीर रीत्या होऊं नये असें उत्सव साजरा करणाऱ्या मित्रमंडळीस साफ सांगितलें त्याला या मानापमानाचें काय होय ? त्यांना साहित्य-संमेलनाचें अध्यक्षस्थान इतके दिवस लाभूं देण्यांत आलें नाहीं हें सत्य. तथापि त्यांच्या नाट्याच्या विद्येचें कोणी हरण करूं शकला काय ?

असो. एक वर्षाच्या तुरुंगवासानंतर प्रकृति खचली म्हणून म्हणा किंवा 'येतां अशुभसा काल नवा, तपानें ध्येय मनिं सेवा, स्वकर आवरा, कूर्म गुरु करा' या शिकवणीनें म्हणा, त्यांनीं मन धार्मिक, पारमार्थिक विषयांत घातलें आहे. या चिंतनांतून एखाददुसरें परि-पक्व असें नाटकरूपी फळ मराठी भाषेच्या पदरांत पडलें तरी हवेंच आहे. अथवा गीता, ज्ञानेश्वरी वगैरे परिशीलनानें गीतारहस्या-सारखा प्राकृत लोकांस चिरंतन मार्गदर्शक होणारा 'ग्रंथराजु' बाहेर पडला तरीहि कृष्णाजीपंतांच्या हातून एका दृष्टीनें आपले राजकीय गुरु लोकमान्य टिळक यांस गुरुदक्षिणा मिळाल्याचें स्वर्गीय समा-धान लाभेल.

११

# श्री. माधव श्रीहरि अणे

" Who is the Happy Warrior ? Who is he
That every man in arms should wish, to be ?
' Tis finally the man, who, lifted high,
Conspicuous object in a Nation's eye,
Or left unthought-of in obscurity,
Who......
Plays, in the many games of life, that one
Where what he most doth value must be won:
Whom neither shape of danger can dismay,
Nor thought of tender happiness betray:
Who, not content that former worth stand fast,
Looks forward, persevering to the last,
From well to better daily self--surpast:
Finds comfort in himself and in his cause."

—**Wordsworth**

किर्लोस्कर नाटकगृहांत सभा होती. लोकमान्य टिळक अध्यक्ष होते. बापूजी अण्यांचें भाषण झालें. तात्यासाहेब केळकरांनीं आभार मानले. आपल्या आभार-प्रदर्शक बोलण्यांत ते म्हणाले, अण्यांच्या बाबतींत ' लहान मूर्ति पण थोर कीर्ति ' ही म्हण सार्थ झाली. १९१७ सालींच हें खरें होतें तर आज सोळा वर्षांनीं किती तरी पटीनें अधिक खरें नाहीं का ? तेव्हां बापूजी फार तर एकट्या वऱ्हाडचे पुढारी गणले जात. आतां ते अखिल भारताचे नेते म्हणून समजले जातात व ते लोकनायक यथार्थनाम झाले आहेत. टिळकांची

लोकमान्य ही जशी पदवी, तशी अण्यांची लोकनायक ही. टिळक गुरु व अणे शिष्य. अशी गुरुशिष्यांची जोडी विरळाच आढळते. म्हणून तर श्रीधर कवीनें अशी महती गाइली आहे कीं चतुर आणि पवित्र मित्र, सर्वज्ञ व दयाळू देशिक, भाविक व उदार शिष्य, सुंदर गृहिणी, भक्तिमान् पुत्र, व्युत्पन्न व सुरस वक्ता हें पूर्वसुकृतानेंच प्राप्त होत असतें. टिळक–गांधींची पुण्याई म्हणून अणे त्यांना शिष्य लाभले कां अण्यांचें पूर्वदत्त चांगलें म्हणून टिळक–गांधींचें छात्रत्व त्यांच्या नशिबीं आलें, हें सांगणें जरा कठिण आहे. तथापि वस्तु-स्थिति मात्र अशी होऊन बसली कीं, टिळकांना अण्यांच्याविषयीं अत्यंत अभिमान वाटावा व गांधींनाहि अण्यांचें सहकार्य म्हणजे राजकीय घबाड हस्तगत झाल्याचा आनंद व्हावा. १९१८ च्या स्वराज्याच्या दौऱ्यांत लोकमान्य टिळकांनीं अण्यांचें जनतेवरील वजन समक्ष पाहिलें, तेव्हां त्यांच्या कर्तृत्वाच्या गौरवाचे निदर्शक असे पूस नदीच्या वाळवंटांत ‘ ही स्वराज्याची पंढरी होय ’ असे उद्गार काढले; तर गतवर्षी पनवेलच्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेच्या प्रसंगीं ‘ Be my mouth–piece ’ असा गांधींनीं अण्यांना विश्वासाचा संदेश दिला. टिळकांचे अनुयायी अण्यांना छोटे टिळकच समज-तात. सामान्यपणें दिसण्यांत ते टिळकांच्यासारखे दिसतात सुद्धां. देहयष्टीनें लहान-खुरे, डोक्यावर पगडी, मुद्रा किंचित्शी क्रूरांतच जमा, पोषाखाचा अगदीं साधेपणा, खोल विचाराच्या दर्शक अशा कपाळावर दोन-तीन आठ्या, तें बसणें-उठणें, तें घाईनें इतरांस चटकन् न समजणारें बोलणें, ती हातांतील काठी, इत्यादि गोष्टींत तर कोणीही ‘ हें चित्र पहा आणि हें चित्र पहा ’ असें साम्य दाखविण्याच्या हेतूनें म्हणावें. शेक्सपीयरनें असें लिहिलें तें विरोध-दर्शनासाठीं. टिळक–अण्यांच्या रूपांतील व चाल–चलणुकींतील सारखेपणा कांहीं विशेष वाटतो. राजकारणांतील विचारसरणी सदैव

युध्यमान; चर्चापद्धति अगदीं सडेतोड, झोंपेच्या वेळेशिवाय इतर वेळीं स्वराज्य-स्वातंत्र्या-खेरीज दुसरी चिंता नाहीं. आणि असे संक्षिप्त टिळक महात्माजींच्या राजकीय कार्याला जुंपले गेले तर त्यांना तरी कां बरें अभिमान न वाटावा ?

बापूजी अण्यांचें सार्वजनिक चारित्र्य व कार्य विकसित व वर्धिष्णु असें पाहिलें म्हणजे मनूच्या माशाची आठवण होते. स्वत: नागपूरच्या मॉरिस कॉलेजांत असतांनाच १८९८ साली कॉलेजांत टिळकांना बोलाविण्याचा उपक्रम बापूजींनीं केला. तेव्हांपासून प्रारंभ. पुढें अमरावतीचें ' शिवाजी विद्यालय ' झालें; स्वदेशीची चळवळ झाली; ' हरिकिशोर ' पत्र झालें; यवतमाळची जिल्हा सभा झाली; वऱ्हाडांतील जमीनधाऱ्याची व जंगल-तक्रारींची चळवळ झाली; स्वराज्य पक्षाची धामधूम झाली; लेजिस्लेटिव्ह अॅसेंब्ली झाली; नेहरू रिपोर्ट झाला; वऱ्हाडांतील जंगलसत्याग्रह झाला; परवांची कलकत्ता कॉंग्रेस झाली. अगदीं पहिल्या पायरीपासून सुरवात करून थेट शिखर गांठलें. लहान बीचा वाढत वाढत मोठा वृक्ष झाला. पायापासून बांधतां बांधतां मजलेदार इमारत पुरी झाली म्हणावयाची; प्रस्तावनेपासून परिसमाप्तिपावेतों ग्रंथाचे भाग लिहून झाले. तसें पाहिलें तर त्यांना चोपन्नावें वर्ष चालू आहे. उमेद अशी आहे कीं अजून पुष्कळ देशसेवा करूं. ' अधिकस्याधिकं फलं ' हें तर उघडच आहे. परंतु झालें तें कांहीं कमी का आहे ? अशी विलक्षण उत्क्रांति व विस्तार किती लोकाग्रणींच्या आयुष्यांत आढळतो ? खरोखरच हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या. जास्त नाहीं.

टिळकांचे कल्याण गणले जाणारे बापूजी, गांधीजींच्या अनुयायांत कसे समाविष्ट झाले याचें कित्येकांना बरेंच आश्चर्य वाटतें. पण जेथें जातीची अस्सल देशभक्ति आहे तेथें टिळक–गांधी हा भेद नष्टच होतो. आणि असला तरी स्वातंत्र्यप्राप्तीच्या आंदोलनांत तो भेदा-

भेद लुप्त होऊन जाणें स्वाभाविक आहे. बरें, बापूजींच्या बाबतींत देशभक्ति कोणी उत्पन्न केली असें विचारणें, हें मोराच्या पिसारा इतका सुशोभित कोणीं केला, सूर्याला इतकें तेज कोणी दिलें, चंद्राला इतके शांतिप्रद किरण कोणीं अर्पण केले, असेंच विचारण्याप्रमाणें होय. टिळकांसारखा वीर पुरुष सरकारशीं सामना करणारा पाहिला, बापूजी तिकडे आकर्षिले गेले. टिळक गेले, गांधी आले; आणि ते जेव्हां राष्ट्रांत युयुत्सु प्रतिकारवृत्ति चेतवूं लागले तेव्हां अणे निसर्गतःच त्यांच्या निशाणाखालीं लढाई करूं लागले. प्रथमपासून अण्यांची प्रवृत्ति युद्धप्रवण आहे. स्वार्थत्याग, तडफ, बाणेदारपणा हे त्यांच्या कार्याचे स्थायिभाव होत. १९०९ सालीं, म्हणजे वकिली सुरू केल्यावर दोन-तीन वर्षांच्या आंतच, बापूजींची सनद रद्द करण्यांत आली, तेव्हां ते डगमगून तर नाहींच गेले; उलट म्हणाले कीं, सरकार फार तर सनद घेईल, पण बुद्धीवर कांहीं ताबा चालवूं शकणार नाहीं ना! हे उद्गार वाचले म्हणजे,

एका केवलमेव साधनविधौ सेनाशतेभ्योऽधिका
नंदोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मा गान्मम ।

या आर्य चाणक्याच्या उक्तीची कशी आठवण झाल्याखेरीज राहील? सांप्रत जरी तशीच स्थिति प्राप्त झाली तरी ते कधीं दुःखाचे उसासे टाकीत बसले नाहींत. एकदां जें सतीचें वाण घेतलें तें घेतलें. १९२५ सालीं कुटुंब निवर्तलें तरी ते विषण्णमनस्क होऊन बसले नाहींत. त्यांचें अंगीकृत कार्य अखंड चालूंच. त्यांत काडीची कसूर व्हावयाची नाहीं. टिळकांनीं पुण्यास बोलाविलें कीं तडक निघून यावयाचें; दिल्ली-सिमल्यास ॲसेंब्लीच्या कामासाठीं असले म्हणजे मोठ्या मुकदम्याचा लाभ असला तरी उडाणटप्पू विद्यार्थ्याप्रमाणें ॲसेंब्लीला 'बुटीस' द्यावयाची नाहीं; नेहरू-रिपोर्टाच्या लेखनाच्या वेळीं अलाहाबाद येथें घरदार सोडून महिनेन् महिने

मुक्काम करावयाचा; महात्मा गांधींच्या उपवासाच्या निमित्तानें पुण्यास दीर्घकालीन तळ पडला कीं ठरल्याप्रमाणें रोज 'पर्णकुटी'-वर जाऊन त्यांच्या प्रकृतिमानाची चौकशी केल्याशिवाय राहावयाचे नाहींत. असा एकनिष्ठपणाचा कार्यक्रम अव्याहत चालावयाचा.

याचा अर्थ ते एकलकोंडे आहेत असा मुळींच नाहीं हो. गप्पाष्टकें मारण्यांत ते कसे पट्टीचे आहेत. त्यांच्या इतपत लोकसंग्रह फार थोड्यांचा. टिळक–गांधींचा अफाट हें निःसंशय. पण त्यांच्याशीं गप्पा मारावयास लहान माणसास जरा संकोच वाटतो. अण्यांचें तसें नाहीं. 'मौने मौनी गुणिनि गुणवान् पंडिते पंडितोऽसौ' या सुभाषितांत वर्णिलेल्या पुरुषाप्रमाणें त्यांची वागणूक. यवतमाळास घरीं असले काय अगर परगांवीं कोणा स्नेह्याच्या घरीं असले काय, त्यांच्याभोंवतीं मंडळी जमावयाचीच. एकदां चर्चा सोडून चर्चेचा, गप्पागोष्टींचा फड पडला म्हणजे कांहीं विचारूं नये. 'अविदित-गतयामा रात्रिरेव व्यरंसीत्!' अशी अवस्था होऊन जावयाची. पत्नीनिधनानंतर पान सोडलें. पण सुपारीची डबी ही जणुं पतिव्रते-सारखी त्यांची मनोभावानें सेवा सदैव करीत असते. गाडीच्या चाकाला वंगण व त्यांच्या रसनेला सुपारीचीं खांडें. एखाद्या लाडक्या गांवीं आपल्या जिव्हाळयाच्या बहुसाल मित्रमंडळीपैकीं कोणाकडे ते गेले कीं हां हां म्हणतां बातमी गांवभर पसरावी व वामनानें वनसुधेंत लिहिल्याप्रमाणें,

खडबडोनि समस्तहि धांवले।
सहित–वत्स हरीप्रति पावले ॥

असें दृष्टीस पडावें. आणि पुण्यास येऊन राहिले तरी देखील काय, एकदां गांधींकडे जाऊन येण्याचें काम उरकलें कीं येईल त्याच्याशीं बोलावयास स्वारी तयारच. तात्यासाहेब केळकरांबरोबर राजकीय विषय उन्मेखून निघत नाहीं म्हणून हवापाण्याच्या गप्पा

निघाल्या तरी त्यांत रंगणार व मूळाक्षरांच्या तक्त्याकडे बघत बघत ' ञ व ळ या दोन अक्षरांनीं चित्रकारांना फसविलेंच कीं ' असेंही म्हणणार; धुळ्याच्या आप्पासाहेब केळकरांचे समाजसत्तावादी चिरंजीव आले तरी त्यांच्याशीं समरस होणार; माटेमास्तरांसारखा गंभीर व विचारी पण खरी पोटतिडीक बाळगणारा अस्पृश्यता-निवारक आला तरी त्याच्याशीं तन्मय होणार; कवडेशास्त्र्यांसारखा कडकडीत सनातनी उपस्थित झाला तरी त्याच्याशीं आपुलकीनें बसणार-बोलणार; घरीं फार कंटाळा आला तर डॉ. केतकरांच्या बंगल्यावर जाणार किंवा बापूसाहेब चाफेकरांकडे बैठक मारणार. पुन्हा, बोलणें अगदीं अघळपघळ. बोलतांना विनोद करतील, सहज कोणाची चेष्टा करावयाची असली तर नाकाला नुसतीच चिमटी लावून, तपकीर ओढल्यासारखें करून एखाद्याचा अभिनय करून दाखवितील. क्वचित्प्रसंगीं असें कांहीं तरी बोलतील कीं बरोबर असलेल्या मंडळींच्या हंसून हंसून मुरकुंड्या वळून जातील. विशेष वाद निघाला तर ओघांत रागावतील, चिडतील, कदाचित् कोणास लागण्यासारखें बोलतील. पण मन आरशासारखें निर्मळ व प्रेमळ. त्यामुळें स्वत: ते तर ताबडतोब विसरतातच. पण ज्याला बोलले असतील तो देखील हवेंत बोललेलें हवेंत विरून गेलें; पाटीवर लिहिलें, पाटी पुसून टाकली; असेंच खरोखरी मानतो. बापूजींच्या गप्पा म्हणजे बौद्धिक मेजवानी. एका संस्कृत कवीनें तीन प्रत्यक्ष सौख्यें सांगितलीं आहेत. त्यांत ' सुभाषितज्ञेन जनेन साकं संभाषणं ' याला अग्रस्थान दिलें आहे व इंग्लिश कवि पोप यानें अशा स्वरूपाच्या कथाप्रसंगाला उद्देशून Feast of reason and flow of soul असा श्लोकचरण रचला आहे. बापूजींच्या गप्पागोष्टींना बऱ्याच अंशांनीं हें वर्णन लावतां येतें.

कारण अणे हे नुसते राजकीय पुढारी नाहींत. ते लोकाग्रणी

असून व्युत्पन्न आहेत. पढिक विद्वान् असून विनयशाली आहेत. राजकारणी असून धर्मनिष्ठ सनातनी आहेत. चळवळ करणारे असून विद्याव्यासंगी आहेत. त्यांची बुद्धि क्षुरधारेसारखी तीक्ष्ण आहे. विचार करण्याची पद्धति खोल आहे. त्यांची उपस्थिति फार प्रशंसनीय आहे. व्याख्यानांत बोलण्याची रीत अशी कीं त्यांना बोलतांना पाहिलें व ऐकलें म्हणजे टिळकांची प्रतिमा डोळ्यांसमोर उभी आहेसें वाटावें. भाषणांत दाखले आले कीं ते भारत-रामायणांतील यावयाचे, आधार द्यावयाचा तर वेदांतील ऋचांचा. मूळ घराणें आंध्रांतील. तेलंगणांतील म्हणून वडे, भजीं वगैरे तेलकट पदार्थ भातांत कुसकरून खाणें जसें त्यांना प्रिय, त्याप्रमाणें संस्कृत जुन्यानव्या ग्रंथांचें परिशीलन. ॲसेंब्लींत होते तेव्हां मध्यारात्रीपर्यंत जागून कागदपत्र वाचीत. रेल्वे फायनॅन्स कमिटीचे सभासद होते तेव्हां रात्रौ दोन-दोन वाजेपर्यंत बसून कोठें ज्यूक्सचा रिपोर्ट पाहा, कोठें स्वतःचीं टिपणें तयार कर हें चालावयाचें. वकिली होती तेव्हां इजारदारांच्या हक्क-संरक्षणासाठीं खलिते लिहून काढावयाचे. आतांहि रिकामपण सांपडलें कीं, महाभारताची भांडारकर इन्स्टिटयूटची नवी आवृत्ति पहा, अगर डॉ. बाळकृष्णांच्या इंग्रजी शिवचरित्राचीं पानें चाळ, हा उद्योग आरंभावयाचा. अलीकडील इंग्रजी-मराठी वाङ्मयाचा त्यांचा परिचय अगदींच नमस्कार करण्यापुरता, हें त्यांनींच परवां सिंहगडीं गेले होते तेव्हां कबूल केलें. पण ही उणीव जुन्या ग्रंथांच्या सघन ज्ञानानें त्यांनीं खास भरून काढली आहे. पाठांतर व प्रत्युत्पन्नमतित्वही वाखाणण्यासारखें आहे. १९१९ सालीं यवतमाळास ' लोकमत ' पत्र सुरू झालें. त्या पत्रावर घालावयास संपादकानें एक श्लोक बापूजींजवळ मागितला. पत्राच्या प्रसिद्धीचा दिवस तर येऊन ठेपलेला. बापूजी गांवाला जाण्यास मोटारींत बसलेले. तथापि त्या मोटारगर्दींत एका शब्दाचा फरक करून त्यांनीं

'विचरति लोकमतः प्रदीप्तरश्मीः' हा जुनाच श्लोक क्षणांत लिहून संपादकाच्या हातांत टाकला. 'अध्यक्षस्यावलिप्तस्य' हें टिळकांचें अवतरण तर महशूर आहे. व केळकरांनीं देखील किर्लोस्कर नाटक-गृहाच्या आंत ब्रीदवाक्य म्हणून रंगविण्यासाठीं स्वतःच एक ध्येय-दर्शी श्लोक बनवून दिल्याचें त्यांच्या मित्रवर्गास आतां ठाऊक झालें आहे. हें सारें खरें असलें तरी, एवढें मात्र कबूल केलें पाहिजे कीं, बापूजींच्या बोलण्यांत मधूनमधून गांवरानी शब्द येतात. सुग्रास भोजन करतांना मधेंच दांताखालीं करकन् खडा यावा, तसें त्यांचे कांहीं ठराविक प्राकृत शब्द आले म्हणजे ऐकणाराला होतें. त्यांच्याशीं ज्यांची दाट ओळख झाली आहे, त्यांना याचें कांहींच वाटत नाहीं. पण अंमळ नाजूक मनाच्या मनुष्याला धक्काच बसावयाचा. दुसरें असें कीं, त्यांचें हस्ताक्षर फार वाईट आहे. कोणी म्हणतात कीं, मोठ्या माणसांचें अक्षर वाईट असतें. कोणी हस्ताक्षरावरून स्वभा-वाचा कयास बांधतात. बापूजींच्या बाबतींत असा स्वभावनिर्णय सर्वस्वीं खोटा ठरेल हें निश्चित. सुंदर व वळणदार अक्षर म्हणजे कसें मोत्यासारखें असावें. बापूजींचें पाहिलें तर कोंबडीचे पाय व बदकाची चोंच. शिवाय ते जसे घाईघाईत व तोंडांतल्या तोंडांत बोलतात, तसेंच गिचमिड गिचमिड लिहितात. परंतु लेखन मात्र तर्कशुद्ध असावयाचें. उगीच नाहीं गांधींनीं देखील 'Calm logic of Mr. Aney' असें आपल्या 'यंग इंडियांत' कधींच विधान करून ठेवलें !

त्यांच्या वादपटुत्वाप्रमाणें त्यांचा करारीपणा लक्षांत घेण्यासारखा आहे. ॲसेंब्लींत कधीं आपण होऊन अधिकारी साहेबापाशीं लाळ-घोटेपणा करावयास गेले नाहींत. उभ्या ॲसेंब्लींत केळकर व अणे हे दोनच असे हिरवे सभासद कीं, त्यांनीं आपली जागा केव्हां कामाशिवाय सोडली नाहीं. इतर काय, साहेब दिसला कीं स्मित

करावयाचें; हस्तांदोलन व्हावयाचें; बरोबर चहा-बिस्किटें खावयाचीं; एकाद्या नातेवाईकाच्या नोकरीसाठीं खटपट व्हावयाची; कोणी कोणी तर ज्योतिष पाहाण्याच्या बहाण्यानें साहेबाच्या अंतर्गृहांत सुद्धां प्रवेश संपादन करावयाचे. अणे–केळकर काय, नाकासमोर जावयाचे व नाकासमोर परत यावयाचे. यवतमाळास प्रांतांतील बडे ह्पीसर येतात--जातात. त्यांनीं बापूजींकडे वाटेल तर प्रथम यावें, मग बापूजींनीं परतभेट द्यावी. एरवीं नाहीं. तो भला नि आपण भले. पण हें सगळें हुद्द्यावरील अधिकाऱ्यापुरतेंच. आपापसांत कदापि नाहीं. पालघरला ठाणें जिल्हा परिषद् मागें झाली. बाळासाहेब दांडेकरांच्या भव्य बंगल्यांत स्वतंत्र खोलींत, ते अध्यक्ष या नात्यानें, त्यांची खास सोय केली होती. बरोबर गेलेली प्रतिनिधि, पाहुणे वगैरे मंडळी त्यांच्यापासून दूर दूर आपले बिछाने घालून निजूं लागली. आपणाला मंडळी टाळतात काय, असें पाहून बापूजी उठले, त्या मेळाव्यांत जाऊन घुसले व तेथील एका गादीवर मुद्दाम निजले. बरोबर त्यांना सामानाचा फारसा लबेदा नको असतो. प्रवासांत कोणी स्नेही-सोबती बरोबर असलेच तर गाडींत गप्पा मारावयाच्या व खायचें-प्यायचें. एकटेच असले तर आपली जागा सोडून खालीं देखील उतरणें मुष्कील. पैशाचें पाकीट, छत्री, घड्याळ वगैरे जवळ संभाळणें म्हणजे त्यांना कटकट वाटते. राष्ट्रीय सभेच्या बैठकीला गेले कीं, मुक्कामावर पोंचतांच पैसे असतील नसतील ते एकाद्या बरोबरच्या माणसाजवळ खुशाल देऊन टाकावयाचे; त्यानें विचारावें ‘बापूजी, पैसे कमजास्त झाले तर तुम्हांला कसें कळणार ?’ बापूजींनीं उत्तर द्यावें, ‘आम्ही देतों, आम्हांला कांहीं माणसाची पारख आहे कीं नाहीं ?’

इतके सारखे हिंडतात-फिरतात कीं, त्यांच्या पायाला जसें कांहीं कायमचें चाक बांधलेलें. पण असें असून धर्माचरणास कधीं चुकत

नाहींत. स्नान, संध्या, उपोषण वगैरे अंतरावयाचें नाहीं. कडकडीत थंडींत अमृतसर येथें राष्ट्रीय सभेच्या वेळीं किंवा ॲसेंब्लीच्या अधिवेशन-प्रसंगीं सिमल्यास सुद्धां संध्या केल्याशिवाय राहावयाचे नाहींत. कलकत्त्याच्या कॉंग्रेसच्या निमित्तानें अटक झाल्यावर त्यांना मिदनापूरच्या कच्च्या तुरुंगांत ठेवलें. संध्येच्या उपकरणासाठीं भांडून अखेरीस तीं मिळविलीं व त्या टिनपॉट भांड्यांनीं संध्या पार पाडली. हा एक प्रकार. नेहरू रिपोर्टाच्या निमित्तानें अलाहाबादच्या वास्तव्यांत सर तेजबहादुर सप्रू यांच्याकडे, त्या दिवशींचें काम उशीरा संपल्यामुळें, रात्रींच्या भोजनाचा प्रसंग पडला. सप्रू म्हणजे भले मोठे लॉर्ड. त्यांच्या उमरावी थाटाच्या राजवाड्यांत संध्यावंदन म्हणजे लॉर्ड सिंह बिहारचे गव्हर्नर असतांना तेथील गव्हर्मेंट हाऊस मधील तुळशी-वृंदावन अथवा तांबे मध्यप्रांताचे गव्हर्नर असतांना नागपूरच्या गव्हर्मेंट हाऊसमधील मंगळागौरीची पूजा, यांच्यासारखी एक 'न भूतो न भविष्यति' अशी जणुं अघटित घटना. मोठ्या प्रयासानें बापूजींनीं काय काय सामान पाहिजे तें नोकराला नीट समजावून सांगितलें. त्यानें काय विचारतां, बड्या पाहुण्याची उत्तम बरदास्त ठेवावयाची म्हणून भव्य व्यासपीठ, भारी भारी शालजोड्या, चांदीचे उत्तर हिंदुस्थानी घाटाचे जंगी जंगी लोटे सादर केले. आणि मग त्या उच्चासनावर विराजमान होत्साते आमचे बापूजी अणे संध्यावंदन करते झाले! हा दुसरा प्रकार. त्यांना बिचाऱ्यांना काय, पहिल्याचा विषाद नाहीं आणि दुसऱ्याचा हर्ष नाहीं. संध्या झाली एवढेंच समाधान. याला म्हणावें स्थितप्रज्ञ. याचें नांव कर्मयोगी. या गोष्टींत त्यांची जी वृत्ति दिसून येते तीच त्यांची मोठीं मोठीं राजकारणें करतात त्यांतही प्रभावी असते. ते खरोखरच इतके त्यागी व विरागी आहेत कीं, "कदा वाराणस्याममरतटिनीरोधसि वसन्" हा भर्तृहरीचा श्लोक त्यांच्या जिव्हाग्रावर खेळत असेल

अशी कल्पना केली तरी ती कांहीं अगदींच अवस्त्वारोप केल्याप्रमाणें होईल असें नाहीं. खरें खोटें कोणास ठाऊक, पण श्रीशंकराचार्य कुर्तकोटी त्यांनाच पीठावर नेमणार अशी वार्ता कांहीं वर्षांपूर्वींच कित्येकांच्या कानीं आली होती म्हणतात.

शास्त्रीबोवांनीं 'विद्वत्व आणि कवित्व' हा लेख निबंधमालेंत लिहिला. अलीकडच्या काळीं जर कोणी 'विद्वत्व आणि नेतृत्व' असा लेख लिहिला तर त्यांत बापूजींना बरेंच वर स्थान द्यावें लागेल. ही जोडी आतां फुटत चालली आहे असें समजलें जात आहे. टिळक जसे पुढारी असून पंडित होते, तीच बापूजींची गत. विलायतेंत देखील बर्क, ग्लॅडस्टन, डिझरॅली, ॲस्क्विथ यांची परंपरा जुन्या स्वरूपांत प्रस्तुत चालू नाहीं. कदाचित् लोकशाहीच्या काळांत ही दुक्कल सदैव कायम टिकून राहणें कठीणही होईल. पुढचें कोणी सांगावें ? बापूजींची प्रत्यक्ष वाङ्मयसेवा अशी अल्पस्वल्पच आहे यांत शंका नाहीं. ग्वाल्हेरच्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष झाले होते. वऱ्हाडच्या शारदाश्रमाचे ते सूत्र-चालक आहेतही. त्यांनीं चार-सहा ग्रंथांना प्रस्तावना लिहिल्या आहेत. मराठी भाषेवर व इतर राजकीय विषयांवर त्यांचें थोडेंबहुत लिखाण आहे. त्यांच्या व्याख्यानांचा व लेखांचा एक ग्रंथ प्रसिद्धहि झालेला आहे. परंतु परांजपे, केळकर, खाडिलकर यांच्या लेखनसमृद्धीशीं त्यांची तुलना करावयाची म्हणजे दर्यामें खसखस. परंतु बापूजी केव्हां साहित्य-सेवेची बिरुदावली स्वतः डोक्यावर मिरवत नाहींत. सोलापूरच्या जिल्हासभेचे अध्यक्ष या नात्यानें त्या शहरीं गेले असतां, एका साहित्यसंस्थेनें त्यांचा व तपस्वी बाबासाहेब परांजपे यांचा सन्मान केला. उंच रानगवतांतून चालून गेल्यावर धोतरांत गुंतलेलीं कुत्रीं काढून टाकावीं, त्याप्रमाणें त्या उभयतांनींही आपल्या पदरास चिकटत असलेली वाङ्मयसेवा झाडून टाकली. वस्तुतः बापूजींची जी

वाङ्मयसेवा आहे ती कोंकणांतल्या भातशेतीसारखी आहे. एक शेत त्यांत राब पेटवून भाजावें, पाऊस पडला म्हणजे भातपेरणी करावी व त्याचे रोप चांगले उगवून तयार झाले म्हणजे मग ते उपटून बाकीच्या शेतांत दोन-दोन, तीन-तीन रोप वेगवेगळे दूर दूर लावावे. ही पुढची दुसरी विस्तरशः लागवड करण्यास बापूजींना सवडच मिळाली नाहीं. त्यामुळें त्यांच्या शेतीला पीक आलें नाहीं. मग कोठारांत धान्यसंचय कसा होणार? शिवाय, त्यांचा पेशाही थोडा निराळा. त्यांतून संधि आली तर कागदावर लेखणी ओढण्याचा मनस्वी कंटाळा. ते म्हणतातच, भाषण लिहून काढावयाचें आपल्या देवाच्यानें होणें नाहीं. तें कांहीं असलें तरी, त्यांना वाङ्मयाचा छंद असता तर ते त्या क्षेत्रांत सुद्धां पहिले नाहीं तरी, पहिल्या पंक्तींत बसण्यास पात्र ठरले असते, असें त्यांच्या असलेल्या लेखनावरून म्हणण्यास विशेष प्रत्यवाय नाहीं. ही बाजू नसल्यामुळें बापूजींची योग्यता किंचिदपि कमी होते असें मात्र नव्हे. कारण अखेरीस इतिहासांत पांडित्यप्रकर्ष श्रेष्ठ ठरणार, कां राजकीय कर्तबगारी व समरांगणावरील पराक्रम श्रेष्ठ ठरणार हें एक न सुटणारें कोडें आहे; व यदाकदाचित् तें सुटलें तर ती एक न पटणारी गोष्ट होईल. जनरल वूल्फनें शिताफीनें व शौर्यानें क्वेबेकचा किल्ला पाडाव केला. पण बाण सोडतांना, 'हा विजय संपादन करण्यापेक्षां The paths of glory lead but to the grave ही ग्रे कवीची ओळ लिहिणें बरें' असें त्यानें उद्गार काढल्याचें इतिहासांत नमूद आहे. उलट स्कॉटनें आपल्या कादंबऱ्यांतून जाज्वल्य देशाभिमानाचा प्रसार केला, पण स्वतः रणभीरु म्हणून त्याचा अधिक्षेपही कोणी केला तर तो सोसावा लागतो.

या प्रश्नाचा निर्णय कांहींही लागो वा न लागो. वर्ड्स्वर्थनें 'हॅपी वॉरियर' या कवितेंत किंवा रे. टिळक कवीनें 'लोकमित्र'

या कवितेंत जो पुरुष कल्पिला आहे, त्याच्याशीं बापूजींचें फार साम्य आहे म्हटलें तर अतिशयोक्ति नाहीं, वस्तुवर्णनच आहे. प्रत्येक तरुण हिंदी कार्यकर्त्यानें त्यांचेंच उदाहरण डोळयांसमोर ठेवावें. हा 'सुखी योद्धा' आपल्या अंतःकरणांतील दीपशिखेच्या प्रकाशांत व्यवहार करतो. जितकें दुःख व कष्ट अधिक तितकी त्याची सहनशीलता वाढती. एकदां ध्येय निश्चित केलें कीं, त्याच्या पूर्तीसाठीं अव्यभिचारी निष्ठा व अप्रातिहत यत्न. अकस्मात् आपत्ति कोसळली तरी त्याची बुद्धि विचलित होत नाहीं. राष्ट्राच्या डोळ्यांत भरण्यासारखा अग्रपूजेचा मान मिळो अथवा अप्रसिद्ध स्थितींत राहून कार्य करण्याचा प्रसंग येवो. आयुष्यांत जी सिद्धि प्राप्त करून घ्यावयाची असते, तिच्यासाठींच परिश्रम करीत असतो. समोर धोका असला तरी डरत नाहीं, सुखाच्या विचारनें कच खात नाहीं. झालें एवढें पुष्कळ झालें, इतिकर्तव्यता झाली, असें म्हणून संतुष्ट होऊन राहात नाहीं, तर दृष्टि पुरोभागीं फेकतो. अखेरपर्यंत यत्नसायास सोडीत नाहीं. कालच्याहून आज, आजच्याहून उद्यां अधिक, अशा चढत्या श्रेणीनें यशःप्राप्तीच्या मार्गाचें आक्रमण करीत जातो. असा वर्ड्स्वर्थचा 'हॅपी वॉरियर,' असाच रे. टिळकांचा 'लोकमित्र' आणि असेच आमचे बापूजी अणे. आणि म्हणूनच शेवटीं त्या आंग्ल कवीच्या शब्दांच्या अनुरणनाचा वाचकांस आराम व लेखणीस विराम देऊं या:—

This is the Happy Warrior; this is he
That every man in arms should wish to be.

आणि म्हणूनच रेव्हरंड टिळकांच्या समवेत आपणही भरतवाक्य गाऊं या:—

**धन्य ! धन्य ! या धन्य विभूति ! प्राप्ति यांची स्वर्गप्राप्ति !**
**देवा ! यांची भारत जगती वाट सदा बघते !**

# १२

# पंडित जवाहरलाल नेहरू

शमयति गजानन्यान् गंधद्विपः कलभोऽपि सन्
भवति सुतरां वेगोदग्रं भुजंगशिशोर्विषम् ।
भुवमधिपतिर्बालावस्थोऽप्यलं परिरक्षितुम्
न खलु वयसा जात्यैवायं स्वकार्यसहो भरः ॥

—विक्रमोर्वशीयम्

महात्मा गांधींचा संयुक्त प्रांतांतील दौरा कांहीं आठवड्यांपूर्वी संपला. परत जातांना लोकांनीं त्यांना विनंति केली, "महात्माजी, आपला कांहीं तरी संदेश सांगा कीं जो आम्हीं सगळ्या जनतेला निवेदन करावा." महात्माजींची लघुसंदेशपदा वाणी बाहेर पडली कीं, "सर्वजण पंडित जवाहरलाल व्हा." नेपोलियन बोनापार्टला ज्याप्रमाणें कौतुकानें 'लिट्ल् कॉरपोरल्' म्हणून पदवी देण्यांत येत असे, त्याप्रमाणें म. गांधी पं. जवाहरलालजींना नेहमीं मजेनें 'आमचा तरुण सेनापति' या नांवानें संबोधतात. आजकाल ज्याच्या त्याच्या तोंडीं पंडित जवाहरलाल नेहरू व बाबू सुभाषचंद्र बोस. सर्वांचे डोळे या उभयतांच्या हालचालींकडे व संभाषणा-व्याख्यानांकडे. यंदा नागपूरला अखिल भारतीय मजूर-संघ परिषद् होती, तिचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल. गुदस्तां पुण्यास मुंबई इलाखा युवक परिषद् होती, तरी तिच्या अध्यक्षत्वाची माळ पंडित-जींच्या गळयांत. अगदीं १९१२ सालीं बॅरिस्टर होऊन ते परत आले, तेव्हांपासून नाहीं तरी १९१७ सालीं मिसेस ॲनी बेझंट यांच्या होमरूलच्या चळवळींत ते भाग घेऊं लागल्यापासून राजकीय आंदो-लनाच्या आघाडीस ते आहेतच असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

१९१९ सालीं 'इंडिपेंडंट' पत्राचे ते डायरेक्टर झाले. पंजाबमधील हत्याकाण्डानंतरच्या राष्ट्रीय सभेच्या चौकशींत प्रमुखपणें त्यांनीं आपल्या कामाचा वांटा उचलला. १९२० सालीं वकिलीवर उदक सोडलें. नंतर औध येथील शेतकी चळवळींत पुढाकार घेतला, व कुळांचा कायदा बदलून घेतला. १९२३ सालापासून तर राष्ट्रीय सभेचे ते सर चिटणीस आहेतच. हिंदुस्थानी सेवादलाचे ते दोनदां सभापति झाले; पहिल्या रिपब्लिकन (स्वाधीन भारत) परिषदेची मुहूर्तमेढ मद्रास येथें १९२७ मध्यें त्यांनीं रोंवली. साम्राज्य-विरोधी संघाची जागातिक परिषद् दोन वर्षांपूर्वी ब्रूसेल्स येथें भरली, तिला हिंदी राष्ट्रीय सभेचे पहिले प्रतिनिधि म्हणून तेच हजर; सोव्हिएट रशियांतील स्थिति ते समक्ष अवलोकन करून आले, व तत्संबंधीं असें चित्ताकर्षक पुस्तक निर्माण केलें कीं, तें थोडक्या अवधींत कल्पनेबाहेर लोकप्रिय होऊन बसलें. स्वातंत्र्य–संघाचे प्रणेते तेच. युवकांच्या चळवळीचे सूत्रधार तेच. संयुक्त प्रांतीय परिषदेस दोनदां अध्यक्ष तेच. केरळ व पंजाब प्रांतिक परिषदांच्या वरासनांवर ह्यांचीच योजना. अखिल वंगीय विद्यार्थि–परिषदेच्या व्यासपीठावर तेच अधिष्ठित. सरकारच्या रोषास तर चारपांच वेळां बळी पडलेले. १९२० सालीं त्यांनीं अफगाणिस्थानच्या वकिलांस भेटूं नये म्हणून त्यांना बंदी. १९२१ सालीं असहकारितेंत सहा महिने शिक्षा. तीन महिन्यांनीं सुटका होतांच फिरून पावणे दोन वर्षें कारागृहवासाची सजा; पुन्हा मुक्तता व नाभाच्या अकाली शीखांच्या बाबतींत पुन्हा अटक.

फार काय, आतां खुद्द राष्ट्रीय सभेचेच ते अध्यक्ष, व ते देखील रडत रडत अध्यक्षस्थान स्वीकारून नव्हे. बहुसंख्याक प्रांतिक कॉंग्रेस कमिट्यांनीं निवड केली होती महात्माजींची. त्यांनीं नकार दिला. सरदार वल्लभभाईंना विचारलें, तेव्हां ते म्हणाले, 'How can

a soldier dare to take up the place that the General himself shrinks from?' पंडित मोतीलाल नेहरूंचेंही नांव पुढें आलें. त्यांनीं मखलाशी करून चेंडू उडवून लावला. त्यांनीं उत्तर केलें, 'If Mahatma Gandhi is a back number, I am much more so, being eight years his senior.' चालू अध्यक्ष पं. मोतीलालजींसारखे श्रेष्ठ मुत्सद्दी, व नवीन अध्यक्षाच्या जागीं निवडणूक व्हावयाची अननुभवी मुलाची. तथापि जेव्हां म. गांधींनीं खाजगी रीतीनें पुत्र पंडित जवाहरलालजींना पृच्छा केली तेव्हां त्यांनीं 'नार्हति तातः पुंगवधारितायां धुरि दम्यं नियोजयितुम्,' असे विक्रमोर्वशीयम् नाटकांतील कुमाराप्रमाणें राजकारणांत अस्थानीं असणाऱ्या शालीनतेचे उद्गार काढले नाहींत. तर त्यांनीं ठासून म. गांधींना सांगितलें, 'If it is thrust upon me, I hope I shall not wince.' शत्रुपक्षाच्या डोळ्यांत सलणाऱ्या व त्याचा नायनाट करण्यासाठीं सज्ज असलेल्या या लोकपक्षीय बिनीच्या स्वाराकडे पाहिल्यावर,

'समरशिरसि चंचत्पंचचूडश्चमूना।—
मुपरि शरतुषारं कोऽप्ययं वीरपोतः (किरात)'

हा श्लोक क्षणभर एखाद्याच्या स्मृत्याकाशांत चमकून गेला तर तें यथायोग्यच होय.

जवाहरलालजींची उमर अवघी उणीपुरी चाळीस वर्षांची! पण इतक्या वर्षांत एवढी लोकसेवा व मानसन्मान फारच थोड्यांच्या नशिबीं येतात. ते राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष निवडले गेले तेव्हां पुष्कळांना आश्चर्य वाटलें. वृद्धांनीं घूत्कार केला कीं, अगदींच पोरसवदा अध्यक्ष झाला; राष्ट्रीय सभेंत पोराटकी व बाळनायकी व्हावयाची, दुसरें काय? तथापि कर्तबगारी वयावर थोडीच अवलंबून असते! गंधद्विपाचा बच्चा कां असेना, इतर हत्तींना भारी असावयाचा; वति-

भर लांब असला तरी अस्सल सापाचें विष सौम्य असतें असें नाहीं. तसेंच धाकट्या पंडितजींचें. विल्यम् पिट इंग्लंडचा मुख्य मंत्री झाला तेव्हां तर तो पं. जवाहरलालजींपेक्षां किती तरी लहान नव्हता का ? महाराज दशरथाच्या दरबारीं पोक्त माणसें नव्हतीं असें नाहीं; परंतु अध्वरविघातशांतीसाठीं विश्वामित्र ऋषीनें त्यांच्याकडे याचना केली ती काकपक्षधर प्रभु रामचंद्राची. असें आहे म्हणून तर 'तेजसां हि न वय: समीक्ष्यते ' असा कालिदासानें सर्वांच्या तोंडीं बसलेला मनोज्ञ अर्थांतरन्यास आपल्या प्रतिभेनें निर्माण केला.

पं. जवाहरलालजींच्या या तेजोमय व विस्फारित होणाऱ्या चारित्र्याचें आश्चर्य वाटतें तें असें कीं, पं. जवाहरलालजींसारख्या अत्यंत संपन्न वडिलांच्या पोटीं जन्मास येऊन अशी जगाविराहित गोष्ट कशी घडली ? इंग्लिश भाषेंत म्हण आहे:—He that hath one hog, makes him fat; and he that hath one son, makes him a fool. ' जवाहर म्हणजे एकुलता एक मुलगा. सर्व कुटुंबच शिरीषपुष्पाप्रमाणें नाजुक. ' पांडवप्रतापां ' त श्रीधरानें एके स्थळीं वर्णन केलें तें नेहरूंच्या कुटुंबीयांना लावावयाचें म्हटलें तर, सर्व मुलें–माणसें अशीं गौरवर्ण, कोमल व कांतिमय कीं नवनीताचीं घडलीं आहेत, कापराच्या चूर्णाचीं बनविलीं आहेत, गंगेचें पाणी तर नाहीं ना आटवून मनुष्याकार झालें, चंद्रकिरणांचीं ओतलीं का क्षीरसागरांतून बाहेर पडलीं, असें पाहणारांस वाटावें. त्यांतल्या त्यांत जवाहर म्हणजे राजबिंडा मुलगा. मग काय विचारावें ? पण त्यांच्या बाबतींत पं. मोतीलालजींनीं वरील इंग्लिश म्हण खोटी ठरविली. मुलास विद्या पहिल्या प्रतीची प्राप्त करून देण्यासाठीं जेवढ्या सोयी करतां येण्यासारख्या होत्या तेवढ्या त्यांनीं केल्या. जसा कांहीं जवाहर म्हणजे इंग्लंडांतील एखादा बड्या लॉर्डाचाच मुलगा. हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षण नामांकित खाजगी इंग्लिश शिक्षकांमार्फत;

इंग्लंडमध्यें हॅरोच्या सुप्रसिद्ध शाळेंत दुय्यम शिक्षण; केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत प्रवेश व पुढील अभ्यास; व शेवटीं इनर टेंपलमध्यें बॅरिस्टरच्या ज्ञानाचें संपादन. याशिवाय पोहणें होतें, घोड्यावर बसणें होतें, गिर्यारोहण होतें, व शिशिरक्रीडा होतीच. मुलाच्या विद्यार्जनाची व सर्वांगीण प्रगतीची इतकी चिंता बापानें वाहिल्यावर व मुलगाही जातिवंत कर्तृत्ववान् असल्यावर पं. जवाहरलालजीं-सारखें नररत्न भारतमातेच्या कां बरें हृदयावर दैदीप्यमान होणार नाहीं? सूर्याच्या पोटीं शनैश्वर आला नाहीं; प्रतिसूर्य उदय पावला. दिव्यापासून अधिक ज्योतिर्मय असा दुसरा प्रदीप तळपूं लागला. अशा मुलाचें किती किती म्हणून कौतुक व्हावें? पित्यालाच केवळ जीव कीं प्राण वाटावा असें नव्हे, तर साऱ्या 'आनंदभुवना'चा आनंद तोच; लहानमोठ्यांच्या, नोकराचाकरांच्या, आल्यागेल्याच्या प्रेमाचें निधान तेंच. कोडकौतुक इतकें कीं, 'From the Cradle to the Bar' या नांवाचे पं. जवाहरलालजींच्या फोटोचें एक पुस्तक बांधवून ठेवीसारखें जपून ठेवलें आहे तें पहावें म्हणजे त्याची थोडीबहुत कल्पना येते. प्रेमळ पित्याला आपल्या लाडक्याच्या सगळ्याच गोष्टींचें कौतुक. जवाहर तुरुंगांत गेला तेव्हां थट्टेनें पं. मोतीलालजींनीं म्हणावें, आतां 'From the Bar to the Prison-bar' असा या पुस्तकाचा दुसरा भाग तयार केला पाहिजे.

अशी परिस्थिति असून देखील पं. जवाहरलालजींनीं आजन्म देशसेवेची दीक्षा पत्करली व असिधाराव्रत स्वीकारलें हेंच त्यांचें वैशिष्ट्य व लोकोत्तरत्व. आणि तें खरेंच आहे. कमळ स्वच्छ सरो-वरांत उत्पन्न झालेलें, विष्णूच्या हातांत त्याचा निवास, आपण स्वतः लक्ष्मीचें घर, सुगंध घ्यावा तो देवांचें हृदयही काबीज करणारा; असे गुण कमळाच्या अंगीं, पण त्या सर्वांची पराकाष्ठेची उन्नति किंवा त्यांचें उत्कृष्ट चीज केव्हां म्हणावयाचें? जगन्नाथ पंडितानें आपल्या

उल्लासांत म्हटल्याप्रमाणें, जेव्हां द्विजश्रेष्ठ हंसाच्या ठायीं त्याची प्रीति असेल तेव्हां. एरव्हीं नाहीं. पं. जवाहरलालांच्या अंगीं खरोखरच अनेक गुण आहेत. 'निसर्गभिन्नास्पदमेकसंस्थमास्मिन्द्वयं श्रीश्च सरस्वती च' असें त्यांचें वर्णन केलें तरी त्यांत अतिशयोक्ति नाहीं. त्यांच्या ऐश्वर्यसंपत्तीबद्दल बोलावयासच नको; पण विद्यादेवीनें देखील त्यांच्यावर वरदहस्त जणुं ठेवला आहे. विलायतेंत ट्रिनिटी कॉलेजांत बी. ए. च्या परीक्षेंत सन्मान मिळवून ते उत्तीर्ण झाले. इतकेंच नव्हे, त्यांच्या खोल विचारांचें व दांडग्या वाचन—व्यासंगाचें प्रत्यंतर त्यांच्या लेखन-भाषणांत मिळतें. रिकामा वेळ सांपडला कीं तो एखाद्या महत्त्वाच्या ग्रंथाच्या परिशीलनांत गेला म्हणून समजावें. अलाहाबादेहून पुण्यास यावयास निघाले तरी ट्रंकेंत रशियाविषयीं कांहीं निवडक नूतन पुस्तकें, कोठें एमिली लडविगचें नेपोलियनचें ताजें चरित्र असें सांपडावयाचें. एखाद वेळ आवडत्या मुलीसाठीं व्हिएन्ना येथें विकत घेतलेली नामी कलाकुसरीची रेशमी पिशवी हातीं लागावयाची; व ती अशी कीं, दृष्टीस पडतांच व तिला स्पर्श करतांच तिनें आपल्या कानांत आपणांस विकत घेणाराच्या ललितवस्तुप्रियतेची व अभिजात सौंदर्यसमीक्षेची गोष्ट गुणगुणत सांगावी. निसर्गसुत वर्ड्स्वर्थ कवीनें आपल्या 'एक्स्कर्शन' काव्यांत, एका मुलीला हातांतील शिंपला स्वतःच्या मातृ-जलनिधीची कथा साकल्यानें पण निःशब्द आवाजांत सांगत असल्याचें नाहीं कां वर्णन केलें? दोन-चारदां कारागृहवास भोगला, तथापि बाहेर आल्यावर आंत कालक्षेप कसा केला विचारलें, तेव्हां जाड्या तीन वह्या त्यांनीं दाखविल्या. आंत उघडून पाहिलें तों तेथें वाचलेल्या हिंदी—इंग्रजी गद्यपद्य पुस्तकांतील टिपणें व उतारे.

लेखन-पद्धतीही फार सुंदर व गोंडस. गेल्या वर्षीच्या येथील युवक-परिषदेचें भाषण सर्व आगगाडीच्या प्रवासाच्या धबडग्यांत

चौकी व भुसावळ यांच्या दरम्यान लिहिलेलें. परंतु तें इतकें रेखीव व चिरेबंदी भाषेंत लिहिलें आहे व त्यांतील विचार इतके गंभीर व चिंतनीय आहेत कीं, प्रत्येकानें तें तोंडपाठ ठेवावें. अर्भकाविषयीं एक वाक्प्रचार रूढ आहे कीं, 'They are to be seen, not heard,' तसें त्यांच्या भाषणाविषयीं कोणी असें विधान केलें कीं, तें कानानें ऐकण्यापेक्षां डोळयांनीं वाचलेलें अधिक परिणामकारक, तर तें सर्वस्वीं खोटें ठरणार नाहीं. कारण त्यांचें व्याख्यान आपलें बेताचें. काठी मोठी भव्य नाहीं, पोषाख म्हणजे खादीचा पायघोळ सदरा, वर बिनगुंड्यांचें जाकीट, डोक्यावर खादीचीच टोपी व नेसलेलेंही धोतर खादीचेंच, फारच थंडी कडाक्याची असली तर शाल पांघरलेली, वाणी विशेष तेजस्वी व प्रोद्दीपक नाहीं, बोलतांना जीभ जरा अडखळणारी व सभेला गर्दी मी म्हणणारी. या तयारी-निशीं कसलें व्याख्यान आणि काय ? तथापि व्याख्यानाला ते डर-तात असें नाहीं. जंगी सभांत बोलतात, आणि त्यांची कार्यनिष्ठा व कळकळ अशी आहे कीं, उपरिनिर्दिष्ट सर्व दोष असून देखील श्रोतृ-वृंदांना ते आपलेसे करून घेतात.

वास्तविक पं. जवाहरलाल हे सोन्याचे गोकर्ण तोंडांत धरूनच जन्मास आलेले; जसे कांहीं कुबेराच्या श्रीमंतींत वाढलेले. एवढ्या-बरोबर आळस यावयाचा; पण जवाहरलाल इतके निरलस कीं त्यांच्या-बरोबर काम करणें कठिणच. बरें शिस्तबाज असे कीं कांहीं विचारण्याची सोय नाहीं. अलाहाबादेस असले म्हणजे अकरा ते पांच राष्ट्रीय सभेच्या हेवेट रोडवरील कचेरींत जाऊन काम करीत बसावयास कदापि चुकावयाचे नाहींत. कचेरीची व्यवस्था तर अशी ठेवली आहे कीं, जणुं काय सरकारी सेक्रेटरीएटच. मोठ्या प्रमाणावर भारतवर्षभर प्रतिस्पर्धी लोकसत्ता प्रस्थापित होणें शक्य असेल किंवा नसेल. एकवीस प्रांतिक कमिट्या, जिल्हा कमिट्या व एकंदर

राष्ट्रीय सभेचा प्रपंच या बाबतींत तरी पं. जवाहरलाल यांनीं सर चिटणीस झाल्यापासून अत्यंत सुयंत्रितपणा चांगलाच चालू करून ठेवला आहे. पत्रांचीं उत्तरें नेमल्यावेळीं मुद्देसूद पाठविणें हा साहेबांचा गुण त्यांनीं तंतोतंत उचलला आहे. पत्नीच्या प्रकृतिस्वास्थ्या-साठीं जिनीव्हाला गेले असोत अगर डलहौसी-मसूरी येथें असोत, किंवा राजकीय दौऱ्यावर असोत, त्यांच्या टपालाची निरवानिरव नमुनेदार पद्धतीनें व्हावयाची. त्यांचे जोडीदार बाबू सुभाषचंद्र बोस आहेत. पण सुभाषबाबूंच्या राज्यांत पोस्टखातें अजीबात नाहीं असें त्यांचें वर्तन; क्वचित् तारखातें असलें तर असावयाचें. दासबाबूंचेंही असेंच. पं. मदनमोहन मालवीय यांचा देखील तोच खाक्या. नेपो-लियनची अशी कथा सांगतात कीं, पत्रें आलीं म्हणजे पंधरा दिवस टेबलाच्या खणांत ठेवावयाचीं व मग खण उघडून पत्रें वाचावीं तों बहुतेकांचीं उत्तरें आपोआपच जाऊन तीं विल्हेस लागलेलीं असा-वयाचीं. पत्रोत्तराच्या नियमितपणांत पं. जवाहरलाल नेहरूंचें उदा-हरण नजरेसमोर ठेवण्यासारखें. स्वभावाचा साधेपणाही असाच आश्चर्योत्पादक व त्यांच्या खानदानी नबाबशाहीशीं विसंगत दिसण्या-सारखा. कोणीही सामान्य माणसानें जावें व त्यांना भेटावें, कोणाला फारसा निर्बंध त्यांच्या संबंधांत तरी नाहीं. पं. मोतीलालजींच्या संबंधांत काय आडकाठी असेल ती वेगळी. स्वतः जवाहरलाल आपणांस शिपाई समजतात व तसे वागतात देखील. मग इतका साधेपणा त्यांच्या वागणुकींत असावा हें साहजिकच होय. एखादे वेळेस बोलण्यांत किंचित् दिमाखाची झांक मारते, नाहीं असें नाहीं. कल्याणहून मोटारीनें पुण्यास येतांना खंडाळा, लोणावळा हीं आपलीं महाराष्ट्रीय थंडगार हवेचीं ठिकाणें वाटेंत लागलीं. ते सहजगत्या बोलून गेले, " Oh, these are apologies of hill-stations ! " तथापि सौंदर्यनिरीक्षणाची व सांस्कृतिक विद्येची अभिरुचि इतकी

जबर कीं, त्याच वेळीं मुद्दाम मोटार थांबवून, पायानें इकडे- तिकडे पुष्कळ फिरून आले व कारल्याचीं लेणीं तर सूक्ष्मभावानें तज्ज्ञा-प्रमाणें पाहिलीं. त्यांची शोधकबुद्धि किती कुशाग्र होती तें त्यांनीं अलाहाबादेहून मसुरीस आपल्या दहा वर्षांच्या इंदिरेला पाठविलेल्या व नुकत्याच ग्रंथरूपानें प्रकाशित झालेल्या पत्रांत दृग्गोचर होतें. कार्य उरकण्याची चपळाई अशी दिसते कीं, ऑल-इंडिया काँग्रेस-कमिटीच्या सभांतून चिटणीस या नात्यानें किंवा एका परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें तडित्स्फुरणाप्रमाणें चटचट आपल्यापुढील कामाचा ते निकाल लावतात.

वयोमान परिपक्क कमी, वडिलांचा मुलगा म्हणूनही कदाचित् मोठेपणा जरा लवकर व प्रभूत प्राप्त झालेला, योग्यताही सामान्याच्या वरच्या दर्जाची. यामुळें त्यांच्यांत कांहीं दोष शिरले आहेत यांत शंका नाहीं. अनुभवाचें व विवेकाचें माप थोडें कमी म्हणून म्हणा अथवा उत्सवाचा, कळकळीचा व स्वातंत्र्य-लालसेचा अतिरेक म्हणून म्हणा, त्यांचें बोलणें–चालणें कांहीं कांहीं प्रसंगीं उर्मटपणाचें भासतें. सभा चालू असतां कोणाला ‘तुम्हांला युनिटरी पद्धति व फेडरल पद्धति यांमधील अंतर कळलें आहे कीं नाहीं, याची वानवा आहे’ असें टाकून बोलावयाचें, तर एखाद्या पक्क्या मुरलेल्या ब्रिटिश मुत्सद्द्याचा ‘He has not the brains of a cat’ असा अधिक्षेप करावयाचा, हें अंमळ चमत्कारिक म्हणावें लागतें. कार्य करतांना त्यांचा तादृश अविवेक दिसून येतो तसा तो त्यांच्या विनोदांतही आढळतो. व्हाइसरॉय साहेबांच्या जाहीर-नाम्याला उत्तर म्हणून तयार केलेल्या पुढाऱ्यांच्या पत्रकावर स्वातंत्र्य-वादी असून सही केली व मग, ‘I have made the mistake of my life’ अशा पश्चात्तापानें विदग्ध होऊन बसले व मित्रांना लिहूं लागले, ‘It will be set right soon.’ हेंच विनोदांत. अध्यक्ष-

पदावरच्या उपसंहाराच्या स्वतःच्या भाषणास 'प्रेतयात्रेचें भाषण' असें म्हणण्यांत सदभिरुचि काय? कदाचित् 'Indiscretion is the better part of valour' असें त्यांचें मत असल्यास न कळे. असें होतें हें खरें. परंतु एवढ्या कार्यैकनिष्ठ, उद्यमशील, शिस्तबाज तहाहयात देशसेवकाच्या अंगांत थोडेसे अवगुण दिसले तरी, त्यांच्याकडे कानाडोळा करणें योग्य व जरूर नाहीं काय? अगदीं निर्दोष व धुतल्या तांदुळासारखा निर्मल कोण मनुष्य सांपडणार बरें? म्हणून तर सुभाषितकार म्हणतात, 'एकोहि दोषो गुणसंनिपाते निमज्जतींदोः किरणेष्विवांकः' व म्हणूनच तर शेक्सपीयरनें लिहून ठेवलें कीं,

"They say, best men are moulded out of faults;
And, for the most, become much more the better
For being a little bad."

आणि त्यांचें थोडक्या अवधींतील कार्य व त्यांचें गुणबाहुल्य यांच्या योगानेंच तर ते आज हिंदी जनतेच्या गळ्यांतील ताईत होऊन बसले आहेत. सन १९२० सालापासून म. गांधींनीं जसें एका दृष्टीनें हिंदी राष्ट्रीय चळवळीला निराळें वळण लावलें, तसें पं. जवाहरलालजींनींही लावलें आहे. राष्ट्रीय सभेचा हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत बोलबाला महात्माजींनीं केला. पंडितजींनीं राष्ट्रीय सभेचा कीर्तिडिंडिम सुधारलेल्या जगभर वाजविला व राष्ट्रीय सभेची विजयपताका इंग्लंड, जपान वगैरे राष्ट्रांत नेऊन फडकविली. रशियांतील परिस्थितीचें अवलोकन करून आले, स्वतः समाजसत्तावादी बनले व प्रायः सर्व राष्ट्राची मनोवृत्ति पालटून टाकली. इतके दिवस ते तरुणांचे अध्वर्यु म्हणून गणले जात होते. आतां ते अखिल जनतेचे सेनापति झाले आहेत. परवां लाहोरास त्यांची घोड्यावरून जी प्रचंड मिरवणूक लोकांनीं काढली ती या सेनानीच्या सन्मानाची द्योतक न म्हणावी

तर काय ? एकावन्न तोफांची सलामी काय, दोन लाख जनसंमर्द काय, घोडेस्वार काय व इतर लवाजमा काय ! 'टाईम्स'च्या बातमीदारानें तोंडांत बोट घातलें. त्यानें देखील पं. जवाहरलालजींना 'The idol of the revolutionary wing in the Congress' व 'The youthful politician who is determined to make history at Lahore' अशा पदव्यांनीं भूषविलें.

जवाहरलालजींच्यावर सांप्रत खूप मोठी जबाबदारी आली आहे. एकंदर राष्ट्र व राष्ट्रीय सभा क्रांतीच्या जबरदस्त धुमश्चक्रींत प्रवेश करीत आहे. अध्यक्षपद सोडतांना व मुलास वस्त्रें अर्पण करतांना पं. मोतीलाल नेहरू यांनीं आशा प्रकट केली कीं, पित्याचें कृत्य पुत्रानें तडीस न्यावें. ते सार्वत्रिक क्रान्तीचे मानसपुत्र आहेत. आज समाज सुखी नाहीं. समाजांतील सर्व घटकांस सारखेंच सुख-समाधान संपादन करून घेतां आलें पाहिजे, अशी समाजसत्तावादाच्या पायावर सामाजिक पुनर्घटना करणें हें त्यांचें एक ध्येय. आणि सर्वांस राजकीय स्वातंत्र्य मिळवून देणें हें दुसरें. सामान्य जनता म्हणजे मजूर, शेतकरी इत्यादींचे संघ निर्माण करून त्यांच्यामार्फत अनत्याचारी राष्ट्रीय संप घडवून आणणें हा त्यांचा मार्ग. सगळी विचारसरणी व वागणूक या मार्गाप्रत पोंचविणारी. त्याच्याकरितां 'आनंदभवना'ची धर्मशाळा झाली तरी चिंता नाहीं, ही मनाची तयारी. जवाहरलालांची तडफ व तरतरी अशी आहे कीं, ते आपल्या कामांत केव्हांही कसूर किंवा अंगचोरपणा करतील हें स्वप्नांत देखील संभवनीय नाहीं. अज व रघु, फिलीप व अलेक्झांडर, बाळाजी विश्वनाथ व बाजीराव, कृष्णशास्त्री व विष्णुशास्त्री चिपळूणकर या पिता-पुत्रांच्या जोड्यांप्रमाणें मोतीलाल व जवाहरलाल ही जोडी देखील इतिहासांत निःसंशय चिरस्मरणीय होईल. 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' या न्यायानें 'पुत्रादिच्छेत् पराजयम्' हा न्याय देखील

पेत्यांना अभिमानास्पद नव्हे का? गुरु महात्माजी व पिता पंडित गोतीलालजी या दोघांनाही स्वातंत्र्य हिंदुस्थानाच्या दृष्टिपथांत आणतां आलें नाहीं तें शिष्य व पुत्र पं. जवाहरलालजी यांनीं आणलें तर त्याहून बहारीची दुसरी कोणती गोष्ट असणें शक्य नाहीं. सारथि श्रीकृष्ण व योद्धा धनुर्धर पार्थ असा सदृशसंयोग जुळल्यावर यशःसिद्धि पूर्ण व्हावी हें ईश्वराचें देणें आहे. शिवाय, पं. जवाहरलालजींचा विशेष भर युवकसंघाच्या चळवळीवर आहे व तरुणांनाही महात्माजींनीं 'पं. जवाहरलाल व्हा' असा उपदेश केला आहे. पण वस्तुतः या सूत्रांत उपदेशापेक्षां आशीर्वादच अधिक भरलेला आहे. महापुरुषांचा आशीर्वाद बहुशः विफल नसतो. महात्माजींचा हा आशीर्वाद लवकरच खरा ठरो; पं. जवाहरलाल नेहरूंना स्वीकृत कार्यांत विजय प्राप्त होवो व महात्माजींच्या तोंडांत साखर पडो!!

---

## १२

# बाबू सुभाषचंद्र बोस

दधानः प्रेमाणं तरुषु समभावेन विपुलं
न मालाकारोऽसावकृत करुणां बालबकुले ।
अयं तु द्रागुद्यत्कुसुमनिकराणां परिमलै—
र्दिगन्तानातेने मधुपकुलझंकारभरितान् ॥

—जगन्नाथपंडित.

डेक्कन जिमखान्याच्या मैदानावरील प्रसंग. १९२८ सालच्या मे महिन्याचे दिवस होते. रात्रीचा समय. शुभ्र चांदणें पडलें होतें. येथें भरलेली महाराष्ट्र प्रांतिक परिषद् संपून महाराष्ट्रीय प्रतिनिधि-मंडळी श्रमपरिहाराचा फराळ वगैरे आटोपून मौजेनें एकत्र बसली होती. मांडवपरतण्याच्या निमित्तानें म्हणून स्वागताध्यक्ष कै. शिवरामपंत परांजपे बोलावयास उभे राहिले व त्यांनीं पहिलेंच वाक्य उच्चारलें तें हें : 'वर एक चंद्र प्रकाशत आहे आणि खालींहि एक चंद्र आज अधिष्ठित आहे !' सहज सुचलेली उपमा, परंतु खरोखरच अत्यंत अर्थपूर्ण व समर्पक होय. नांवानें सुभाषचंद्र तसे खाजगी व सार्वजनिक कार्यांत व वर्तनांत देखील. प्रत्यक्ष नामाभिधान व आचारविचार यांचें इतकें सादृश्य फारच क्वचित् दिसून येतें. एरवीं 'नांव सोनूबाई आणि हातीं कथलाचा वाळा' ही म्हण कशाला रूढ होती व कालिदासानें तरी 'परंतपो नाम यथार्थनामा' असा रघुवंशांतील स्वयंवर-वर्णनांतील एका राजाचा विशिष्ट गौरव कशाला केला असता ? शेक्सपीयरनें तिरस्कारानें विचारलें कीं, नांवांतच काय आहे ? गुलाबाला कोणतींही नांवें ठेवलीं तरी त्याचा

सुवास कायमच. तथापि नांव, कर्तृत्व व स्वभाव यांचा उत्तम मेळ जमला तर त्यांत पराकाष्ठेचें स्वारस्य नाहीं असें कोण बरें म्हणणार? 'अधिकस्याधिकं फलं' हा जगाचा न्यायच होय. दुधांत साखर पडली तर माधुर्य वाढणार व सोन्याला सुगंध प्राप्त झाला तर त्याच्या किंमतींत जास्त भर पडणारच.

सुभाषचंद्रांच्या वाणींत निरातिशय गोडी भरलेली आहे, व त्यांची चालचालणूकहि चंद्राप्रमाणें शांत, प्रसादयुक्त व आल्हाददायक आहे. त्यांच्या तोंडून एखादा तरी दुसऱ्यास लागणारा शब्द बाहेर पडत असेल कीं नाहीं याची शंका वाटते. किती कामानें कंटाळले असले तरी चेहऱ्यावर त्रासिकपणाची छटा नाहीं अगर कपाळावर आठी चढावयाची नाहीं. सर्व आयुष्यच लोकसेवेला व राष्ट्रस्वातंत्र्याला वाहिलेलें असल्यामुळें लहानथोर अनेक व्यक्तींशीं सदैव बोलण्या-चालण्याचा प्रसंग; पण पावसाला अथवा सूर्यप्रकाशाला राजवाडा व झोपडी हा विधिनिषेध नाहीं, त्याप्रमाणें त्यांचा स्वाभाविक गोडवे-पणा व वाङ्माधुर्य यांचा प्रवाह अखंड चालूच. कलकत्त्यास त्यांच्या राहत्या बंगल्यांत तागाच्या गिरणींतील कामगार, जमशेटपूर येथील मजूर, विद्यार्थी व इतर तरुण लोक व शिष्ट नागरिक यांची सारखी पैरवी असावयाची; परंतु सुभाषबाबूंच्या जिभेला खळ नाहीं, आपले-पणानें व प्रेमानें बोलण्यांत कमतरता नाहीं, समोर बसलेला माणूस केव्हां निघून जातो आहे असें कधीं वाटलें नाहीं, कीं टेबलावरील किंवा मनगटावरील घड्याळाकडे चोरटी नजर नाहीं. बाहेरगांवीं गेले तरी तसेंच. ते स्वतः दुसऱ्या कोणाकडे भेटावयास गेले तरी तीच रीत. मुंबईस वुईटर रोडवरील बाबासाहेब जयकरांच्या बंगल्यांत दासबाबूंच्या स्नेहास स्मरून उतरले काय, कांतिलाल परेख यांच्या ऑपेरा हाऊस शेजारच्या बंगल्यांत स्वतःची त्यांच्याशीं केंब्रिज येथील कॉलेजांतील मैत्री म्हणून उतरले काय, अगर पुण्यास अण्णा-

साहेब भोपटकरांच्या ‘बलवंताश्रमांत’ उतरले काय त्यांच्याकडे येणाऱ्या–जाणाऱ्यांचा सतत ओघ असावयाचा. आश्चर्य असें कीं एवढ्या जंजाळांत सुद्धां सुभाषबाबू जसा गृहस्थ येईल तसे त्याच्याशीं संभाषण करीत राहावयाचे. त्यांतच जयकर यावयाचे, त्यांतच मजूर–संघाचे लोक यावयाचे, त्यांतच युवक–संघाचे कार्यकर्ते तरुण सल्लामसलतीला यावयाचे, त्यांतच अमेरिकन बातमीदार तासन्तास त्यांच्याशीं उच्च राजकारणाची चर्चा करण्यास यावयाचे, त्यांतच हिंदी वर्तमानपत्रांचे प्रतिनिधि मुलाखत घेण्यास यावयाचे, त्यांतच फोटोग्राफर फोटो काढून घेण्यास यावयाचे; असे एक ना दोन, किती प्रकार वर्णावे?

सुभाषबाबूजींचा कारभार मात्र अगदीं धिम्मेपणानें व शांत चित्तानें चालावयाचा. बिचाऱ्यांना घाई हा शब्दच ठाऊक नाहीं. दुसऱ्या दिवशींच्या प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनासाठीं आदल्या रात्रीं १२। चे गाडीनें पुण्यास जावयास निघावयाचें, पण बारा वाजून पांच मिनिटें झालीं तरी हे राजश्री आपले बॅरिस्टर जिना व विठ्ठलभाई यांच्याकडे सावकाश गप्पा मारीत बसलेले. रात्रींच्या लाहोर एक्सप्रेसनें धुळ्यास जाण्यासाठीं निघावयाचें, पण बोरी-बंदरावरून गाडी सुटण्यास अर्धा तास उरला तरी या स्वारीचें गिरगांवांत जेवणच चाललेलें. शिवाजी मंदिरांत सहा वाजतां व्याख्यान जाहीर झालेलें, पण टिळक-मंदिरांतून खासगी चर्चा आटोपून भोपटकरांकडे परत येण्यास साडेसहा झाले तरी, चटकन् व्याख्या-नास जाण्याऐवजीं धीरे धीरे त्यांचें मुखमार्जन होत असलेलें. रोजचीं पत्रांचीं पुडकीं येऊन पडावयाचीं. त्यांचीं उत्तरें लिहिण्याची देखील फारशी घाई नसावयाची. एक दोन ताराच येऊन धडकल्या तर पाहावयाचें; नाहीं तर आलेल्यां आलेल्या पत्रांना उत्तराच्या अभावीं किंवा विलंबानें आपोआपच उत्तर मिळालेलें असावयाचें. या बाब-

तींत त्यांच्या बरोबरीचे पंडित जवाहरलाल एका टोंकाला व हे दुसऱ्या टोंकाला.

यासारखाच विरोध दोघांच्या चालण्यांत व वक्तृत्वांतही दृष्टोत्पत्तीस येतो. आग विझविण्यास जाणाऱ्या बंबाप्रमाणें जवाहरलाल हे नेहमीं धांवत असतात. त्यांचें भाषण चाचरत चाचरत व वाघ पाठीस लागल्यासारखें किंवा लवंगी फटाक्यांची माळ पेटविल्यासारखें असावयाचें. शरीरयष्टि तेजस्वी असली तरी पोरसवदा खरीच. वागणुक सुद्धां थोडी बालिश व लाडिकपणाची म्हटली तरी कांहीं खोटें नव्हे. सुभाषबाबूंचें याच्या अगदीं उलट. देह भव्य; चेहेरा बुद्धासारखा गभीरसत्त्व; अंगावर मोहक कांति; डोळ्यांत स्वातंत्र्यलालसेच्या पाण्याची चमक; गति आत्मविश्वासाची द्योतक व हत्तीसारखी मंद; प्रशमशुचित्वाशीं संवादी असा पांढरा स्वच्छ खादीचा बंगाली पोषाख; व्याख्यान प्रभुत्वाच्या उत्कर्षानें विनटलेलें; त्यांचे गुरुजी देशबंधु दास यांच्यासारखें पावसाळ्यांत घाटांत कड्यावरून खालीं पाणी कोसळावें तसें नाहीं; पंडित मालवीयांच्यासारखें जान्हवीतोयहि नाहीं; महात्मा गांधींच्या सारखें 'लघुसंदेशपदा सरस्वती' अशा वर्णनालाहि पात्र होण्यासारखें नाहीं; राजगोपाळाचार्यांच्यासारखें मुद्देसूद व तीक्ष्ण नाहीं; मौलाना शौकतअल्लींच्यासारखें शब्दबंबाळ नाहीं; महंमद अलम किंवा पट्टाभी सीतारामय्या यांच्यासारखें महाबळेश्वराच्या किंवा अंबोली घाटांतील पावसाप्रमाणेंहि नाहीं. तर वर्षाकाळीं बोरघाटच्या निसर्गसौंदर्यामधून वाट काढीत काढीत वर येणाऱ्या डेक्कन क्वीनमधील प्रवासासारखें अथवा भुईनळ्यानें लावलेल्या शोभेच्या दारूच्या झाडासारखें.

देशाभिमानानें उद्दीपित झालेली, स्वार्थत्यागानें ललामभूत झालेली, स्वभावानें सर्वप्रिय झालेली, कृतीनें व यशानें महामान्य झालेली व भावी विजयाच्या आकांक्षेनें शुभसूचक भासणारी अशी ही लोको-

तर मूर्ति दृष्टीस पडली म्हणजे भवभूतीच्या नाटकांत माल्यवानानें काढलेलें भार्गवाचें चित्र कां बरें आठवणार नाहीं? दृढनिश्चयाचीं दर्शक अशीं जड व ठाम पावलें टाकीत चालतांना त्यांना देखलें म्हणजे 'धीरोद्धता नमयतीव गतिर्धरित्रीम्' ही कुशवर्णनाची ओळ मनांत येणारच. दासबाबू त्यांना वारंवार 'पोक्त तरुण' (Young old man) असें गमतीनें संबोधीत याचें स्मरण झालें म्हणजे 'कौमारकेऽपि गिरिवद्गुरुतां दधानः' हा पुढला श्लोकचरण ओंठावर साहजिकच यावा.

'Who lives, 'if Bengal dies?' I stand for an Independent Indian Republic.' 'Freedom is to me an end in itself. It is something priceless beyond measure.' 'Freedom is a necessity for the human soul as oxygen is for the human lungs.' 'Self-conscious youth will not only act, but will also dream; will not only destroy but will also build.' 'बंगाल मेला तर कोण जगणार?' 'भारतवर्ष हें संपूर्ण स्वतंत्र राष्ट्र व्हावें असें माझें मत आहे.' 'स्वातंत्र्याकरितां स्वातंत्र्य हें माझें ब्रीद. स्वातंत्र्याला दुसरें तिसरें मोल नाहीं.' 'फुफ्फुसांना जसा ऑक्सिजनवायु तसें आत्म्याला स्वातंत्र्य.' 'तरुणांत स्वतःची जाणीव निर्माण झाली म्हणजे ते कर्तबगारी गाजवितील इतकेंच नव्हे, तर त्यांना स्वप्नेंहि पडूं लागतील. ते विध्वसंक कार्य करून थांबतील असें नव्हे, तर विधायक रचनाहि तेच करूं शकतील.' हे त्यांच्या व्याख्यानांतील स्फूर्ति-स्फुलिंगाप्रमाणें असलेले उद्गार वाचावे.

बंगाल ऑर्डिनन्सखालीं अटकेंत असतां त्यांना क्षयाची भावना झाली. कांहीं अटींवर बंगाल सरकार त्यांस सोडण्यास तयार झालें. त्या वेळीं त्यांनीं आपले बॅरिस्टर बंधु शरच्चंद्र बोस यांस ब्रह्मदेशां-

तील इनसाईन तुरुंगांतून १९२७ सालीं ता. ४ एप्रिल रोजीं, त्या अपमानकारक निर्बंधाचा निषेध करणारें पत्र लिहिलें त्यांतील खालील उतारा वाचावा:

'Thank God. I am at peace with myself, and I can face with perfect equanimity any ordeal that He in His wisdom may choose to visit me with. I regard myself as doing penance in my own humble way for the past sins of our nation and I am and shall be happy in my atonement. Our thoughts will not die, our ideas will not fade from the nation's memory and posterity will be heir of our fondest dreams. This is the faith which will sustain me in my tribulation for ever and for ever !'

'परमेश्वराची खैर म्हणावयाची कीं, आहे या स्थितींत माझें मन समाधान पावत आहे. जें दिव्य देव माझ्यापुढें करील त्यांतून मी न डगमगतां पार पडेन. आपल्या मायभूमीनें जीं पापें पूर्वी केलीं त्यांच्या निवृत्तीकरितां मी माझ्या सामर्थ्याप्रमाणें तप करीत आहें अशी माझी समजूत आहे. या प्रायश्चित्तांतच मला सुख वाटत आहे. आपले विचार कदापि मरण पावणार नाहींत. स्मृतिपटलावरून आपल्या कल्पना केव्हांहि कोमेजून जाणार नाहींत. भावि पिढी आपल्या सुखस्वप्नांची वारसदार होईल. हा विश्वास हाच माझ्या कष्टमय अवस्थेंत माझा आधारस्तंभ.' त्यांच्या पत्रांतील हीं वाक्यें वाचलीं म्हणजे तर 'वीरो रसः किमयमेत्युत दर्प एव' या उपर्युक्त श्लोकाची शेवटची ओळ अभावितपणें मुखांतून निघून जाते. खरोखर ज्यांनीं सुभाषबाबूंना १९२८ च्या कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं स्वयंसेवकदलाचे सरसेनापति (General Officer Commanding) म्हणून लष्करी पोषाकांत, राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष पंडित

मोतीलाल नेहरू यांच्या मिरवणुकीचे पुढें, घोड्यावर बसलेले पाहिलें त्यांना तर वीररस रूपास आला कीं काय, देशभक्तीनें नरदेह धारण केला कीं काय, स्वार्थत्यागाचा साक्षात् अवतार झाला कीं काय, असा संशय आला ! तो देखावा असा कीं, मेकॉलेसाहेबांनीं आपल्या एका ग्रंथांत वर्णिल्याप्रमाणें, एकदां पाहावा व जन्मभर आठ-वीत राहावा.

त्यांच्या शौर्याची व स्वार्थत्यागाची किती म्हणून कसोटी पाहावी ? तीनदां तुरुंगवास पदरीं आला तरी त्याची क्षिति नाहीं. एकदां देशसेवेचें सतीचें वाण घेतलें तें घेतलें. स्वार्थत्यागाची तर पराकाष्ठा ! आय. सी. एस्. ची परीक्षा उतरलेली. पण नागपूरच्या राष्ट्रीय सभेंत असहकारितेचा ठराव मंजूर झाल्यावर, हक्काच्या सरकारी नोकरीवर लाथ मारून, देशबंधु चित्तरंजन दास यांना येऊन ते मिळाले. बंगालच्या राष्ट्रीय महाविद्यालयाचे आचार्य झाले. कांहीं दिवस दासबाबू मेयर असतांना सुभाषबाबू कलकत्ता कार्पोरेशनचे चीफ एक्झिक्यूटिव्ह ऑफिसर झाले. स्वतः मेयर होण्याचाहि असामान्य मान त्यांना मिळाला. दासांच्या 'फॉरवर्ड' पत्राच्या संपा-दकत्वाचें कामहि त्यांनीं केलें. स्वराज्यपक्षाचे एक अग्रणी म्हणून प्रांतिक कायदेमंडळांतहि त्यांनीं उत्कृष्ट कामगिरी बजावली. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा नापास झाली म्हणून सार्वजनिक क्षेत्रांत उडी घालणारे थोर गृहस्थ, हाताच्या बोटांवर मोजण्याइतके कां होईना, पण सांपडतील. परंतु परीक्षा चांगल्या तऱ्हेनें पास होऊन, पाया-पाशीं लोळत आलेली सरकारी नोकरी दूर लोटून, राष्ट्रकार्याला सर्वस्व अर्पण करणारा पुरुष म्हणजे सुभाषबाबूच 'एकमेवाद्वितीय' दिसतात. असे महानुभावित्वाचे अंगीं गुण व दासबाबूंनीं हातांत धरलें; मग काय कमी ? दासांच्या पाठीमागें बंगालचें नेतृत्व तर त्यांच्या शिरावर पडलेंच. शिवाय आखिल भारतांतील तरुणांच्या

गळ्यांतील ते सांप्रत कंठमणि होऊन बसले. कवि म्हणतो:—

सिध्यंति कर्मसु महत्स्वपि यन्नियोज्या:
संभावनागुणमवेहि तमीश्वराणाम् ।
किं वा भविष्यदरुणस्तमसां विभेत्ता
तं चेत् सहस्रकिरणो धुरि नाकरिष्यत् ॥

हें कांहीं अंशीं वस्तुस्थितीस धरून असें मानलें तरी, 'प्रभवति शुचिर्बिंबोद्ग्राहे मणिर्न मृदां चयः' व 'पात्रविशेषन्यस्तं गुणांतरं व्रजति शिल्पमाधातुः' हेंहि तितक्याच प्रमाणांत खरें असल्याचें व्यवहारांत अनुभवास येतें. तें कांहीं असलें तरी गुरु-शिष्यांची अशी जोडी विरळा. भारतांतील दाखलाच द्यावायचा तर द्रोणार्जुनांचा, इतर कोणाचा नाहीं.

पाहिलें तर वय अवघें चौतीस. अजून अविवाहित. शिक्षणक्रम देखील, एकदां प्रोफेसर ओटन यांजवर हल्ला केल्याच्या आरोपावरून प्रेसिडेन्सी कॉलेजांतून काढून लावल्यामुळें व एकदां स्वतःच्या डोक्यांत यतिधर्म स्वीकारण्याची लहर आल्याकारणानें हरिद्वार, वृंदावन इकडे कॉलेज सोडून निघून गेल्याकारणानें, असा दोनदां त्रुटित झाला तरी तो लवकर पुरा केला. आई अक्षरशः अष्टपुत्रा सौभाग्यवती. तिचें बाळकडूं म्हणून म्हणा अगर दुसऱ्या कोणत्या कारणानें म्हणा, त्यांना बालपणापासून लोकसेवेची आवड. त्या लोकसेवेच्या उपजत इच्छेला दासबाबूंच्या सहवासानें योग्य अवसर मिळाला. बंगाली लोक जात्याच ध्येयवादी. व सुभाष तर वंगदेशाच्या करपुतळीसारखे. सरोजिनी बाईनीं १९२२ च्या गया कॉंग्रेसच्या वेळीं प्रथमच सुभाषबाबूंना दासबाबूंच्या बरोबर पाहिलें. बाईंची दृष्टि नेहमींच काव्यदृष्टि. त्या एकदम म्हणाल्या: He has the genius of Bengal on his face and youth on his brow.' ( त्यांच्या चेहऱ्यावर बंगालची बुद्धिमत्ता व कपाळावर तारुण्य दृष्टीस पडत

आहे.) हे उद्गार शंभराच्या वर टक्के खरे ठरले. नुसत्या बंगालचेच काय, सुभाषबाबू आज सर्व भारतीय युवकसमाजाचे अध्वर्यु गणले जातात. कोठल्याहि प्रांतांत युवकपरिषद् असो, तिच्या अध्यक्ष-स्थानाची सुपारी सुभाषबाबूंकडे निश्चयानें यावयाची. तसेंच ज्या गांवीं त्यांनीं जावें त्या गांवांतील एखाद्या कॉलेजाचें संमेलन असलें कीं तन्निमित्त भाषण करण्याचें आमंत्रण त्यांनाच यावयाचें.

महाराष्ट्राविषयीं त्यांना पहिल्यापासून आदर. हा प्रांत इतरांहून कांहीं तरी आगळा आहे ही मनोमय खात्री. त्यांत सुदैव असें कीं टिळकांना ब्रह्मदेशांत ज्या कारागृहांत ठेवण्यांत आलें होतें तेथेंच सुभाषबाबूंनाहि ठेवण्यांत आलें. हें आपलें विलक्षण नशीब असें त्यांना अजूनहि वाटतें व टिळकांच्या अध्याहृत सहवासाचा ठसा त्यांच्या मनावर कायम स्वरूपांत उमटलेला दिसतो. चालू पिढींतील तरुण कार्यकर्ते अहंमन्यतेनें म्हणतात, १९२० सालाच्या पूर्वींचें राजकारण आम्हांस माहीत नाहीं. सुभाष आपलें नातें दासांबरोबर टिळकांशीं साभिमान जोडतात. बंगाल–महाराष्ट्र आम्ही दोघे भाऊभाऊ असें ते मानतात. म्हणून तर ते प्रांतिक परिषदेचे मागें अध्यक्ष झाले व आतां प्रथम महाराष्ट्र युवकपरिषदेचे अध्यक्ष होण्याचें, बंगाल प्रांताची परिस्थिति अतिशय नाजुक असून देखील, त्यांनीं कबूल केलें. स्वतःच्या कार्यापेक्षां मित्रकार्य गुरुतर वाटावें हें तर साधु जनांचें व दुसऱ्या नरश्रेष्ठांचें लक्षण.

देशांतील तरुणांच्या अंतःकरणांतील भावना त्यांच्या अंतःकरणांत आरशाप्रमाणें प्रतिबिंबित झालेल्या दिसतात, मग ते एवढे प्रिय व्हावे यांत नवल तें काय? राष्ट्राला स्वातंत्र्यप्राप्ति करून देणें हें साध्य. त्यासाठीं घरादारावर, आत्मसुखावर, फार काय, जीवितावर तुळशीपत्र ठेवलेलें. सत्तावीस सालीं अत्यवस्थ आजारी पडल्यामुळें सरकारनें त्यांना मुक्त केलें. लगेच पाटणा येथें भाषण केलें. त्यांत

म्हणाले, "आपणांस आजारी पडण्यास सवड नाहीं." इतकी जबरदस्त ध्येयपूर्तीसाठीं तळमळ व पोटतिडीक. प्लूटार्कनें ईपॅमिनोंडास या रणधुरंधर सेनानीची एक गोष्ट सांगितली आहे. लढाईला तोंड लागण्याच्या ऐन वेळींच एक चांगला योद्धा वारल्याची बातमी त्याला कोणी कळविली. तों त्यानें विचारलें 'अरे, इतकी दंगल चालू असतांना त्याला मरावयाला फुरसत कशी मिळाली?' त्या पैकींच सुभाषबाबूंचें वरील बोलणें.

तुलना करूं लागणें गैरच. प्रचलित राजकारणांत सुभाषबाबूंना जोड नाहीं, तरी पण केशवाय नमः म्हटलें कीं, नारायणाय नमः यावयाचें. तद्वत् पंडित जवाहरलाल व बाबू सुभाषचंद्र यांचीं नांवें एकदम उच्चारलीं जातात. जवळ जवळ जोडाक्षरेंच. एक तर जवाहरलालजींची चाळिशी उलटलेली. चार-पांच वर्षें त्यांनीं आपलें स्वतंत्र व्यक्तित्व, विचारसंपत्ति, ओजस्विता निःसंशय दाखविली व हिंदुस्थानचे डोळे दिपविले. अलीकडे त्यांचें पाणी कमी झालें. लाहोरच्या राष्ट्रीय सभेंत त्यांच्या प्रभेचा मध्यान्ह झाला. महात्मा गांधींच्या संप्रदायाच्या लोंढ्यांत ते वाहवले. सुभाषबाबूंची प्रथा सर्वथा वेगळी. त्यांच्या स्वातंत्र्याच्या ध्येयांत हीण नाहीं. महात्मा गांधी स्वातंत्र्याचें खोटें माप मागूं लागले, तेव्हां कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत वीरपोताप्रमाणें विरोध करण्यास कचरले नाहींत. बोलघेवडे श्रीनिवास अय्यंगार परीक्षेच्या प्रसंगीं बारगळले. राष्ट्रीय सभेच्या स्वातंत्र्याच्या ध्येयाचे आद्यप्रवर्तक पं. जवाहरलाल यांनीं दांतओंठ चावले तरी अखेरीस ते महात्माजींना बधले. सुभाष एकटे पायावर खंबीर राहिले. कराचीस देखील परिस्थितीमुळें सुभाषबाबूंनीं राष्ट्रीय सभेच्या चालकांशीं दोन हात करण्याचें टाळलें, पण ध्येय सोडलें नाहीं.

त्यांच्या स्वातंत्र्याच्या निस्सीम निष्ठेंत हिंदी संस्कृतीविषयीं दुर्दम्य

अभिमानाची बहुमोल भर पडल्यामुळें त्यांचें ध्येय अधिकच खुलून दिसतें. इतर समवयस्क पुढारी व हे त्यांच्यांत हा मोठा फरक वाटतो. स्वातंत्र्य पाहिजे, स्त्रियांनीं सार्वजनिक चळवळींत अवश्यमेव भाग घेतला पाहिजे, समाजसत्तावाद पाहिजे, पाश्चात्य सुधारतील क्षीर तेवढें पाहिजे; तथापि आपल्या अभिजात परंपरागत संस्कृतीचें संरक्षण केलेंच पाहिजे, असें त्यांचें मत. पूर्वजांविषयीं अभिमान तर त्यांच्या मनाच्या कोंदणांत हिऱ्याच्या खड्यासारखा बसविलेला. काय कॉम्युनिझम म्हणतां ? आमच्याकडे आसामांत खासी लोक तर त्यांतच वावरतात. काय लोकशाही म्हणतां ? के. पी. जयस्वाल यांचें पुस्तक पाहा; लोकशाही अस्तित्वांत असलेली ८१ संस्थानांची यादी तुम्हांला सांपडेल. हिंदी संस्कृति ही एक विशाल नदी आहे. ती कालाच्या दोन तीरांमधून सारखी वाहात चालली आहे; अनेक लहानमोठे जलप्रवाह तींत येऊन समरस होऊन जात आहेत. ही त्यांची कल्पना. अतएव कोंवळ्या मनाच्या भावनाप्रधान तरुणांना त्यांचा आग्रह असा कीं, 'मार्क्स, बाकुनिन' यांच्या लिखाणांच्या लाटांवर शीड नसलेल्या जहाजाप्रमाणें गटंगळ्या खाऊं नका; हिंदी मनोभूमिका फार भिन्न; परंपरा वेगळी; त्यांना अनुसरून जरूर त्या नवीन घटना बनवा.

गेल्या जून महिन्यांत सुभाषबाबू येथें आले होते. तात्यासाहेब केळकरांकडे दुपारचा चहा चालला होता. केळकरांसारखाच त्यांनाहि वेळेस एका कपाहून जास्त चहा लागतो. ते स्पष्ट सांगतातच कीं कपभर पिऊन झाल्यावर जो आपण चहा घेतों व गप्पा मारतों त्या गप्पांची लज्जत और असते. त्यावेळीं ते नेहमींच्या आनंदी वृत्तीनें व विनोदी स्वभावास अनुसरून म्हणाले, 'केळकर जर दीड कप चहा घेत असतील तर मग मी त्यांचा अनुयायी आहें म्हणावयाचें.' काय योगायोग असेल तो खरा. हल्लींची राष्ट्रीय

सभा व सुभाष यांची नीटशी सांधेजोड जमत नाहीं एवढें उघड आहे. दासबाबू व पंडित मोतीलाल यांचें सूत नव्हतें. बंगाल हें क्रांतिकारकाचें आगर म्हणून महात्मा गांधींच्या मनांत आढी. त्यांत दासबाबूंनीं स्वराज्यपक्षाच्या प्रतिष्ठापनेंत पुढाकार घेतला. सुभाष बोस त्यांचे अत्यंत निष्ठावंत व विश्वासू मानसपुत्र. सरकारहि सुभाष-बाबूंना क्रांतिकारकांचे पाठीराखे समजतें. या सर्वांचा एकंदर परिणाम असा झाला आहे कीं राष्ट्रीय सभेच्या गाभाऱ्यांत सुभाषबाबूंना मज्जाव. दासबाबूंच्या नंतर बंगाल प्रांतिक कॉंग्रेस कमिटींत सतत मारामारी सुरू आहे. ती तोडण्याकरितां पं. मोतीलालजींची योजना मागें झाली. तेव्हां त्यांनीं समक्ष कलकत्त्यास जाऊन, सुभाषबाबूंना बाजूस सारून, बॅरिस्टर सेनगुप्त यांच्या शिरावर प्रांतिक कॉंग्रेसच्या अध्यक्षत्वाचा, कॉर्पोरेशनच्या मेयरशिपचा व कौन्सिलांतील स्वराज्य पक्षाच्या नायकत्वाचा असा तिकोनी मुकुट ठेवला. यंदा पुनः कॉंग्रेसच्या निवडणुकीची कटकट निघाली. आमच्या बापूजी अण्यांची पंच म्हणून नेमणूक वर्किंग कमिटीनें केली. तडजोड अशी झाली कीं, सुभाषबाबूंना प्रांतिक कमिटींतून सर्वस्वीं अंगच काढून घेणें योग्य वाटलें. अनिर्वाह पक्ष म्हणून एक वर्ष त्यांना पं. जवाहरलाल व डॉ. सय्यद महंमुद यांच्याबरोबर राष्ट्रीय सभेचे चिटणीस निवडलें. पण बहारीची गोष्ट अशी कीं, कॉंग्रेसचे पत्रांचे कागद छापले त्यांत डाव्या कोपऱ्यांत नांवें दोनच, सुभाषबाबूंचें नाहींच. कांहीं महिन्यांपूर्वी एकाच ठिकाणच्या दोन विभागलेल्या परिषदांचें अध्यक्षस्थान सरदार वल्लभभाई पटेल व बाबू सुभाषचंद्र यांस देण्यांत आलें. परिषदांच्या तारखांपूर्वी सुभाष बार्डोलीस गेले. तेथें त्यांना त्यांच्या दर्जास अनुरूप असें वागविण्यांतहि आलें नाहीं म्हणतात. कराचीहून परत जातांना महात्मा गांधींनीं त्यांच्याबरोबर खाजगी मनमोकळी चर्चा करण्याकरितां आपल्याबरोबर दिल्लीपर्यंत मुद्दाम घेतलें. गांधी सुद्धां त्यांचें मन काबीज करूं शकले नाहींत.

राष्ट्री : सभेनें त्यांना झिडकारलें तरी त्यांत सुभाषबाबूंसारख्या राजकीय कर्मयोगी तपस्व्याची काय हानि होणार ! माळ्यानें बागेंतील बकुळीच्या झाडाला पाणी घातलें नाहीं तरी, आपल्या निसर्गदत्त सौरभ्यानें, तें मधुपांना आकृष्ट करणारच व त्यांच्या गुणगुणण्यानें दाही दिशा निनादून टाकणारच हें सांगणें नलगे. विधाता रागावला तर हंसाच्या कमल-निवासाचा विलास नष्ट करूं शकतो, पण त्याच्या वैदग्ध्यकीर्तीला उणेपणा आणूं शकत नाहीं, हें सुभाषितकारांचें आप्तवाक्य. सिंहाला झालें तरी वनराज म्हणून अभिषेकसंस्कार का कोणी करावयास गेलें आहे ! ती त्यांची स्वयंभू पदवी होय. ते त्यांच्या विक्रमशालित्वाचें फळ होय. आतांपर्यंत झाली ही सुभाषबाबूंच्या सार्वजनिक कामगिरीची केवळ प्रस्तावना म्हटली तरी चालेल. अर्धेअधिक आयुष्य अद्यापि जावयाचें आहे. चंद्रिका प्रभा फाकूं · गली आहे. चंद्र उदयोन्मुख झाला आहे. कलमावर गुलाबकळी विकास पावूं लागली आहे. प्रफुल्ल पुष्पापेक्षां कलिकाच अधिक सुंदर व मधुर असते असा कविसंकेत आहे. नुकताच उगवूं लागलेला असा बीजेचा चांद अधिक पुण्यकारक असें मानतात. कोणी कांहीं म्हटलें तरी योग्यकाळीं कळी पूर्णपणें फुलते व शशांकहि आपल्या षोडश कलांच्या संभारानें जगतास आनंदमय व सुखकर प्रकाशांत बुडवून टाकतो. परमेश्वर करो आणि सुभाषचंद्र बोस यांना भरपूर आयुरारोग्य लाभो आणि त्यांच्या अंगच्या उदात्त गुणसमुच्चयाचा, राष्ट्राच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या महत्कार्यांत, उत्तरोत्तर अधिक उपयोग होवो ! प्रिय सुभाष, आपलें झालें हें कार्य दिव्य आहेच; पण आपला भावी काल हा रम्यतर होणार असें अनुमान काढणें अनाठायीं बिलकुल नाहीं. आणि म्हणूनच नाशिकच्या गोविंद कवीच्या भूपाळींतील शब्दांनीं आपणांस सांगतों—

मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचे बुडबुडे ॥
तुझ्यावर ॥ शब्दांचे बुडबुडे ॥
तुझे पवाड गातिल पुढतीं तोफांचे चौघडे ॥